
कविकुलगुरु - कालिदास - संस्कृत - विश्वविद्यालयः

शीर्षक	:—	कार्तिकमास माहात्म्य M642
ग्रंथकार /लिपिक	:—	——————————
पृष्ठे	:—	115
काळ	:—	शके 1834
विषय	:—	धर्मशास्त्र
स्वरूप	:—	संपुर्ण
लिपी	:—	देवनागरी/नंदिनागरी/मोडी/तेलुगु/शारदा/नेवारी/ग्रंथ

M642

॥ अथ सार्थं कार्तिकमाहात्म्यम् ॥

M642



॥ अथ कार्तिकमासमाहात्म्यविषयानुक्रमणिका ॥

॥ इति कार्तिकमासमाहात्म्यविषयानुक्रमः ॥

अथ कार्तिकमासमाहात्म्यविषयानुक्रमणिकाः ।

१८ विष्णुकृतो जलंधररूप धारण पुरःसरं वृंदापातिव्रत्यभंग

रत्यन्ते विष्णुरूपदर्शनादीति क्रुद्धवृंदाकृतं विष्णुं प्रतिशापकृत

भार्याहरणाद्दुःखितस्य कपिसहायवद्वः अरण्यभ्रमणं वृंदायाअनल

भक्षिविनिइत्यपदानपुरःअरंप्रग्निप्रवेशवर्णनं

...भायागौरीदर्शनेनशंभो-

...पदानं,पुनर्जलंधरेणसहयुद्धेज

...शवस्तुतिः, देवकृतादेवीस्तुतिः,देवी

...ण्यादेवानांगौरीलक्ष्मीसरस्वतीगमनं, तत

...जानांकार्यसिद्ध्यर्थंवृंदावनेरोपणम् ।

१८ अष्टादशाऽध्याये ॥ तद्बीजेभ्योधात्रीमालतीतुलसीत्ये

...रूपिण्योवनस्पतयःसमुद्भूताः, धात्रीतुलस्यौस्त्री

...वनस्पत्यौविष्णुंप्रतिप्रेम्णाऽपश्यतामतोविष्णोर

बभूवतुरितिवर्णनपूर्वकंविष्णोर्वैकुंठलोकेगमनम् ,

कार्तिकव्रतोद्यापनेतुलसीप्रशंसा, धात्रीमहिमा.

१९ अथैकोनविंशे;कार्तिकव्रतमाहात्म्येधर्मदत्तेतिहासः

हरिपूजनार्थंगच्छतस्तस्यमध्येमार्गे कलहाराक्षसीसमा-

विषयाः

गमः तया सहसंवादश्च, कलहायावृत्तांतनिवेदनं,कलहा-

मुक्तिविषयकयाञ्चा ।

२० विंशेऽध्याये, तस्याअंगोपरिधर्मदत्तेनाऽभिषिक्ततो-

यप्रभावाद्दिव्यरूपप्राप्तिःविमानेनसहहरिगणागमनं;गण-

कृतधर्मदत्तप्रशंसा ।

२१ एकविंशेऽध्याये धर्मदत्तेनविष्णुभक्तिविषयेप्रश्नेकृतेग-

णौहरिभक्तिमाहात्म्यंसेतिहासंकथयतः, तत्रचोलविष्णु

दासकथानकं, अनंतशयनेविष्णुपूजांकुर्वतश्चोलस्यसुवर्ण

पूजायाःविष्णुदासब्राह्मणेनतुलसीदलैराच्छादनंतयोःसं

वादपूर्वकंतस्मिन्नेवस्थलेव्रतकारित्वेनतयोर्निवासकथनम्।

२२ द्वाविंशेध्याये, चांडालरूपधारिणाअलक्षितेन वि-

ष्णुदासस्ययावत्सप्तदिनंपाकहरणं, ततोविष्णुदासस्यह-

रिदर्शनं, वैकुंठगमनंच, चोलस्य भक्त्यैवविष्णुप्राप्तिर्भ-

वतीतिनिश्चित्य भागिनेयंराज्येऽभिषिच्ययज्ञकुण्डेपत-

नम् तदाविष्णुःप्रादुर्भूयचोलंगृहीत्वास्वधामप्रत्यपद्यत।

२३ त्रयोविंशेध्याये, जयविजयेतिहासः हरिक्षेत्रवर्णनं

॥ १ ॥

विषयाः.

हरिगणाभ्यांधर्मदत्तस्य विष्णुव्रतोपदेशःततस्तस्या-

...ः ।

...विंशेध्याये; कृष्णावेण्योर्माहात्म्यंतत्रब्रह्मदेवय-

...देवानांस्वराशापेननदीत्वप्राप्तिवर्णनम् ।

...शेध्याये; नारदस्यस्वस्थानगमनंश्रीकृष्णकृत-

...प्रशंसा, अदत्तंपुण्यंकथंलभ्यतेइतिसत्यभा-

...ासंबंधं यावत्पुण्यंलभ्यतेतन्निरूपणम् ।

...ाये; पुण्यभागलाभविषये अवंतीपुर-

...ः तत्रतस्यात्यंतदाःशील्यवर्णनं,

...शीतलत्वदर्शनेनकौतुकावि

...षिभिस्तुलसीदलमिश्र-

...यंकंभीपाकयातना-

अ० विषयाः

२८ अष्टाविंशेऽध्याये, वासुदेव इत्थंसत्यायैकार्तिकमाहा-

त्म्यंकथयित्वासंध्यादिकर्माकरोत्. आपद्गतेनकथंकार्ति-

कनियमाअनुष्ठेयाइतिऋषिप्रश्नेसूतेनापत्तिविषयेव्रतानु-

ष्ठानंनिरूपितम्, अश्वत्थवटमहिमा.

२९ एकोनत्रिंशेऽध्यायेऽश्वत्थस्यास्पृश्यत्वंकुतइतिप्रश्ने-

सूतः समुद्रमथनादाविर्भूतायाऽलक्ष्म्यास्तत्तलवासइतिस-

कथानकंनिरूपयामास।

३० त्रिंशेऽध्याये; सर्वमासेभ्यः कार्तिकस्यैवमुख्यत्वंकु-

तइतिसत्यभामाप्रश्ने कृष्णःसूतोक्तमहेश्वरस्कंदसंवादंप्रा-

स्तौत्, तत्रईश्वरकृताकार्तिकप्रशंसा, चतुर्विधस्नानलक्षणं

तन्महिमाच ।

३१ एकत्रिंशेऽध्याये, कार्तिकमासेभोजनदानप्रभृतिदा-

नमहिमा, परान्नवर्जनचांद्रायणतैलमधुवर्जनप्रभृतयो-

...तत्रपलाशपत्रभोजनप्रशंसा, तुलसीपत्रैर्हरिपूजन-

...।

... माघस्नानं, शूकरक्षेत्रमाहात्म्यम् ।

॥ इति कार्तिकमासमाहात्म्य विषयानुक्रमः संपूर्णः ॥

॥ श्रीगणेशायनमः ॥ ॥ सूतउवाच ॥ एकदाद्वारकामागादृषिःकृष्णदिदृक्षया ॥ पुष्पाण्यादा
यदिव्यानिकल्पवृक्षोत्थितानिच ॥१॥ नारदंस्वागतेनासौकृष्णःसत्कारमाचरत् ॥ इदमर्घ्यमि-
दंपाद्यमित्युवाचासनंददत् ॥ २ ॥ नारदस्तानिपुष्पाणिकृष्णायोपजहारच ॥ कृष्णःषोडशसाह-
स्रस्त्रीभ्यस्तानिव्यभज्यत् ॥ ३ ॥ विस्मृत्यसत्यभामांतुसर्वाभ्यस्तान्यदात्प्रभुः ॥ सत्यभामाततःक्रु-
द्धाक्रोधागारंसमाविशत् ॥४ ॥ समाज्ञायततःकृष्णस्तत्रगत्वासमाहितः ॥ सत्यभामांमानयित्वागरु-
डंमनसास्मरन् ॥५ ॥ स्मृतमात्रस्तुगरुडस्तदागत्याग्रतःस्थितः ॥ आरुह्यवेगात्पत्रंतमित्युवाचप्रि-
यांप्रभुः ॥६॥ सत्येत्वमाकृथाःक्रोधंत्वत्कृतेदैवतैःसह ॥ विरुध्यदेवराजानंरोपयिष्येतवांगणे ॥७ ॥

कल्पद्रुमंमहाभागेपराधंमेक्षमांकुरु ॥ इतिकृत्वाप्रतिज्ञांतुकृष्णःससत्यभामया ॥ ८॥ देवलोक-
मगात्तूर्णंयत्रदेवःसवृत्रहा ॥ याचितःकल्पवृक्षार्थमुत्तरंदत्तवान्प्रभुम् ॥ ९॥ नायंदेवद्रुमोभूम्यांप्रा-
प्तुंयोग्यस्त्वयाप्रभो ॥ तदाक्रुद्धोमहाबाहुर्वृक्षमुत्पाट्यमूलतः ॥ १० ॥ वाहमारोपयामासवेगेन
बलवत्तरः ॥ तदावज्रधरोवेगाद्वज्रमुद्यम्यवीर्यवान् ॥ ११ ॥ गरुडंताडयामासकल्पवृक्षंत्यजेरि-
ति ॥ तदापत्ररथःपत्रंकुलिशस्यापिगौरवात् ॥ १२॥ एकंविसर्जयामासत्वरयाप्रजगामच ॥
तेनवज्रप्रहारेणत्रयोऽभूवन्पतत्रिणः॥ १३॥ मयूरोनकुलश्चाषःकृष्णोद्वारवतीमगात् ॥ आगत्य
सत्यभामायागृहेहैनमरोपयत् ॥ तदैवनारदोभ्यागात्सत्ययामानितोबहु ॥ १४ ॥ सत्यभामोवाच

॥ ईदृशःकल्पवृक्षोयंपतिरेताहृशःप्रभुः ॥ भवेभवेकथंप्राप्यस्तदाख्यातुभवान्मम ॥ १५॥ इति
पृष्टस्तदाप्राहनारदोमुनिसत्तमः ॥ प्राप्यतेसत्यभामेयंतुलापुरुषदानतः ॥ सत्यभामातदाकृष्णंक-
ल्पवृक्षसमन्वितम् ॥ १६॥ नारदायैवसाप्रादात्तोलयित्वाविधानतः ॥ सवोपस्करमाकृष्यनारद-
त्रिदिवंययौ ॥ १७॥ सूतउवाच ॥ श्रियःपतिमथामंत्र्यगतेदेवर्षिसत्तमे ॥ हर्षोत्फुल्लाननासत्या-
वासुदेवमथाब्रवीत् ॥ १८ ॥ सत्यभामोवाच ॥ धन्यास्मिकृतकृत्यास्मिसफलंजीवितंचमे ॥ मज्ज-
न्मनिनिदानंचधन्यौतौपितरौमम ॥ १९ ॥ यौमात्रैलोकसुभगांजनयामासतुर्ध्रुवम् ॥ षोडशस्त्रीसह-
स्राणांवल्लभाहंयतस्तव ॥ २० ॥ यस्मान्मयादिपुरुषःकल्पवृक्षसमन्वितः ॥ यथोक्तविधिनासम्यङ्ना-
रदायसमर्पितः ॥ २१॥ यद्वार्तामपिजानंतिभूमिसंस्थानजंतवः ॥ सोयंकल्पद्रुमोगेहेममतिष्ठतिसांप्रतम्

॥२२॥ त्रैलोक्याधिपतेश्चाहंश्रीपतेरतिवल्लभा ॥ अतोहंप्रष्टुमिच्छामिकिंचित्त्वांमधुसूदन ॥२३॥ यदित्वंमत्प्रियकरःकथयस्वात्रविस्तरात् ॥ श्रुत्वातच्चपुनश्चाहंकरोमिहितमात्मनः ॥२४॥ यथाकल्पं-त्वयादेववियुक्तास्यांनकर्हिचित् ॥ सूतउवाच ॥ इतिप्रियावचःश्रुत्वास्मेरास्योयंगदाग्रजः ॥२५ ॥ स-त्याकरेकरंकृत्वागमत्कल्पतरोस्तलम् ॥ निषिध्याऽनुचरंलोकंसविलासंप्रियान्वितः ॥ प्रहस्यसत्या-मामंत्र्यप्रोवाचजगतांपतिः ॥२६॥ तत्प्रीतिपरितोषार्थंलसत्पुलकितांगजः ॥२७॥ कृष्णउवाच ॥ नमेत्वत्तःप्रियतमाकाचिदन्यानितंबिनी ॥ षोडशस्त्रीसहस्राणांप्रियेप्राणसमाह्यसि ॥२८॥ त्व-दर्थंदेवराजेनविरोधोदैवतैःसह ॥ त्वयायत्प्रार्थितंकांतेशृणुयच्चमहद्भवेत् ॥२९॥

॥ श्रीगणेशायनमः ॥ एकदां नारद देवाधिदेव भगवंताच्या दर्शनाकरितां स्वर्गलोकाहून द्वारकेस गेले ॥ १ ॥ नंतर भक्तीनें कृष्णाची पूजा करून कृष्णाला एक पारिजातकाचें फूल देते झाले ॥ २ ॥ कृष्णानीं तें फूल घेऊन रुक्मि-णीला दिलें; इतक्यांत नारदांनीं त्वरेनें जाऊन ती सर्व हकीगत सत्यभामेला सांगितली. मग भगवान् कृष्ण सत्य-

॥ श्रीगणेशायनमः ॥ एकदास्वर्गलोकाद्वैनारदोद्वारिकांगतः ॥ दिदृक्षयाभगवतोदेवदेवस्यवेधसः ॥ १ ॥ दृष्ट्वाकृष्णंततःपूजांकृत्वाभक्तिसमन्वितः ॥ पारिजातस्यपुष्पैकंददौभगवतेतदा ॥ २ ॥ कृष्णोपितद्गृहीत्वातुरुक्मिण्यैदत्तवांस्तदा ॥ एतस्मिन्नंतरेचैवनारदोमुनिसत्तमः ॥ ३ ॥ सत्यभामामगात्तूर्णंकथयामाससर्वशः ॥ ततोजगामभगवान्देवदेवोजनार्दनः ॥ ४ ॥ श्रीवत्सलांछनधरःसत्यभामागृहंप्रति ॥ दृष्ट्वाप्रियांचविमनामेकांतेसमुपस्थिताम् ॥ ५ ॥ प्रहस्यचजगन्नाथोवासुदेवोब्रवीदिदं ॥ प्रियेकुतोसिविमनास्तद्वदस्वममाग्रतः ॥ ६ ॥ ततोब्रवीत्सत्यभामाक्रोधप्रस्फुरिताधरा ॥ मंदारपुष्पंकस्मात्त्वंरुक्मिण्यैदत्तवानसि ॥ ७ ॥

भामेच्या गृहीं गेले तों आपली प्रिया दुःखित होऊन एकीकडे बसली आहे असें त्यांनीं पाहिलें ॥ ३ ॥ ४ ॥ ५ ॥ तेव्हां भगवान् हसून ह्मणाले हे प्रिये! तुला कशापासून दुःख झालें तें मला सांग ॥ ६ ॥ तेव्हां रागानें जिचे ओंठ थरथर कांपत आहेत अशी सत्यभामा ह्मणाली कीं पारिजाताचें फूल मला न देतां तुह्मीं रुक्मिणीला कां दिलें ॥ ७ ॥

तेव्हां वासुदेव बोलले कीं तूंही माझी आवडती आहेस. तुलाही मी पारिजाताचें पुष्प देईन; नंतर पारिजात वृक्ष आणण्याकरितां सत्यभामेसहवर्तमान गरुडावर आरोहण करून स्वर्ग लोकास जाऊन इंद्रास जिंकून तेथील पारिजात वृक्ष उपटून घेऊन द्वारकेस आले आणि सत्यभामेला ह्मणाले, हा पारिजात वृक्ष तुला घे; तूंच मला फार प्रिय आहेस॥८॥

ततोब्रवीद्वासुदेवस्त्वंहिसत्येममांतिका ॥ ततोगरुडमानीयसमारुह्यसभार्यया ॥ ८ ॥ स्वर्गलोकमगात्तूर्णंकल्पवृक्षजिघृक्षया ॥ उत्पाट्यमंदारतरुंजित्वाह्यदितिनंदनम् ॥ ९ ॥ द्वारिकामगमत्कृष्णस्ततःप्राह प्रियांसतीं ॥ गृहाणमंदारतरुंत्वंमेपरमवल्लभा ॥ १० ॥ ततोब्रवीत्सत्यभामानारदंमुनिपुंगवम् ॥ कथयस्वमहायोगिन्ममाग्रे मुनिसत्तम ॥ ११ ॥ येनमेकृष्णविश्लेषोनभवेच्चकथंचन ॥ ततःप्राहमुनिर्वाक्यंसत्यभामांयशस्विनीम् ॥ १२ ॥ शृणुसत्येप्रवक्ष्यामियद्ददातिभुनक्तितत् ॥ तस्माद्दानंददस्वैनंनवियोगोभविष्यति ॥ १३ ॥ तथेत्युक्त्वाददौदानंनारदाययशस्विनी ततस्तुनारदःकृष्णंसंगृह्यह्यगमन्मुनिः ॥ १४ ॥

॥ ९ ॥ ॥ १० ॥ पुढें एकदा सत्यभामा मुनिश्रेष्ठ नारदाला ह्मणाली कीं हे नारदा ॥ ११ ॥ जेणेंकरून श्रीकृष्णाचा व माझा केव्हांहि वियोग होणार नाहीं असा उपाय मला सांगा. तेव्हां नारद सत्यभामेला ह्मणाले ॥१२॥ जें दान करावें त्याचाच उपभोग मिळतो या करितां कृष्णच दान दे ह्मणजे तुझा व त्याचा वियोग कधींच होणार नाहीं ॥ १३ ॥ बरें आहे असें ह्मणून सत्यभामेनें नारदाला कृष्ण दान दिला नंतर नारद कृष्णास घेऊन निघाले ॥ १४ ॥

॥ १ ॥

तेव्हां सत्यभामा नारदास ह्मणाली कीं, तूं याच लोकीं मला कृष्णाचा वियोग केलास ॥ १५ ॥ मग परलोकीं त्यांची प्राप्ति कशी होईल ? तेव्हां नारद हंसून ह्मणाले ॥ १६ ॥ जर तराजूमध्यें श्रीकृष्णास तोलून त्याचे भारंभार द्रव्य (सोनें) मला देशील तर मी ह्याला परत देतों॥ १७ ॥ तेव्हां सत्यभामेनें घरांतील सर्व जिन्नस डागिने वगैरे

ततोऽब्रवीत्सत्यभामानारदंमुनिपुंगवम् ॥ अस्मिंल्लोकेवियोगोस्यत्वयाकारिमयासह ॥ १५ ॥ परलोकेकथंत्वस्यवियोगोनभविष्यति ॥ ततोऽब्रवीन्मुनिवरःप्रहस्यवाक्यमेवच ॥ १६ ॥ तुलायांतोलयस्वैनंयेनतुल्योभविष्यति ॥ तत्प्रदेहिचमेमूल्यंतर्ह्येनंतुत्यजाम्यहम् ॥ १७ ॥ ततोगृहोपस्करणंसर्वमानीयतेनसा ॥ तोलयामासवैसत्यानचतुल्योबभूवसः ॥ १८ ॥ ततोहरिनिदेशेनसत्यभामादृढव्रता ॥ तुलसीदलमानीयतोलयामासतेनतम् ॥ १९ ॥ तेनतुल्योबभूवाथभगवान्भक्तवत्सलः ॥ ततोगृहीत्वातुदलंनारदोमुनिपुंगवः ॥ २० ॥ स्तुत्वाजनार्दनंदेवं स्वर्गलोकंजगामसः ॥ २१ ॥

वजनांत घातले तरी वजन पुरें होईना ॥ १८ ॥ तेव्हां सत्यभामेनें श्रीकृष्णाच्या आज्ञेनें एक तुळसीपत्र आणून तराजूंत टाकिलें ॥ १९ ॥ व त्या तुळसीपत्राचे बरोबर भक्तवत्सल कृष्णाचें वजन झालें व तेवढें तुळसीपत्रच नारदांनीं घेतलें ॥ २० ॥ व भगवंताची स्तुति करून नारद स्वर्गलोकास गेले ॥ २१ ॥

नारद कृष्णास विचारून गेल्यानंतर आनंदानें जिचे नेत्र प्रफुल्लित झाले आहेत अशी सत्यभामा कृष्णाला ह्मणाली ॥ २२ ॥ मी धन्य आहें, कृतकृत्य आहें, माझें जन्म सफल आहे, व माझे जन्मदाते आईबापही धन्य आहेत ॥ २३ ॥ ज्यांनीं मला त्रैलोक्यांत दैववती अशी उत्पन्न केली; कारण तुह्मांला तुमच्या सोळा हजार

श्रियःपतिमथामंत्र्यगतेदेवर्षिसत्तमे ॥ हर्षोत्फुल्लेक्षणासत्यावासुदेवमथाब्रवीत् ॥ २२ ॥ सत्योवाच ॥ धन्यास्मिकृतकृत्यास्मिसफलंजीवितं मम ॥ मज्जन्मनिनिदानेचधन्यौतौपितरौमम ॥ २३ ॥ यौमांत्रैलौक्यसुभगांजनयामासतुर्ध्रुवम् ॥ षोडशस्त्रीसहस्राणांवल्लभाऽहंयतस्तव ॥ २४ ॥ यस्मान्मयाऽदिपुरुषःकल्पवृक्षसमन्वितः ॥ यथोक्तविधिनासम्यङ्नारदायसमर्पितः ॥ २५ ॥ यद्वार्त्तामपिजानंतिभूमिसंस्थानजंतवः ॥ सोऽयंकल्पद्रुमोगेहेसदातिष्ठतिचांगणे ॥ २६ ॥ त्रैलोक्याधिपतेश्चाहंश्रीपतेरतिवल्लभा ॥ अतोहंप्रष्टुमिच्छामिकिंचित्त्वांमधुसूदन ॥ २७ ॥ यदित्वंमत्प्रियकरःकथयस्वात्रविस्तरम् ॥ श्रुत्वातच्चपुनश्चाहंकरोमिहितमात्मनः ॥ २८ ॥

स्त्रियांमध्यें मीच प्रिय आहें ॥ २४ ॥ ह्मणूनच मी भगवान् कल्पवृक्षासह यथाविधि नारदास दान दिला ॥ २५ ॥ पृथ्वीवरील लोक केवळ ज्याची वार्ताही जाणत नाहींत तो प्रत्यक्ष कल्पवृक्ष पारिजात माझे आंगणांत आहे ॥ २६ ॥ त्रैलोक्यपति देवाची मी अतिप्रिया आहें. ह्मणून तुह्मांला थोडें विचारावें अशी इच्छा आहे ॥ २७ ॥ जर तुह्मी माझे प्रियकर असाल तर विस्तारानें सांगा ह्मणजे तें मी ऐकून पुन्हा आपलें हित करीन; ह्मणजे त्यायोगानें कल्पपर्यंत तुमचा व माझा वियोग होणार नाहीं ॥ २८ ॥

सूत ह्मणाले—असें प्रियेचें वाक्य ऐकून कृष्ण हांसले ॥ २९ ॥ व तिचा हात धरून कल्पवृक्षा खालीं आले व सेवक लोकांनां दूर केलें ॥ ३० ॥ प्रियेच्या अतिप्रीतीनें संतुष्ट होऊन रोमांचित असे भगवान् कृष्ण हंसत सत्यभामेस हांक मारून म्हणाले—॥ ३१ ॥ हे प्रिये सोळा हजार स्त्रियांमध्यें तूंच एक मला प्राणाप्रमाणें अति प्रिय आहेस ॥ ३२ ॥ तुझ्या करितां

यथाकल्पंत्वयादेववियुक्तास्यान्नकर्हिचित् ॥ ॥ सूतउवाच ॥ ॥ इतिप्रियावचःश्रुत्वास्मेरास्यःसगदाधरः ॥ २९ ॥ सत्याकरंकरेधृत्वागमत्कल्पतरोःस्थलम् ॥ निषिध्यानुचरंलोकंसविलासः प्रियान्वितः ॥ ३० ॥ प्रहस्यसत्यामामंत्र्यप्रोवाचजगतांपतिः ॥ तत्प्रीतिपरितोषोत्थलसत्पुलकितांगकः ॥ ३१ ॥ श्रीकृष्णउवाच ॥ ॥ नमेत्वत्तःप्रियतमाकाचिदन्यानितंबिनी ॥ षोडशस्त्रीसहस्राणांप्रियाप्राणसमाह्यसि ॥ ३२ ॥ त्वदर्थेदेवराजेनविरोधोदैवतैःसह ॥ त्वयायत्प्रार्थितंकांतेशृणुतच्चमहाद्भुतम् ॥ ३३ ॥ ॥ सूतउवाच ॥ ॥ एकदाभगवान्कृष्णस्सत्यायाःप्रियकाम्यया ॥ वैनतेयंसमारूढइन्द्रलोकंतदागमत् ॥ ३४ ॥ कल्पवृक्षंयाचितवान्सोवदन्नददाम्यहं ॥ वैनतेयस्तदाक्रुद्धस्तदर्थंयुयुधेतदा ॥ ३५ ॥

इंद्राशीं व सर्व देवांशीं मी विरोध केला ॥ तूं पूर्वी कोणती इच्छा केलीस ती चमत्कारिक गोष्ट ऐक ॥ ३३ ॥ सूत म्हणतात—श्रीकृष्ण सत्यभामेची इच्छा पूर्ण करण्याकरितां गरुडावर बसून जेव्हां इंद्र लोकास गेले ॥ ३४ ॥ व इंद्रापाशीं कल्पवृक्ष मागितला; तो इंद्र देत नाहीं म्हणाला तेव्हां—गरुड रागावून त्याकरितां युद्ध करूं लागला ॥ ३५ ॥

गरुडानें गोलोकीं गाईबरोबरही युद्ध केलें; त्यावेळीं त्याच्या चोंचीनें तुटून गाईचे कान शेंपूट व रक्त भूमीवर पडलें ॥ ३६ ॥ त्या तिहींपासून तीन वस्तु झाल्या; कानापासून तमाखू, शेंपटापासून गोमी ॥ ३७ ॥ व रक्तापासून मेंदी झाली; मोक्ष इच्छिणारानें या तिन्ही वस्तु दूर कराव्या सेवन करूं नयेत॥ ३८ ॥ गाईनीं रागानें गरुडास शिंगानीं

गोलोकेगरुडोगोभिर्युद्धंचैवचकारसः ॥ गरुडस्यचतुंडेनपुच्छकर्णास्तदाऽपतन् ॥ ३६ ॥ रुधिरो
पिपपातोर्व्यांत्रीणिवस्तूनिचाभवन् ॥ कर्णेभ्यश्चतमालंचपुच्छाद्गोमीबभूवह ॥ ३७ ॥ रुधिरान्मे
हदीजातामोक्षार्थीदूरतस्त्यजेत् ॥ तस्मादेतत्त्रयंचैवनहिसेव्यंनरैःप्रिये ॥ ३८ ॥ गावस्तागरु
डंश्रृङ्गैःप्रजह्रुःकुपितास्तदा ॥ गरुत्मतस्त्रयःपक्षाःपृथिव्यामपतन्प्रिये ॥ ३९ ॥ पक्षात्प्राथ
मिकाजातोनीलकंठःशुभात्मकः ॥ द्वितीयाच्चमयूरोवैचक्रवाकस्तृतीयतः ॥ ४० ॥ दर्शनाद्वै
त्रयाणांतुशुभंफलमवाप्नुयात् ॥ तस्मादिदंसुपाख्यानंवर्णितंचमयाप्रिये ॥ ४१ ॥ सुपर्ण
दर्शनाच्चैवयत्फलंलभतेनरः ॥ तत्फलंप्राप्नुयात्तेषांदर्शनाद्धेममालयम् ॥ ४२ ॥

प्रहार केला तेव्हां गरुडाचीं तीन पिसें पृथ्वीवर पडलीं. एकापासून नीलकंठ भारद्वाज, दुसऱ्यापासून मोर व तिसऱ्या पासून चक्रवाक उत्पन्न झाले ॥ ३९ ॥ ४० ॥ या तिहींच्या दर्शनानें शुभ फळ मिळतें; या करितां ही गोष्ट तुला सांगितली ॥ ४१ ॥ गरुडाच्या दर्शनाचें जें फळ तें यांच्या दर्शनानें मनुष्यास मिळतें व वैकुंठ प्राप्त होतो ॥ ४२ ॥

हे प्रिये जें देतां येत नाहीं, करितां येत नाहीं किंवा सांगतां येत नाहीं तें सर्व तुजकरितां मी करितों; तर तुझा प्रश्न कसा सांगणार नाहीं ॥ ४३ ॥ तुझ्या मनांत असेल तें विचार. सत्यभामा ह्मणाली ॥ मीं पूर्वी दान, व्रत किंवा तप काय केलें होतें ॥ ४४ ॥ कीं ज्याच्या योगानें मी मनुष्य असून मनुष्यापेक्षां श्रेष्ठ झालें व तुमची अर्धांगी पत्नी होऊन गरुडावर

अदेयमपिवाकार्यमकथ्यमपियत्पुनः ॥ तत्करोमिकथंप्रश्नंकथयामिनमस्प्रिये ॥ ४३ ॥ पृच्छ
स्वसर्वंकथयेयत्तेमनसिवर्तते ॥ ॥ सत्योवाच ॥ ॥ दानंव्रतंतपोवापिकिंतुपूर्वंकृतंमया ॥ ४४ ॥
येनाहंमर्त्यजामर्त्यभावातीताभवंकिल ॥ तवांगार्धहरानित्यंगरुडासनगामिनी ॥ ४५ ॥ इन्द्रा
दिदेवतावासमगमंयात्वयासह ॥ अतस्त्वांप्रष्टुमिच्छामिकिंकृतंतुमयाशुभम् ॥ ४६ ॥ भवांतरे
चकिंशीलाकाचाहंकस्यकन्यका ॥ ॥ श्रीकृष्णउवाच ॥ ॥ शृणुष्वैकमनाःकांतेयथात्वंपूर्व
जन्मनि ॥ ४७ ॥ पुण्यव्रतंकृतवतीतत्सर्वंकथयामिते ॥ आसीत्कृतयुगस्यांतेमायापुर्यांद्विजो
त्तमः ॥४८॥ आत्रेयोदेवशर्मेतिवेदवेदांगपारगः ॥ आतिथेयोग्निशुश्रूषीसौरव्रतपरायणः ॥ ४९ ॥

बसून-॥ ४५ ॥ तुमच्या बरोबर इंद्रादिक देवतांच्या स्थानाला जातें । ह्मणून विचारतें कीं पूर्वी मी काय पुण्य केलें ? ॥ ४६ ॥ पूर्वजन्मीं मी कोण होतें, कोणाची कन्या होतें तें सांगा ॥ कृष्ण ह्मणतात ॥ चित्त देऊन ऐक; पूर्वजन्मीं तूं काय व्रत केलेंस तें सांगतों. कृतयुगाचे शेवटीं मायापुरीमध्यें ॥४७॥४८॥ अत्रि गोत्री देवशर्मा या नांवाचा ब्राह्मण रहात होता. तो वेदवेदांगें पढलेला असून सूर्याचें व्रत करणारा, अग्नि व अतिथि यांची सेवा करणारा असा होता ॥४९॥

तो नित्य सूर्याची आराधना करणारा असल्याकारणानें प्रत्यक्ष सूर्यासारखा तेजस्वी होता; त्याला वृद्धपणीं गुणवती नांवाची मुलगी झाली ॥ ५० ॥ त्याला पुत्र नसल्यामुळें आपले चंद्र नामक शिष्याला ती मुलगी देऊन त्याला मुलाप्रमाणें मानीत होता व तो शिष्यही त्याला बापाप्रमाणें मानी ॥ ५१ ॥ ते दोघे कोणे एके दिवशीं दर्भ समिधा

सूर्यमाराधयन्नित्यंसाक्षात्सूर्यइवापरः ॥ तस्यातिवयसश्चासीन्नाम्नागुणवतीसुता ॥ ५० ॥ अपुत्रः सस्वशिष्यायचंद्रनाम्नेददौसुताम् ॥ तमेवपुत्रवन्मेनेसचतंपितृवद्वशी ॥ ५१ ॥ तौकदाचिद्वनं यातौकुशेध्महरणार्थिनौ ॥ हिमाद्रिपादोपवनेचेरतुस्तावितस्ततः ॥ ५२ ॥ तावुभौराक्षसंघो रमायांतंतमपश्यताम् ॥ भयविव्हलसर्वांगावसमर्थौपलायितुम् ॥ ५३ ॥ निहतौरक्षसाते नकृतांतसमरूपिणा ॥ तौतत्क्षेत्रप्रभावेणधर्मशीलतयापुनः ॥ ५४ ॥ वैकुंठभवनंनोतौमद्गणै र्मत्समीपगैः ॥ यावज्जीवंतुयत्ताभ्यांसूर्य्यपूजादिकंकृतम् ॥ ५५ ॥

आणण्याकरितां अरण्यांत गेले व हिमालयाचे पायथ्याचे वनांत इकडे तिकडे फिरूं लागले ॥ ५२ ॥ इतक्यांत त्यांनीं भयंकर राक्षस येत आहे असें पाहिलें व भयानें घाबरून पळण्यास असमर्थ झाले असतां ॥५३॥ त्या दुष्ट यमासारख्या भयंकर राक्षसानें त्या दोघांस ठार मारिलें ! त्या क्षेत्राच्या पुण्यानें व त्यांच्या धर्मशीलपणानें त्यांना माझ्या पार्षदगणांनीं वैकुंठास नेलें; त्यानीं आमरण सूर्याची पूजा वगैरे करून जें पुण्य केलें ॥ ५४ ॥ ५५ ॥

तेणेंकरून मी प्रसन्न झालों । शंकर, सूर्य, गणपति, विष्णु व देवी यांचे उपासक ॥ ५६ ॥ जसें मेघांचें पाणी अखेर समुद्रासच मिळतें त्याप्रमाणें मलाच येऊन मिळतात. मी एकच असून नावांनीं व कृतीनें पांच प्रकारचा झालों आहें ॥ ५७ ॥ जसें एकाद्या व्यक्तीला (देवदत्ताला) त्याचे पुतण्ये, भाचे, नातू, मुलगे वगैरे निरनिराळ्या

तेनाहंकर्मणाताभ्यांसुप्रीतोह्यभवंकिल ॥ शैवाःसौराश्चगाणेशावैष्णवाःशक्तिपूजकाः ॥ ५६ ॥ मामेवंप्राप्नुवंतीहवर्षांभःसागरंयथा ॥ एकोऽहंपंचधाजातःक्रिययानामभिःकिल ॥५७॥ देवदत्तो यथाकश्चित्पुत्राद्याह्वाननामभिः ॥ ५८ ॥ ततश्चतौमद्भवनाधिवासिनौविमानयानौरविवर्चसा वुभौ ॥ मत्तुल्यरूपौममसन्निधानगौदिव्यांगनाचंदनभोगभोगिनौ ॥ ५९ ॥ ॥ इतिश्रीपद्मपुराणे उत्तरखण्डेकार्तिकमाहात्म्येकृष्णसत्यासंवादेप्रथमोऽध्यायः ॥ १ ॥ ॥श्रीकृष्णउवाच ॥ ॥ ततो गुणवतीश्रुत्वारक्षसानिहतावुभौ ॥ पितृभर्तृजदुःखार्ताकारुण्यंपर्यदेवयत् ॥ १ ॥

काका, मामा इत्यादि नावांनीं हाक मारतात तद्वत् ॥ ५८ ॥ पुढें ते दोघे वैकुंठांत राहणारे, विमानांत बसून फिरणारे, माझ्याप्रमाणें रूप धारण करणारे, माझ्या जवळ राहणारे, दिव्य स्त्रिया व चंदनादि भोग भोगणारे असे झाले ॥ ५९ ॥ ॥इति श्रीपद्मपुराणे कार्तिकम० प्रथमोध्यायः ॥ १ ॥ ७ ॥ श्रीकृष्ण ह्मणतात—त्यानंतर गुणवतीला हे दोघे राक्षसानें मारल्याचें वर्तमान समजलें तेव्हां बाप व पति ह्यांजबद्दल तिला फार दुःख झालें, ती दीनस्वरानें रडूं लागली ॥ १ ॥

गुणवती ह्मणाली अहो पति, अहो बाबा, तुह्मी मला टाकून कोठें गेला? तुमच्या वांचून म्यां अनाथ मुलीनें काय करावें ॥ २ ॥ मला घरांत बसणारीला आतां अन्न वस्त्र देऊन प्रेमानें माझें पालन कोण करील ॥ ३ ॥ माझें भाग्य, सुख, आशा व जीवित हीं सर्व नष्ट झालीं तरी मी आतां कोणाला शरण जाऊं कीं जो माझें दुःख निवारण करील ॥ ४ ॥

गुणवत्युवाच ॥ ॥ हानाथहापितस्त्यक्त्वागतस्त्वंक्कमयाविना ॥ बालाऽहंकिंकरोम्यद्यह्यनाथाभवतोर्विना ॥ २ ॥ कोनुमामास्थितांगेहेभोजनाच्छादनादिभिः ॥ अकिंचित्कुशलांस्नेहात्पालयेत्पतिदूषिताम् ॥ ३ ॥ हतभाग्याहतसुखाहताशाहतजीविता ॥ शरणंकंप्रयाम्यद्ययोमेदुःखंप्रमार्जेति ॥ ४ ॥ क्कयास्यामिक्कतिष्ठामिकिंकरोमियथाघृणम् ॥ विधात्राहाहतास्म्यद्यकथंजीवामिबालिशा ॥ ५ ॥ ॥ श्रीकृष्णउवाच ॥ ॥ एवंबहुविलप्याथकुररीवभ्रशातुरा ॥ पपातभूमौविकलारंभावातहतायथा ॥ ६ ॥ चिरादाश्वास्यसाभूयोविलप्यकरुणंबहु ॥ निमग्नाशोकजलधौदुःखितासमवर्तत ॥ ७ ॥

मी कोठें जाऊं, कोठें उभी राहूं व काय करूं । ब्रह्मदेवानें निष्ठुरपणानें माझा नाश केला; आतां मी गरीबानें कसें जगावें? ॥ ५ ॥ कृष्ण ह्मणतात—याप्रमाणें तिनें दुःखित झालेल्या हरिणीप्रमाणें पुष्कळ शोक केला व वाऱ्यानें केळ पडावी तशी ती भूमीवर पडली ॥ ६ ॥ पुष्कळ वेळानें पुन्हां उठून तिनें फार शोक केला; याप्रमाणें ती शोकसागरांत बुडून गेली ॥ ७ ॥

तिनें घरांतील सर्व जिनसा विकून यथाशक्ति त्या दोघांचें पारलौकिक क्रिया कर्म केलें? ॥ ८ ॥ त्या नगरांतच ती जिवंत असून मेल्याप्रमाणें राहूं लागली. इंद्रियें जिंकून खरें व शुद्ध आचरण ठेऊन शांतपणानें विष्णूची भक्ति करूं लागली ॥ ९ ॥ एकादशीव्रत व कार्तिकमासव्रत हीं दोन व्रतें मरणकालपर्यंत तिनें केलीं ॥ १० ॥ हे सत्यभामे, हीं दोन व्रतें

साग्रहोपस्करान्सर्वान्विक्रीयाशुभकर्मतत् ॥ तयोश्चक्रेयथाशक्तिपारलौकींततःक्रियाम् ॥ ८ ॥ तस्मिन्नेवपुरेचक्रेवासंसामृतजीविनी ॥ विष्णुभक्तिपराशान्तासत्यशौचाजितेंद्रिया ॥ ९ ॥ व्रतद्वयंतयासम्यगाजन्ममरणात्कृतम् ॥ एकादशीव्रतंसम्यक्सेवनंकार्तिकस्यच ॥ १० ॥ एतद्व्रतद्वयंकांतेममातीवप्रियंकरम् ॥ भुक्तिमुक्तिकरंपुण्यंपुत्रसम्पत्तिदायकम् ॥ ११ ॥ कार्तिकेमासियेनित्यंतुलासंस्थेदिवाकरे ॥ प्रातःस्नास्यंतितेमुक्त्वौमहापातकिनोपिच ॥ १२ ॥ स्नानंजागरणंदीपंतुलसीवनपालनम् ॥ कार्तिकेमासिकुर्वंतितेनराविष्णुमूर्तयः ॥ १३ ॥ संमार्जनंविष्णुगृहेस्वस्तिकादिनिवेदनम् ॥ विष्णोःपूजांचयेकुर्युर्जीवन्मुक्तास्तुतेनराः ॥ १४ ॥

मला फार प्रिय आहेत. भोग, मुक्ति, पुण्य, पुत्र व संपत्ति देणारीं हीं व्रतें आहेत ॥ ११ ॥ कार्तिकमासीं तूळराशीस सूर्य असतां जे प्रातःस्नान करितात ते महापातकी असले तरी मुक्त होतात ॥ १२ ॥ प्रातःस्नान, जागरण, दिवेलावणें व तुलसींची बाग राखणें हीं कृत्यें कार्तिकमासीं जे करितात ते विष्णुमूर्तीच समजावे ॥ १३ ॥ विष्णुदेवालयांत सदा सारवण करून स्वस्तिकें घालणारे व विष्णूची पूजा करणारे मनुष्य जीवन्मुक्तच आहेत ॥ १४ ॥

याप्रमाणें तीनच दिवस जरी कार्तिकमहिन्यांत हें व्रत केलें तरी ते देवांना सुद्धां वंद्य होतात; मग जन्मभर करणारे तर किती पुण्यवान् म्हणून सांगूं ! ॥१५॥ या प्रमाणें ती गुणवती दरवर्षीं उत्तम रीतीनें व्रत करीत होती. विष्णूचे पूजेमध्यें तिचें भक्तियुक्त अंतःकरण नेहमीं निमग्न झालें होतें ॥१६॥ हे प्रिये, एकदा ती ज्वरानें पीडित होऊन कृश झाली

इत्थंदिनत्रयमपिकार्तिकेयेप्रकुर्वते ॥ देवानामपितेवंद्याःकिंचैवाजन्मतःकृतम् ॥ १५ ॥ इत्थं गुणवतीसम्यक्प्रत्यब्दंव्रतिनीह्यभूत् ॥ नित्यंविष्णोःप्रपूजायांभक्त्यातत्परमानसा ॥ १६ ॥ कदाचित्सरुजासाथकृशांगीज्वरपीडिता ॥ स्नातुंगंगांगताकांतेकथंचिच्छनकैस्तदा ॥१७॥ यावज्जलांतरगताकंपिताशीतपीडिता ॥ तावत्साविह्वलाऽपश्यद्विमानंयातमंबरात् ॥ १८ ॥ शंखचक्रगदापद्मैरायुधैरुपलक्षिताः ॥ विष्णुरूपधराःसम्यग्वैनतेयध्वजांकितम् ॥ १९ ॥ आरोहयन्विमानंतामप्सरोगणसेवितम् ॥ चामरैर्वीज्यमानांतांवैकुंठमनयन्गणाः ॥ २० ॥

असतांही हळू हळू गंगेच्या स्नानास गेली ॥ १७ ॥ गंगेच्या जलांत शिरली तों थंडीमुळें कांपूं लागून विव्हळ झाली असतां आकाशांतून खालीं येणारें विमान तिनें पाहिलें ॥ १८ ॥ तें विमान शंखचक्र गदापद्म धारण करणाऱ्या विष्णुरूपी दूतांनीं युक्त होतें व त्या विमानाचा ध्वज गरुडांकित होता ॥ १९ ॥ त्या विष्णुदूतांनीं तिला विमानांत चढविलें व तिजवर चवऱ्या वारीत अप्सरोगणांनीं सेव्यमान अशा तिजला वैकुंठास नेलें ॥ २० ॥

कार्तिकव्रताच्या पुण्यानें त्या विमानांत अग्नीच्याज्वाळेप्रमाणें तेजस्वी दिसणारी ती गुणवती मत्सांनिध्य पावली ॥२१॥ नंतर जेव्हां ब्रह्मादिकदेवांच्या प्रार्थनेमुळें मी पृथ्वीवर आलों तेव्हां माझे सर्व गणही माझ्याबरोबर आले ॥२२॥ हे सत्यभामे, सारे यादव हे माझेच गण आहेत. देवशर्मा नामक तो तुझा पिता हा सत्राजित झाला ॥ २३ ॥ तो

अथसातद्विमानस्थाज्वलदग्निशिखोपमा ॥ कार्तिकव्रतपुण्येनमत्सान्निध्यंगताभवत् ॥ २१ ॥ अथब्रह्मादिदेवानांयदाप्रार्थनयाभुवम् ॥ आगतोहंगणाः सर्वेयातास्तेपिमयासह ॥ २२ ॥ एतेहियादवाःसर्वेमद्गणाएवभामिनी ॥ पितातेदेवशर्माभूत्सत्राजिदभिधोह्ययम् ॥ २३ ॥ यश्चंद्रनामासोऽक्रूरस्त्वंसागुणवतीशुभा ॥ कार्तिकव्रतपुण्येनबह्वमत्प्रीतिदायिनी ॥ २४ ॥ मद्द्वारियत्त्वयापूर्वंतुलसीवाटिकाकृता ॥ तस्मादयंकल्पवृक्षस्तवांगणगतःशुभे ॥ २५ ॥ कार्तिकेदीपदानंचत्वयायत्तुकृतंपुनः ॥ त्वद्गेहसंस्थाचशुभातस्माल्लक्ष्मीःस्थिराभवत् ॥ २६ ॥ यच्चव्रतादिकंसर्वंविष्णवेभर्तृरूपिणे ॥ निवेदितवतीतस्मान्ममभार्यात्वमागता ॥ २७ ॥

चंद्र नामक शिष्य अक्रूर झाला; ती शुभकारक गुणवती तूं आहेस; त्या कार्तिकव्रताच्या पुण्यानें तूं मला आवडती झालीस ॥ २४ ॥ हे प्रिये, विष्णूचे देवळांत तूं पूर्वीं तुळशीची बाग केलीस त्या पुण्यानें तुझ्या अंगणांत कल्पवृक्ष आहे ॥ २५ ॥ कार्तिकमासीं तूं दीपदान दिलेंस त्या पुण्यानें तुझ्या घरांत मंगलदायक लक्ष्मी स्थिर राहिली आहे ॥ २६ ॥ तूं आपण केलेलें व्रतादिक सर्व पतिस्वरूपी विष्णूला अर्पण केलेंस म्हणून तूं माझी स्त्री झालीस ॥ २७ ॥

तूं पूर्वी मरणकालपर्यंत कार्तिकव्रत केलेंस त्या पुण्यानें तुझा व माझा कधींही वियोग होणार नाहीं ॥ २८ ॥ याप्रमाणें कार्तिकमासीं जे व्रत करतात ते माझेसन्निध येऊन मला तूं जशी प्रिय आहेस तसे तेहि मला संतोषजनक होतात ॥२९॥ मनुष्य हे जरी यज्ञ, दान, तप, व्रत इत्यादिक करितात तथापि त्यानां कार्तिकव्रताच्या पुण्याच्या सोळावा हिसा

आजन्ममरणात्पूर्वंयत्कृतंकार्तिकव्रतम् ॥ कदाचिदपितेनत्वंमद्वियोगंनयास्यसि ॥ २८ ॥ एवंये कार्तिकेमासिनराव्रतपरायणाः ॥ मत्सान्निध्यंगतास्तेपिप्रीतिदास्त्वंयथामम ॥ २९ ॥ यज्ञदानव्रततपःकारिणोमानवाः खलु ॥ कार्तिकव्रतपुण्यस्यनाप्नुवंतिकलामपि ॥ ३० ॥ इत्थं निशम्यभुवनाधिपतेस्तदानींप्राग्जन्मपुण्यभववैभवजातहर्षा ॥ विश्वेश्वरंत्रिभुवनैकनिदानभूतं कृष्णंप्रणम्यवचनंनिजगादसत्या ॥ ३१ ॥ इतिश्रीपद्मपुराणेकार्तिकमाहात्म्येश्रीकृष्णसत्यासंवादेद्वितीयोऽध्यायः ॥ २ ॥ सत्योवाच ॥ ॥ सर्वेपिकालावयवास्तवकालस्वरूपिणः ॥ मासानांतुकथंनामसमासःकार्तिकोवरः ॥ १ ॥

देखील फल मिळत नाहीं ॥३०॥ याप्रमाणें कृष्णाच्या मुखांतून पूर्वजन्माची पुण्यकथा ऐकून आनंदित झालेली सत्यभामा त्रिभुवनांला आदिकारण अशा श्रेष्ठ कृष्णाला नमस्कार करून ह्मणाली ॥३१॥ इति श्रीपद्म० कार्ति० द्वितीयोऽध्यायः ॥ ॥ २ ॥ सत्यभामा ह्मणते–कालस्वरूपी जो तूं त्या कालाचे सर्व मासादि अवयव तुझेच अंश आहेत; मग सर्व महिन्यांमध्यें कार्तिक मासच कां श्रेष्ठ आहे ॥ १ ॥

तिथींमध्यें एकादशी व मासांमध्यें कार्तिकमास तुह्मांला प्रिय असण्याचें कारण मला सांगा॥ २॥ श्रीकृष्ण ह्मणतात–तूं फार उत्तम विचारलेंस; तुला याविषयीं पृथूचा व नारदाचा संवाद सांगतों· चित्त देऊन ऐक॥३॥ पूर्वी पृथुराजानें नारदास हेंच विचारिलें व सर्वज्ञ नारदानीं कार्तिक श्रेष्ठ असण्याचें कारण सांगितलें ॥ ४ ॥ नारद ह्मणतात—पूर्वी त्रैलोक्य

एकदशीतिथीनांचमासानांकार्तिकःप्रियः ॥ कथंतेदेवदेवेशकारणंतत्रकथ्यताम् ॥ २ ॥ श्रीकृष्णउवाच ॥ ॥ साधुपृष्टंत्वयाकांतेशृणुष्वैकाग्रमानसा ॥ पृथोर्वैन्यस्यसंवादंमहर्षेर्नारदस्यच ॥ ३ ॥ एवमेवपुरापृष्टोनारदःपृथुनाप्रिये ॥ उवाचकार्तिकाधिक्यकारणंसर्वविन्मुनिः ॥ ४ ॥ नारदउवाच ॥ ॥ शंखनामाभवत्पूर्वमसुरःसागरात्मजः ॥ त्रिलोकीमथनेशक्तोमहाबलपराक्रमः ॥ ५ ॥ जित्वादेवान्निराकृत्यस्वर्लोकात्समहासुरः ॥ इंद्रादिलोकपालानामधिकारांस्तथाहरत् ॥ ६ ॥ तद्भयादथतेदेवासुवर्णाद्रिगुहांगताः ॥ न्यवसन्बहुवर्षाणिसावरोधाः सबांधवाः ॥ ७ ॥

जिंकण्यास समर्थ असा महापराक्रमी सागराचा पुत्र शंखनावांचा राक्षस होता ॥ ५ ॥ त्यानें देवांस जिंकून स्वर्गांतून घालवून दिलें व इंद्रादिकांचे सर्व अधिकार हरण केले ॥ ६ ॥ नंतर ते सर्व देव त्याच्या भयानें मेरुपर्वताच्या गुहेंत गेले व पुष्कळ वर्षेंपर्यंत स्त्रिया व बांधवांसह तेथें दडून राहिले ॥ ७ ॥

ते देव गुहेंत असतां तो दैत्य विचार करूं लागला ॥ ८ ॥ देवांचा पराभव करून त्यांचे अधिकार मीं जरी हरण केले तरी ते बलवान् दिसतात तेव्हां काय करावें ॥ ९ ॥ हं, मी समजलों; देव वेदमंत्रानीं बलिष्ठ झाले आहेत. तेव्हां वेदमंत्र हरण करावे ह्मणजे ते सहज बलहीन होतील॥१०॥ असा विचार करून विष्णूला झोंप लागली आहे असें पाहून

सुवर्णाद्रिगुहादुर्गसंस्थितास्त्रिदशादयः ॥ तद्वीक्षायांबभूवुस्तेतदादैत्योव्यचारयत् ॥ ८ ॥ हृताधिकारास्त्रिदशामयायद्यपिनिर्जिताः ॥ लक्ष्यंतेबलयुक्तास्तेकरणीयंमयाऽत्रकिम् ॥ ९ ॥ ज्ञातं तत्तुमयादेवावेदमंत्रबलान्विताः ॥ तान्हरिष्येततःसर्वेबलहीनाभवंतिवै ॥ १० ॥ इतिमत्वा ततोदैत्योविष्णुमालक्ष्यनिद्रितम् ॥ सत्यलोकाज्जहाराशुवेदानादिस्वयंभुवः ॥ ११ ॥ नीतास्तुते नतेवेदास्तद्भयात्तेनिराक्रमम् ॥ तोयानिविविशुर्यज्ञमंत्रबीजसमन्विताः ॥ १२ ॥ तान्मार्गमाणः शंखोपिसमुद्रांतर्गतोभ्रमन् ॥ नददर्शतदादैत्यःक्वचिदेकत्रसंस्थितान् ॥ १३ ॥ अथब्रह्मासुरैः सार्द्धंविष्णुंशरणमन्वगात् ॥ पूजोपकरणान्गृह्यवैकुंठभवनंगतः ॥ १४ ॥

त्यानें त्वरेनें सत्यलोकाहून ब्रह्मदेवाचे वेद हरण केले ॥ ११ ॥ त्यानें नेलेले ते वेद त्याच्या भीतीनें यज्ञ मंत्रबीजासह पाण्यांत शिरले ॥ १२ ॥ त्यांच्या शोधाकरितां शंखासुर समुद्रांत फिरूं लागला परंतु एके ठिकाणीं गुप्त असलेले ते वेदमंत्र त्यास दिसले नाहींत ॥ १३ ॥ नंतर ब्रह्मदेव देवांसह पूजादिक साहित्य घेऊन वैकुंठांत विष्णूला शरण गेला ॥ १४ ॥

तेथें विष्णूला जागृत करण्याकरितां वाद्यें वाजविलीं; गायन केलें; सुंगधिक धूप व दीप पुनः पुनः लाविले ॥ १५ ॥ नंतर देवांचे भक्तीनें संतुष्ट झालेले भगवान् जागृत झाले व हजारों सूर्यांप्रमाणें तेजस्वी अशा भगवंताचें त्या सर्वांनीं दर्शन घेतलें॥१६॥ षोडशोपचारांनीं भगवंताची पूजा करून सर्वांनीं साष्टांग नमस्कार घातले.नंतर देवांनां विष्णु बोलले

तत्रतस्यप्रबोधायगीतवाद्यादिकाः क्रियाः ॥ चक्रुर्देवास्तथागंधधूपदीपान्मुहुर्मुहुः ॥१५॥ अथ प्रबुद्धोभगवांस्तद्भक्तिपरितोषितः ॥ ददृशुस्तेसुरास्तत्रसहस्रार्कसमद्युतिम् ॥ १६ ॥ उपचारैः षोडशभिःसंपूज्यत्रिदशास्तदा ॥ दंडवत्पतिताभूमौतानुवाचाथमाधवः ॥ १७ ॥ विष्णुरुवाच ॥ ॥ वरदोऽहंसुरगणागीतवाद्यादिमंगलैः ॥ मनोभिलषितान्कामान्सर्वानेवददामिवः ॥ १८ ॥ ऊर्जे स्यशुक्लैकादश्यांयावदुद्बोधिनीभवेत् ॥ निशातुर्यांशशेषेणगीततूर्यादिमंगलान् ॥ १९ ॥ कुर्वंतिनित्यंमनुजाभवद्भिर्यद्यथाकृतम् ॥ तेमत्प्रीतिकरानित्यंमत्सान्निध्यंव्रजंतिहि ॥ २० ॥

॥ १७ ॥ विष्णु ह्मणाले–हे देवहो तुमच्या गीतवाद्यादिमंगलानीं मी संतुष्ट झालों, तुमची इच्छा असेल तें सर्व तुह्मांस देईन ॥ १८ ॥ कार्तिकशुद्ध एकादशीला सूर्योदय होईल तोंपर्यंत कार्तिकमासीं नित्य पहांटे प्रहर रात्र राहिली असतां मंगलवाद्यगीत मजपुढें तुह्मीं केलें; करितां त्याप्रमाणें जे करितील ते मला प्रिय होतील आणि माझेजवळ येतील ॥ १९ ॥ २० ॥

तुह्मी यथाक्रमानें पाद्य, अर्घ्य, आचमनीय व उदक मला अर्पण केलें. त्याचा गुण अद्भुत आहे. तें तुमच्या सुखास कारण झालें ॥ २१ ॥ शंखासुरानें हरण केलेले वेद उदकांत आहेत. हे देवहो, मी त्या सागरपुत्र शंखासुरास मारून ते वेद आणतों॥ २२ ॥आजपासून प्रत्येक वर्षी कार्तिकमासीं मंत्रबीजासहित वेद उदकामध्यें विश्रांति घेतील॥२३॥

पाद्यार्घ्याचमनीयापोयद्भवद्भिर्यथाक्रमम् ॥ तदद्भुतगुणंयस्माज्जातंवःसुखकारणम् ॥ २१ ॥ वेदाः शंखहृताःसर्वेतिष्ठंत्युदकसंस्थिताः ॥ तानानयाम्यहंदेवाहत्वासागरनंदनम् ॥ २२ ॥ अद्यप्रभृ तिवेदास्तुमंत्रबीजसमन्विताः ॥ प्रत्यब्दंकार्तिकेमासिविश्रमंत्यप्सुसर्वदा ॥ २३ ॥ अद्यप्रभृ त्यहमपिभवामिजलमध्यगः ॥ भवंतोपिमयासार्धमायांतुसमुनीश्वराः ॥ २४ ॥ कालेस्मिन्येप्र कुर्वंतिप्रातःस्नानंनरोत्तमाः ॥ तेसर्वेयज्ञावभृथैःसुस्नाताःस्युर्नसंशयः ॥ २५ ॥ येकार्तिकव्रतं सम्यक्कुर्वंतिमनुजाःसदा ॥ तेदेहांतेत्वयाशक्रप्राप्यामद्भवनंतदा ॥ २६ ॥ विघ्नेभ्योरक्षणंतेषांसम्य क्कार्यंतथात्वया ॥ देयात्वयाचवरुणपुत्रपौत्रादिसंततिः ॥ २७ ॥

आजपासून कार्तिकांत मीही जलामध्यें राहीन व तुह्मीही सर्व ऋषींसह माझ्याबरोबर वास करा ॥ २४ ॥ या कार्तिकमासीं जे मनुष्य प्रातःस्नान करितील त्या सर्वांना अवभृथ स्नान केल्याचें फळ मिळेल ॥ २५ ॥ हे इंद्रा जे मनुष्य नित्य उत्तम कार्तिकव्रत करितील त्यांना अंतकालानंतर तूं वैकुंठाला आणून पोंहोचीव ॥ २६ ॥ तसेंच विघ्नांपासून त्यांचें उत्तम संरक्षण कर. हे वरुणा, तूं त्यांना पुत्रपौत्रादि संतति दे ॥ २७ ॥

कुबेरा तूं माझे आज्ञेनें त्यांची ऐश्वर्य संपत्ति वाढीव; कारण तो मनुष्य माझें रूप धारण करणारा जीवन्मुक्त आहे ॥ २८ ॥ ज्यानें जन्मापासून मरणकालपर्यंत यथाविधि हें उत्तम व्रत केलें तो तुमच्याही बरोबरीचा आहे ॥ २९ ॥ आज एकादशीला तुम्ही मला जागृत केलें ह्मणून ही तिथि मला फार मान्य व प्रिय आहे ॥ ३० ॥ दानें,

धनवृद्धिर्धनाध्यक्षत्वयाकार्याममाज्ञया ॥ ममरूपधरःसाक्षाज्जीवन्मुक्तोभवेद्यतः ॥ २८ ॥ आज न्ममरणाद्येनकृतमेतद्व्रतोत्तमम् ॥ यथोक्तविधिनासम्यक्समानोभवतामपि ॥ २९ ॥ एका दश्यांयतश्चाहंभवद्भिःप्रतिबोधितः ॥ अतश्चैषातिथिर्मान्यासाऽतीवप्रीतिदामम ॥ ३० ॥ व्रतद्वयं सम्यगिदंनरैःकृतंसान्निध्यकृद्यन्नतथान्यदस्ति ॥ दानानितीर्थानिव्रतानियज्ञाःस्वर्लोकदान्ये वतथासुरोत्तमाः ॥३१ ॥ इतिश्रीपद्मपुराणेउत्तरखण्डेकार्तिकमाहात्म्येश्रीकृष्णसत्यासंवादेतृती योऽध्यायः ॥ ३ ॥ ॥ नारद उवाच ॥ ॥ इत्युक्त्वाभगवान्विष्णुःशफरीतुल्यरूपधृक् ॥ खात्पपातांजलौविंध्यवासिनःकश्यपस्यसः ॥ १ ॥

तीर्थें, व्रतें व यज्ञ ह्यानीं स्वर्ग प्राप्त होतो; माझें सांनिध्य मिळत नाहीं. परंतु हे देवहो, ह्या दोन व्रतानीं माझें सान्निध्य मनुष्याला प्राप्त होतें ॥ ३१ ॥ इति तृतीयोऽध्यायः ॥ ३ ॥ नारद ह्मणतात–ह्याप्रमाणें भाषण करून भगवंतानीं मत्स्यरूप धारण केलें व विंध्याचलावर वास करणाऱ्या कश्यप ऋषींच्या अंजुलींत प्रवेश केला ॥ १ ॥

त्या ऋषीनें कृपेनें त्या मत्स्याला आपल्या कमंडलूंत ठेविलें. परंतु कमंडलूंत तो मावेना ह्मणून कूपामध्यें ठेविलें॥२॥त्या ठिकाणींही मावत नाहीं असें पाहून सरोवरांत ठेविलें. त्याठिकाणींही तो मावेना ह्मणून त्याला समुद्रांत सोडून दिलें. तेथें ही तो मत्स्य अतिशय वाढला॥३॥ नंतर मत्स्यरूप धारण करणाऱ्या भगवंतांनीं शंखासुराचा वध केला व त्या शंखा-

सतंकमंडलौक्षिप्रंकृपयाक्षिप्तवान्मुनिः ॥ तावत्सनममौतत्रततःकूपेन्यवेशयत् ॥ २ ॥ तत्रा
पिनममौतावत्कासारंप्रावपत्ससतम् ॥ एवंससागरेक्षिप्तस्तत्रसोपिव्यवर्धत ॥ ३ ॥ ततोवधीत्सतं
शंखंविष्णुमत्स्यस्वरूपधृक् ॥ अथतंस्वकरेधृत्वाबदरीवनमागमत् ॥ ४ ॥ तत्राहूयऋषीन्सर्वा
निदमाज्ञापयत्प्रभुः ॥ ॥ विष्णुरुवाच ॥ ॥ जलांतरविशीर्णांस्तेयूयंवेदान्प्रमार्गथ ॥ ५ ॥
आनयध्वंचत्वरिताःसागरस्यजलांतरात् ॥ तावत्प्रयागंतिष्ठामिदेवतागणसंयुतः ॥ ६ ॥ ॥
नारदउवाच ॥ ॥ ततस्तैःसर्वमुनिभिस्तपोबलसमन्वितैः ॥ उद्धृताश्चसबीजास्तेवेदायज्ञसम
न्विताः ॥७॥ तेषुयावन्मितंयेनलब्धंतावद्धितस्यतत् ॥ ससएवऋषिर्जातस्तत्तत्प्रभृतिपार्थिव॥८॥
अथसर्वेपिसंगम्यप्रयागंमुनयोययुः ॥ विष्णवेसविधात्रेतेलब्धान्वेदान्यवेदयन् ॥ ९ ॥

सुराला हातांत घेऊन बदरीवनामध्यें गमन केलें॥४॥ त्या ठिकाणीं सर्व ऋषींना बोलावून विष्णु ह्मणाले, उदकामध्यें पसरलेले वेद तुह्मीं शोधा॥५॥व तुह्मी सागरांतून जोंपर्यंत वेद आणतां तोंपर्यंत मीं सर्व देवगणांसह प्रयागीं रहातों ॥ ६ ॥ नारद ह्मणतात,–नंतर सर्व ऋषींनीं आपल्या तपोबलानें यज्ञ बीजांसहित ते सर्व वेद उदकांतून बाहेर काढिले॥७॥ तेव्हांपासून ज्या ज्या ऋषीला जे जे मंत्र मिळाले तो तो त्या त्या मंत्रांचा ऋषि झाला॥८॥ नंतर सर्व ऋषि मिळून प्रयागीं आले व

आणलेले सर्व वेद ब्रह्मदेवासहवर्तमान असलेल्या विष्णूला देते झाले ॥ ९ ॥ संपूर्ण वेद मिळालेले पाहून मोठ्या हर्षानें ब्रह्मदेवानें देव ऋषिगणासहवर्तमान अश्वमेध नांवाचा यज्ञ केला ॥ १० ॥ यज्ञ झाल्यानंतर देव, गंधर्व, यक्ष, पन्नग, गुह्यक इत्यादिकांनीं भगवंताला साष्टांग नमस्कार करून प्रार्थना केली कीं ॥ ११ ॥ हे जगन्नाथा विष्णो,

लब्ध्वावेदान्समग्रांस्तुब्रह्माहर्षसमन्वितः ॥ अयजद्वाजिमेधेनदेवर्षिगणसंयुतः ॥ १० ॥
यज्ञांतेदेवगंधर्वयक्षपन्नगगुह्यकाः॥निपत्यदंडवद्भूमौविज्ञप्तिंचक्रुरंजसा ॥ ११ ॥ ॥ देवाऊचुः ॥
॥ देवदेवजगन्नाथविज्ञप्तिंश्रृणुनःप्रभो ॥ हर्षकालोयमस्माकं तस्मात्त्वंवरदोभव ॥ १२ ॥ स्थानेऽ
स्मिन्द्रुहिणोवेदान्नष्टान्प्रापपुनस्त्वयम् ॥ यज्ञभागान्वयंप्राप्तास्त्वत्प्रसादाद्रमापते ॥ १३ ॥
स्थानमेतद्भिनःश्रेष्ठपृथिव्यांपुण्यवर्धनम् ॥ भुक्तिमुक्तिप्रदंचास्तुप्रसादाद्भवतःसदा ॥ १४ ॥ कालो
प्ययंमहापुण्योब्रह्मघ्नादिविशुद्धिकृत् ॥ दत्ताक्षयकरश्चास्तुवरमेवंददस्वनः ॥ १५ ॥

आमची विज्ञापना ऐका. आह्मीं सांप्रतकाळीं अत्यंत आनंदित झालों आहों ॥ १२ ॥ तरी ह्या ठिकाणीं नष्ट झालेले वेद ब्रह्मदेवाला पुन्हां मिळाले व हे रमापते तुझ्या कृपेनें आह्मांला यज्ञभाग मिळाले ॥ १३ ॥ ह्मणून हें स्थान सर्व पृथ्वीमध्यें श्रेष्ठ, पुण्यवर्धक व तुझ्या कृपेनें भुक्ति व मुक्ति देणारें असें असावें असा आह्मांला वर दे ॥ ॥ १४ ॥ त्याच-प्रमाणें हा कालही (कार्तिक मास) अत्यंत पुण्यकारक, ब्रह्मघ्नादिकांची शुद्धि करणारा व दिलेलें दान अक्षय लफ

करणारा असावा असा आह्मांला वर दे ॥ १५ ॥ विष्णु ह्मणतातः—हे देव हो हें माझें कार्तिकमासव्रत व तुह्मीं मागितलेले वर हे तुह्मीं ह्मणतां त्याप्रमाणें असोत. आणि हें ब्रह्मक्षेत्र अतिविख्यात होईल ॥ १६ ॥ सूर्यवंशामध्यें उत्पन्न होणारा भगीरथ राजा ह्या ठिकाणीं गंगा आणील व त्या गंगेचा सूर्यकन्या जी कालिंदी यमुना

विष्णुरुवाच ॥ ॥ ममाप्येतद्व्रतंदेवायद्भवद्भिरुदाहृतम् ॥ तथाऽस्तुसुलभंत्वेतद्ब्रह्मक्षेत्रमतिप्रथम् ॥१६॥ सूर्यवंशोद्भवोराजागंगामत्रानयिष्यति ॥ सासूर्यकन्ययाचात्रकालिंद्यायोगमेष्यति ॥ १७ ॥ यूयंचसर्वेब्रह्माद्यानिवसंतुमयासह ॥ तीर्थराजेतिविख्यातंतीर्थमेतद्भविष्यति ॥ १८ ॥ दानंतपोव्रतंहोमोजपपूजादिकाःक्रियाः ॥ अनंतफलदाःसंतुमत्सान्निध्यकराःशुभाः ॥ १९ ॥ ब्रह्महत्यादिपापानिसप्तजन्मार्जितानिच ॥ दर्शनादस्यतीर्थस्यविनाशंयांतुतत्क्षणात् ॥ २० ॥ देहत्यागंचयेधीराःकुर्वंतिममसन्निधौ ॥ मत्तनुंप्रविशंत्येतेनपुनर्जन्मिनोनराः ॥ २१ ॥

तिच्याशीं संगम होईल ॥ १७ ॥ आणि ब्रह्मादिक देव माझ्यासहवर्तमान येथें वास करोत. व हें स्थल तीर्थराज नांवाचें प्रसिद्ध होईल ॥ १८ ॥ या ठिकाणीं केलेलीं दान, तप, व्रत होम, जप व पूजा वगैरे कर्में अनंत फल देणारीं होऊन माझें सान्निध्य करणारीं होवोत ॥ १९ ॥ ब्रह्महत्यादिक पापें सप्तजन्मार्जित असलीं तरी सुद्धां या तीर्थाच्या दर्शनानें एका क्षणांत लयाला जावोत ॥ २० ॥ या ठिकाणीं देहत्याग करणारे लोक माझ्यासन्निध येऊन माझ्या

शरीरांत प्रविष्ट होतील व ते पुनः जन्म घेणार नाहींत ॥ २१ ॥ या ठिकाणीं माझ्या समोर पित्याच्या उद्देशानें जे श्राद्ध करतील त्यांचे सर्व पितृगण मत्स्वरूप पावतील ॥ २२ ॥ तसेंच हा काल कार्तिकमास मकरस्थसूर्य असतांना स्नान करणाऱ्याचें पाप नाश करणारा पुण्यकारक असा असो ॥ २३ ॥ रवि मकरस्थ असतां माघमासीं

पितॄनुद्दिश्ययेश्राद्धंकुर्वंत्यत्रममाग्रतः ॥ तेषांपितृगणाःसर्वेयांतितेमत्स्वरूपताम् ॥ २२ ॥ कालोप्येषमहापुण्यफलदोस्तुसदानृणाम् ॥ सूर्येमकरगेप्राप्तेस्नायिनांपापनाशनम् ॥२३॥ मकरस्थेरवौमाघेप्रातःस्नानंप्रकुर्वताम् ॥ दर्शनादेवपापानियांतिसूर्याद्यथातमः ॥ २४ ॥ सलोकत्वंसमीपत्वंसारूप्यंचत्रयंक्रमात् ॥ नृणांदास्याम्यहंस्नानैर्माघेमकरगेरवौ ॥ २५ ॥ यूयंमुनीश्वरास्सर्वेश्शृणुत्वंवचनंमम ॥ बदरीवनमध्येहंसदातिष्ठामिसर्वगः ॥ २६ ॥ अन्यत्रदशभिर्वर्षैस्तपसाप्राप्यतेफलम् ॥ तत्रतद्दिवसैकेन भवद्भिःप्राप्यतेसदा ॥ २७ ॥ स्थानस्यदर्शनंतस्ययेकुर्वंतिनरोत्तमाः ॥ जीवन्मुक्ताःसदातेषुपापंनैवावतिष्ठते ॥ २८ ॥

प्रातःस्नान करणाऱ्यांच्या दर्शनानेंच सूर्याच्या तेजानें जसा अंधकार नाहींसा होतो त्याप्रमाणें लोकांचीं पातकें नष्ट होतात ॥ २४ ॥ रवि मकरस्थ असतांना माघमासीं स्नान करणाऱ्यांना मी सलोकत्व, समीपत्व व सारूप्य देतों ॥ २५ ॥ हे ऋषिहो माझें वाक्य श्रवण करा. मी बदरीवनामध्यें सर्वकाल वास करीन ॥ २६ ॥ अन्यक्षेत्रांत दहावर्षें तपश्चर्याकरून जें फल प्राप्त होतें तें फल बदरिकाश्रमीं एक दिवस तपश्चर्या केल्यानें मिळतें ॥२७॥ जे नरश्रेष्ठ ह्या

स्थानाचें दर्शन करितात ते जीवन्मुक्त होत. त्यांचेठायीं पाप वसत नाहीं ॥ २८ ॥ नारद ह्मणतातः–ह्याप्रमाणें देवाधिदेव विष्णु देवांशीं भाषण करून ब्रह्मदेवासह अंतर्धान पावते झाले व सर्व इंद्रादि देवही त्या ठिकाणीं अंशरूपानें राहून आपआपल्या लोकीं गमन करिते झाले ॥ २९ ॥ जो नरश्रेष्ठ ही कथा श्रवण करील किंवा

नारदउवाच ॥ ॥ एवंदेवान्देवदेवस्तदुक्त्वातत्रैवांतर्द्धानमागात्सवेधाः ॥ देवाःसर्वेप्यंशकै स्तत्र तिष्ठंश्चांतर्धानंप्रापुरिंद्रादयस्ते ॥२९॥ इमांकथांयःशृणुयान्नरोत्तमोयःश्रावयेद्वापिविशुद्धचेतसा ॥ सतीर्थराजंबदरीवनंयद्गत्वाफलंतत्समवाप्नुयाच्च ॥ ३०॥ इतिश्रीपद्मपुराणेकार्त्तिकमाहात्म्येश्रीकृष्णसत्यासंवादेप्रयागवर्णनंनामचतुर्थोऽध्यायः ॥ ४ ॥ ॥ पृथुरुवाच ॥ ॥ महत्फलंत्वयाप्रोक्तंमुनेकार्तिकमाघयोः ॥ तयोःस्नानविधिंसम्यङ्नियमानपिनारद ॥ १ ॥ उद्यापनविधिंचैवयथावद्वक्तुमर्हसि ॥ ॥ नारदउवाच ॥ त्वंविष्णोरंशसंभूतोनाज्ञातंविद्यतेतव ॥ २ ॥

शुद्धांतःकरणानें श्रवण करवील त्याला तीर्थराज प्रयागाला व बदरीवनाला जाऊन जें पुण्य प्राप्त होतें तें प्राप्त होईल ॥ ३० ॥ इति चतुर्थोध्यायः ॥४॥ पृथु ह्मणतो–हे नारदा, तूं कार्तिक व माघ या मासांच्या व्रताचें महत्फल सांगितलेंस त्याचप्रमाणें या दोन महिन्यांचा स्नानविधि व नियम ॥१॥ आणि उद्यापनविधि हीं यथाशास्त्र कथन करा ॥ नारद ह्मण तात–राजा, तूं विष्णूच्या अंशापासून झालेला आहेस ! तुला ठाऊक नाहीं असें कांहीं नाहीं ॥ २ ॥

तथापि या व्रतांचे नियम मजपासून श्रवण कर । आश्विन मासाच्या शुक्लैकादशीच्या दिवशीं ॥ ३ ॥ कार्तिकमास व्रतास आरंभ करावा । आलस्य टाकून प्रहर रात्रीं निरंतर जागृत व्हावें ॥ ४ ॥ उदकानें भरलेलें पात्र घेऊन दिवसा किंवा सायंकाळींही कर्णावर यज्ञोपवीत ठेवून आग्नेयी दिशेकडे गांवाच्या बहिःप्रदेशीं गमन करावें ॥५॥ तृणांनीं भूमि आच्छादित करावी; वस्त्रानें मस्तक वेष्टन करावें व नेसावयाचें वस्त्र वर खोंचून उत्तरेकडे तोंड करून थुंका न टाकतां ॥ ६ ॥

तथापिवदतःसम्यङ्नियमानपिवैश्शृणु ॥ आश्विनस्यतुमासस्ययाशुक्लैकादशीभवेत् ॥ ३ ॥ कार्तिकस्यव्रतानीहतस्यांकुर्यादतंद्रितः । रात्र्यांतुर्यांशशेषायामुदतिष्ठेत्सदाव्रती ॥ ४ ॥ प्रागुदीचींव्रजेद्ग्रामाद्बहिःसोदकभाजनः ॥ दिवासंध्यासुकर्णस्थब्रह्मसूत्रउदङ्मुखः ॥ ५ ॥ अंतर्धायतृणैर्भूमिंशिरःप्रावृत्यवाससा ॥ वस्त्रंनियम्ययत्नेनष्ठीवनोच्छ्वासवर्जितः ॥६ ॥ कुर्यान्मूत्रपुरीषेचरात्रौवैदक्षिणामुखः ॥ गृहीतशिश्नश्चोत्थायमृद्भिरभ्युद्धृतैर्जलैः ॥ ७ ॥ गंधलेपक्षयकरंशौचंकुर्यादतंद्रितः॥एकालिंगेकरेतिस्रउभयोर्मृद्द्वयंस्मृतम् ॥ ८ ॥ पंचापानेदशैकस्मिन्नुभयोःसप्तमृत्तिकाः ॥ एतच्छौचंगृहस्थस्यद्विगुणंब्रह्मचारिणः ॥ ९ ॥

मूत्र व पुरीषविधि करावा । हा विधि रात्रौ कर्तव्य असेल तर दक्षिणेकडे तोंड करून करावा । नंतर शिश्न धरून उठावें व मृत्तिका आणि उदक ॥ ७ ॥ यानीं दुर्गंधीचा नाश करणारें शौच करावें । मूत्रोत्सर्ग केल्यानंतर शिश्नाचें एकदा मृत्तिकेनें, डाव्या हाताचें तीनदा मृत्तिकांनीं व दोन्ही हस्तांचें दोनदा मृत्तिकांनीं शौच करावें ॥८॥ पुरीषोत्सर्ग

केल्यानंतर गुदस्थानीं पांचमृत्तिकांनीं, डाव्या हाताचें दहा मृत्तिकांनीं व दोन हातांचें सप्तमृत्तिकांनीं शौच करावें. हा शौचनियम गृहस्थांचा सांगितला आहे । ह्याच्या दुप्पट ब्रह्मचाऱ्यानें ॥ ९ ॥ व तिप्पट वानप्रस्थानें आणि चौपट संन्याशांनीं करावें । जें मृत्तिका शौच दिवा करावें ह्मणून सांगितलें त्याच्या निम्मे हिश्शानें रात्रीं शौच करावें ॥१०॥ रोग्यानें याच्या निमपट व मार्गस्थ असले तर त्याच्याही निमपट करावें । याप्रमाणें शौचविधि न केल्यास

वानप्रस्थस्यत्रिगुणंयतीनांचचतुर्गुणम् ॥ यद्दिवाविहितंशौचंतदर्धंनिशिकीर्तितम् ॥ १० ॥
तदर्धमातुरेप्रोक्तमातुरस्यार्धमध्वनि ॥ शौचकर्मविहीनस्यसकलानिष्फलाःक्रियाः ॥ ११ ॥
मुखशुद्धिविहीनस्यनमंत्राःफलदायकाः ॥ दंतजिह्वाविशुद्धिंचततःकुर्यात्प्रयत्नतः ॥ १२ ॥
आयुर्बलंयशोवर्चःप्रजाःपशुवसूनिच ॥ ब्रह्मप्रज्ञांचमेधांचत्वंनोदेहिवनस्पते ॥ १३ ॥
इतिमंत्रंसमुच्चार्यद्वादशांगुलयागृही ॥ समिधाक्षीरवृक्षस्यक्षयाहोपोषणंविना ॥ १४ ॥
प्रतिपद्दर्शनवमीषष्ठीचार्कदिनेतथा ॥ चंद्रसूर्योपरागेचनकुर्याद्दंतधावनम् ॥ १५ ॥

त्याच्या सर्व धर्मक्रिया निष्फळ होतात ॥ ११ ॥ मुखशुद्धि केल्यावांचून ह्मटलेले मंत्र फलदायक होत नाहींत; ह्मणून दंत व जिव्हा यांची प्रयत्नेंकरून शुद्धि करावी ॥ १२ ॥ हे वनस्पते ! आयुष्य, बल, यश, कांति, प्रजा, द्रव्य, ब्रह्मज्ञान, सारासार ज्ञान व धारणाशक्ति हीं आह्मांला दे ॥ १३ ॥ हा मंत्र ह्मणून गृहस्थानें बारा अंगुल प्रमाणाचें क्षीरवृक्षाचें काष्ठ घेऊन श्राद्धतिथि व उपोषण यांखेरीज अन्य दिवशीं दंतधावन करावें ॥ १४ ॥ प्रतिपदा, अमावास्या,

नवमी, षष्ठी, रविवार, चंद्रग्रहण व सूर्यग्रहण या दिवशीं दंतधावन करूं नये ॥ १५ ॥ कंटकीवृक्ष, कापूस निर्गुंडी, पळस, वड, एरंड, दुर्गन्धी वृक्षाच्या काष्ठांनीं दंतधावन करूं नये ॥ १६ ॥ शौचविधि व स्नानविधि झाल्यानंतर विष्णूच्या किंवा शिवाच्या मंदिरांत जावें व गंध, पुष्प, तांबूलादिक पूजा उपचार घेऊन भक्तियुक्त होत्साता ॥ १७ ॥ विष्णूची पाद्यादिक उपचारांनीं पूजा करून स्तुति करावी. नमस्कार करावा व गीत वाद्यादि

कंटकीवृक्षकार्पासीनिर्गुंडीब्रह्मवृक्षकान् ॥ वटैरंडविगंधाद्यान्वर्जयेद्दंतधावने ॥ १६ ॥
ततोविष्णोःशिवस्यापिगृहंगच्छेत्प्रसन्नधीः॥पुष्पंगंधान्सतांबूलान्गृहीत्वाभक्तितत्परः॥१७॥
तत्रदेवस्यपाद्यादीनुपचारान्पृथक्पृथक् ॥ कृत्वास्तुत्वापुनर्नत्वाकुर्याद्गीतादिमंगलम् ॥ १८ ॥
तालवेणुमृदंगादिध्वनियुक्तान्सनर्तकान् ॥ पुष्पैर्गंधैःसतांबूलैर्गायकानपिचार्चयेत् ॥ १९ ॥
देवालयेगीतपरायतस्तेविष्णुमूर्तयः ॥ तपांसियज्ञदानानिकृतादिषुजगद्गुरोः ॥२०॥ तुष्टिदा
निकलौयस्माद्भक्त्यागानंप्रशस्यते ॥ कृत्वैवंससिदेवेशमयापृष्टस्तुपार्थिव ॥ विष्णुरेवंतदाप्रा
हमद्भक्तिपरितोषितः ॥ २१ ॥

मंगल करावें ॥ १८ ॥ टाळ, वेणू, मृदंग इत्यादिक वाजवून नृत्य करावें; गायकादिकांचा ही गंध, पुष्प, तांबुल इत्यादिकांनीं सत्कार करावा ॥ १९ ॥ कृतत्रेतादि युगामध्यें तप, यज्ञ, दान हीं भगवंताला तोषदायक होतात ॥ २० ॥ व कलीमध्यें भक्तियुक्त गायनानें भगवान् संतुष्ट होतो ह्मणून देवापुढें गायन करणारे विष्णुरूप समजून त्यांची पूजा करावी २१

नारद ह्मणतातः—हे पृथो, तूं कोठें राहतोस असें मी भगवंताला विचारिलें असतां माझ्या भक्तीनें तुष्ट झालेले विष्णु मला ह्मणाले कीं, मीं वैकुंठामध्यें तसा रहात नाहीं किंवा योग्यांच्या हृदयांत वास करीत नाहीं अथवा सूर्यामध्यें ही रहात नाहीं पण माझे भक्त ज्या ठिकाणीं गायन करतात तेथें मीं राहतों ॥ २२ ॥ त्यांची गंधपुष्पादिकांनीं पूजा केली असतां, मला जो आनंद होतो तो माझ्या स्वतःच्या पूजनानें मला होत नाहीं ॥ २३ ॥ माझ्या पुराण कथा व

नाहंवसामिवैकुंठेयोगिनांहृदयेरवौ ॥ मद्भक्तायत्रगायंतितत्रतिष्ठामिनारद ॥ २२ ॥ तेषांपूजा
दिकंगंधपुष्पाद्यैःक्रियतेनरैः ॥ तेनप्रीतिंपरांयामिनतथामत्प्रपूजनात् ॥ २३ ॥ मत्पुराणकथां
श्रुत्वामद्भक्तानांचगायनम् ॥ निंदंतियेनरामूढास्तेमद्द्वेष्याभवंतिहि ॥ २४ ॥ शिरीषोन्मत्तगि
रिजामल्लिकाशाल्मलीभवैः ॥ अर्कजैःकर्णिकारैश्चविष्णुर्नार्च्यस्तथाक्षतैः ॥ २५ ॥ जपाकुंद
शिरीषैश्चयूथिकामालतीभवैः ॥ केतकीभवपुष्पैश्चनैवार्च्यःशंकरस्तथा ॥२६॥ गणेशंतुलसी
पत्रैर्दुर्गांनैवतुदूर्वया ॥ मुनिपुष्पैस्तथासूर्यंलक्ष्मीकामोनचार्चयेत् ॥ २७ ॥

माझ्या भक्तांचें गायन श्रवण करून जे मूर्ख निंदा करितात त्यांचा मी द्वेष करितों ॥२४॥ लक्ष्मीची इच्छा करणारांनीं शिरीष, धोत्रा, गोकर्ण, मल्लिका, शाल्मली, रुई व कणेर या पुष्पानीं व अक्षतानीं विष्णूची पूजा करूं नये॥२५॥जास्वंद, कुंद, शिरीष, जुई, मालती व केतकी ही फुलें शंकरास वाहूं नयेत ॥२६॥ गणेशाला तुलसीपत्रे वाहूं नयेत व दुर्गेला

दूर्वा वाहूं नयेत. तसेंच अगस्त्याचीं फुलें सूर्याला वाहूं नयेत ॥ २७ ॥ याहून व्यतिरिक्त फुलें देवाना वाहण्याला पूजेमध्यें प्रशस्त आहेत, याप्रमाणें पूजाविधि करून पुढील " मंत्रहीनं " या मंत्रानीं देवाची क्षमा मागावी ॥२८॥ हे देवा मंत्राशिवाय, क्रियेशिवाय व भक्तिखेरीज जी मीं पूजा केली ती तुझ्या कृपेनें परिपूर्ण असो ॥ २९ ॥ अशी प्रार्थना करून देवाला प्रदक्षिणा घालाव्या व साष्टांग नमस्कार करून पुन्हा देवाची क्षमा मागावी व गायनादि उपचार

एभ्योऽन्यानिप्रशस्तानिपूजायांसर्वदैवतु ॥ एवंपूजाविधिंकृत्वादेवदेवंक्षमापयेत् ॥ २८ ॥ मंत्रहीनं
क्रियाहीनंभक्तिहीनंसुरेश्वर ॥ यत्पूजितंमयादेवपरिपूर्णंतदस्तुमे ॥ २९ ॥ ततःप्रदक्षिणांकृत्वादंडव
त्प्रणिपत्यच ॥ पुनःक्षमाप्यदेवेशंगायनाद्यंसमापयेत् ॥ ३० ॥ विष्णोःशिवस्यापिचपूजनंयेकु
र्वंति सम्यङ्निशिकार्तिकस्य ॥ निर्धूतपापाःसहपूर्वजैस्तेप्रयांतिविष्णोर्भवनंमनुष्याः ॥ ३१ ॥
इतिश्रीपद्मपुराणेकार्तिकमाहात्म्येश्रीकृष्णसत्यासंवादेकार्तिकव्रतकथनंनामपंचमोऽध्यायः ॥५॥
॥ नारदउवाच ॥ ॥ नाडीद्वयावशिष्टायांरात्र्यांगच्छेज्जलाशये ॥ तिलदर्भाक्षतैःपुष्पैर्गंधाद्यैः
सहितःशुचिः ॥ १ ॥

समाप्त करावेत ॥ ३० ॥ याप्रमाणें कार्तिकमासीं पहाटे विष्णूचें अथवा शिवाचें पूजन जे मनुष्य उत्तम प्रकारें करितात ते निष्पाप होत्साते आपल्या पूर्वजांसहवर्तमान वैकुंठलोकाला गमन करितात ॥ ३१ ॥ इति श्रीपद्मपुराणे कार्तिकमाहात्म्ये कृष्णसत्यभामासंवादे कार्तिकव्रतकथनंनाम पंचमोध्यायः ॥ ५ ॥ नारद ह्मणतातः— दोन घटकाभर

रात्र शिल्लक असतांनां पहाटेस शुचि असा तिल, दर्भ, अक्षता इत्यादिकानीं युक्त होत्साता जलाशयाचे ठायीं स्नाना-
करितां गमन करावें ॥ १ ॥ देवखात, नदी व संगम ह्याठिकाणीं स्नान केलें असतां अनुक्रमें करून, उत्तरोत्तर दसपट
पुण्य प्राप्त होतें व तीर्थामध्यें स्नान केलें असतां वीसपट फल प्राप्त होतें ॥२॥ नंतर विष्णूचें स्मरण करून स्नानाचा संकल्प
करावा आणि तीर्थादि देवतानां अर्घ्यदान करावें ॥ ३ ॥ 'नमःकमल नाभाय' या मंत्रानें विष्णूला अर्घ्य द्यावें ॥ ४ ॥

मानुषोदेवखातेचनद्यामथचसंगमे ॥ क्रमाद्दशगुणंस्नानंतीर्थेतद्द्विगुणंस्मृतम् ॥२॥ विष्णुंस्मृ
त्वाततःकुर्यात्संकल्पंसवनस्यच ॥ तीर्थादिदेवताभ्यश्चक्रमादर्घ्यादिदापयेत् ॥३॥ अर्घ्यमंत्रः॥
नमःकमलनाभायनमस्तेजलशायिने ॥ नमस्तेऽस्तुहृषीकेशगृहाणार्घ्यंनमोस्तुते॥ ४ ॥ वैकुंठे
चप्रयागेचतथाबदरिकाश्रमे॥यतोविष्णुर्विचक्रमेत्रेधानिदधेपदम् ॥५॥ अतोदेवाअवंतुनोयतो
विष्णुर्विचक्रमे ॥ तैरेवसहितःसम्यङ्मुनिवेदमखान्वितः॥६॥ कार्तिकेऽहंकरिष्यामिप्रातःस्नानं
जनार्दन ॥ प्रीत्यर्थंतवदेवेशदामोदरमयासह ॥७॥ध्यात्वानत्वाचदेवेशंजलेस्मिन्स्नातुमुद्यतः॥
तवप्रसादात्पापंमेदामोदरविनश्यतु ॥ ८ ॥

हे विष्णो तूं वैकुंठ, प्रयाग, व बदरिकाश्रम या तीन ठिकाणीं आपलें पदस्थान केलें आहेस; तेथील संपूर्ण देव, मुनि,
वेद व यज्ञ यांसह तुझ्या प्रीतीकरितां मीं कार्तिकमासीं प्रातःस्नान करितों । हे दामोदरा, लक्ष्मीसहवर्तमान तूं
प्रसन्न हो ॥ ७ ॥ हे देवा तुझें ध्यान व तुला नमस्कार करून या जलामध्यें मी स्नान करण्याला तयार झालों आहें तरी

तुझ्या प्रसादानें माझें पाप नष्ट होवो ॥ ८ ॥ विधियुक्त कार्तिकस्नान करणारा असा व्रती मी अर्घ्य देतों तो
राधादामोदरा ग्रहण कर ॥ ९ ॥ कार्तिकांत नित्यनैमित्तिक कर्में केलीं असतां सर्व पातकें जातात तर दैत्यनाशका
विष्णो माझा अर्घ्य ग्रहण कर ॥१०॥ असे दोन अर्घ्य देऊन भागीरथी, विष्णु, शिव व सूर्य यांचें स्मरण करून नाभी
इतक्या पाण्यांत प्रवेश करून यथाविधि स्नान करावें ॥ ११ ॥ गृहस्थाश्रम्यानीं तीळ व आंवळकाठीचा कल्क आंगा-

अर्घ्यमंत्रः ॥ व्रतिनःकार्तिकेमासिस्नातस्यविधिवन्मम॥ गृहाणार्घ्यंमयादत्तंराधयासहितोहरे
॥ ९ ॥ नित्यनैमित्तिकंकर्मकार्तिकेपापनाशने ॥ गृहाणार्घ्यंमयादत्तंदानवेंद्रनिषूदन ॥१० ॥
स्मृत्वाभागीरथींविष्णुंशिवंसूर्यंजलेविशेत् ॥ नाभिमात्रेततस्तिष्ठेद्व्रतीस्नायाद्यथाविधि॥ ११॥
तिलामलकचूर्णेनगृहीस्नानंसमाचरेत् ॥ विधवास्त्रीयतीनान्तुतुलसीमूलमृत्स्नया ॥ १२ ॥
सप्तमीदर्शनवमीद्वितीयादशमीषुच ॥ त्रयोदश्यांनवैस्नायाद्धात्रीफलतिलैःसह ॥ १३ ॥
आदौकुर्यान्मलस्नानंमंत्रस्नानं ततःपरम् ॥ स्त्रीशूद्राणांनवेदोक्तैर्मंत्रैस्तेषांपुराणजैः ॥ १४ ॥

ला लावून स्नान करावें, विधवा व यती यानीं तुलसीमूलाची माती आंगाला लावून स्नान करावें ॥ १२ ॥ सप्तमी,
अमावास्या, नवमी, द्वितीया, दशमी, एकादशी, द्वादशी, व त्रयोदशी, या दिवशीं तीळ व आंवळे आंगाला लाऊं नयेत॥१३॥
प्रथम तीन बुड्यानीं मलस्नान करावें नंतर मंत्रस्नान करावें । स्त्रिया व शूद्र यांनीं वेदोक्त मंत्र ह्मणूं नयेत व त्यांनीं पुरा-

णोक्त मंत्रानीं स्नान करावें ॥ १४ ॥ स्नानमंत्र–जो भक्तभावन परमेश्वर देवकार्याकरितां तीन रूपानें झाला तो विष्णु सर्व पाप नाश करणारा कृपेनें मला पवित्र करो ॥ १५ ॥ सर्व देव विष्णूच्या आज्ञेनें कार्तिकव्रत करणारांचें रक्षण करितात; ते सर्व इंद्रादि देव मला पवित्र करोत ॥ १६ ॥ समस्त सबीज सरहस्य वेदमंत्र देव, काश्यपादि ऋषि मला पवित्र करोत ॥ १७ ॥ गंगादि सर्व नद्या, पुष्करादि सर्व तीर्थें, सिंधु आदि नद, सप्तसागरांसह सर्व जलाशय मला

स्नानमंत्राः ॥ त्रिधाभूद्देवकार्यार्थंयःपुराभक्तभावनः ॥ सविष्णुःसर्वपापघ्नःपुनातुकृपयात्रमाम् ॥ १५ ॥ विष्णोराज्ञामनुप्राप्यकार्तिकव्रतकारकान् ॥ रक्षंतिदेवास्तेसर्वेमांपुनंतुसवासवाः ॥ १६ ॥
वेदमंत्राःसबीजाश्चसरहस्यामखान्विताः ॥ कश्यपाद्याश्चमुनयोमापुनंतुसवासवाः ॥ १७ ॥
गंगाद्याःसरितःसर्वास्तीर्थानिजलदानदाः ॥ ससप्तसागराःसर्वेमांपुनंतुजलाशयाः ॥ १८ ॥
पतिव्रतास्त्वदित्याद्यायक्षास्सिद्धाःसपन्नगाः ॥ ओषध्यःपर्वताश्चापिमांपुनंतुत्रिलोकजाः ॥ १९ ॥
एभिःस्नात्वाव्रतीमंत्रैर्हस्तन्यस्तपवित्रकः ॥ देवर्षीन्मानवान्पितॄंस्तर्पयेच्चयथाविधि ॥ २० ॥
यावंतःकार्तिकेमासिवर्तंतेपितृतर्पणे ॥ तिलास्तत्संख्यकाब्दानिपितरःस्वर्गवासिनः ॥ २१ ॥

पवित्र करोत ॥ १८ ॥ अदिति इत्यादि पतिव्रता, यक्ष, सिद्ध, पन्नग, ओषधी व पर्वत हे तीन लोकांतले सर्व मला पवित्र करोत ॥ १९ ॥ व्रती यानें या मंत्रानीं स्नान करून हातांत पवित्र धारण करून देव, ऋषि, मानव आणि पितर यांचें यथाविधि तर्पण करावें ॥ २० ॥ कार्तिकमासीं जितके तीळ पितृतर्पणकाळीं असतात तितकीं वर्षें पर्यंत स्वर्गा-

मध्यें पितर वास करितात ॥ २१ ॥ नंतर उदकाशयामधून बाहेर येऊन शुद्ध वस्त्र परिधान करून प्रातःकालीं करावयास सांगितलेलीं सर्व संध्यादि कृत्यें करून श्रीहरीची पूजा करावी ॥ २२ ॥ नंतर तीर्थादि देवतांचें स्मरण करून पुनः भक्तियुक्त अंतःकरणानें गंध पुष्प अक्षतानीं युक्त असें अर्घ्य ॥ २३ ॥ 'व्रतिनः०' या मंत्रानें विष्णूला समर्पण करावें ॥ २४ ॥ नंतर वेदामध्यें पारंगत अशा ब्राह्मणांची भक्तीनें गंध, पुष्प, तांबूल इत्यादिकांनीं पूजा करून वारंवार

ततोजलाद्विनिष्क्रम्यशुचिवस्त्रावृतोव्रती ॥ प्रातःकालोदितंकर्मसमाप्याचर्योहरिः पुनः ॥ २२ ॥
तीर्थादिदेवान्संस्मृत्यपुनरर्घ्यंप्रदापयेत् ॥ गंधपुष्पफलैर्युक्तंभक्त्यातत्परमानसः ॥ २३ ॥
अर्घ्यमंत्रः ॥ व्रतिनःकार्तिकेमासिस्नातस्यविधिवन्मम ॥ गृहाणार्घ्यंमयादत्तंराधयासहितोहरे ॥ २४ ॥ ततश्चब्राह्मणान्भक्त्यापूजयेद्वेदपारगान् ॥ गंधैःपुष्पैःसतांबूलैःप्रणमेच्चपुनःपुनः ॥ २५ ॥ तीर्थानिदक्षिणेपादेवेदास्तन्मुखमाश्रिताः ॥ सर्वांगेष्वाश्रितादेवाःपूजितास्तेतदर्चया ॥ २६ ॥ अव्यक्तरूपिणोविष्णोःस्वरूपंब्राह्मणाभुवि ॥ नावमान्यानोविरोध्याःकदाचिच्छुभमिच्छता ॥ २७ ॥

नमस्कार करावा ॥ २५ ॥ ब्राह्मणांच्या उजव्या पायाचे ठिकाणीं सर्व तीर्थें वास करितात; सर्व वेद मुखाच्या ठायीं वास करितात, आणि सर्वांगांत देव वास करितात ह्मणून ब्राह्मणांची पूजा केली असतां या सर्वांचें पूजन केल्याप्रमाणें होतें ॥ २६ ॥ कल्याण इच्छिणाऱ्या मनुष्यानें ब्राह्मणांचा अवमान करूं नये आणि त्यांशीं विरोध करूं नये;

कारण ते अव्यक्तरूप भगवान् विष्णूचेंच स्वरूपें होत ॥ २७ ॥ नंतर भगवंताला प्रिय जी तुलसी तिची पूजा करावी. एकाग्र अंतःकरणानें प्रदक्षिणा व नमस्कार करावेत ॥ २८ ॥ हे तुलसी तुला सर्व देवानीं निर्माण केलें, सर्व मुनीनीं तूं पूजित आहेस, हे विष्णुप्रिये तुलसी तुला नमस्कार असो; तूं माझें पातक हरण कर ॥२९॥ नंतर पुराणांतील विष्णु-

ततोहरिप्रियांदेवींतुलसीमर्चयेद्व्रती॥प्रदक्षिणानमस्कारान्कुर्यादेकाग्रमानसः ॥२८॥ देवैस्त्वं निर्मितापूर्वमर्चितासिमुनीश्वरैः ॥ नमोनमस्तेतुलसीपापंहरहरिप्रिये ॥२९॥ ततोविष्णुकथां श्रुत्वापौराणींस्थिरमानसः ॥ पुनस्तान्ब्राह्मणांश्चैवपूजयेद्भक्तिमान्व्रती ॥ ३० ॥ एवंसर्वविधिं सम्यक्पूर्वोक्तंभक्तिमान्नरः ॥ करोतियःसलभतेनारायणसलोकताम् ॥ ३१ ॥ रोगापहंपातक नाशकृत्परंसद्बुद्धिदंपुत्रधनादिसाधकम् ॥ मुक्तेर्निदानंनहिकार्तिकव्रताद्विष्णुप्रियादन्यदिहा स्तिशोभनम् ॥ ३२ ॥ इतिश्रीपद्मपुराणेउत्तरखण्डेकार्तिकमाहात्म्येश्रीकृष्णसत्यासंवादे षष्ठोऽध्यायः ॥ ६ ॥

कथा स्वस्थ अंतःकरणानें श्रवण कराव्यात । पुनः त्या ब्राह्मणांची भक्तीनें पूजा करावी ॥३०॥ याप्रमाणें सर्व व्रतविधि जो भक्तिमान् मनुष्य करितो तो नारायणाच्या लोकाला पावतो ॥ ३१ ॥ या लोकीं विष्णूला प्रिय अशा कार्तिक-व्रताशिवाय रोग व पातकाचें नाशक, सद्बुद्धि देणारें, मुक्तीला कारण असें कोणतेंही व्रत नाहीं ॥ ३२ ॥ इति श्री-

पद्मपुराणे कार्तिकमा० षष्ठोऽध्यायः ॥ ६ ॥ नारद ह्मणतात–हे महाराजा, कार्तिकव्रत करणारांचे जे नियम सांगितले ते तुला थोडक्यांत सांगतों श्रवण कर ॥ १ ॥ सर्व आमिषें, मांस, मध, कांजि, मोहऱ्या, भांग इत्यादि मादक पदार्थ कार्तिकव्रत करणारानीं सेवन करूं नयेत ॥ २ ॥ परान्न घेऊं नये, दुसऱ्याचा द्रोह करूं नये, तीर्थयात्रेशिवाय इतरत्र जाऊं नये ॥ ३ ॥ देव, वेद, ब्राह्मण, गुरु, गाय, व्रती, स्त्रिया, राजे, मोठे लोक यांची निंदा कार्तिकव्रत करणारानीं

नारदउवाच ॥ ॥ कार्तिकव्रतिनांपुंसांनियमायेप्रकीर्तिताः ॥ ताञ्छृणुष्वमहाराजकथ्यमाना न्समासतः ॥ १ ॥ सर्वामिषाणिमांसंचक्षौद्रंसौवीरकंतथा ॥ राजिकोन्मादिकंचापिनैवाद्या त्कार्तिकव्रती ॥ २ ॥ परान्नंचपरद्रोहंपरदेशागमंतथा ॥ तीर्थंविनासदैवेहवर्जयेत्कार्तिकव्रती ॥ ३ ॥ देववेदद्विजातीनांगुरुगोव्रतिनांतथा ॥ स्त्रीराजमहतांनिन्दांवर्जयेत्कार्तिकव्रती ॥ ४ ॥ द्विदलंचतिलंतैलंपक्वान्नंमूल्यदूषितम् ॥ भावदुष्टंशब्ददुष्टंवर्जयेत्कार्तिकव्रती ॥ ५ ॥ प्राण्यं गमामिषंचूर्णंफलंजंबीरमामिषम् ॥ धान्येमसूरिकाःप्रोक्ताअन्नंपर्युषितंतथा ॥ ६ ॥ अजागो महिषीक्षीरादन्यदुग्धादिचामिषम् ॥ द्विजक्रीतारसाःसर्वेलवणंभूमिजंतथा ॥ ७ ॥

करूं नये ॥ ४ ॥ द्विदल दाळी, तिळ, तेल, विकत घेतलेलें शिजलेलें अन्न, ज्याची उत्पत्ती वाईट तें, ज्याचें नांव वाईट तें अन्न, हीं कार्तिकांत वर्ज करावीं॥५॥ प्राण्याचें नखकेसइत्यादि अंग, चुना, फळांत ईडलिंबू, धान्यांत मसुरा व शिळें अन्न हीं आमिष ह्मणजे मांसतुल्य आहेत ॥ ६ ॥ शेळी, गाय, ह्मैस यांशिवाय इतरांचें दूध आमिष आहे व ब्राह्मणांनीं

विकलेलें तूप, तेल, मीठ इत्यादि सर्व रस, जमिनीपासून झालेलें मीठ, तांब्याचे भांड्यांतील पंचगव्य व डबक्यांतील पाणी व आपणाकरितांच केलेलें अन्न हें सर्व आमिष आहेत; तीं वर्ज्य करावींत ॥ ७ ॥ ८ ॥ ब्रह्मचर्य, जमिनीवर शय्या, पत्रावळीवर जेवणें व चवथ्या प्रहरीं अन्नभक्षण याप्रमाणें व्रत करावें ॥ ९ ॥ नरकचतुर्दशीला अंगास तेल लावून स्नान करावें. कार्तिकांत अन्य दिवशीं अंगास तेल लावूं नये ॥१०॥ कांदा, वांगें, मोडाचें धान्य, छत्रीचें झाड,

ताम्रस्थितंपंचगव्यंजलंपल्वलसंस्थितम् ॥ आत्मार्थेपाचितंचान्नमामिषंचोच्यतेबुधैः ॥ ८ ॥
ब्रह्मचर्यमधःशय्यापत्रावल्यांचभोजनम् ॥ चतुर्थयामेभुंजानःकुर्यादेवंसदाव्रतम् ॥ ९ ॥
नरकस्यचतुर्दश्यांतैलाभ्यंगंचकारयेत् ॥ अन्यत्रकार्त्तिकेमासितैलस्नानंविवर्जयेत् ॥ १० ॥
पलांडुंवृंतकंशुंगंछत्राकंगृंजनंतथा ॥ नालिकांमूलकंचैववर्जयेत्कार्तिकव्रती ॥११॥ अलाबुंचापिट्टं
ताकंकूष्मांडंबृहतीद्वयम् ॥ श्लेष्मातकंकपित्थंचवर्जयेद्वैष्णवव्रती ॥ १२ ॥ रजस्वलांत्यजम्ले
च्छपतिताव्रतकैस्तथा ॥ द्विजद्विड्वेदबाह्यैश्चनवदेत्सर्वदाव्रती ॥ १३ ॥ एभिर्दृष्टंचकाकैश्चसू
तिकान्नंचतद्भवेत् ॥ द्विपाचितंचदग्धान्नंनैवाद्याद्वैष्णवव्रती ॥ १४ ॥

तांबडा कांदा, नालिका, मुळा हीं कार्तिकांत वर्ज्य करावीं ॥ ११ ॥ दुध्या भोपळा, वांगें, कोहळा, रिंगणी, डोरली भोकर, कवठ हीं विष्णुव्रत करणारानें सोडावीं ॥ १२ ॥ व्रत करणारानें विटाळशी, अतिशूद्र, यवन, जातीतून बाहेर टाकलेला, अव्रती, ब्राह्मणद्वेष्टा व वेद न मानणारा यांशीं भाषण करूं नये ॥ १३ ॥ यानीं पाहिलेलें अन्न काव-

ळ्यानें पाहिलेलें व सोईराघरचें अन्न, दोनदां शिजविलेलें मोदक वगैरे व करपलेलें अन्न व्रत करणारानें खाऊं नये ॥१४॥ अंगास तेल लावणें, गादीवर निजणें, बहुतांचें अन्न, काशाचे भांड्यांत भोजन हीं कार्तिकांत वर्ज्य केलीं असतां व्रत पूर्ण होतें ॥ १५ ॥ इतर व्रत करणारांनीं सर्व व्रतांत हीं वर्ज्य करावीं; विष्णूच्या प्रीतीकरितां कृच्छ्रादिक यथाशक्ति प्रायश्चित्तें करावीं ॥ १६ ॥ प्रतिपदेपासून क्रमानें कोहळा, डोरलें, मीठ, तीळ, आंबट, बेलफळ, कलिंगड,

तैलाभ्यंगंतथाशय्यांगणान्नंकांस्यभोजनम् ॥ कार्तिकेवर्जयेद्यस्तुपरिपूर्णव्रतीभवेत् ॥ १५ ॥
एतानिवर्जयेन्नित्यंव्रतीसर्वव्रतेष्वपि ॥ कृच्छ्रादींश्चप्रकुर्वीतस्वशक्त्याविष्णुतुष्टये ॥ १६ ॥
क्रमात्कूष्मांडबृहतीलवणंतिलाम्लंतथा ॥ श्रीफलंचकलिंगंचफलंधात्रीभवंतथा ॥१७॥ नारि
केलमलाबुंचपटोलंवल्लकास्तथा ॥ चर्मवृंताकचवलीशाकंस्त्रीगमनंतथा ॥ १८ ॥ शाकान्येता
निवर्ज्यानिक्रमात्प्रतिपदादिषु ॥ धात्रीफलंरवौतद्वद्वर्जयेत्सर्वदाव्रती ॥१९॥ एभ्योऽन्यद्वर्जये
त्किंचिद्विष्णुव्रतपरायणः ॥ तत्पुनर्ब्राह्मणेदत्त्वाभक्षयेत्सर्वदाव्रती ॥२०॥ एवमेवहिमाघेपिकु
र्यांच्चनियमान्व्रती ॥ हरेश्चजागरंतत्रप्रबोधोक्तंचकारयेत् ॥ २१ ॥

आंवळा, नारळ, भोंपळा, पडवळ, वाल, मसुरा, चवळी या भाज्या व स्त्रीगमन सोडावें ॥ १७ ॥ १८ ॥ रविवारीं नेहमी आंवळा सोडावा ॥ १९ ॥ यांशिवाय दुसरें कांहीं सोडलें तर तर तो पदार्थ ब्राह्मणास दान देऊन नंतर भक्षावा ॥ २० ॥ याप्रमाणें माघ महिन्यांतही नियम करावे व प्रबोधसमयीं सांगितल्याप्रमाणें हरिजागर

करावा ॥ २१ ॥ यथाविधि कार्तिकव्रत करणाऱ्या मनुष्यास पाहून यमदूत, जसे हत्ती सिंहाला भिऊन पळतात तसे पळतात ॥२२॥ यज्ञ करणारापेक्षां कार्तिकव्रत करणारा श्रेष्ठ आहे; यज्ञापासून स्वर्ग मिळतो व कार्तिकव्रत करणारा वैकुंठास जातो ॥२३॥ भोग व मुक्ति देणारीं व्रतें वं पृथ्वीवरील सर्व क्षेत्रें कार्तिकव्रत करणाराचे शरीरांत रहातात ॥२४॥ दुःस्वप्न किंवा मन वाचा शरीर यांजकडून झालेलें कोणतेंही पाप हीं कार्तिकव्रत करणाराचे दर्शनानें तत्काल नाहींशीं होतात

यथोक्तकारिणंदृष्ट्वाकार्तिकव्रतिनंनरम् ॥ यमदूताःपलायंतेगजाःसिंहार्दितायथा ॥ २२ ॥ वरं विष्णुव्रतंह्येतन्नयज्ञव्रतयाजकाः ॥ यज्ञकृत्प्राप्नुयात्स्वर्गंवैकुंठंकार्तिकव्रती ॥ २३ ॥ भुक्तिमुक्तिव्रतानीहयानिक्षेत्राणिभूतले ॥ वसंतितानितद्देहेकार्तिकव्रतकारिणः ॥२४ ॥ दुःस्वप्नंदुष्कृतंकिंचिन्मनोवाक्कायसंभवम् ॥ कार्तिकव्रतिनंदृष्ट्वाविलयंयांतितत्क्षणात् ॥२५॥ कार्तिकव्रतिनःपुंसोविष्णुवाक्यप्रणोदिताः ॥ रक्षांकुर्वंतिशक्राद्याराजानंकिंकरायथा ॥२६ ॥ विष्णुव्रतकरोनित्यंयत्रव्रजतिपूजितः ॥ ग्रहभूतपिशाचाद्यानैवतिष्ठंतितत्रवै ॥२७॥ कार्तिकव्रतिनःपुण्यंयथोक्तव्रतकारिणः ॥ नसमर्थोभवेद्वक्तुंब्रह्मापिहिचतुर्मुखः ॥ २८ ॥

॥२५॥ जसे सेवक राजाचें रक्षण करितात तसें कार्तिकव्रत करणाराचें रक्षण इंद्रादिक देव विष्णूचे आज्ञेनें प्रेरीत होत्साते करितात ॥२६॥ विष्णु व्रत करणारा जेथें जातो व जेथें त्याचे पूजन होतें तेथें भूत, ग्रह, पिशाच्य रहाणारच नाहींत ॥२७॥ यथोक्त कार्तिकव्रत करणाराचें पुण्य वर्णन करण्यास चार मुखांचा ब्रह्मदेवही समर्थ होत नाहीं ॥२८॥

विष्णूचें हें कार्तिकव्रत सर्व पापें नाहींसें करणारें; सुपुत्र, नातू, धन व धान्य यांची वृद्धि करणारें असें आहे । हें नियमयुक्त कार्तिकव्रत करणाराला तीर्थें हिंडत जाण्याचें व तीर्थसेवा करण्याचें कारण नाहीं ॥ २९ ॥ इति श्रीपद्मपु० उ० कार्तिकमाहात्म्ये सप्तमोध्यायः॥७॥ नारद म्हणाले:—हे राजा मीं आतां कार्तिकव्रताचा उद्यापनविधि सविधान संक्षेपानें

विष्णुव्रतंसकलकल्मषनाशनंचसत्पुत्रपौत्रधनधान्यसमृद्धिकारि॥ऊर्ज्जंव्रतसनियमंकुरुतेमनुष्यः किंतस्यतीर्थपरिशीलनसेवयाच ॥ २९ ॥ इतिश्रीपद्मपुराणेउत्तरखण्डेकार्तिकमाहात्म्येश्रीकृष्णसत्यासंवादेसप्तमोऽध्यायः ॥ ७ ॥ ॥ नारदउवाच ॥ अथोर्ज्जव्रतिनःसम्यगुद्यापनविधिंनृप ॥ तंश्रृणुष्वमयाख्यातंसविधानंसमासतः ॥ १ ॥ ऊर्ज्जशुक्लचतुर्दश्यांकुर्यादुद्यापनंव्रती ॥ व्रतपूर्त्तिफलार्थंचविष्णुप्रीत्यर्थमेवच ॥ २ ॥ तुलस्याउपरिष्टात्तुकुर्यान्मंडपिकांतथा ॥ सुतोरणांचतुर्द्वारांपुष्पचामरशोभिताम् ॥ ३ ॥ द्वारेषुद्वारपालांश्चपूजयेन्मृन्मयान्पृथक् ॥ पुण्यशीलंसुशीलंचजयंविजयमेवच ॥ ४ ॥

सांगतों तो श्रवणकर ॥ १ ॥ व्रत करणारानें कार्तिकशुद्धचतुर्दशीला व्रताची संपूर्णता होण्याकरितां व तो विष्णूच्या प्रीतीकरिकतां उद्यापन करावें ॥ २ ॥ तुळसीवृंदावनावर मंडप घालावा; त्याला चार द्वारें ठेवावीं व तो तोरणें फुलें चवऱ्या यांनीं सुशोभित करावा ॥ ३ ॥ चार द्वारांत मातीचे द्वारपाळ पुण्यशील, सुशील, जय व विजय असे करावे

व त्यांची पूजा करावी ॥ ४ ॥ तुळसीच्या खालीं चार रंगांनीं सुशोभित असें सर्वतोभद्र काढावें ॥ ५ ॥ त्यावर पंचरत्नांनीं युक्त व नारळासहित असा शुभ कलश ठेवावा ॥६॥ त्यावर शंख, चक्र, गदा व पद्म यांतें धारण करणारा पीतांबरधारी विष्णु याची लक्ष्मीसह पूजा करावी ॥ ७ ॥ व्रत करणारानें इंद्रादिक लोकपालांची त्या मंडलावर पूजा करावी । भगवान् द्वादशीला जागे झाले, त्रयोदशीचे दिवशीं सर्व देवानीं भगवंताचें दर्शन घेतलें व चतुर्दशीचे दिवशीं

तुलसीमूलदेशेचसर्वतोभद्रमुत्तमम् ॥ चतुर्भिर्वर्णकैःसम्यक्शोभाढ्यंसमलंकृतम् ॥ ५ ॥ तस्योपरिष्टात्कलशंपंचरत्नसमन्वितम् ॥ महाफलेनसंयुक्तंशुभंतत्रनिधायच ॥ ६ ॥ पूजयेत्तत्रदेवेशंशंखचक्रगदाधरं ॥ कौशेयपीतवसनंयुक्तंजलधिकन्यया ॥ ७ ॥ इन्द्रादिलोकपालांश्चमंडलेपूजयेद्व्रती ॥ द्वादश्यांप्रतिबुद्धोऽसौत्रयोदश्यांपुनःसुरैः ॥८॥ दृष्टोऽर्चितश्चतुर्दश्यांतस्मात्पूज्यस्तिथाविह ॥ तस्यामुपवसेद्भक्त्याशांतःप्रयतमानसः ॥ ९ ॥ पूजयेद्देवदेवेशंसौवर्णंगुर्वनुज्ञया ॥ उपचारैःषोडशभिर्नानाभक्ष्यसमन्वितैः ॥ १० ॥ रात्रौजागरणंकुर्याद्गीतवाद्यादिमंगलैः ॥ ततःप्रभातेविमलेकुर्यान्नित्यक्रियानरः ॥ ११ ॥

पूजन केलें ॥ ८ ॥ ह्मणून या कार्तिक शुद्ध चतुर्दशीचे दिवशीं उपोषण करून शांत व एकाग्र अंतःकरणानें राधादामोदराचें पूजन करावें ॥ ९ ॥ सोन्याची विष्णुप्रतिमा करून गुरूच्या आज्ञेनें व नाना प्रकारच्या भक्ष्यादि पदार्थांनीं युक्त षोडशोपचारांनीं पूजा करावी ॥ १० ॥ रात्रीं गायन करून व वाद्यें वाजवून जागरण करावें व सकाळीं उठून नित्यकर्मे

करावीं ॥ ११ ॥ नंतर होम करून ब्राह्मणभोजन घालावें व त्यांना यथाशक्ति दक्षिणा द्यावी; कृपणपणा करूं नये ॥ १२ ॥ याप्रमाणें वैकुंठचतुर्दशी करणाराला व या दिवशीं नुसतें उपोषण करणारालाही वैकुंठ प्राप्त होतें ॥ १३ ॥ या वैकुंठचतुर्दशीपर्वणीचें माहात्म्य देव व शेष शंभर वर्षें देखील वर्णन करूं शकणार नाहींत ॥ १४ ॥ वैकुंठचतुर्दशीला हरिजागरामध्यें जे भक्तीनें गायन करितात ते मागील शंभर जन्मांचे पातकापासून मुक्त होतात ॥ १५ ॥ विष्णुजागरामध्यें जे गातात, नाचतात त्यांचें पुण्य हजार गाई दान करणारांचे पुण्यासारखें सांगितलें आहे ॥ १६ ॥ जो वासुदेवापुढें गाऊन नाचून मौज दाखवील व असें रात्रीं जागरण करील ॥१७॥ व विष्णूच्या कथा सांगून विष्णु-

होमंकुर्यात्ततोविप्रान्संतर्प्यप्रयतात्मवान् ॥ शक्त्यातुदक्षिणांदद्याद्वित्तशाठ्यविवर्जितः ॥१२॥ एवंयेनकृताराजन्वैकुंठाख्याचतुर्दशी ॥ यस्यामुपोषणेनैववैकुंठंप्राप्नुयान्नरः ॥ १३ ॥ वैकुंठाख्यचतुर्दश्यामाहात्म्यंनैवशक्यते ॥ वक्तुंवर्षशतैर्देवैःशेषेणापिविशेषतः ॥१४॥ गीतंकुर्वंतियेभक्त्याजागरेचक्रपाणिनः ॥ जन्मांतरशतोद्भूतैस्तेमुक्ताःपापसंचयैः ॥१५॥ नराणांजागरेविष्णोर्गीतंनृत्यंप्रकुर्वताम् ॥ गोसहस्रंचददतांसमंफलमुदाहृतम् ॥ १६ ॥ गीतनृत्यादिकंकुर्वन्दर्शयन्कौतुकानिच ॥ पुरतोवासुदेवस्यरात्रौयोजागरेद्धरेः ॥ १७ ॥ पठन्विष्णुचरित्राणियोरंजयतिवैष्णवान् ॥ तस्यपुण्यफलंविष्णुस्सालोक्यंचप्रदास्यति ॥ १८ ॥

भक्तांचें मनरंजन करील त्याला त्याचें पुण्यफळ विष्णु आपले लोकास नेऊन सालोक्यताही देईल ॥१८॥ इतर भाषणें सोडून तोंडानें वाद्य वाजवितो या प्रमाणें नित्य जो हरिजागर करील त्याला दररोज कोटीतीर्थांचें पुण्य मिळेल ॥१९॥ पौर्णिमेला तीस दंपत्यें अगर शक्तीप्रमाणें निदान एका तरी सपत्नीक ब्राह्मणास भोजन घालावें ॥ २० ॥ या दिवशीं विष्णूनीं मत्स्यरूप धरून वर दिले, ह्मणून या दिवशीं जप होम दान इत्यादि केलेलें कर्म अक्षय्य फल देणारें होतें ॥२१॥

मुखेनकुरुतेवाद्यंस्वेच्छालापांश्चवर्जयेत् ॥ भावैरेतैर्नरोयस्तुकुरुतेहरिजागरम् ॥दिनेदिनेतस्यपुण्यंतीर्थकोटिसमंस्मृतम् ॥१९॥ ततस्तुपौर्णमास्यांवैसपत्नीकान्द्विजोत्तमान् ॥ त्रिंशन्मितानथैकंवास्वशक्त्याचनिवेदयेत् ॥२०॥वरान्दत्वायतोविष्णुर्मत्स्यरूप्यभवद्यतः॥अस्यांदत्तंहुतंजप्तंतदक्षय्यफलंस्मृतम् ॥२१॥ अतस्तान्भोजयेद्विप्रान्पायसान्नादिनाव्रती॥अतोदेवाइतिद्वाभ्यांजुहुयात्तिलपायसम् ॥ २२ ॥ प्रीत्यर्थंदेवदेवस्यदेवानांचपृथक्पृथक् ॥ दक्षिणांचयथाशक्त्याप्रदद्यात्प्रणमेच्चतान् ॥ २३ ॥ पुनर्देवंसमभ्यर्च्यदेवांश्चतुलसींतथा ॥ ततोगांकपिलांतत्रपूजयेद्विधिवद्व्रती ॥ २४ ॥

ह्मणून ब्राह्मणाला खीर आदि अन्न घालून भोजन द्यावें व ‘ अतोदेवा ’ या मंत्रानें तीळ व क्षीर यांचा होम करावा ॥ २२ ॥ विष्णूच्या प्रीतीकरितां व इतर देवांप्रीत्यर्थ ब्राह्मणानां यथाशक्ति दक्षिणा द्यावी व नमस्कार करावा ॥ २३ ॥ पुन्हां विष्णूची, देवांची व तुळशीची पूजा करून कपिला गाईची यथाविधि

पूजा करावी ॥ २४ ॥ व्रताचा उपदेश करण्याऱ्या गुरूची त्याचे पत्नीसह वस्त्रालंकारांनीं पूजा करावी व त्या सर्व ब्राह्मणांची प्रार्थना करावी ॥ २५ ॥ प्रार्थना मंत्र-हे द्विजहो आपल्या कृपेनें विष्णु मला सदा प्रसन्न असोत व या व्रतापासून माझ्या सात जन्मांचें पाप नाहींसें व्हावें व माझी संतती स्थिर व्हावी व माझे मनोरथ सफल व्हावे व देहाचा

गुरुंव्रतोपदेष्टारंवस्त्रालंकरणादिभिः ॥ सपत्नीकंसमभ्यर्च्यतांश्चविप्रान्क्षमापयेत् ॥ २५ ॥ प्रार्थनामंत्रः ॥ युष्मत्प्रसादाद्देवेशःप्रसन्नोस्तुसदामम ॥ व्रतादस्माच्चयत्पापंसप्तजन्मकृतंमया ॥ २६ ॥ तत्सर्वंनाशमायातुस्थिरामेचास्तुसंततिः ॥ मनोरथाश्चसफलाःसंतुनित्यंममार्चया ॥ २७ ॥ देहांतेवैष्णवंस्थानंप्राप्नुयामतिदुर्लभम् ॥ २८ ॥ इतिक्षमाप्यतान्विप्रान्प्रसाद्यच विसर्जयेत् ॥ तामर्चांगुरवेदद्याद्गवायुक्तांतदाव्रती ॥ २९ ॥ ततःसुहृद्गणयुतःस्वयंभुंजीतभक्तिमान् ॥ कार्तिकेवाथातपसिविधिरेवंविधःस्मृतः ॥ ३० ॥ एवंयःकुरुतेसम्यक्कार्तिकस्यव्रतंनरः ॥ विपाप्मासर्वकामाढ्योविष्णुसान्निध्यगोभवेत् ॥ ३१ ॥

अंत झाल्यावर दुर्लभ जें विष्णूचें स्थान तें प्राप्त व्हावें ॥ २६ ॥ २७ ॥ २८ ॥ याप्रमाणें गुरूची व ब्राह्मणांची प्रार्थना करून त्यांना संतुष्ट करून पाठवावें. ती पूजा व गोप्रदान गुरूला द्यावें ॥ २९ ॥ नंतर आपले मित्रांसह भोजन करावें. कार्तिक व माघ यांच्या व्रताचा व उद्यापनाचा असाच विधि आहे ॥ ३० ॥ याप्रमाणें जो कार्तिकव्रत करील

त्याचीं सर्व पापें जाऊन मनोरथ पूर्ण होऊन तो विष्णूच्या सन्निध जाईल ॥ ३१ ॥ सर्व व्रतें सर्व दानें व सर्व तीर्थें यांचें जें फल आहे त्याचे:कोटिपट फल या कार्तिकव्रतानें मिळतें ॥ ३२ ॥ जे विष्णूचे भक्तींत निमग्न होऊन कार्तिकव्रत करितात ते धन्य, ते पूज्य व त्यांचेंच जन्म सफल झालें ॥ ३३ ॥ जो कार्तिक व्रत करण्याचा संकल्प करितो त्याचीं भीतीनें देहांतील सर्व पातकें कांपूं लागतात; यानें कार्तिकव्रत केलें तर आह्मी कोठें जावें असें त्यांना

सर्वव्रतैःसर्वतीर्थैःसर्वदानैश्चयत्फलम् ॥ तत्कोटिगुणितंज्ञेयंसम्यगस्यविधानतः ॥ ३२ ॥
तेधन्यास्तेसदापूज्यास्तेषांचसफलोभवः ॥ विष्णुभक्तिरतायेस्युःकार्तिकव्रतकारिणः ॥ ३३ ॥
देहेस्थितानिपापानिकंपंयांतिचतद्भयात् ॥ क्वयास्यामोभवत्येषयदूर्जव्रतकृन्नरः ॥ ३४ ॥
इत्यूर्जव्रतनियमाञ्छृणोतिभक्त्यायोवैतान्कथयतिवैष्णवाग्रतोऽपि ॥ तौसम्यग्व्रतनियमात्फलं भवद्यत्तत्सर्वंकलुषविनाशनंलभेते ॥ ३५ ॥ इतिश्रीपद्मपुराणेकार्तिकमाहात्म्येअष्टमोऽध्यायः ॥८॥ पृथुरुवाच ॥ ॥ यत्त्वयाकथितंब्रह्मन्व्रतमूर्जस्यविस्तरात् ॥ तत्रयातुलसीमूलेविष्णोः पूजात्वयोदिता ॥ १ ॥

भय होतें ॥ ३४ ॥ याप्रमाणें हे कार्तिकव्रताचे नियम जो ऐकतो व विष्णुभक्तापुढें भक्तीनें सांगतो त्या दोघांना सर्व पापांचा नाश करणारे व्रत नियम केल्याचें फल मिळतें ॥ ३५ ॥ इति श्री पद्म पु. कार्तिक मा. अष्टमोध्यायः ॥ ८ ॥ पृथु ह्मणतात—हे नारदा, आपण कार्तिकाचें व्रत विस्तारानें सांगितलें त्यांत श्रीविष्णूची पूजा तुळशीचे खालीं

करावी ह्मणून सांगितलें ॥ १ ॥ याकरितां तुलसीचें माहात्म्य इतकें काय व ती देवांचा देव जो विष्णू त्याला इतकी अति प्रिय कशी झाली हें आपण मला सांगा ॥ २ ॥ हे नारदा तुळसी कशी उत्पन्न झाली व कोठें झाली तेंही सांगा. ॥ ३ ॥ नारद ह्मणाले—राजा, सावधानचित्तानें ऐक. तुलशीचें माहात्म्य व त्या संबंधाची पूर्वींची हकीकत तुला सर्व सांगतों ऐक ॥ ४ ॥ पूर्वीं एकदा इंद्र देव व अप्सरा यांसहवर्तमान शंकराच्या दर्शनाकरितां कैलासास गेला

तेनाहंप्रष्टुमिच्छामिमाहात्म्यंतुलसीभवम् ॥ कथंसाऽतिप्रियातस्यदेवदेवस्यशार्ङ्गिणः ॥ २ ॥
कथमेषासमुत्पन्नाकस्मिन्स्थानेचनारद ॥ एवंब्रूहिसमासेनसर्वज्ञोसिमतोमम ॥ ३ ॥ ॥ नारदउवाच ॥ ॥ श्रृणुराजन्नवहितोमाहात्म्यंतुलसीभवम् ॥ ऐतिहासंपुरावृत्तंतत्सर्वंकथयामिते ॥ ४ ॥ पुराशक्रःशिवंद्रष्टुमगात्कैलासपर्वतम् ॥ सर्वदेवैः परिवृतोह्यप्सरोगणसेवितः ॥ ५ ॥ यावद्गतःशिवगृहंतावत्तत्रसदृष्टवान् ॥ पुरुषंभीमकर्माणंदंष्ट्राननविभीषणम् ॥ ६ ॥ सपृष्टस्तेनकस्त्वंभोःक्वगतोजगदीश्वरः ॥ एवंपुनःपुनःपृष्टःसतदानोक्तवान्नृप ॥ ७ ॥ ततःक्रुद्धोवज्रपाणिस्तंनिर्भर्त्स्यवचोब्रवीत् ॥ रेमयापृच्छ्यमानोपिनोत्तरंदत्तवानसि ॥ ८ ॥

॥ ५ ॥ जों शंकराच्या घराजवळ जातो तों तेथें एक भयंकर ज्याचें तोंड व दाढा अक्राळविक्राळ असा महापराक्रमी पुरुष तेथें पाहिला ॥ ६ ॥ इंद्रानें त्याला विचारिलें कीं अहो आपण कोण ? शंकर कोठें गेले ? याप्रमाणें पुनः पुनः विचारिलें तरी तो कांहीं बोलला नाहीं ॥ ७ ॥ तेव्हां इंद्र रागावून त्याची निर्भर्त्सना करून ह्मणाला

अरे मूर्खा मी किती विचारितों तरी तूं उत्तर देत नाहींस? ॥ ८ ॥ तर मी तुला वज्रानें मारितों; तुझा त्राता, कोण आहे पाहूं! असें ह्मणून इंद्रानें त्याला वज्र मारिलें ॥ ९ ॥ तेणेंकरून त्याचा कंठ निळा झाला व वज्राचें भस्म झालें, नंतर शंकर आपल्या तेजानें सर्वांस जाळतात कीं काय असे लाल झाले ॥ १० ॥ तें पाहून बृहस्पति हात जोडून त्वरेनें पुढें झाला व इंद्रालाही साष्टांग नमस्कार करण्यास लाविलें व स्तवन करूं लागला ॥ ११ ॥

अतस्त्वांहन्मिवज्रेणकस्तेत्रातास्तिदुर्मते ॥ इत्युदीर्यततोवज्रीवज्रेणाभ्यहनद्दृढम् ॥ ९ ॥ तेनास्यकंठेनीलत्वमगाद्वज्रंचभस्मताम्॥ततोरुद्रःप्रजज्वालतेजसाप्रदहन्निव ॥१०॥दृष्ट्वाबृहस्पतिस्तूर्णंकृतांजलिपुटोऽभवत् ॥ इंद्रंचदंडवद्भूमौकृत्वास्तोतुंप्रचक्रमे ॥११॥ बृहस्पतिरुवाच ॥ नमोदेवाधिपतयेत्र्यंबकायकपर्दिने ॥ त्रिपुरघ्नायशर्वायनमोंधकनिषूदिने ॥ १२ ॥ विरूपायातिरूपायबहुरूपायशंभवे ॥ यज्ञविध्वंसकर्त्रेचयज्ञानांफलदायिने ॥ १३ ॥ कालांतकायकालायकालभोगिधरायच ॥ नमोब्रह्मशिरोहन्त्रेब्रह्मण्यायनमोनमः ॥ १४ ॥

बृहस्पति ह्मणतात—हे शंकरा तूं देवाधिदेव, त्र्यंबक, कपर्दी, त्रिपुरासुराला मारणारा, शर्व, अंधकाला मारणारा विरूप, सुरूप, बहुरूप, शंभु, दक्षयज्ञाचा नाश करणारा, सर्व यज्ञाचें फल देणारा, काळाचा नाश करणारा, काळरूप, सर्प धारण करणारा, ब्रह्मदेवाचें शिर हरण करणारा, ब्राह्मणाचा दयाळू असा आहेस; अशा तुला नमस्कार

असो ॥ १२ ॥ १३ ॥ १४ ॥ नारद ह्मणतात—याप्रमाणें बृहस्पतीनें स्तवन केलेले शंकर त्रैलोक्याला जाळणारी नेत्रांतील अग्निज्वाळा आवरून ह्मणाले ॥ १५ ॥ हे गुरो तुझ्या स्तुतीनें मी प्रसन्न झालों, वर माग. तूं इंद्राला जीवदान दिलेंस ह्मणून तूं जीव या नांवानें प्रसिद्ध हो ॥ १६ ॥ गुरु ह्मणाले—देवा आपण प्रसन्न असाल तर इंद्र शरण आला आहे याचें रक्षण करा व तुमचे तृतीय डोळ्यातील अग्नि शांत होवो ॥ १७ ॥ शंकर ह्मणाले—हा अग्नि

नारदउवाच॥एवंस्तुतस्तदाशंभुर्धिषणेनजगादतम्॥संहरन्नयनज्वालांत्रिलोकीदहनक्षमाम् ॥ १५॥ वरंवरयभोब्रह्मन्प्रतिस्तुत्यानयातव॥इंद्रस्यजीवदानेनजीवेतित्वंप्रथांव्रज ॥१६॥ बृहस्पतिरुवाच॥ ॥ यदितुष्टोसिदेवत्वंपाहींद्रंशरणागतम् ॥ अग्निरेषशमंयातुभालनेत्रसमुद्भवः ॥ १७ ॥ रुद्रउवाच ॥ पुनःप्रवेशमायातिभालनेत्रेकथंशिखी ॥ एनंत्यक्ष्याम्यहंदूरेयथेंद्रंनैवपीडयेत् ॥ १८ ॥ नारदउवाच ॥ ॥ इत्युक्त्वातंकरेधृत्वाप्राक्षिपल्लवणार्णवे ॥ सोपतत्सिंधुगंगायाःसागरस्यचसंगमे ॥ १९ ॥ तावत्सबालरूपत्वमगात्तत्ररुरोदच ॥ रुदतस्तस्यशब्देनप्राकंपद्धरणीमुहुः ॥ २० ॥

पुन्हा कपाळावरील डोळ्यांत कसा शिरेल? आतां इंद्राला पीडा होऊं नये ह्मणून याला मी दूर टाकितों ॥ १८ ॥ नारद ह्मणाले—राजा शंकरांनीं याप्रमाणें बोलून तो अग्नि हातीं घेऊन समुद्रांत टाकला, तो गंगा व समुद्र यांचा संगम आहे तेथें पडला ॥ १९ ॥ इतक्यांत त्याला बाळरूप प्राप्त होऊन रडूं लागला. तेव्हां त्या रडण्याच्या शब्दानें

पृथ्वी थरथर कांपूं लागली ॥ २० ॥ त्या रुदनाच्या शब्दानें स्वर्गादिक सत्यलोकांपर्यंत सर्व लोक बहिरे झाले. तें रुदन ऐकून ब्रह्मदेव तेथें आला व हें काय आहे ह्मणून आश्चर्य पावला ॥ २१ ॥ इतक्यांत समुद्राच्या मांडीवर तें मूल पाहून ब्रह्मदेव समुद्रास ह्मणाला, हें अद्भुत बाळक कोणाचें ? ॥ २२ ॥ ब्रह्मदेवाचें भाषण ऐकून समुद्रानें ब्रह्मदेव आलेला पाहून हात जोडले ॥ २३ ॥ तें मूल ब्रह्मदेवाच्या मांडीवर ठेवून नमस्कार करून ह्मणाला, हे

स्वर्गाद्याःसत्यलोकांतास्तत्स्वनाद्बधिरीकृताः ॥ श्रुत्वाब्रह्माययौतत्रकिमेतदितिविस्मितः ॥ २१॥
तावत्समुद्रस्योत्संगेतंतुबालंददर्शह ॥ ततोब्रह्माब्रवीद्वाक्यंकस्यायंशिशुरद्भुतः ॥ २२ ॥ निश
म्यैतद्वचोधातुर्वाक्यंसिंधुरथाब्रवीत् ॥ दृष्ट्वाब्रह्माणमायांतंसमुद्रोपिकृतांजलिः ॥ २३ ॥ प्रणम्य
शिरसाबालंतस्योत्संगेन्यवेशयत् ॥ भोब्रह्मन्सिंधुगंगायांजातोयंममपुत्रकः ॥ २४ ॥ जातकर्मा
दिसंस्कारान्कुरुष्वास्यजगद्गुरो ॥ नारदउवाच ॥ इत्थंवदतिपाथोधौसबालःसागरात्मजः ॥ २५ ॥
ब्रह्माणमग्रहीत्कूर्चेविधुन्वँस्तंमुहुर्मुहुः ॥ धुन्वतस्तस्यकूर्चंतुनेत्राभ्यामगमज्जलम् ॥ २६ ॥ कथं
चिन्मुक्तकूर्चोयंब्रह्माप्रोवाचसागरम् ॥ ब्रह्मोवाच ॥ नेत्राभ्यांविधृतंयस्मादनेनैतज्जलंमम ॥ २७ ॥

ब्रह्मदेवा, हा सिंधुगंगेच्या संगमांत झालेला माझा मुलगा आहे ॥ २४ ॥ तर हे जगद्गुरो, याचे जन्मसंस्कार तूं कर. नारद ह्मणालेः—याप्रमाणें समुद्र बोलत आहे ॥२५॥ इतक्यांत त्या बालकानें ब्रह्मदेवाची मिशी धरून ओढली. ब्रह्मदेव हिसके मारून मिशी सोडवूं लागला तेव्हा ब्रह्मदेवाच्या दोनी नेत्रांतून पाणी आलें ॥ २६ ॥ कष्टानें

मिशी सोडविल्यावर ब्रह्मदेव समुद्रास ह्मणाले—यानें माझ्या नेत्राचें पाणी धारण केलें ॥ २७ ॥ ह्मणून हा जलंधर शा नांवानें प्रसिद्ध होईल व या योगानें तरुण होऊन सर्व शास्त्रपारंगत होईल ॥ २८ ॥ शंकरावांचून याचा कोणाचेही हातून वध होणार नाहीं । जेथून हा उत्पन्न झाला तेथूनच त्याचा नाश होईल ॥ २९ ॥ नारद ह्मणाले—याप्रमाणें ब्रह्मदेवानीं बोलून शुक्राला बोलावून आणलें व जलंधरास राज्यावर बसविलें व समुद्राचा निरोप घेऊन

तस्माज्जलंधरइतिख्यातोनाम्नाभविष्यति ॥ अनेनैवैषतरुणः सर्वशास्त्रार्थपारगः ॥ २८ ॥
अवध्यःसर्वभूतानांविनारुद्रंभविष्यति ॥ यतएषसमुद्भूतस्तत्रैवांतंगमिष्यति ॥ २९ ॥ ॥
नारदउवाच ॥ ॥ इत्युक्त्वाशुक्रमाहूयराज्येतंचाभ्यषेचयत् ॥ आमंत्र्यसरितांनाथंब्रह्मां
तर्धानमागमत् ॥३०॥ अथतद्दर्शनोत्फुल्लनयनःसागरस्तदा ॥ कालनेमिसुतांवृंदांतद्भार्यार्थम
याचत ॥३१॥ तेकालनेमिप्रमुखास्ततोसुरास्तस्मैसुतांतांप्रददुःप्रहर्षिताः ॥ सचापितांप्राप्यसु
हृद्वरान्वशांशशासगांशुक्रसहायवान्बली ॥ ३२ ॥

ब्रह्मदेव अंतर्धान पावले ॥ ३० ॥ ब्रह्मदेवाच्या दर्शनानें समुद्रास आनंद झाला व त्यानें कालनेमीची मुलगी वृंदा जलंधरास नवरी करण्यास मागितली ॥ ३१ ॥ कालनेमी आदिकरून दैत्यांनीं मोठ्या आनंदानें ती मुलगी जलंधरास दिली; ती उत्तम वश्य स्त्री मिळाल्यावर व उत्तम आप्त मिळाल्यावर शुक्राच्या सहायानें तो बलवान् होऊन

राज्य करूं लागला ॥ ३२ ॥ इति पद्म. का. म. जलन्धरवर्णननाम नवमोऽध्यायः ॥ ९ ॥ नारद ह्मणतातः—राजा पूर्वी देवांनीं जिंकल्यामुळें जे दैत्य पाताळांत राहत होते ते पृथ्वीवर येऊन जलंधराच्या आश्रयानें निर्भय राहते झाले ॥ १ ॥ एके वेळीं त्या जलंधरानें राहूचें शिर तुटलेलें पाहून त्याचें कारण त्यानें शुक्राला विचारिलें ॥ २ ॥ तेव्हां शुक्राचार्यांनीं

इतिश्रीपद्मपुराणेकार्तिकमाहात्म्येश्रीकृष्णसत्यासंवादेजालंधरोपाख्यानेतदुत्पत्तिकथनंनाम नवमोऽध्यायः ॥९ ॥ नारदउवाच ॥ ॥ येदेवैर्निर्जिताःपूर्वंदैत्याःपातालसंस्थिताः ॥ तेपिभूमंडलंयातानिर्भयास्तमुपाश्रिताः ॥ १ ॥ कदाचिच्छिन्नशिरसंराहुंदृष्ट्वासदैत्यराट् ॥ पप्रच्छभार्गवंतत्रतच्छिरश्छेदकारणम् ॥ २ ॥ सशशंससमुद्रस्यमथनंदेवकारितम् ॥ रत्नापहरणंचैवदैत्यानांचपराभवम् ॥ ३ ॥ सश्रुत्वाक्रोधरक्ताक्षःस्वपितुर्मथनंतदा ॥ दूतंसंप्रेषयामासघस्मरंशक्रसन्निधौ ॥ ४ ॥ दूतस्त्रिविष्टपंगत्वासुधर्मांप्राविशद्धराम् ॥ जगादाखर्वमौलिस्तुदेवेंद्रंवाक्यमद्भुतम् ॥ ५ ॥

देवांनीं समुद्रमंथन केलें व रत्नें हरण केलीं व दैत्यांचा पराभव केला ही गोष्ट सांगितली ॥ ३ ॥ आपला पिता जो समुद्र त्याचें देवांनीं मंथन केलेलें ऐकून रागानें त्याचे डोळे लाल झाले व घस्मर नांवाचा दूत त्यानें इंद्राकडे पाठविला ॥ ४ ॥ तो खर्वमौली घस्मर स्वर्गलोकीं जाऊन इंद्रसभेंत शिरून इंद्राशीं चमत्कारिक भाषणें बोलला ॥ ५ ॥

घस्मर ह्मणालाः—समुद्राचा मुलगा जलंधर हा सर्व दैत्यांचा राजा आहे; त्यानें मला दूत पाठविलें आहे. त्याचा निरोप श्रवण कर ॥ ६ ॥ तूं मंदरपर्वताच्या योगानें माझा पिता समुद्र याचें मंथन कां केलेंस ? समुद्रांतील नेलेलीं सर्व रत्नें लवकर आह्मांला दे ॥ ७ ॥ याप्रमाणें त्या दूताचें भाषण ऐकून इंद्रास चमत्कार वाटला व त्या भयंकर

घस्मरउवाच ॥ ॥ जलंधरोब्धितनयःसर्वदैत्यजनेश्वरः ॥ दूतोऽहंप्रेषितस्तेनसयदाहश्रृणुष्व तत् ॥ ६ ॥ कस्मात्त्वयाममपितामथितःसागरोद्रिणा ॥ नीतानिसर्वरत्नानितानिशीघ्रंप्रयच्छमे ॥ ७ ॥ इतिदूतवचःश्रुत्वाविस्मितस्त्रिदशाधिपः ॥ उवाचघस्मरंरौद्रंभयघोषसमन्वितः ॥ ८ ॥ ॥ इन्द्रउवाच ॥ ॥ श्रृणुदूतमयापूर्वंमथितःसागरोयथा ॥ अद्रयोमद्भयात्रस्ताःस्वकुक्षिस्थाःकृतास्तथा ॥ ९ ॥ अन्येपिमद्द्विषस्तेनरक्षितादितिजाःपुरा ॥ तस्माद्यत्तत्प्रजातंतुमयाप्यपहृतंकिल ॥ १० ॥ शंखोप्येवंपुरादेवानद्विषत्सागरात्मजः ॥ ममानुजेननिहतःप्रविष्टःसागरोदरम् ॥ ११ ॥

घस्मराला भय उत्पन्न करणाऱ्या शब्दानें भाषण करिता झाला ॥ ८ ॥ इंद्र ह्मणालाः—हे दूता, मी पूर्वी समुद्रमंथन केलें त्याचें कारण ऐक. पर्वत माझ्या भयानें समुद्रांत दडले त्यांना त्यानें पोटांत आश्रय दिला ॥ ९ ॥ शिवाय पुष्कळ माझे रिपू जे दैत्य त्यांचें त्यानें रक्षण केलें ह्मणून त्यापासून मंथन करून जें मिळालें तें मीं घेतलें ॥ १० ॥ पूर्वी सागराचा

पुत्र शंखासुर देवांचा द्वेष करीत होता, त्यालाही माझे धाकटे बंधू विष्णूनें मारिलें. ॥ ११ ॥ तर जा व हीं समुद्र-मंथनाचीं कारणें आहेत असें त्या जलंधराला सांग । नारद ह्मणालेः—इंद्रानें याप्रमाणें परत पाठविलेला दूत पृथ्वीवर आला ॥ १२ ॥ त्यानें सर्व इंद्रानें सांगितलेलें वर्तमान दैत्यास सांगितलें. तें ऐकून जालंधर संतप्त झाला; रागानें त्याचे ओठ थरथर कांपूं लागले ॥ १३ ॥ तो देवांना जिंकण्याच्या उद्योगास लागला व त्यांकरितां चोहों-

तद्गच्छकथयस्वास्यसर्वंमथनकारणम् ॥ ॥ नारदउवाच ॥ इत्थंविसर्जितोदूतस्तदेंद्रेणागम द्भुवम् ॥ १२ ॥ तदिदंवचनंसर्वंदैत्यायाकथयत्तदा ॥ तन्निशम्यतदादैत्योरोषात्प्रस्फुरिताधरः ॥ १३ ॥ उद्योगमकरोत्तूर्णंसर्वदेवजिगीषया ॥ तदोद्योगेसुरेन्द्रस्यदिग्भ्यःपातालतस्तथा ॥ १४ ॥ दितिजाः प्रत्यपद्यंतकोटिशःकोटिशस्तदा॥अथशुंभनिशुंभाद्यैर्दलाधिपतिकोटिभिः ॥ १५ ॥ गत्वात्रिविष्टपंदैत्योनंदनाधिष्ठितोभवत् ॥ निर्ययुस्त्वमरावत्यादेवायुद्धायदंशिताः ॥ १६ ॥ पुरमावृत्त्यतिष्ठंतंदृष्ट्वादैत्यबलंमहत् ॥ ततःसमभवद्युद्धंदेवदानवसेनयोः ॥ १७ ॥

कडील व पातालांतील कोट्यावधि दैत्य तेथें मिळाले ॥ १४ ॥ नंतर तो दैत्येंद्र जालंधर शुंभनिशुंभादि सेनापतींच्या कितीएक कोटी घेऊन स्वर्गास जाऊन नंदनवनांत राहिला । तेव्हां देवही अमरावतीहून युद्धास सज्ज होऊन आले ॥ १५॥१६॥पुढें दैत्यांचें मोठें सैन्य अमरावतीला वेष्टून राहिलें आहे असें पाहतांच देव दैत्यांचें युद्ध सुरू झालें ॥१७॥

मुसळ, परीघ, बाण, गदा, शक्ति, परशु इत्यादि शस्त्रांनीं ते एकमेकांवर धावत जाऊन मारूं लागले ॥ १८॥ दोन्ही सैन्यें क्षीण होऊन रक्ताच्या ओघानें भरलीं; हत्ती, घोडे, रथ व पायदळ यांनीं कित्येक पाडले, दुसऱ्यांनीं त्यांना पाडिलें ॥ १९ ॥ त्या वेळेस रणभूमि संध्याकाळच्या मेघाप्रमाणें लाल झाली. त्या युद्धांत जे दैत्य पडत त्यांनां शुक्र अमृत-

मुशलैःपरिघैर्बाणैर्गदाशक्तिपरश्वधैः ॥ तेन्योन्यंसमधावेतांजघ्नतुश्चपरस्परम् ॥१८॥ क्षीणेचाभवतांसैन्येरुधिरौघपरिप्लुत ॥ पतितैःपात्यमानैश्वगजाश्वरथपत्तिभिः ॥ १९ ॥ व्यराजतरणेभूमिःसंध्याभ्रपटलैरिव ॥ ततोयुद्धेहतान्दैत्यान्भार्गवस्तूदतिष्ठयत् ॥ २० ॥ विद्ययाऽमृतजीविन्यामंत्रितैस्तोयबिंदुभिः ॥ देवानपितथायुद्धेतत्राजीवयदंगिराः ॥ २१॥ दिव्यौषधीःसमानीयद्रोणाद्रेःसपुनःपुनः ॥ दृष्ट्वादेवांस्तथायुद्धेपुनरेवसमुत्थिताम् ॥ २२ ॥ जलंधरःक्रोधवशोभार्गववाक्यमब्रवीत् ॥ ॥ जलंधरउवाच ॥ ॥ मयायुद्धेहतादेवाउत्तिष्ठंतिकथंपुनः॥२३॥ तवसंजीविनीविद्यानैवान्यत्रेतिविश्रुतम् ॥ ॥ शुक्रउवाच ॥ ॥ दिव्यौषधीःसमानीयद्रोणाद्रेरंगिराःसुरान् ॥ २४ ॥

संजीवनीविद्येच्या मंत्राचें पाणी शिंपून उठवीत होता व देव पडतील त्यांना गुरु द्रोणागिरीहून दिव्य औषधी वारंवार आणून उठवीत होता. युद्धांत पडलेले देव पुनः उठलेले पाहून जलंधर रागानें शुक्रास ह्मणाला—मीं मारलेले देव पुन्हा कसे उठतात ॥ २० ॥ २१ ॥ २२ ॥ २३ ॥ तुझी संजीवनीविद्या दुसऱ्याला माहीत नाहीं

असें प्रसिद्ध आहे । शुक्र ह्मणतात–हे दैत्या, द्रोणागिरीहून गुरु दिव्य औषधि आणून देवांस पुन्हां जीवंत करितो; याकरितां तूं लौकर द्रोणागिरी हरण कर । नारद ह्मणतातः–राजा, याप्रमाणें सांगतांच लागलीच त्या दैत्यानें द्रोणागिरी नेऊन समुद्रांत टाकून दिला व पुन्हा युद्धास आला. नंतर देव पडलेले पाहून गुरु द्रोणाद्रीकडे गेला ॥ २४ ॥ ॥ २५ ॥ २६ ॥ तों तेथें द्रोणाद्रि गुरूला दिसला नाहीं; तो दैत्यांनीं नेला असें जाणून गुरु भयाभीत झाला ॥ २७ ॥

जीवयत्येषतच्छीघ्रंद्रोणाद्रिंत्वमपाहर ॥ ॥ नारदउवाच ॥ ॥ इत्युक्तःसतुदैत्येंद्रोनीत्वाद्रोणाचलंतदा ॥ २५ ॥ प्राक्षिपत्सागरेतूर्णंपुनरागान्महाहवम् ॥ अथदेवान्हतान्दृष्ट्वाद्रोणाद्रिमगमद्गुरुः ॥ २६ ॥ तावत्तत्रगिरींद्रंतुनददर्शसुरार्चितः ॥ ज्ञात्वादैत्यहृतंद्रोणंधिषणोभयविह्वलः ॥ २७ ॥ आगत्यदूराद्व्याजहेश्वासाकुलितविग्रहः ॥ पलायध्वंमहादेवानायंजेतुंक्षमोयतः ॥२८॥ रुद्रांशसंभवोह्येषस्मरध्वंशक्रचेष्टितम्॥श्रुत्वातद्वचनंदेवाभयविव्हलितास्तदा ॥ २९ ॥ दैत्येनवध्यमानास्तेपलायंतेदिशोदश ॥ देवान्विप्रद्रुतान्दृष्ट्वादैत्यैःसागरनंदनः ॥ ३० ॥

व दुरून धापा टाकीत येऊन ह्मणाला देवहो ! पळा. हा बलवान् आहे; याला जिंकण्यास तुह्मी असमर्थ अहांत ॥ २८ ॥ हा शंकराचा अंश आहे, पूर्वीची इंद्राची हकीकत आठवा. तें गुरूचें भाषण ऐकून देव भयानें घाबरले ॥ २९ ॥ दैत्यांनीं नाश केल्यामुळें देव दाही दिशांनीं पळूं लागले. दैत्यानीं देव पळवून लावले असें पहातांच

॥ ३० ॥ शंख नगारे वाजवून जयघोष करीत तो जालंधर दैत्यांसह अमरावती नगरींत शिरला । दैत्य नगरांत शिरतांच इंद्रादिक सर्व देव दैत्यांच्या त्रासामुळें मेरू पर्वताच्या गुहेंत जाऊन राहिले. याप्रमाणें देवांस जिंकून जलंधर तेथें स्वर्गाचें राज्य करूं लागला ॥ ३१ ॥ ॥ ३२ ॥ नंतर इंद्रादि देवांच्या सर्व अधिकारांवर शुंभ आदिकरून

शंखभेरीजयरवैःप्रविवेशामरावतीम् ॥ प्रविष्टेनगरींदैत्येदेवाःशक्रपुरोगमाः ॥ ३१ ॥ सुवर्णाद्रिगुहांप्राप्तान्यवसन्दैत्यतापिताः ॥ एवंदेवान्विनिर्जित्यतत्रराज्यंचकारसः ॥३२ ॥ ततश्चसर्वेष्वसुरोऽधिकारेष्विंद्रादिकानांविनिवेशयत्तदा ॥ शुंभादिकान्दैत्यवरान्पृथक्पृथक्स्वयंसुवर्णाद्रिगुहामगात्पुनः ॥३३॥ इति श्रीकार्तिकमाहात्म्येश्रीकृष्णसत्यासंवादेजलंधरोपाख्यानेजलंधरविजयप्राप्तिर्नामदशमोऽध्यायः ॥ १० ॥ ॥ नारदउवाच ॥ पुनर्दैत्यंसमायांतंदृष्ट्वादेवास्सवासवाः ॥ भयप्रकंपिताःसर्वेविष्णुंस्तोतुंप्रचक्रमुः ॥ १ ॥ देवाऊचुः॥ नमोमत्स्यकूर्मादिनानास्वरूपैःसदाभक्तकार्योद्यतायार्तिहंत्रे ॥ विधात्रादिसर्गस्थितिध्वंसकर्त्रेगदाशंखपद्मारिहस्ताय तेऽस्तु ॥ २ ॥

मोठमोठे दैत्य त्यानें नेमिले व आपण पुन्हा सुवर्णगिरी पर्वताचे गुहेला देवांचा शोध करीत गेला ॥ ३३ ॥ इति दशमोऽध्यायः ॥ १० ॥ नारद ह्मणतातः–राजा, पुन्हा दैत्य आलेला पाहून इंद्रादिक सर्व देव भयानें थरथरां कांपूं लागले व त्यांनीं विष्णूची स्तुति करण्यास आरंभ केला ॥ १ ॥ देव ह्मणतातः–हे विष्णु, तुह्मीं भक्तांच्या कार्या-

करितां मत्स्य कूर्म इत्यादि रूपें धारण करून त्यांचीं दुःखें नाहींशीं करणारे, ब्रह्मदेवादिक जगाची उत्पत्ति, स्थिति व नाश करणारे, शंख, चक्र, गदा व पद्म धारण करणारे असे आहां; तुह्मांला नस्कार असो ॥ २ ॥ लक्ष्मीचे पति, दैत्यांचा नाश करणारे, गरुडावर बसणारे, पीतांबर नेसणारे, यज्ञादि कर्में पूर्ण करणारे, बलियज्ञविध्वंसक, भक्तवत्सल शरणागतरक्षक अशा तुह्मांला आह्मीं नमस्कार करितों ॥ ३ ॥ दैत्यांनीं पीडिलेल्या देवांच्या दुःखरूप पर्वताला वज्रा-

रमावल्लभायासुराणांनिहंत्रेभुजंगारियानायपीतांबराय ॥ मखादिक्रियापाककर्त्रेविकर्त्रेशरण्या यतस्मैनताःस्मोनताःस्मः॥३॥नमोदैत्यसंतापितामर्त्यदुःखाचलध्वंसदंभोलयेविष्णवेते॥भुजंगे शतल्पेशयायार्कचंद्रद्विनेत्रायतस्मैनताःस्मोनताःस्मः ॥ ४ ॥ नारदउवाच ॥ संकष्टनाशनं नामस्तोत्रमेतत्पठेन्नरः ॥ सकदाचिन्नसंकष्टैःपीड्यतेकृपयाहरेः॥ ५ ॥ इतिदेवाःस्तुतिंयावत्कु र्वंतिदनुजद्विषः ॥ तावत्सुराणामापत्तिर्विज्ञाताविष्णुनातदा ॥ ६ ॥ सहसोत्थायदैत्यारिःस क्रोधःखिन्नमानसः ॥ आरूढोगरुडंवेगाल्लक्ष्मींवचनमब्रवीत् ॥ ७ ॥

प्रमाणें भेद करणारे हे विष्णो, जलांत शयन करणारे, शेषराजशय्येवर निजणारे, चंद्र सूर्य ज्याचे दोन नेत्र, अशा हे भगवंता तुह्मांला वारंवार नमस्कार करितों ॥ ४ ॥ नारद ह्मणतात–राजा हें संकटनाश करणारें स्तोत्र जे ह्मण- तील त्यांना श्रीहरीच्या कृपेनें कधींही संकटाची बाधा होणार नाहीं ॥ ५ ॥ याप्रमाणें देव दैत्यशत्रु भगवंताची स्तुति करीत आहेत, इतक्यांत विष्णूनीं देवांचें संकट जाणिलें ॥ ६ ॥ दैत्यारी विष्णु देवांचे दुःखानें खिन्नचित्त

होऊन रागानें उठले व वेगानें गरुडावर बसून लक्ष्मीला भाषण करते झाले ॥ ७ ॥ विष्णु ह्मणतातः–तुझा भाऊ ज- लंधर यानें देवांचा नाश केला ह्मणून त्यांनीं साह्यार्थ मला बोलाविलें; करितां त्वरेनें युद्धाला जातों ॥ ८ ॥ लक्ष्मी ह्मणत्ये–देवा मी तुमची प्रियपत्नी भक्तीनें जर तुह्मांला प्रिय आहें तर युद्धांत माझे भावाला मारणें कसें योग्य होईल ॥ ९ ॥ विष्णु ह्मणतातः–हे लक्ष्मी, तो रुद्रांशापासून झालेला आहे व ब्रह्मदेवाचा त्याला वर आहे; करितां तुझ्या

॥ श्रीभगवानुवाच ॥ ॥ जलंधरेणतेभ्रात्रादेवानांकदनंकृतम् ॥ तैराहूतोगमिष्यामियुद्धाया द्यत्वरान्वितः ॥ ८ ॥ श्रीरुवाच ॥ अहंतेवल्लभानाथभक्त्याचयदिसर्वदा ॥ तत्कथंतेममभ्रा तायुद्धेवध्यःकृपानिधे ॥ ९ ॥ ॥ श्रीभगवानुवाच ॥ ॥ रुद्रांशसंभवत्वाच्चब्रह्मणोवचना दपि ॥ प्रीत्याचतवनैवायंममवध्योजलंधरः ॥ १० ॥ ॥ नारदउवाच ॥ ॥ इत्युक्त्वागरु डारूढःशंखचक्रगदासिभृत् ॥ विष्णुर्वेगाद्ययौयुद्धंयत्रदेवाःस्तुवंतिते ॥ ११ ॥ अथारुणानुजा त्युग्रपक्षवातप्रपीडिताः ॥ वात्याविर्तर्जितादैत्याबभ्रमुःखेयथाघनाः ॥१२॥ ततोजलंधरोदृष्ट्वा दैत्यान्वातप्रपीडितान् ॥ उद्धृत्यनयनःक्रोधात्ततोविष्णुंसमभ्ययात् ॥ १३ ॥

प्रीतीस्तव मी त्याला युद्धांत मारणार नाहीं ॥ १० ॥ नारद ह्मणतात–विष्णु याप्रमाणें बोलून हातांत शंख चक्र गदा खड्ग घेऊन गरुडावर बसून जेथें देव स्तुति करीत होते तेथें त्वरेनें साहाय्यास आले ॥ ११ ॥ तेव्हां गरुडाच्या भयंकर पंखाच्या वाऱ्यानें पीडित कितीएक दैत्य आकाशांत मेघाप्रमामें भ्रमण पाऊं लागले ॥ १२ ॥ गरुड पक्षा-

च्या वाऱ्याचे योगानें दैत्यांची अशी दशा झालेली पाहून जलंधर रागानें डोळे वटारून विष्णू जवळ आला ॥ १३ ॥ तेव्हां त्याचें व विष्णूचें मोठें युद्ध झालें. सर्व आकाश त्या दोघांच्या बाणांनीं भरून गेलें ॥ १४ ॥ विष्णूंनीं बाण मारून त्या दैत्याचे ध्वज छत्र धनुष्य व घोडे छेदून टाकले व त्याचे छातीवर एक बाण मारिला ॥ १५ ॥ तेव्हां दैत्यानें त्वरेनें उडी मारून हातांत गदा घेऊन ती गरुडाच्या डोक्यावर मारिली व त्याला खालीं पाडिलें ॥ १६ ॥

ततःसमभवद्युद्धंविष्णुदैत्येंद्रयोर्महत्॥आकाशंकुर्वंतोबाणैस्तदानिरवकाशवत् ॥ १४ ॥ विष्णु दैंत्यस्यबाणौघैर्ध्वजंछत्रंधनुर्हयान् ॥ चिच्छेदतंचहृदयेबाणेनैकेनचाहनत् ॥ १५॥ ततोदैत्यः समुत्पत्त्यगदापाणिस्त्वरान्वितः ॥ आहत्यगरुडंमूर्ध्निपातयामासभूतले ॥ १६ ॥ विष्णुर्गदां स्वखड्गेनचिच्छेदप्रहसन्निव ॥ तावत्सहृदयेविष्णुंजघानदृढमुष्टिना ॥ १७ ॥ ततस्तौबाहुयुद्धे नयुयुधातेमहाबलौ ॥ बाहुभिर्मुष्टिभिश्चैवजानुभिर्नादयन्महीम् ॥ १८ ॥ एवंतौरुचिरंयुद्धंकृ त्वाविष्णुःप्रतापवान् ॥ उवाचदैत्यराजानंमेघगंभीरनिःस्वनः ॥ १९ ॥

विष्णूंनीं हासत हासत सहज लीलेनें आपल्या खड्गानें त्याची गदा तोडिली. इतक्यांत त्यानें विष्णूच्या हृदयावर बुक्की मारिली ॥ १७ ॥ नंतर ते महाबली बाहुयुद्ध करिते झाले. दंड, बुक्या, गुडघे यांच्या प्रहारांच्या नादानें पृथ्वी दणाणली ॥ १८ ॥ याप्रमाणें उत्कृष्ट प्रकारचें युद्ध केल्यावर प्रतापी विष्णु मेघासारख्या गंभीरवाणीनें त्या दैत्याला बोलले

॥ १९ ॥ विष्णु ह्मणाले—दैत्येंद्रा ! तुझा पराक्रम पाहून मी संतुष्ट झालों वर माग; न देण्यासारखें असेल तें सुद्धां देईन, तुझ्या मनांत असेल तें माग ॥ २० ॥ जलंधर ह्मणतोः—हे भाऊजी ! तूं संतुष्ट आहेस तर एक वर मला दे. माझी बहीण जी लक्ष्मी तिला घेऊन सर्व सेवकांसह आजपासून तूं माझे घरीं वास्तव्य कर ॥ २१ ॥ नारद ह्मणतात—राजा

॥ विष्णुरुवाच ॥ ॥ वरंवरयदैत्येंद्रप्रीतोस्मितवविक्रमात् ॥ अदेयमपितेदद्मियत्तेमनसिवर्तते ॥ २० ॥ ॥ जलंधरउवाच ॥ ॥ यदिभावुकतुष्टोसिवरमेकंददस्वमे ॥ मद्भगिन्यासहाद्यत्वं मद्गृहेसगणोवस ॥ २१ ॥ ॥ नारदउवाच ॥ ॥ तथेत्युक्त्वासभगवान्सर्वदेवगणैःसह ॥ तदाजलंधरपुरमगमद्रमयासह ॥ २२ ॥ जलंधरस्तुदेवानामधिकारेषुदानवान् ॥ स्थापयित्वा महाबाहुःपुनरागान्महीतलम् ॥ २३ ॥ देवगंधर्वसिद्धेषुयत्किंचिद्रत्नसंज्ञितम् ॥ तदात्मव शंगंकृत्वातिष्ठत्सागरनंदनः ॥ २४ ॥ पातालभुवनेदैत्यंनिशुंभंसमहाबलम् ॥ स्थापयित्वा सशेषादीनानयद्भूतलंबली ॥ २५ ॥

ते विष्णु, जलंधरास वर देऊन देवगण व लक्ष्मी यांसह जलंधराच्या नगरांत जाऊन राहिले ॥ २२ ॥ तो महा-पराक्रमी जलंधर देवांच्या अधिकारांवर दैत्यांस नेमून पुन्हा पृथ्वीवर येता झाला ॥ २३ ॥ तो सागरपुत्र जलंधर, देव, गंधर्व, सिद्ध यांजपाशीं जेवढीं ह्मणून रत्नें होतीं, तीं सर्व आपले स्वाधीन करून घेऊन राहिला ॥ २४ ॥ पाताला-

मध्यें निशुंभ नांवाच्या पराक्रमी दैत्यास अधिकारी नेमून शेषादिकांना पृथ्वीवर आणिलें ॥ २५ ॥ देव, गंधर्व, सिद्ध, सर्प, राक्षस, मनुष्यें यांना आपल्या नगरच्या रहिवाशी प्रजा करून तिन्ही लोकांचें राज्य करूं लागला ॥ २६ ॥ याप्रमाणें जलंधरानें सर्व देवादिकांना आपले ताब्यांत ठेवून तो प्रजेचें रक्षण पोटच्या मुलाप्रमाणें मोठ्या धर्मानें करूं लागला ॥ २७ ॥ यामुळें त्याचे राज्यांत रोगी, दरिद्री, कृश, दुःखी, अनाथ असा कोणीही दिसत नव्हता

देवगंधर्वसिद्धाद्यान्सर्पराक्षसमानुषान् ॥ स्वपुरेनागरान्कृत्वाशशासभुवनत्रयम् ॥ २६ ॥ एवं जलंधरःकृत्वादेवान्स्ववशवर्तिनः ॥ धर्मेणपालयामासप्रजाःपुत्रानिवौरसान् ॥ २७ ॥ नकश्चिद्व्याधितोनैवदुःखीनैवकृशस्तथा ॥ नदीनोदृश्यतेतस्मिन्धर्माद्राज्यंप्रशासति ॥ २८ ॥ एवं महींशासतिदानवेंद्रेधर्मेणसम्यक्चदिदृक्षयाहम् ॥ कदाचिदागांमथतस्यलक्ष्मींविलोकितुंश्रीरमणंचसेवितुम् ॥ २९ ॥ इतिश्रीपद्मपुराणेउत्तरखंडेकार्तिकमाहात्म्येश्रीकृष्णसत्यासंवादेनारदागमनंनामैकादशोऽध्यायः ॥ ११ ॥ नारदउवाच ॥ समांसंपूज्यविधिवद्दानवेंद्रोतिभक्तिमान् ॥ संप्रहस्यतदावाक्यंजगादभुवनेश्वरः ॥ १ ॥

॥ २८ ॥ याप्रमाणें तो जलंधर धर्मानें राज्य करीत असतां, त्याचें ऐश्वर्य पहावें व लक्ष्मीपति भगवान् यांचें दर्शन घ्यावें अशा हेतूनें एकदा मी त्याचे नगरास गेलों ॥ २९ ॥ इति श्रीप० का० म० जालं० एकादशोध्यायः ॥ ११ ॥ नारद ह्मणतात–राजा जलंधरानें मोठ्या भक्तीनें माझी पूजा केली व हंसून मला ह्मणाला ॥ १ ॥

हे ब्रह्मन्! आपण कोठून आलांत? विशेष काय काय पाहिलें? येथें कोणत्या कार्या करितां आलां त्याची मला आज्ञा करा ।२। नारद ह्मणतात–हे दैत्येंद्रा, मी सहज कैलासाला गेलों असतां तेथें पार्वतीसह शंकर बसलेले पाहिले ।।३।। तेथें दहाहजार योजनें कल्पवृक्षांचें वन आहे,शेकडों कामधेनू आहेत व चिंतामणींचा सर्वत्र चकचकाट आहे ॥ ४ ॥ तें पाहून मला मोठें

कुतआगम्यतेब्रह्मन्किंचिद्दृष्टंत्वयाप्रभो ॥ यदर्थमिहचायातस्तदाज्ञापयमांमुने ॥ २ ॥ ॥ नारदउवाच ॥ ॥ गतःकैलासशिखरेदैत्येंद्राहंयदृच्छया ॥ तत्रोमयासमासीनंदृष्टवानस्मि शंकरम् ॥३॥ योजनायुतविस्तीर्णेकल्पवृक्षमहावने ॥ कामधेनुशताकीर्णेचिन्तामणिसुदीपिते ॥ ४ ॥ तद्दृष्ट्वामहदाश्चर्यंविस्मयोमेभवत्तदा ॥ क्वापीदृशीभवेदृद्धिस्त्रैलोक्येवानवेतिच ॥ ५ ॥ तदातवापिदैत्येंद्रसमृद्धिःसंस्मृतामया ॥ तद्विलोकनकामोस्मित्वत्सान्निध्यमिहागतः ॥ ६ ॥ त्वत्समृद्धिमिमांपश्यन्स्त्रीरत्नरहितांध्रुवम् ॥तर्कयामिशिवादन्यस्त्रिलोक्यांनसमृद्धिमान् ॥७॥ अप्सरोनागकन्याद्यायद्यपित्वद्गृहेस्थिताः ॥ तथापितानपार्वत्यारूपेणसदृशाध्रुवम् ॥ ८ ॥

आश्चर्य वाटलें, व अशी संपत्ति त्रैलोक्यांत सुद्धां असेल कीं नाहीं असें वाटलें ॥५॥ तेव्हां तुझ्या ऐश्वर्याची मला आठवण झाली व तें पाहावें ह्मणून तुजकडे आलों ॥ ६ ॥ ही तुझी समृद्धि पाहिली पण ती स्त्रीरत्नाखेरीज आहे. तेव्हां मी विचार केला कीं, या त्रैलोक्यांत शंकरासारखा संपत्तिवान् दुसरा कोणी नाहीं ॥ ७ ॥ तुझ्याजवळ अप्सरा ना-

गकन्या वगैरे पुष्कळ आहेत, तरी त्या पार्वतीच्या रूपाची बरोबरी स्त्रीनें करणार नाहींत ॥ ८ ॥ जिच्या लावण्य-समुद्रांत ब्रह्मदेव निमग्न होऊन धैर्यच्युत झाला अशा त्या पार्वतीची बरोबरी कोण करणार आहे ॥ ९ ॥ मदनाचा नाश करणारा विरक्त असा शंकर असून तिच्या रूपाला भुलून तिच्या लावण्यरूपसमुद्रांत मासोळीप्रमाणें फिरत होता ॥ १० ॥ पार्वतीचें रूप पाहून तशी स्त्री उत्पन्न करावी म्हणून ब्रह्मदेवानें पुनः पुनः स्त्रिया उत्पन्न केल्या, त्या अप्सरा

यस्यालावण्यजलधौनिमग्नश्चतुराननः ॥ स्वधैर्यमुमुचत्पूर्वंतयाकान्योपमीयते ॥९॥ वीतरागोपिचयथामदनारिःस्वलीलया ॥ सौंदर्यगहनेऽभ्रामिशफरीरूपयापुरा॥१०॥यस्याःपुनःपुनःपश्यन्रूपंधातापिसर्जने ॥ ससर्जाप्सरसस्तासांतत्समैकापिनाभवत् ॥११॥ अतःस्त्रीरत्नसंभोकुःसमृद्धिस्तस्यसावरा ॥ तथानतवदैत्येन्द्रसर्वरत्नाधिपस्यच ॥१२॥ एवमुक्त्वातमामंत्र्यगतेसतिसदैत्यराट् ॥ तद्रूपश्रवणादासीदनंगज्वरपीडितः ॥१३ ॥ अथसंप्रेषयामासदूतंतुसिंहिकासुतम् ॥ त्र्यंबकायापिचतदाविष्णुमायाविमोहितः ॥ १४ ॥

झाल्या परंतु तशी एकही स्त्री झाली नाहीं ॥ ११ ॥ अशा स्त्रीचा जो उपभोग घेणारा त्याचीच संपत्ति श्रेष्ठ आहे । तूं सर्व रत्नांचा धनी आहेस, तरी तसें तुझें ऐश्वर्य नाहीं ॥ १२ ॥ याप्रमाणें बोलून त्याचा निरोप घेऊन मी गेल्यानंतर पार्वतीच्या रूपाचें वर्णन त्यानें ऐकल्यामुळें तो कामज्वरानें पीडित झाला ॥ १३ ॥ नंतर विष्णूच्या मायेनें मो-

हित झाल्यामुळें त्यानें आपला दूत राहू याजला शंकराकडे पाठविलें ॥१४॥ तो शुक्लपक्षींच्या चंद्राप्रमाणें तेजस्वी अशा कैलासाला गेला, तेव्हां त्याच्या काळ्या शरीरामुळें तो कैलास कृष्णपक्षींच्या चंद्राप्रमाणें भासूं लागला ॥ १५ ॥ नंदीनें शंकराला तो आल्याची खबर दिल्यावर तो आंत प्रवेश करिता झाला; शंकरांनीं त्यास भ्रूलतेनें बोलण्याची सूचना करतांच तो बोलूं लागला ॥१६॥ राहु म्हणतो—देव नाग ज्याची सेवा करितात, जो त्रैलोक्याचा व सर्व रत्नांचा

कैलासमगमद्राहुःकुर्वन्शुक्लेंदुवर्चसम् ॥ कार्ष्ण्येनकृष्णपक्षेंदुवर्चसंस्वांगजेनतम्॥१५॥निवेदितस्तुदेवायनंदिनाप्रविवेशसः॥त्र्यंबकभ्रूलतासंज्ञाप्रेरितोवाक्यमब्रवीत् ॥१६॥ राहुरुवाच॥देवपन्नगसेव्यस्यत्रैलोक्याधिपतेः प्रभो ॥ सर्वरत्नेश्वरस्यत्वमाज्ञांशृणुवृषध्वज ॥१७॥ श्मशानवासिनोनित्यमस्थिमारवहस्यच ॥ दिगंबरस्यतेभार्याकथंहैमवतीशुभा ॥ १८ ॥ अहंरत्नाधिनाथोस्मिसाचस्त्रीरत्नसंज्ञिका ॥ तस्मान्ममैवसायोग्यानैवभिक्षाशिनस्तव ॥१९॥ नारदउवाच ॥ ॥ वदत्येवंतदाराहौभ्रूमध्याच्छूलपाणिनः ॥ अभवत्पुरुषोरौद्रस्तीव्राशनिसमस्वनः ॥ २० ॥

स्वामी जलंधर त्याची तुम्हांला आज्ञा आहे; ती वृषध्वज शंकरा ऐका ॥१७॥ तूं स्मशानांत राहणारा, आंगावर हाडकें बाळगणारा, दिगंबर (नग्न) असणारा, अशा तुला अशी सुंदर स्त्रीरत्न पार्वती कशी शोभेल? ॥१८॥ मी सर्व रत्नांचा मालक आहें आणि पार्वती स्त्रियांत रत्न आहे; तेव्हां ती मलाच योग्य आहे, तुला भिक्षा मागून खाणाराला ती योग्य नाहीं ॥१९॥ नारद म्हणतातः—याप्रमाणें राहू बोलत आहे इतक्यांत शंकराच्या भुवयांमधून विजेसारखा शब्द करणारा

भयंकर पुरुष निघाला ॥ २० ॥ त्याचें तोंड सिंहासारखें, जीभ बाहेर आलेली व लळलळ करणारी, अग्नीच्या ज्वाळे-प्रमाणें ज्याचे डोळे, मोठा उंच, केश उभे, शरीर कृश, भयंकर जसा दुसरा नारसिंहच ॥ २१ ॥ असा तो पुरुष राहूला खाण्याकरितां धावला, तें पाहून राहू घाबरून भयानें अतिवेगानें बाहेर पळाला; तरी त्याला त्यानें धरिलें ॥ २२ ॥ हे राजा, तो राहू मोठ्यानें ओरडून शंकराला ह्मणाला- देवा मी शरण आलों; माझें रक्षण कर ॥ २३ ॥ मला ब्राह्म-

सिंहास्यःप्रचलज्जिव्हःसज्वालनयनोमहान् ॥ ऊर्ध्वकेशःशुष्कतनुर्नृसिंहइवचापरः ॥२१॥ सतं खादितुमायांतंदृष्ट्वाराहुर्भयातुरः॥पलायन्नतिवेगेनबहिःसचदधारतम् ॥२२ ॥ सचराहुर्महाबाहोमेघगंभीरयागिरा ॥ उवाचदेवदेवत्वंपाहिमांशरणागतम् ॥२३॥ब्राह्मणंमांमहादेवखादितुं समुपागतः॥महादेवोवचःश्रुत्वाब्राह्मणस्यतदाब्रवीत् ॥२४ ॥ धृत्वाखादितुमारब्धस्तावद्रुद्रेण वारितः ॥ नैवासौवध्यतामेतिदूतोयंपरवान्यतः॥२५॥मुंचेतिपुरुषःश्रुत्वाराहुंतत्याजसोंबरे ॥ राहुंत्यक्त्वासपुरुषस्तदारुद्रंव्यजिज्ञपत् ॥ २६ ॥

णाला खाण्यास हा आला आहे; त्या ब्राह्मण राहूचें हें भाषण ऐकून शंकर ह्मणाले ॥ २४ ॥ तो राहूला धरून खाणार इतक्यांत शंकरांनीं त्याचें निवारण केलें व ह्मणाले-हा दूत, दुसऱ्याचा चाकर आहे ह्मणून हा वध करण्यास योग्य नाहीं ॥ २५ ॥ याला सोड, असें ऐकतांच त्यानें राहूला आकाशांत फेकलें; नंतर तो पुरुष शंकराची विनंति करूं

लागला ॥ २६ ॥ पुरुष ह्मणालाः-मला फार भूक लागली मी भुकेनें व्याकुळ झालों आहें. मी काय खाऊं त्याची आज्ञा कर ॥ २७ ॥ शंकर ह्मणालेः-तूं आपल्या हातापायाचें मांस खा. नारद ह्मणतात-शंकरानीं अशी आज्ञा करितांच तो आपल्यालाच खाऊं लागला ॥ २८ ॥ हात पाय वगैरे सर्व मांस खाल्लें; फक्त मस्तक शेष राहिलें. तें पाहून शंकर प्रसन्न झाले ॥ २९ ॥ असें घोर कर्म करणारा पुरुष पाहून विस्मय वाटून बोलले, शंकर ह्मणतात-तूं कीर्ति-

॥ पुरुषउवाच ॥ क्षुधामांबाधतेत्यन्तंक्षुत्क्षामश्चास्मिसर्वथा ॥ किंभक्षयामिदेवेशतदाज्ञापयमां प्रभो ॥२७॥ ईश्वरउवाच ॥ ॥ भक्षयस्वात्मनःशीघ्रंमांसंत्वंहस्तपादयोः ॥ नारदउवाच ॥ ॥ सशिवेनैवमाज्ञप्तश्चखादपुरुषःस्वकम्॥२८॥हस्तपादोद्भवंमांसंशिरःशेषंयथाभवत् ॥ दृष्ट्वाशिरोवशेषंतंसुप्रसन्नस्तदाशिवः ॥ २९ ॥ उवाचभीमकर्माणंपुरुषंजातविस्मयः ॥ ईश्वरउवाच ॥ ॥ त्वंकीर्तिमुखसंज्ञोहिभवमद्वारिगःसदा ॥ ३० ॥ त्वदर्चायेनकुर्वंतिनैवतेमत्प्रियंकराः ॥ नारद उवाच ॥ तदाप्रभृतिदेवस्यद्वारिकीर्तिमुखःस्थितः ॥३१॥ नार्चयंतीहयेपूर्वंतेषामर्चाद्वथाभवेत् राहुर्विमुक्तोयस्तेनसोपतद्बर्बरस्थले ॥ ३२ ॥

मुख या नांवाचा होऊन नेहमीं माझे दारांत राहा ॥ ३० ॥ तुझी प्रथम पूजा जे करणार नाहींत ते मला प्रिय होणार नाहींत । नारद ह्मणतातः-तेव्हांपासून देवाच्या दारांत कीर्तिमुख राहिला ॥ ३१ ॥ जे अगोदर त्याची पूजा करणार नाहींत त्यांची पूजा निष्फळ होईल । त्यानें फेकलेला राहू त्याचे हातून सुटला तो बर्बर देशांत पडला ॥ ३२ ॥

ह्मणून राहू बर्बरदेशांत झालेला असें त्यांचें नांव प्रसिद्ध झालें. नंतर राहूनें आपला पुन्हां जन्मच झाला असें मानलें व जलंधराजवळ येऊन सर्व हकीकत सांगितली ॥ ३३ ॥ इति श्रीप. का. मा. द्वादशोध्यायः ॥ १२ ॥ नारद ह्मणतातः—राजा जलंधरानें ती हकीकत ऐकिली तेव्हां त्याला मोठा राग आला व कोट्यावधि दैत्य बरोबर घेऊन कैला-

अतःसबर्बरेभूतइतिभूमौप्रथांगतः ॥ ततःसराहुःपुनरेवजातमात्मानमस्मिन्निति मन्यमानः॥ समेत्य सर्वंकथयांबभूवजलंधरायैवविचेष्टितंतत् ॥३३॥ इतिश्रीपद्मपुराणेकार्तिकमाहात्म्येजलंधरोपाख्यानेदूतसंवादेद्वादशोऽध्यायः ॥ १२ ॥ नारदउवाच ॥ जलंधरस्तुतच्छ्रुत्वाकोपाकुलितविग्रहः॥निर्जगामाशुदैत्यानांकोटिभिःपरिवारितः ॥ १ ॥ गच्छतोप्याग्रतःशुक्रोराहुर्दृष्टिपथेभवत् ॥ मुकुटश्चापतद्भूमौवेगात्प्रस्खलितस्तदा ॥ २ ॥ दैत्यसैन्यावृतैस्तस्यविमानानांशतैस्तदा ॥व्यराजतनभःपूर्णंप्रावृषीवयथाघनैः ॥ ३ ॥ तस्योद्योगंतदादृष्ट्वादेवाःशक्रपुरोगमाः ॥ अलक्षितास्तदाजग्मुः शूलिनंतेव्यजिज्ञपुः ॥ ४ ॥

सास निघाला ॥ १ ॥ जातांना शुक्राचार्य पुढें होते; वाटेंत मार्गदर्शक राहू होता। वेगानें जाऊं लागल्यामुळें तो मार्गांत अडखळून पडला व त्याचा मुकुट डोक्यावरून खालीं पडला ॥ २ ॥ दैत्यांच्या सैन्यांनीं भरलेलीं शेकडों विमानें आकाशांत चाललीं तेव्हां पावसाळ्यांत ढगांनीं व्यापलेल्या आकाशाप्रमाणें नभ शोभत होतें ॥ ३ ॥ जलंधराचा असा उद्योग पाहून, इंद्रप्रमुख देव गुप्तरूपानें जाऊन शंकराची प्रार्थना करूं लागले ॥ ४ ॥ देव ह्मणतातः—हे प्रभो शंकरा आमचें दुःख आपण कसें जाणत नाहीं? आमच्या रक्षणाकरितां जलंधराचा नाश करा ॥ ५ ॥ नारद ह्मणतातः—याप्रमाणें देवांचें भाषण ऐकून वृषभध्वज शंकर हांसले आणि महाविष्णूला बोलावून भाषण केलें ॥६॥ शंकर ह्मणतातः-हे विष्णो! तुह्मी युद्धांत जलंधराला कां मारिलें नाहीं? आणि आपलें वैकुंठ सोडून त्याचेच घरीं येऊन कां राहिलां?

॥ देवाऊचुः ॥ ॥ नजानासिकथंस्वामिन्देवापत्तिमिमांविभो ॥ तदस्मद्रक्षणार्थायजहिसागरनंदनम् ॥ ५ ॥ ॥ नारदउवाच ॥ ॥ इतिदेववचःश्रुत्वाप्रहस्यवृषभध्वजः ॥ महाविष्णुंसमाहूयवचनंचेदमब्रवीत् ॥६॥ ईश्वरउवाच ॥ ॥ जलंधरःकथंविष्णोनहतः संगरेत्वया॥ तद्गृहंचापियातोसित्यक्त्वावैकुंठमात्मनः ॥७॥ ॥ विष्णुरुवाच॥ ॥ तवांशसंभवत्वाच्चभ्रातृत्वाच्चयथाश्रियः ॥ नमयानिहतःसंख्येत्वमेनंजहिदानवम् ॥८॥ ॥ ईश्वरउवाच ॥ ॥ नायमेभिर्महातेजाःशस्त्रास्त्रैर्वध्यतेमया ॥ देवैःसहस्वतेजोंशंशस्त्रार्थंदीयतांमम ॥ ९ ॥ नारदउवाच ॥ अथ विष्णुमुखादेवाः स्वतेजांसिददुस्तदा ॥ तान्यैक्यमागतानीशोदृष्ट्वास्वंचामुचन्महः ॥१०॥

॥७॥ विष्णु ह्मणालेः—तो तुमच्या अंशापासून उत्पन्न झालेला व लक्ष्मीचा भाऊ ह्मणून मी याला युद्धांत मारलें नाहीं, तुह्मीच याला जिंका ॥८॥ शंकर ह्मणतातः—हे विष्णो! हा मोठा तेजस्वी बलवान् आहे; आतां या शस्त्रांनीं व अस्त्रांनीं माझ्यानें त्याला मरविणार नाहीं ह्मणून सर्व देवांनीं व तुह्मी आपआपला अंश शस्त्राकरितां मला द्यावा ॥ ९ ॥ नारद

म्हणतातः- राजा-नंतर विष्णुप्रमुख सर्व देवानीं आपआपले तेजांश दिले, ते एकत्र झालेले पाहून शंकरांनीं आपला मोठा तेजांश त्यांत घातला ॥ १० ॥ त्या तेजाचें एक मोठें सुदर्शन नांवाचें चक्र, ज्वाळेच्या लोळानीं भयंकर असें शंकरांनीं केलें॥११॥ नंतर शेषतेजानें इंद्रानें वज्र केलें इतक्यांत कैलास पर्वताच्या पायथ्यापाशीं जलंधर दृष्टीस पडला ॥ १२ ॥ कोट्यावधि हत्ती, घोडे, रथ, पायदळ अशा सैन्यानें युक्त जलंधराला पाहून सर्व देव आले होते तसे गुप्त-

तेनाकरोन्महादेवोमहसांशस्त्रमुत्तमम् ॥ चक्रंसुदर्शनंनामज्वालामालातिभीषणम् ॥११॥ ततः
शेषेणचतदावज्रंचकृतवान्हरिः ॥ तावज्जलंधरोदृष्टःकैलासतलभूमिषु ॥ १२ ॥ हस्त्यश्वरथप
त्तीनांकोटिभिःपरिवारितः ॥ तंदृष्ट्वालक्षिताजग्मुर्देवाःसर्वेयथागताः ॥१३॥ गणाश्चसमसज्जं
तयुद्धायातित्वरान्विताः ॥ नंदीभवक्त्रसेनानीमुखाःसर्वेशिवाज्ञया ॥ १४ ॥ अवतेरुर्गणावेगा
त्कैलासाद्युद्धदुर्मदाः ॥ ततःसमभवद्युद्धंकैलासोपत्यकाभुवि ॥ १५ ॥ प्रमथाधिपदैत्यानांघोर
शस्त्रास्त्रसंकुलम् ॥ भेरीमृदंगशंखौघनिःस्वनैर्वीरहर्षणः ॥ १६ ॥

पणानें निघून गेले ॥ १३ ॥ शंकराच्या आज्ञेनें नंदी, गणपति कार्तिकस्वामी आदिकरून व सर्व गण युद्धाला तयार झाले ॥ १४ ॥ व युद्धांत अजिंक्य असे शंकराचे गण कैलास पर्वतावरून खालीं उतरले व कैलासाच्या तळाशीं त्यांचें युद्ध सुरू झालें॥१५॥शिवाचे गण व दैत्य यांचे शस्त्रास्त्रांच्या ध्वनीनें व्याप्त झाले व नगारे मृदंग शंख

यांचा शब्द ऐकून सर्वांस वीरश्री आली ॥ १६ ॥ हत्ती, घोडे, रथ, यांच्या शब्दांनीं पृथ्वी नादित होऊन कांपूं लागली । शक्ति, तोमर, बाणांचा समुदाय, मुसळ, प्रास, पट्टिश वगैरे शस्त्रांनीं आकाश भरून गेलें तें उल्कांनीं व्याप-लेल्यासारखें शोभूं लागलें व पृथ्वीवर प्रमथादि गणांनीं दैत्य व दैत्यांनीं मारून पाडलेले गण व हत्ती, घोडे, पायदळ रथ या योगानें वज्रानें पर्वताचे झालेले तुकडे पृथ्वीवर पडले आहेत कीं काय असे भासले ॥ १७ ॥ १८ ॥ १९ ॥ वसा,

गजाश्वरथशब्दैश्चनादिताभूर्व्यकंपत ॥ शक्तितोमरबाणौघमुसलप्रासपट्टिशैः ॥१७॥ व्यराज
तनभःपूर्णमुल्काभिरिवसंवृतम् ॥ निहतैस्थनागाश्वपत्तिभिर्भूर्व्यराजत ॥१८॥ वज्राहताचल
शिरःशकलैरिवसंवृता ॥ प्रमथाहतदैत्याद्यैर्दैत्याहतगणैस्तथा॥१९॥ वसासृङ्मांसपंकाढ्याभू
रगम्याभवत्तदा ॥ प्रमथाहतदैत्यौघान्भार्गवःसमजीवयत् ॥२०॥ युद्धेपुनःपुनस्तत्रमृतसंजी
विनीबलात् ॥ तंदृष्ट्वाव्याकुलीभूतागणाःसर्वेभयान्विताः २१ ॥ शशंसुर्देवदेवायतत्सर्वंशुक्रचे
ष्टितम् ॥ अथरुद्रमुखात्कृत्याबभूवातीवभीषणा ॥ २२ ॥

मांस, रक्त यांचा चिखल झाल्यामुळें उंच सखल वगैरे कांहींच समजेनासें झालें! शिवगणांनीं मारलेले दैत्य शुक्र जिवंत करीत होता ॥२०॥ अमृतसंजीवनी विद्येनें दैत्य पुनः पुन्हां उठतात हें पाहून गण व्याकूळ होऊन भ्याले॥२१॥व शंकराला तें शुक्राचें सर्व कृत्य सांगते झाले. तेव्हां शंकराच्या मुखापासून अतिभयंकर अशी एक कृत्या निघाली! जिचे पाय

ताडवृक्षाप्रमाणें, तोंड दरीप्रमाणें व डोंगराप्रमाणें स्तन अशी होती ! ती युद्धभूमीवर बसून दैत्यांना खाऊं लागली॥२२॥ ॥२३॥तिनें शुक्राला धरून आपले योनींत ठेविलें व आकाशांत अंतर्धान पावली । शुक्राला धरिलेलें पाहून शिवगणांला हर्ष झाला व त्यांनीं दैत्यांच्या सैन्याचा नाश केला तेव्हां दैत्याच्या सैन्याची भयानें पळापळ झाली॥२४॥२५॥ वायूच्या वेगानें जसा गवताचा ढीग विसकटून जातो तसें दैत्यांचें सैन्य गणांच्या भयानें भग्न झालें, असें पाहून दुसरे निशुंभादि

तालजंघादरीवक्त्रास्तनापीडितभूरुहा ॥ सायुद्धभूमिमासाद्यभक्षयंतीमहासुरान् ॥ २३ ॥भार्ग वंस्वभगेधृत्वाजगामांतर्हितानभः ॥ विधृतंभार्गवंदृष्ट्वादैत्यसैन्यंगणास्तदा ॥ २४ ॥ अम्लानव दनाहर्षान्निजघ्नुर्युद्धदुर्मदाः ॥ अथाभज्यतदैत्यानांसेनागणभयार्दिता ॥ २५ ॥ वायुवेगेना हतेवप्रकीर्णातृणसंहतिः ॥ भग्नांगणभयात्सेनांदृष्ट्वामर्षयुतायुयुः ॥२६॥ निशुंभशुंभौसेनान्यौ कालनेमिश्ववीर्यवान् ॥ त्रयस्तेवारयामासुर्गणसेनांमहाबलाः ॥२७॥मुंचंतःशरवर्षाणिप्रावृषी वबलाहकाः ॥ ततोदैत्यशरौघास्तेशलभानामिवव्रजाः ॥ २८ ॥

दैत्य आले ॥ २६ ॥ निशुंभ, शुंभ हे सेनापती व मोठा पराक्रमी कलनेमि असे तिघे गणाचे सेनेचें निवारण करूं लागले ॥ २७ ॥ त्यांनीं पावसाळ्यांतील मेघांप्रमाणें बाणांचा वर्षाव केला; त्यांच्या बाणांनीं टोळांच्या समुदाया-प्रमाणें सर्व दिशा व आकाश व्यापिलें तेव्हां गणसेना थरथर कांपू लागली व शेंकडों बाण लागून त्यांचे-

शरीरांतून रक्ताचे प्रवाह वाहूं लागले ॥२८॥ ॥ २९ ॥ गण वसंतऋतूंतील पळसाचे वृक्षाप्रमाणें रक्तानें लाल झाले होते त्या योगानें पडलेले व दुसऱ्यांना पाडणारे सर्व गण छिन्नभिन्न झाले तेव्हां कांहीं समजेनासें झालें होतें ॥३०॥ ते सर्व गण युद्धभूमि सोडून माघारे फिरले ॥ ३१ ॥ आपलें सैन्य नाश पावलें असें पाहून पराक्रमी शैल गणपति व कार्तिक

रुरुधुःखंदिशःसर्वागणसेनामकंपयन् ॥ गणाःशरशतैर्भिन्नारुधिरासारवर्षिणः ॥ २९ ॥ वसंतेकिंशुकाभासानप्राज्ञायतकिंचन ॥ पतिताःपात्यमानाश्चभिन्नाश्छिन्नास्तदागणाः ॥ ॥३०॥ त्यक्त्वासंग्रामभूमिंतेसर्वेपिविमुखाभवन् ॥३१॥ ततःप्रभग्नंस्वबलंविलोक्यशैलादिल म्बोदरकार्तिकेयाः ॥ त्वरान्वितादैत्यवरान्प्रसह्यनिवारयामासुरमर्षिणस्ते ॥३२ ॥ इतिश्रीपद्म पुराणेउत्तरखण्डेकार्तिकमाहात्म्ये श्रीकृष्णसत्यासंवादेरुद्रसेनापराभवोनामत्रयोदशोऽध्यायः ॥ १३ ॥ नारदउवाच ॥ तेगणाधिपतीन्दृष्ट्वानंदीभमुखषण्मुखान् ॥ अमर्षादभ्यधावंतद्वंद्वयु द्धायदानवाः ॥१॥ नंदिनंकालनेमिश्चशुंभोलंबोदरंतथा ॥ निशुंभःषण्मुखंवेगादभ्यधावतदंशितः॥२

स्वामी त्वरेनें पुढें आले, व त्यांनीं त्या दैत्यांचें मोठ्या शौर्यानें निवारण केलें ॥ ३२ ॥ इति त्रयोदशोध्यायः ॥ १३ ॥ नारद ह्मणतात—ते दैत्य नंदी, गणपति, षडानन, यांस पाहून मोठ्या अमर्षानें द्वंद्वयुद्ध करण्याकरितां धावत आले ॥ १ ॥ नंदीबरोबर कालनेमी, गणपतिबरोबर शुंभ व षडाननाबरोबर निशुंभ असे सज्ज होऊन युद्धास

धांवले ॥ २ ॥ निशुंभानें कार्तिकस्वामीच्या मोराला उरांत पांच बाण मारले त्या योगानें तो मूर्छित पडला ॥ ३ ॥ कार्तिकस्वामीनें क्रोधानें आपले हातांत शक्ति घेतली इतक्यांत ती निशुंभानें वेग करून आपल्या शक्तीनें पाडली ॥ ४ ॥ नंदीनें अनेक बाण कालनेमीला मारिले. सात बाणांनीं त्याचे घोडे, ध्वज सारथी व जूं पाडिलें ॥ ५ ॥ काल-

निशुंभःकार्तिकेयस्यमयूरंपंचभिःशरैः ॥ हृदिविव्याधवेगेनमूर्छितःसपपातच ॥ ३ ॥ ततः शक्तिधरःशक्तिंयावज्जग्राहरोषितः ॥ तावन्निशुंभोवेगेनस्वशक्त्यातमपातयत् ॥ ४ ॥ नंदीश्वरःशरव्रातैःकालनेमिमवध्यत ॥ सप्तभिश्चहयान्केतुमीषांसारथिमच्छिनत् ॥ ५ ॥ कालनेमिस्तुसंक्रुद्धोधनुश्चिच्छेदनंदिनः ॥ तदपादस्यसशूलेनतंवक्षस्यहनद्बली ॥६॥ सशूलभिन्नहृदयोहताश्वोहतसारथिः ॥ अद्रेःशिखरमामुच्यशैलाद्रिंसोप्यपातयत् ॥ ७॥ अथशुंभोगणेशश्चरथमूषकवाहनौ ॥ युद्ध्यमानौशरव्रातैःपरस्परमविध्यताम् ॥ ८ ॥ गणेशस्तुतदाशुंभंहृदिविव्याधपत्रिणा ॥ सारथिंचत्रिभिर्बाणैःपातयामासभूतले ॥ ९ ॥

नेमीनें रागानें नंदीचें धनुष्य तोडलें; तें नंदीनें टाकून त्याचे उरावर शूल मारिला॥६॥त्या शूलानें त्याचें हृदय फुटलें व घोडे मेले, सारथि मेला असा झाला तेव्हां त्यानें पर्वताचें शिखर उचलून नंदीश्वरावर टाकिलें ॥ ७ ॥ इकडे रथांत बसणारा शुंभ व उंदरावर बसणारा गणपति यांनीं एकमेकांस बाणांनीं वेधून टाकिलें ॥ ८ ॥ तेव्हां गणपतीनें पत्रि बाणानें

शुंभाचें हृदय वेधून तीन बाणांनीं त्याचा सारथी पृथ्वीवर पाडला ॥ ९ ॥ तेव्हां शुंभ अति क्रोधाविष्ट होऊन गणपतीवर बाणांची वृष्टि करूं लागला व तीन बाणांनीं त्यानें उंदरास वेधून मेघासारखी गर्जना केली ॥ १० ॥ त्या बाणांनीं अंग भिन्न होऊन अति वेदना झाल्यामुळें उंदीर चळला, तेव्हां गणपती खालीं पडला; त्या मुळें पदाती झाला ॥ ११ ॥ हे राजा ! मग गणपतीनें शुंभाच्या हृदयावर परशु मारून त्याला पाडिलें व पुनः उंदरावर बसता झाला

ततोतिक्रुद्धःशुंभोपिबाणवृष्ट्यागणाधिपम् ॥ मूषकंचत्रिभिर्विद्ध्वाननादजलदस्वनः ॥ १० ॥ मूषकःशरभिन्नांगश्चचालदृढवेदनः ॥ लंबोदरस्यपतितःपदातिरभवन्नृप ॥ ११ ॥ ततोलंबोदरःशुंभंहत्वापरशुनाहृदि ॥ अपातयत्तदाभूमौमूषकंचारुहत्पुनः ॥१२॥कालनेमिर्निशुंभश्चाप्युभौलंबोदरंशरैः ॥ युगपज्जघ्नतुःक्रोधात्तोत्रैरिवमहाद्विपम् ॥१३ ॥ तंपीड्यमानमालोक्यवीरभद्रोमहाबलः ॥ अभ्यधावतवेगेनभूतकोटियुतस्तदा ॥१४॥ कूष्मांडाभैरवाश्चापिवेतालायोगिनीगणाः ॥ पिशाचायोगिनीसंघागणाश्चापितमन्वयुः ॥ १५ ॥

॥ १२ ॥ कालनेमी व निशुंभ या दोघांनीं रागानें एकदम गणपतीवर बाणवर्षाव केला. मस्त हत्तीला चाबुकांनीं मारितात तसें गणपतीला झालें ॥ १३ ॥ गणपतीला असें पीडिलेलें पाहून बली वीरभद्र कोटिगणासहवर्तमान वेगानें धावत आला ॥ १४ ॥ त्याचे बरोबर कूष्मांड, भैरव, वेताळ, योगिनींचा समुदाय, पिशाचें वगैरेंचा समुदाय व गणही आले॥१५॥

तेव्हां त्यांच्या किलकिलाटानें, सिंहनादानें व नगारे मृदंग वगैरेंच्या नादानें पृथ्वी कांपूं लागली ॥ १६ ॥ भूतें धांवून दैत्यांस खावूं लागलीं, वर खालीं उड्या मारूं लागलीं, रणांगणांत नाचूं लागलीं ॥ १७ ॥ नंदी व कार्तिकस्वामी यांनां धीर आला व ते बाणांनीं त्वरेनें दैत्यांना मारूं लागले ॥ १८ ॥ दैत्यांची सेना, पुष्कळ छिन्न-

ततःकिलकिलाशब्दैःसिंहनादैःसुर्बघरैः ॥ भेरीतालमृदंगैश्चपृथिवीसमकंपत ॥ १६ ॥ ततो भूतान्यधावंतभक्षयंतिस्मदानवान्॥उत्पतंत्यापतंतिस्मनन्हतुश्चरणांगणे ॥१७॥नंदीचकार्तिकेयश्चसमाश्वस्यत्वरान्वितौ ॥ निजघ्नतूरणेदैत्यानिरंतरशरव्रजैः ॥१८॥ छिन्नभिन्नाहतैर्दैत्यैःपतितैर्भक्षितैस्तदा ॥ व्याकुलासाऽभवत्सेनाविषण्णवदनातदा ॥ १९ ॥ प्रविध्वस्तांतदासेनांदृष्ट्वा सागरनंदनः ॥ रथेनातिपताकेनगणानभिययौबली ॥ २० ॥ हस्त्यश्वरथसंह्रादाःशंखभेरीस्वनास्तथा ॥ अभवन्सिंहनादश्चसेनयोरुभयोस्तदा ॥ २१ ॥

भिन्न व हत झाली, भूतांनीं खाल्ली व पुष्कळशी मरून पडली व त्यामुळें घाबरून खिन्न व म्लानमुख झाली ॥ १९ ॥ तेव्हां आपली उध्वस्त झालेली अशी सेना पाहून जलंधर रथांत बसून मोठ्या वेगानें गणांवर चालून आला ॥ २० ॥ दोन्ही सैन्यांत हत्ती, रथ, घोडे यांचा घडघडाट व शंख, नगारे यांचा ध्वनि झाला व मोठा सिंहनाद झाला ॥ २१ ॥

जलंधराच्या बाणांनीं पृथ्वी व आकाशाचें मध्य धुक्याप्रमाणें व्यापून गेलें ॥ २२ ॥ जलंधरानें गणपतीला पांच बाणांनीं, शैल व कार्तिकस्वामी सांस नऊ बाणांनीं व वीरभद्राला वीस बाणांनीं वेढून मेघाप्रमाणें गर्जना केली ॥२३॥ कार्तिकस्वामीनें शक्ति टाकून जलंधराला वेध केला. त्यानें शक्तीचे आघातानें थोडा व्याकूल होऊन युद्ध केलें ॥२४॥ नंतर जलंधरानें रागानें संतप्त होऊन कार्तिकस्वामीला गदा मारली, तेव्हां कार्तिकस्वामी खालीं पृथ्वीवर पडला ॥२५॥

जलंधरशरव्रातैर्नीहारपटलैरिव ॥ द्यावापृथिव्योराच्छिन्नमंतरंसमपद्यत ॥२२॥ गणेशंपंचभिर्विद्ध्वाशैलादिंनवभिःशरैः ॥ वीरभद्रंचविंशत्याननादजलदस्वनः ॥२३॥ कार्तिकेयस्तदादैत्यं शक्त्याविव्याधसत्वरः ॥ युयुधेशक्तिनिर्भिन्नःकिंचिद्व्याकुलमानसः ॥ २४ ॥ ततःक्रोधपरीतांगःकार्तिकेयंजलंधरः ॥ गदयाताडयामाससचभूमितलेपतत् ॥२५॥ तथैवनंदिनंवेगादपातयतभूतले ॥ ततोगणेश्वरःक्रुद्धोगदांपरशुनाच्छिनत् ॥ २६ ॥ वीरभद्रस्त्रिभिर्बाणैर्हृदिविव्याधदानवम् ॥ सप्तभिश्चहयान्केतुंधनुश्छत्रंचचिच्छिदे ॥ २७ ॥ ततोऽतिक्रुद्धोदैत्येन्द्रःशक्तिमुग्रम्यदारुणाम् ॥ गणेशंपातयामासरथंचान्यमथारुहत् ॥ २८ ॥

त्याचप्रमाणें नंदीलाही वेगानें पृथ्वीवर पाडिलें, तेव्हां गणपतीनें रागावून परशूनें त्याची गदा तोडिली ॥ २६॥ वीरभद्रानें तीन बाणांनीं त्या दैत्याच्या छातीवर वेध केला व सात बाणांनीं त्याचे घोडे, ध्वज, धनुष्य, छत्र हीं तोडिलीं ॥ २७ ॥ तेव्हां त्या दैत्यानें संतापून शक्ति उगारून त्या भयंकर शक्तीनें प्रहार करून गणपतीला पाडिलें

व दुसऱ्या रथावर आपण चढला ॥ २८ ॥ नंतर वीरभद्रावर संतापून चालून आला, ते सूर्याप्रमाणें तेजस्वी जलंधर व वीरभद्र दोघे परस्पर लढूं लागले ॥ २९ ॥ वीरभद्रानें पुन्हा त्याचे घोडे व धनुष्य तोडून पाडिलें ॥ तेव्हां तो दैत्य परीघनांवाचें शस्त्र घेऊन वीरभद्रावर उडी मारून धावला ॥ ३० ॥ नारद ह्मणतात—राजा, जलंधरानें वेगानें

अभ्ययादथवेगेनवीरभद्रंरुषान्वितः ॥ ततस्तौसूर्यसंकाशौयुयुधातेपरस्परम् ॥ २९ ॥ वीरभद्रःपुनस्तस्यहयान्बाणैरपातयत् ॥ धनुश्चिच्छेददैत्येंद्रःपुप्लुवेपरिघायुधः ॥ ३० ॥ नारदउवाच ॥ सवीरभद्रंत्वरयाऽभिगम्यजघानदैत्यः परिघेणमूर्ध्नि ॥ सचापिवीरःप्रविभिन्नमूर्द्धापपातभूमौरुधिरंसमुद्गिरन् ॥ ३१ ॥ इतिश्रीपद्मपुराणेकार्तिकमाहात्म्येश्रीकृष्णसत्यासंवादेवीरभद्रवधोनामचतुर्दशोऽध्यायः ॥ १४ ॥ नारदउवाच ॥ ॥ पतितंवीरभद्रंतुदृष्ट्वारुद्रगणाभयात् ॥ अगमंस्तेरणंहित्वाक्रोशमानामहेश्वरम् ॥ १ ॥ अथकोलाहलंश्रुत्वागणानांचंद्रशेखरः ॥ अभ्ययाद्वृषमारूढःसंग्रामंप्रहसन्निव ॥ २ ॥

जाऊन वीरभद्राच्या मस्तकावर परीघ मारला, तेव्हां त्याचें मस्तक फुटून तो जमिनीवर रक्त ओकत पडला ॥ ३१ ॥ इति श्रीपद्मपुराणे कार्ति० मा० चतुर्दशोऽध्यायः ॥ १४ ॥ नारद ह्मणतातः—राजा, वीरभद्र पडला असें पाहतांच सर्व रुद्रगण भयानें रणांगण सोडून ओरडत शंकराकडे धांवत गेले ॥ १ ॥ त्यांची आरडाओरड ऐकून चंद्रशेखर शंकर हंसतच नंदीवर बसून रणभूमीवर आले ॥ २ ॥ शंकर आले असें पाहून रुद्रगण सिंहनाद करून पुनः युद्धास निघाले व त्यांनीं बाणांची वृष्टि करून पुष्कळ दैत्य मारिले ॥ ३ ॥ तेव्हां दैत्य भयंकर शंकररूप पाहून घाबरून पळूं लागले । जसें कार्तिकव्रत करणाराला पाहून भीतीनें पापें पळतात तसे ॥ ४ ॥ दैत्य रणांतून पळूं लागले असें पाहून जलंधर संतापानें शंकरावर हजरों बाण सोडीत धाऊन आला ॥ ५ ॥ शुंभ, निशुंभ, श्वमुखी, बलाहक, खड्गरोमा,

रुद्रमायांतमालोक्यसिंहनादैर्गणाःपुनः ॥ निवृत्ताःसंगरेदैत्यान्निजघ्नुःशरवृष्टिभिः ॥ ३ ॥ दैत्याश्चभीषणंदृष्ट्वासर्वेचैवविदुद्रुवुः ॥ कार्तिकव्रतिनंदृष्ट्वापातकानीवतद्भयात् ॥ ४ ॥ अथजलंधरोदैत्यान्निवृत्तान्प्रेक्ष्यसंगरे ॥ रोषादधावच्चंडीशंमुंचन्बाणान्सहस्रशः ॥ ५ ॥ शुंभोनिशुंभोश्वमुखोकालनेमिर्बलाहकः ॥ खड्गरोमाप्रचंडश्चघस्मराद्याःशिवंययुः ॥ ६ ॥ बाणांधकारसंछन्नंदृष्ट्वागणबलंशिवः ॥ बाणजालमवाच्छिद्यस्वबाणैरावृणोन्नभः ॥ ७ ॥ दैत्यांश्चबाणवात्याभिःपीडितानकरोत्तदा ॥ प्रचंडबाणजालौघैरपातयतभूतले ॥ ८ ॥ खड्गरोम्णःशिरःकोपात्तदापरशुनाच्छिनत् ॥ बलाहकस्यचशिरःखट्वांगेनाकरोद्द्विधा ॥ ९ ॥

प्रचंड, घस्मर आदिकरून दैत्य शंकरावर चालून आले ॥ ६ ॥ बाणवृष्टीच्या अंधकारानें आपले गण व सैन्य व्यापलें आहे असें पाहून शंकरानीं आपल्या बाणांनीं तें बाणांचें जाळें तोडून आकाश व्यापून टाकिलें ॥ ७ ॥ दैत्यांनाही प्रचंड बाण सोडून त्याच्या वावटळीनेंच घाबरऊन त्या बाणजालानीं त्यांना पृथ्वीवर पाडिलें ॥ ८ ॥ नंतर क्रुद्ध

होऊन खड्गरोम्याचें मस्तक परशूनें तोडलें व खट्वांगानें बलाहकाचें शीर दुभंग केलें ॥ ९ ॥ पाशानें घस्मर दैत्याला बांधून जमिनीवर पाडिलें, तसेंच नंदीनें, कितीएक दैत्य मारिले व बाणानें कितीएक पाडले ॥ १० ॥ तेव्हां दैत्य जसे सिंहानें पीडित हत्ती पळतात तसे ते उभे राहूं शकले नाहींत ॥ तेव्हां जलंधर अतिशय संतापून विजेच्या कडकडाटाप्रमाणें आवाज करून शंकरास युद्धास हाक मारून म्हणाला । जलंधर म्हणतोः—हे शंकरा, तूं माझ्याशीं युद्ध

बद्ध्वाचघस्मरंदैत्यंपाशेनाभ्यहनद्भुवि ॥ वृषभेणहताःकेचित्केचिद्बाणैर्निपातिताः ॥ १० ॥ नशे
कुरसुराःस्थातुंगजाःसिंहार्दिताइव ॥ ततःक्रोधपरीतात्मावेगाद्रुद्रंजलंधरः ॥ ११ ॥ आह्वयामा
ससमरेतीव्राशनिसमस्वनः ॥ जलंधरउवाच ॥ युध्यस्वचमयासार्धंकिमेभिर्निहतैस्तव ॥१२॥
यच्चकिंचिद्बलंतेस्तितद्दर्शयजटाधर ॥ इत्युक्त्वाबाणसप्तत्याजघानवृषभध्वजम्॥१३॥ तान्प्राप्ता
न्निशितैर्बाणैश्चिच्छेदप्रहसन्निव ॥ ततोहयान्ध्वजंछत्रंधनुश्चिच्छेदसप्तभिः ॥१४॥ सछिन्नधन्वा
विरथोगदामुद्यम्यवेगवान् ॥ अभ्यधावच्छिवस्तावद्गदांबाणैर्द्विधाच्छिनत् ॥ १५ ॥

कर, या गरीबांना मरल्यानें काय फल होणार ? ॥११॥ १२॥ हे जटाधरा, तुझें काय सामर्थ्य असेल तें मला दाखीव. याप्रमाणें बोलून सत्तर बाणांनीं शंकरावर प्रहार केला॥१३॥ शंकरांनीं हसून आपल्या तीक्ष्ण बाणांनीं ते सर्व बाण तोडले व सात बाणांनीं त्याचे घोडे, ध्वज, छत्र, धनुष्य तोडिलीं ॥१४॥ ज्याचें धनुष्य तुटलें आहे व जो विरथ झाला आहे असा

तो जलंधर हातांतील गदा उगारून वेगानें शंकरावर धावला, इतक्यात शंकरांनीं बाणांनीं त्याची गदा तोडून दोन तुकडे केले ॥ १५ ॥ तरी तो मूठ वळून बुक्कीनें मारण्याकरितां शंकराकडे आला, तेव्हां शंकरांनीं बाणौघानें त्याला एक कोस मागें हटविलें ॥ १६ ॥ तेव्हां आपणापेक्षां शंकर अधिक बलवान् आहे, असें पाहून जलंधरानें शंकरास मोह पाडणारी अशी अद्भुत गंधर्वमाया उत्पन्न केली ॥ १७ ॥ तेव्हां गंधर्व गाऊं लागले, अप्सरा नाचूं लागल्या,

तथापिमुष्टिमुद्यम्ययर्यौरुद्रंजिघांसया ॥ तावच्छिवेनबाणौघैःक्रोशमात्रमपाकृतः ॥१६ ॥
ततोजलंधरोदैत्योमत्वारुद्रंबलाधिकम् ॥ ससर्जमायांगांधर्वीमद्भुतांरुद्रमोहिनीम् ॥ १७ ॥
ततोजगुश्चननृतुर्गंधर्वाप्सरसांगणाः ॥ तालवेणुमृदंगाद्यान्वादयंतिस्मचापरे ॥ १८ ॥
तंदृष्ट्वामहदाश्चर्यंरुद्रोनादविमोहितः ॥ पतितान्यपिशस्त्राणिकरेभ्योनविवेदसः ॥ १९ ॥
एकाग्रीभूतमालोक्यरुद्रंदैत्योजलंधरः ॥ कामार्तःसजगामाशुयत्रगौरीस्थिताभवत् ॥ २० ॥
युद्धेशुंभनिशुंभाख्यौस्थापयित्वामहाबलौ ॥ दशदोर्दंडपंचास्यस्त्रिनेत्रश्चजटाधरः ॥ २१ ॥

दुसरे ताल वेणु मृदंग इत्यादि वाद्यें वाजवूं लागले ॥ १८ ॥ तेव्हां तो मोठा चमत्कार पाहून शंकर त्या नादानें मोहित झाले, हातांतील शस्त्रें गळलीं तरी तीं त्यांना समजलीं नाहींत ॥ १९ ॥ शंकराचें चित्त असें एकाग्र झालें आहे असें पाहून, जलंधर कामातुर होऊन जेथें पार्वती बसली होती तेथें त्वरेनें गेला ॥२०॥ बलवान् शुंभ व निशुंभ यांना युद्धाचे जागीं ठेऊन आपण, दहा हात, पांच मुखें, तीननेत्र, जटा असें शंकराचें रूप धारण करून

मोठ्या वृषभावर बसून गेला, तेव्हां हा शंकरच आला असें पार्वतीला वाटलें ॥२१॥२२॥ व सख्यांमधून उठून त्याच्या समोर पुढें आली. ती सुंदर पार्वती दृग्गोचर होत आहे ॥२३॥ इतक्यांतच याचें वीर्य गळून पडलें व अंग जड स्तब्ध झालें तेव्हां हा दैत्य आहे हें पार्वतीला समजलें व ती भ्याली ॥२४॥ ती त्वरेनें उत्तर मानस सरोवरांत जाऊन दडली;

महावृषभमारूढःसबभूवजलंधरः ॥ अथोरुद्रंसमायांतमालोक्यभववल्लभा ॥ २२ ॥ अभ्यायर्यौसखीमध्यात्तद्दर्शनपथेऽभवत् ॥ यावद्ददर्शचार्वंगींपार्वतींदनुजेश्वरः ॥ २३ ॥ तावत्स्ववीर्यंमुमुचेजडांगश्चाभवत्तदा ॥ अथज्ञात्वातदागौरीदानवंभयविह्वला ॥ २४ ॥ जगामांतर्हितावेगात्सातदोत्तरमानसे ॥ तामदृष्ट्वाततोदैत्यःक्षणाद्विद्युल्लतामिव ॥ २५ ॥ जवेनागात्पुनर्युद्धंयत्रदेवोवृषध्वजः ॥ पार्वत्यपिभयाद्विष्णुंसस्मारमनसातदा ॥ २६ ॥ तावद्ददर्शतंदेवंसूपविष्टंसमीपगम् ॥ ॥ पार्वत्युवाच ॥ विष्णोजलंधरोदैत्यःकृतवान्परमाद्भुतम् ॥ २७ ॥ तत्किंनविदितंतेस्तिचेष्टितंतस्यदुर्मतेः ॥ विष्णुरुवाच ॥ तेनैवदर्शितःपंथावयमप्यन्वयामहे२८

क्षणांत विजेप्रमाणें ती दिसेनाशी झाली, तेव्हां तो दैत्य जेथें शंकर होते तेथें युद्धास आला। इकडे पार्वतीनें भीतीनें मनांत विष्णूचें स्मरण केलें ॥ २५ ॥ २६ ॥ स्मरण करते इतक्यांत विष्णु जवळ बसले आहेत असें तिनें पाहिलें. पार्वती ह्मणतेः—हे विष्णो ! दुष्ट जलंधरानें अद्भुत चमत्कार केला, त्या दुष्टाचें चरित्र आपण जाणत अहां। विष्णु ह्मणतातः—

पार्वती, त्यानें जो मार्ग दाखवून दिला त्याचेंच मी आचरण करणार आहें ॥ २७ ॥ २८ ॥ तो स्त्रीचे पातिव्रत्यानें सुरक्षित आहे तोंपर्यंत कशानेंही मरणार नाहीं । नारद ह्मणतातः—विष्णु याप्रमाणें बोलून जलंधराच्या नगरास गेले ॥ २९ ॥ नंतर शंकर गंधर्वांच्या नादांत समरंगणांत होते ती गन्धर्वमाया नाहींशी होतांच ते सावध झाले ॥ ३० ॥ शंकराच्या मनाला मोठा चमत्कार वाटला व रागानें पुन्हां जलंधराशीं युद्धास निघाले. दैत्यानें पुनः शंकर आलेले

नान्यथासभवेद्वध्यःपातिव्रत्यसुरक्षितः ॥ नारदउवाच ॥ जगामविष्णुरित्युक्त्वापुनर्जालंधरंपुरम् ॥ २९ ॥ अथरुद्रश्चगंधर्वानुगतःसंगरेस्थितः ॥ अंतर्धानंगतांमायांदृष्ट्वासबुबुधेतदा ॥ ३० ॥ ततोभवोविस्मितमानसःपुनर्जगामयुद्धायजलंधरंरुषा ॥ सचापिदैत्यःपुनरागतंशिवंदृष्ट्वाशरौघैस्समवाकिरद्रणे ॥ ३१ ॥ इतिश्रीपद्मपुराणेकार्तिकमाहात्म्येश्रीकृष्णसत्यासंवादेजालंधरोपाख्यानेपंचदशोऽध्यायः ॥ १५ ॥ ॥ नारदउवाच ॥ ॥ विष्णुर्जलंधरंगत्वातद्दैत्यपुटभेदनम् ॥ पातिव्रत्यस्यभंगायवृंदायाश्चाकरोन्मतिम् ॥ १ ॥ अथवृंदारकादेवीस्वप्नमध्येददर्शह ॥ भर्त्तारंमहिषारूढंतैलाभ्यक्तंदिगंबरम् ॥ २ ॥

पाहून त्यांच्यावर बाणांचा वर्षाव केला ॥ ३१ ॥ इतिश्री० पद्म० कार्तिक मा० पंचदशोध्यायः ॥१५॥ नारद ह्मणतात— राजा, इकडे विष्णु जलंधर दैत्याचे नगरांत गेले व त्याची स्त्री वृंदा इचें पातिव्रत्य भंग करावें असा त्यांनीं विचार केला ॥ १॥ इकडे वृंदा स्वप्नांत आपला पति रेड्यावर बसला आहे, अंगास तेल लाविलें आहे, नग्न आहे ॥ २ ॥

काळ्या फुलांच्या भूषणानीं युक्त आहे व मांसभक्षक पिशाच्चादि सभोंवार आहेत, हजामत केली आहे, काळोखानें व्याप्त दक्षिण दिशेकडे जात आहे ॥ ३ ॥ आपलें नगर समुद्रांत आपल्यासुद्धां बुडालें असें पाहती झाली व ती जागृत होऊन भयंकर स्वप्नाचा विचार करूं लागली ॥४॥ सूर्य उगवल्यावर त्याकडे पाहिलें, तों तिला तो निस्तेज व छिद्रें पडलीं आहेत ज्याला असा दिसला हें सर्व अनिष्ट आहे असें समजून भयानें घाबरी होऊन ती रडूं लागली ॥ ५ ॥ समाधान व्हाव

कृष्णप्रसूनभूषाढ्यंक्रव्यादगणसेवितम् ॥ दक्षिणाशागतंमुंडंतमसाप्यावृतंतदा ॥३॥ स्वपुरं सागरेमग्नंसहसैवात्मनासह ॥ ततःप्रबुद्धासाबालातत्स्वप्नंप्रविचिन्वती॥४॥ददर्शोदितमादित्यं सच्छिद्रंनिष्प्रभंमुहुः ॥ तदनिष्टमितिज्ञात्वारुदतीभयविव्हला ॥ ५ ॥ कुत्रचिन्नालभच्छर्मगो पुराट्टालभूमिषु ॥ ततःसखीद्वययुतानगरोद्यानमागमत् ॥६॥तत्रापिसाश्रमद्बालानालभत्कुत्र चित्सुखम् ॥ वनाद्वनांतरंथातानैववेदात्मनस्तदा ॥७ ॥ततःसाश्रमतीबालाददर्शातीवभीषणौ ॥८॥राक्षसौसिंहवदनौदंष्ट्राननविभीषणौ ॥ तौदृष्ट्वाविव्हलातीवपलायनपराभवत्॥ददर्शतापसं शांतंसशिष्यंमौनमास्थितम् ॥ ९ ॥

ह्मणून गोपुर बंगला इत्यादिक जागीं गेली परंतु तिला सुख वाटेना; मग दोघी मैत्रिणी घेऊन बागेंत गेली ॥ ६ ॥ तेथें इकडे तिकडे पुष्कळ फिरली तरी चैन पडेना. या रानांतून त्या वनांत अशी फिरूं लागली व श्रमिष्ठासारखी होऊन देहभान विसरली ॥ ७ ॥ याप्रमाणें ती फिरत असतां दोन अक्राळविक्राळ राक्षस, ज्यांचीं तोंडें सिंहाप्रमाणें व दाढा ज्यांच्या भयंकर आहेत, असे पाहिले ॥ ८ ॥ त्यां राक्षसांना पाहतांच फार घाबरून पळूं लागली. पळतां पळतां

तिनें शिष्यासहवर्तमान मौन धरून बसलेला एक तपस्वी पाहिला ॥ ९ ॥ वृंदेनें राक्षसाच्या भयानें जाऊन आपल्या हातांनीं त्या तपस्व्याच्या गळ्याला मिठी घातली, आणि हे मुने ! मी शरण आलें; माझें रक्षण कर, असें ह्मणाली ॥ १० राक्षस मागें लागल्यामुळें ती वृंदा घाबरली आहे असें त्या ऋषीनें पाहून रागानें आपल्या हुंकारानें ते घोर राक्षस मागें परतविले ॥ ११ ॥ हुंकाराच्या भयानें राक्षस भिऊन परत गेले असें पाहून वृंदा ऋषीस साष्टांग

ततस्तत्कंठमावृत्त्यनिजांबाहुलतांभयात् ॥ मुनेमांरक्षशरणमागतास्मीत्यभाषत ॥१०॥ मुनि-स्तांविव्हलांदृष्ट्वाराक्षसानुगतांतदा ॥ हुंकारेणैवतौघोरौचकारविमुखौरुषा ॥ ११ ॥ तौहुंकार-भयत्रस्तौदृष्ट्वातौविमुखौगतौ॥ प्रणम्यदंडवद्भूमौवृन्दावचनमब्रवीत् ॥१२॥॥ वृन्दोवाच ॥ रक्षि ताहंत्वयाघोराद्भयादस्मात्कृपानिधे ॥ किंचिद्विज्ञप्तुमिच्छामिकृपयातन्निशामय ॥१३॥जलं धरोहिमद्भर्त्तारुद्रंयोद्धुंगतःप्रभो ॥ सतत्रास्तेकथंयुद्धेतन्मेकथयसुव्रत ॥१४॥ ॥नारदउवाच ॥ मुनिस्तद्वाक्यमाकर्ण्यकृपयोर्ध्वमवेक्षत॥तावत्कपीसमायातौतंप्रणम्याग्रतःस्थितौ ॥१५॥

नमस्कार घालून ह्मणाली ॥१२॥ वृंदा ह्मणत्ये–हे ऋषे, आपण कृपा करून माझें या भयंकर संकटापासून रक्षण केलें. आतां माझी एक विनंति आहे, ती कृपा करून ऐकून माझें समाधान करा ॥१३॥ हे प्रभो ! माझा पति जलंधर शंकराशीं युद्ध करण्यास गेला आहे, तर हे सुव्रता, तो येथें युद्धांत कसा आहे तें मला सांगा ॥ १४ ॥ नारद ह्मणतात–ऋषींनीं तिचें भाषण ऐकून दयेनें वर पाहिलें इतक्यांत दोन वानर आले व ऋषीस नमस्कार करून पुढें उभे राहिले ॥ १५ ॥

नंतर ऋषींनीं डोळ्यानीं खूण करतांच आकाशांत गेले व क्षणार्धांत जाऊन परत येऊन नमस्कार करून उभे राहिले ॥ १६ ॥ वानरानीं आणलेलें आपल्या पतीचें मस्तक, धड व हात पाहून पतीच्या दुःखानें व्याकूळ होऊन वृंदा मूर्च्छित होऊन पडली ॥१७॥ ऋषींनीं तिच्यावर कमंडलूंतील उदक शिंपडून तिला सावध केली, तेव्हां ती पतीच्या कपाळाला कपाळ लावून रडूं लागली ॥१८॥ वृंदा ह्मणाली–जो पूर्वी सुखाच्या भाषणांनीं माझा विनोद करीत होतास, तो आज

ततस्तद्भूलतासंज्ञानियुक्तौगगनंगतौ ॥ गत्वाक्षणार्धादागत्यप्रणतावग्रतःस्थितौ ॥१६॥शिरः कबंधेहस्तौचदृष्ट्वाब्धितनयस्यसा ॥ पपातमूर्छिताभूमौभर्तृव्यसनदुःखिता ॥ १७॥ कमंडलूद कैःसिक्त्वामुनिनाश्वसितातदा ॥ स्वभर्तृभालेसाभालंकृत्वादीनारुरोदह ॥१८॥ वृन्दोवाच ॥ यःपुरासुखसंवादेविनोदयसिमांप्रभो ॥ सकथंनवदस्यद्यवल्लभांमामनागसम् ॥ १९ ॥ येनदेवाःसगंधर्वानिर्जिताविष्णुनासह ॥ सकथंतापसेनाद्यत्रैलोक्यविजयीहतः ॥ २० ॥ नारदउवाच ॥ ॥ रुदित्वेतितदावृन्दातंमुनिंवाक्यमब्रवीत् ॥ ॥ वृन्दोवाच ॥ कृपानिधे मुनिश्रेष्ठजीवयैनंममप्रियम् ॥ २१ ॥

तुमची परम प्रिया मी निरपराधी असून माझ्याशीं कां बोलत नाहींस ॥१९॥ ज्यानें देव गंधर्व व विष्णु यांना देखी-ल जिंकिलें अशा त्रैलोक्य जिंकणाऱ्याला केवळ तपस्वी शंकरानें कसें मारिलें ॥ २० ॥ नारद ह्मणतात–राजा, वृंदा याप्रमाणें रडून ऋषीला ह्मणाली ॥ वृंदा ह्मणतेः–हे कृपाधिने मुनिश्रेष्ठा ! या माझ्या प्रिय पतीला जिवंत करा ॥ २१ ॥

आपण माझे पतीला जिवंत करण्यास समर्थ आहां असें मला वाटतें ॥ नारद ह्मणतातः–हें तिचें भाषण ऐकून ऋषि हंसून भाषण करितात ॥ २२ ॥ ऋषि ह्मणतात–हे वृंदे, याला शंकरांनीं युद्धांत मारिलें आहे ह्मणून हा जिवंत होण्याला समर्थ नाहीं तरी तुझी दया फार येत्ये ह्मणून याला उठवितों ॥ २३ ॥ नारद ह्मणालेः–ऋषि याप्रमाणें बोलून गुप्त झाले व जलंधर जिवंत होऊन उठून प्रीतीनें वृंदेस आलिंगून तिचें चुंबन घेऊं लागला ॥ २४ ॥ वृंदाही आपल्या

त्वमेवास्यमुनेशक्तोजीवनायमतोमम ॥ ॥ नारदउवाच ॥ इतितद्वाक्यमाकर्ण्यप्रहसन्मुनिरब्रवीत् ॥ २२ ॥ ॥ मुनिरुवाच ॥ ॥ नायंजीवयितुंशक्तोरुद्रेणनिहतोयुधि ॥ तथापित्वत्कृपाविष्टएनं संजीवयाम्यहम् ॥ २३ ॥ ॥ नारदउवाच ॥ इत्युक्त्वांतर्दधेविप्रस्तावत्सागरनंदनः ॥ वृंदामा लिंग्यतद्वक्त्रंचुचुंबप्रीतमानसः ॥ २४ ॥ अथवृंदापिभर्त्तारंदृष्ट्वाहर्षितमानसा ॥ रेमेतद्वनमध्य स्थातद्युक्ताबहुवासरम् ॥ २५ ॥ कदाचित्सुरतस्यांतेदृष्ट्वाविष्णुंतमेवच ॥ निर्भर्त्स्यक्रोधसंयुक्तावृं दावचमनमब्रवीत् ॥ २६ ॥ ॥ वृन्दोवाच ॥ ॥ धिक्त्वदीयंहरेशीलंपरदाराभिगामिनः ॥ ज्ञातो सित्वंमयासम्यङ्मायाप्रच्छन्नतापसः ॥ २७ ॥

पतीला पाहून आनंदित झाली व त्याचेबरोबर पुष्कळ दिवस त्याच वनांत राहून उपभोग घेतला ॥ २५ ॥ एके दिवशीं संभोगाचे शेवटीं तो आपला पती नसून विष्णु आहे असें तिनें पाहिलें, तेव्हां रागानें ती विष्णूची निर्भर्त्सना करून बोलली ॥२६॥ वृंदा ह्मणालीः–दुसऱ्याचे स्त्रियांशीं गमन करणाऱ्या तुझ्या शीलाला धिक्कार असो; तूंच मायेनें कपटी

तपस्वी झाला होतास, हें मला चांगलें समजलें ॥ २७॥ जे दोघे आपले द्वारपाळ सेवक मला मायेनें वानर दाखविलेस तेच पुढें राक्षस होऊन तुझी स्त्री हरण करितील॥२८॥ व तूं स्त्रीच्या दुःखानें रानोरान फिरशील तेव्हां वानर तुझें सहाय करतील व दुसरा शिष्य शेष लक्ष्मण हा तुजबरोबर फिरेल व तुझी सेवा करील ॥ २९ ॥ याप्रमाणें बोलून त्या वृंदेनें अग्निप्रवेश केला. विष्णूंनीं पुष्कळ तिचें निवारण केलें तरी तिनें त्यांचें ऐकिलें नाहीं ॥ ३० ॥ नंतर विष्णु वृंदेवर मन

यौत्वयामाययाद्वाःस्थौस्वकीयौदर्शितौमम ॥ तावेवराक्षसौभूत्वाभार्यांतवहरिष्यतः ॥ २८ ॥
त्वंचापिभार्यादुःखार्तोवनेकपिसहायवान् ॥ भ्रमसर्पेश्वरेणायंयस्तेशिष्यत्वमागतः ॥ २९ ॥
इत्युक्त्वासातदावृन्दाप्राविशद्धव्यवाहनम् ॥ विष्णुनावार्यमाणापितस्यामासक्तमानसः ॥ ३० ॥
ततोहरिस्तामनुसंस्मरन्मुहुर्वृंदान्वितोभस्मरजोवगुंठितः ॥ तत्रैवतस्थौसुरसिद्धसंघैःप्रबोध्यमानो ऽपिययौनशांतिम् ॥ ३१ ॥ इतिश्रीपद्मपुराणेउत्तरकाण्डेकार्तिकमाहात्म्येश्रीकृष्णसत्यासंवादेवृंदाग्निप्रवेशोनामषोडशोऽध्यायः ॥ १६ ॥ ॥ नारदउवाच ॥ ततोजलंधरोदृष्ट्वारुद्रमद्भुतविक्रमम् ॥ चकारमाययागौरींत्र्यंबकंमोहयन्निव ॥ १ ॥

ठेवून विरहदुःखानें वारंवार तिचें चिंतन करीत तिच्या राखेंत लोळत राहिले; देवादिकांनीं पुष्कळ समजूत केली, तरी त्यांच्या मनाला शांति आली नाहीं ॥ ३१ ॥ इति श्रीपद्मपुराणे का० मा० वृंदाग्निप्रवेशोनाम षोडशोध्यायः ॥ १६ ॥ नारद ह्मणतातः—राजा ! इकडे जलंधरानें शंकर अद्भुत पराक्रमी असें पाहून त्यांनां मोह पाडण्याकरितां मायेची पार्वती

निर्माण केली ॥१॥ त्यापार्वतीला रथावर बांधिलें आहे, ती रडत आहे व तिला निशुंभ वगैरे दैत्य मारीत आहेत असें शंकरानीं पाहिलें ॥ २॥ अशा प्रकारची पार्वती पाहून शंकरास वाईट वाटलें, आणि क्षणभर आपलें सामर्थ्य विसरून खालीं मान घातली ॥ ३ ॥ नंतर जलंधरानें शंकराच्या मस्तक, छाती व पोट यांवर तीन बाण मारिले; ते पिसापर्यंत आंत शिरले ॥ ४ ॥ ही माया आहे असें विष्णूनीं सुचविलें तेव्हां शंकरांनीं आपलें ज्वालामालांनीं अति भयंकर

रथोपरिचतांबद्धांरुदंतींपार्वतींशिवः ॥ निशुंभप्रमुखाद्यैश्चवध्यमानांददर्शसः ॥२॥ गौरींतथाविधांदृष्ट्वाशिवोप्युद्विग्नमानसः॥अवाङ्मुखःस्थितस्तूष्णींविस्मृत्यस्वपराक्रमम् ॥३॥ततोजलंधरोवेगात्त्रिभिर्विव्याधसायकैः ॥ आपुंखमग्नैस्तंरुद्रंशिरस्युरसिचोदरे ॥४॥ ततोजज्ञेसतांमायां विष्णुनाचप्रबोधितः ॥ रौद्ररूपधरोजातोज्वालामालातिभीषणः ॥५॥ तस्यातीवमहारौद्रंरूपं दृष्ट्वामहासुराः ॥ नशेकुःसंमुखेस्थातुंभेजिरेतेदिशोदश ॥ ६ ॥ ततःशापंददौरुद्रस्तयोःशुंभनिशुंभयोः ॥ ममयुद्धादपक्रांतौगौर्यावध्यौभविष्यथः ॥ ७ ॥ पुनर्जलंधरोवेगाद्ववर्षनिशितैःशरैः बाणांधकारैःसंछन्नंतदाभूमितलंमहत् ॥ ८ ॥

असें उग्र रूप प्रगट केलें ॥ ५ ॥ तें शंकराचें भयंकर रूप पाहून दैत्य भ्याले. शंकरापुढें उभे राहीनात; दश दिशानीं पळूं लागले ॥ ६ ॥ तेव्हां शंकरांनीं शुंभनिशुंभांला शाप दिला कीं, तुह्मी माझे युद्धांत पळालां, तर पुढें पार्वतीचे हातून मराल ॥ ७ ॥ पुनः जलंधरानें शंकरावर बाणांचा वर्षाव करून बाणांचे अंधारानें आकाश व पृथ्वी व्यापून टाकिली

॥ ८ ॥ शंकर तो वेगानें बाणांचा समुदाय तोडीत आहेत इतक्यांत जलंधरानें जलदीनें वृषभास परिघानें मारिलें ॥ ९ ॥ त्या मारानें वृषभ रणांतून परत फिरला. शंकरांनीं त्याला ओढून परत फिरविलें तरी तो रणभूमीवर उभा राहीना ॥ १० ॥ तेव्हां उग्ररूपी शंकर फार रागावले, आणि त्यांनीं सूर्यासारखें तेजस्वी सुदर्शन चक्र वेगानें जलंधरावर फेकलें ॥११॥ तें तेजानें पृथ्वी व आकाश व्यापणारें चक्र जलंधराचें शिर हरण करून जमिनीवर पडलें ॥१२॥

यावद्रुद्रश्चिच्छेदतस्यबाणगणंजवात्॥तावत्सपरिघेणाशुजघानवृषभंबली॥९॥ वृषस्तेनप्रहारेणपरावृत्तोरणांगणात्॥रुद्रेणाकृष्यमाणोपिनतस्थौरणभूमिषु॥१०॥ ततःपरमसंक्रुद्धोरुद्रोरौद्रवपुर्धरः ॥ चक्रंसुदर्शनंवेगाच्चिक्षेपादित्यवर्चसम्॥ ११ ॥ प्रदहद्रोदसीवेगात्पपातवसुधातले॥ जहारतच्छिरःकायान्महदायतलोचनम्॥ १२ ॥ रथात्कायःपपातास्यनादयन्वसुधातलम् ॥ तेजश्चनिर्गतंदेहात्तद्रुद्रेलयमागतम् ॥१३॥ वृन्दादेहोद्भवंतेजस्तद्गौर्यांविलयंगतम्॥अथब्रह्मादयोदेवाहर्षादुत्फुल्ललोचनाः ॥ १४ ॥ प्रणम्यशिरसारुद्रंशशंसुर्विष्णुचेष्टितम् ॥ देवाऊचुः ॥ महादेवत्वयादेवारक्षिताःशत्रुजाद्भयात्॥ १५ ॥

शरीर रथांतून खालीं पडलें, तेव्हां पृथ्वी दणाणली॥त्याच्या देहांतून तेज निघालें तें शंकराच्या शरीरांत लय पावलें ॥१३॥ वृंदेच्या देहांतून तेज निघालें, तें पार्वतीच्या शरीरांत लय पावलें; तेव्हां ब्रह्मदेवादिक सर्व देवांचे नेत्र आनंदानें प्रफुल्लित झाले ॥१४॥अशा देवानीं शंकराला नमस्कार केला व विष्णूच्या चरित्राची प्रशंसा केली॥ देव ह्मणतातः-महादेवा,तुह्मी शत्रूच्या भ-

यापासून देवांचें रक्षण केलें ॥ १५ ॥ परंतु दुसरी एक भीति उत्पन्न झाली आहे. वृंदेच्या लावण्याला भुलून विष्णु मोहित होऊन राहिले आहेत त्याला काय करावें ॥१६॥ शंकर ह्मणतातः—देवहो! तुह्मी विष्णूचा मोह नाहींसा होण्याकरितां मोहिनी मायेला शरण जा; ती दयाळू आहे, तुमचें कार्य करील॥१७॥नारद ह्मणतातः—राजा, याप्रमाणें बोलून भूतगणांसह शंकर अंतर्धान पावले. देवांनीं भक्तवत्सल जी मूल प्रकृति माया तिची स्तुति केली॥१८॥ देव ह्मणतात-उत्पत्ति, स्थिति व नाश यांला

किंचिदन्यत्समुद्भूतंततःकिंकरवामहे ॥ वृन्दालावण्यसंभ्रांतोविष्णुस्तिष्ठतिमोहितः ॥ १६ ॥ ईश्वरउवाच ॥ ॥ गच्छध्वंशरणंदेवाविष्णोर्मोहापनुत्तये ॥ शरण्यांमोहिनींमायांसावःकार्यंकरिष्यति॥१७॥ ॥ नारदउवाच ॥ ॥ इत्युक्त्वांतर्दधेदेवःसर्वभूतगणैस्तदा ॥ देवाश्चतुष्टुवुर्मूलप्रकृतिंभक्तवत्सलाम्॥ १८ ॥ ॥ देवाऊचुः ॥ ॥ यदुद्भवाःसत्त्वरजस्तमोगुणाःसर्गस्थितिध्वंसनिदानकारिणः ॥ यदिच्छयाविश्वमिदंभवाभवौतनोतिमूलप्रकृतिंनताःस्मताम्॥१९॥ याहित्रयोविंशतिभेदशब्दिताजगत्यशेषेसमधिष्ठितापरा॥यद्रूपकर्माणिजडास्त्रयोपिदेवानविद्युः प्रकृतिंनताःस्मताम्॥ २० ॥

कारण जे सत्व, रज व तम हे गुण ते जिच्यापासून झाले व जिच्या इच्छेनें हें सर्व जग उत्पति व लयांला पावतें अशा त्या मूलप्रकृतीला आमचा नमस्कार असो ॥ १९ ॥ जी तेवीस प्रकारच्या भेदानीं बोधिली जाते व जी सर्व जग व्यापून राहते, जिचीं रूपें व कर्में आह्मां अज्ञ देवांना व ब्रह्मा विष्णु शंकर या तिघानांही समजत नाहींत त्या मूलप्रकृ-

तीला आह्मी नमस्कार करितों ॥ २० ॥ जिची नित्य भक्ति केली असतां, त्या पुरुषाला दरिद्राचें भय, मोह व पराभव, हीं प्राप्त होत नाहींत अशी भक्तवत्सल मूल प्रकृति, तिला नमस्कार करितों ॥ २१ ॥ नारद ह्मणतातः–हें स्तोत्र जे त्रिकाल पठण करितील, त्यानां दरिद्र, मोह व दुःख हीं स्पर्श करणार नाहींत ॥ २२ ॥ याप्रमाणें देवांनीं स्तुति केली तेव्हां त्यांना गगनांत आपल्या ज्वाळांनीं सर्व दिशा व्यापल्या आहेत असें तेजोमंडळ दिसलें ॥२३॥ व त्या तेजाच्या

यद्भक्तियुक्ताःपुरुषास्तुनित्यंदारिद्र्यभीमोहपराभवादीन् ॥ नप्राप्नुवंत्येवहिभक्तवत्सलांसदैवमूलप्रकृतिंनतास्मताम् ॥ २१ ॥ ॥ नारदउवाच ॥ ॥ स्तोत्रमेतत्त्रिसंध्यंयःपठेदेकाग्रमानसः ॥ दारिद्र्यमोहदुःखानिनकदाचित्स्पृशंतितम् ॥२२॥ इत्थंस्तुवंतस्तेदेवास्तेजोमंडलमास्थितम् ॥ ददृशुर्गगनंतत्रज्वालाव्याप्तदिगंतरम् ॥ २३ ॥ तन्मध्याद्भारतींसर्वेशुश्रुवुर्व्योमचारिणीम् ॥ शक्तिरुवाच ॥ ॥ अहमेवत्रिधाभिन्नातिष्ठामित्रिविधैर्गुणैः ॥ २४ ॥ गौरीलक्ष्मीस्वराचेतिरजःसत्त्वतमोगुणैः ॥ तत्रगच्छतताःकार्यंविधास्यंतिचवःसुराः ॥ २५ ॥ ॥ नारदउवाच ॥ ॥ श्रृण्वतामितितांवाचमंतर्धानमगान्महः ॥ देवानांविस्मयोत्फुल्लनेत्राणांतत्तदानृप ॥ २६ ॥

मध्यांतून त्यांनीं आकाशवाणी ऐकिली ॥ शक्ति ह्मणत्येः–देवहो! तीन गुणांनीं मीच तीन प्रकारची होऊन रहातें ॥२४॥ सत्व, रज व तम या तीन गुणांनीं गौरी, लक्ष्मी व सरस्वती या नावांनीं मीच आहें. तर देवहो! त्यांजकडे जा ह्मणजे त्या तुमचें कार्य करितील ॥ २५ ॥ नारद ह्मणालेः–हें भाषण देवांनीं ऐकल्यावर तें तेज गुप्त झालें, व देवांना आनंद होऊन चमत्कार वाटला ॥२६॥ त्या शक्तीच्या वाक्यानें प्रेरित झालेले देव, गौरी, लक्ष्मी व सरस्वती यांजकडे जाऊन त्यांना भक्तिपूर्वक नमस्कार करिते झाले ॥ २७ ॥ तेव्हां त्या देवी, प्रणत देवानां पाहून कृपाळूपणानें तिघींनीं देवानां पृथक् पृथक् बीजें देऊन भाषण केलें ॥ २८ ॥ देवी ह्मणतातः–हीं बीजें जेथें विष्णु बसले आहेत तेथें पेरा; ह्मणजे तुमचें कार्य सिद्धीस पावेल ॥ २९ ॥ नारद ह्मणालेः–तेव्हां सर्व देवांना मोठा आनंद झाला व तीं बीजें घे-

ततःसर्वेपितेदेवागत्वातद्वाक्यनोदिताः ॥ गौरींलक्ष्मींस्वरांचैवप्रणेमुर्भक्तितत्पराः ॥ २७ ॥ ततस्तास्तान्सुरान्दृष्ट्वाप्रणतान्भक्तवत्सलाः ॥ बीजानिप्रददुस्तेभ्योवाक्यान्यूचुश्चभूमिप ॥२८॥ देव्यऊचुः ॥ ॥ इमानितत्रबीजानिविष्णुर्यत्रावतिष्ठते ॥ निर्वपध्वंततःकार्यंभवतांसिद्धिमेष्यति ॥ २९ ॥ ॥ नारद उवाच ॥ ॥ ततस्तुहृष्टाःसुरसिद्धसंघाःप्रगृह्यबीजानिविचिक्षिपुस्ते ॥ वृंदान्वितोभूमितलेसयत्रविष्णुः सदातिष्ठतिसौख्यहीनः ॥३०॥ इत्येतत्सत्यवाक्यस्यमाहात्म्यंसमुदाहृतं ॥ यःपठेच्छृणुयाद्वापिस्वर्गलोकंसगच्छति ॥ ३१ ॥ श्रृणुयादेकचित्तेनअविघ्नेनापियुज्यते ॥ सुतैर्विमुक्तायानारीनरश्चापिपठेत्सदा ॥ ३२ ॥

ऊन जेथें विष्णु वृंदेकरितां जमिनीवर उदास होऊन बसले होते तेथें तीं पेरून टाकिलीं ॥ ३० ॥ नारद ह्मणतातः–राजा! याप्रमाणें सत्यवाक्याचें माहात्म्य सांगितलें ही कथा जो पठण करील किंवा ऐकेल, तो स्वर्गलोकास जाईल ॥ ३१ ॥ जिला पुत्र नाहीं अशी स्त्री किंवा पुरुष यांनीं एकचित्तानें ही कथा श्रवण केली तर त्यांचीं संकटें

दूर होतील; विघ्नें येणार नाहींत ॥ इति सप्तदशोऽध्यायः ॥१७॥ नारद ह्मणालेः—राजा ! त्या पेरलेल्या बीजापासून तीन वनपस्ती आवळी, मालती व तुळसी अशा उत्पन्न झाल्या ॥ १ ॥ सावित्रीपासून आवळी, लक्ष्मीपासून मालती व पार्वतीपासून तुलसी. तम, सत्व व रज या गुणानीं युक्त अशा उत्पन्न झाल्या ॥ २ ॥ वृंदेच्या लावण्यातिशयानें

इतिश्रीपद्मपुराणेकार्तिकमाहात्म्येश्रीकृष्णसत्यासंवादेसप्तदशोऽध्यायः ॥ १७ ॥ ॥ नारद उवाच ॥ ॥ क्षिप्तेभ्यस्तत्रबीजेभ्योवनस्पत्यस्त्रयोभवन् ॥ धात्रीचमालतीचैवतुलसीचनृपोत्तम ॥ १ ॥ धात्र्युद्भवास्मृताधात्रीमाभवामालतीस्मृता ॥ गौरीभवाचतुलसीमतःसत्त्वरजोगुणाः ॥२॥ स्त्रीरूपिण्योवनस्पत्योदृष्ट्वाविष्णुस्तदानृप ॥ उत्तस्थौसंभ्रमाद्वृंदारूपातिशयविभ्रमः ॥३॥ दृष्ट्वायाच यतोमोहात्कामासक्तेनचेतसा ॥ तंचापितुलसीधात्र्यौरागेणैवव्यलोकताम् ॥४॥ यच्चलक्ष्म्यापुराबी जमीर्ष्ययैवसमर्पितम् ॥ तस्मात्तदुद्भवानारीतस्मिन्नीर्ष्यापराभवत् ॥ ५ ॥ अतःसावर्वरीत्या ख्यामवापाथविगर्हिताम् ॥ धात्रीतुलस्यौतद्रागात्तस्यप्रीतिप्रदेसदा ॥ ६ ॥

विभ्रम झालेले विष्णु या स्त्रीरूपी तीन वनस्पति पाहून उठून बसले ॥ ३ ॥ व कामासक्त अंतःकरणानें त्यांची याचना केली तेव्हां विष्णूकडे तुळशी व आवळी प्रीतीनें पाहूं लागल्या ॥४॥ पूर्वीं लक्ष्मीनें जें बीज दिलें तें ईर्षेनें अर्पण केलें होतें त्यापासून उत्पन्न झालेली स्त्री मालती ईर्षायुक्त झाली ॥ ५ ॥ ह्मणून ती निंदित वर्वरी असें नांव पावली. आवळी

व तुळशीवर विष्णूची प्रीति असल्यानें त्या सदा भगवंताला आनंद देणाऱ्या प्रिय झाल्या ॥६॥ तेव्हांपासून विष्णु वृंदेचें दुःख विसरले व त्या दोघींसह आनंदानें वैकुंठास गेले. तेव्हां सर्व देवांनीं त्यांना नमस्कार केला ॥ ७ ॥ याचकरितां कार्तिकोद्यापनाचे वेळीं तुळसीच्या खालीं विष्णूची पूजा सांगितली; तुलसीच्या मूळाजवळ केलेली पूजा विष्णूला प्रियकर आहे ॥ ८ ॥ हे राजा ! ज्याच्या घरीं तुळशीची बाग आहे, त्याचें घर तीर्थाप्रमाणें पवित्र आहे. तेथें

ततोविस्मृतदुःखोसौविष्णुस्ताभ्यांसहैवतु ॥ वैकुंठमगमद्धृष्टःसर्वदेवनमस्कृतः ॥ ७ ॥ कार्तिकोद्यापनेविष्णोस्तस्मात्पूजाविधीयते ॥ तुलसीमूलदेशेऽस्यप्रीतिदासायतःस्मृता ॥८॥ तुलसीकाननंराजन्गृहेयस्यावतिष्ठते ॥ तद्गृहंतीर्थरूपंतुनायांतियमकिंकराः ॥९॥ सर्वपापहरं नित्यंकामदंतुलसीवनम् ॥ रोपयंतिनराःश्रेष्ठास्तेनपश्यन्तिभास्करिम् ॥१०॥ दर्शनंनर्मदाया स्तुगंगास्नानंतथैवच ॥ तुलसीवनसंसर्गःसममेतत्त्रयंस्मृतम् ॥११॥ रोपणात्पालनात्सेकाद्दर्श नात्स्पर्शनान्नृणाम् ॥ तुलसीदहतेपापंवाङ्मनःकायसंचितम् ॥ १२ ॥

यमदूत येत नाहींत ॥९॥ तुलसीची बाग सर्व पाप नाहींसें करणारी आहे, सर्व इच्छा पूर्ण करणारी आहे. जे नरश्रेष्ठ तुळशी लावितात, त्यांना यमाचें दर्शन होणार नाहीं ॥ १० ॥ नर्मदेचें दर्शन, गंगेचें स्नान, तुळशीचा स्पर्श हीं तीन्ही सारखीं पुण्यकारक आहेत ॥ ११ ॥ तुळसीचें रोप लावणें, त्याचें रक्षण करणें, त्याला पाणी घालणें, ति-

चें दर्शन घेणें व तिला स्पर्श करणें यापासून वाणी, मन व शरीर यांजकडून घडलेलीं सर्व पापें तुळशी नाहींशीं कर-
ते ॥ १२ ॥ तुलसीमंजिरीनें जो विष्णु व शंकर यांची पूजा करितो तो कधींही पुन्हां जन्मास न येतां मोक्षास
जातो; यांत संशय नाहीं ॥ १३ ॥ पुष्कर आदिकरून सर्व तीर्थें, गंगादिक सर्व नद्या व वासुदेवादिक सर्व देव हे
तुलसीवनामध्यें राहतात ॥१४॥ तुळशीची मंजिरी घेऊन जर कोणी प्राण सोडील तर तो शेकडो पापांनीं युक्त असला

तुलसीमंजरीभिर्यःकुर्याद्धरिहरार्चनम् ॥ नसगर्भगृहंयातिमुक्तिभागीनसंशयः ॥१३॥ पुष्करा
द्यानितीर्थानिगंगाद्याःसरितस्तथा ॥ वासुदेवादयोदेवास्तिष्ठंतितुलसीवने ॥१४॥ तुलसीमंजरी
युक्तोयस्तुप्राणान्विमुंचति ॥ यमोपिनेक्षितुंशक्तोयुक्तंपापशतैरपि ॥ १५ ॥ विष्णोःसायुज्य
माप्नोतिसत्यंसत्यंनृपोत्तम ॥ तुलसीकाष्ठजंयस्तुचंदनंधारयेन्नरः ॥१६॥ तद्देहंनस्पृशेत्पापंक्रिय
माणमपीहयत् ॥ तुलसीविपिनच्छायायत्रयत्रभवेन्नृप ॥१७॥ तत्रश्राद्धंप्रकर्त्तव्यंपितृणांदत्तम
क्षयम् ॥ धात्रीच्छायासुयःकुर्यात्पिंडदानंनृपोत्तम ॥ १८ ॥

तरी यम त्याजकडे पहाण्यास देखील समर्थ होत नाहीं ॥ १५ ॥ तो विष्णूच्याचजवळ सायुज्यतेला जाईल, राजा! हें
अगदीं खरें आहे। जो तुलसीकाष्ठाचें चंदन धारण करितो ॥ १६ ॥ त्यानें पाप केलें तरी त्याच्या देहाला शिवणार
नाहीं। तुळसींच्या झाडांची सावली जेथें जेथें असेल ॥ १७ ॥ तेथें श्राद्ध करावें; ह्मणजे पितरांना दिलेलें अक्षय्य

होतें। आंवळीच्या झाडाखालीं जो पिंडदान करील ॥ १८ ॥ त्याचे जे पितर नरकांत असतील ते मुक्तीला जा-
तील। राजा! जो मस्तकावर हातांत, मुखांत व शरीरावर ॥ १९ ॥ आवळे धारण करील, तो विष्णुसारखा
जाणावा ॥ २० ॥ आवळा तुळशी व द्वारकेंतील माती गोपीचंदन हीं ज्याच्या देहावर आहेत, तो नेहमीं जीव-

मुक्तिंप्रयांतिपितरस्तस्ययेनिरयेस्थिताः ॥मूर्ध्निपाणौमुखेचैवदेहेचनृपसत्तम ॥१९॥ धत्तेधात्री
फलंयस्तुसविज्ञेयोहरिःस्वयम्॥धात्रीफलंचतुलसीमृत्तिकाद्वारकोद्भवा॥ २०॥ यस्यदेहेस्थिता
नित्यंजीवन्मुक्तःसउच्यते ॥ धात्रीफलविमिश्रैश्चतुलसीपत्रमिश्रितैः॥२१॥जलैःस्नातिनरस्त
स्यगंगास्नानफलंस्मृतम् ॥ देवार्चनंनरःकुर्याद्धात्रीपत्रैःफलैरतथा ॥२२॥ सुवर्णमणिमुक्तौघै
रर्चनस्याप्नुयात्फलम्॥ तीर्थानिमुनयोदेवायज्ञाःसर्वेपिकार्तिके ॥२३॥ नित्यंधात्रींसमाश्रित्य
तिष्ठंत्यर्केतुलास्थिते ॥ द्वादश्यांतुलसीपत्रंधात्रीपत्रंतुकार्तिके ॥ २४ ॥

न्मुक्तच समजावा ॥ २१ ॥ आवळे व तुळशीपत्र यांनीं मिश्रित पाण्यानें जो स्नान करील, त्याला गंगास्नानाचें फळ
सांगितलें आहे। जो मनुष्य आवळींचीं पानें व फळें यानीं देवाची पूजा करील ॥ २२ ॥ त्याला सोनें, रत्नें, मोतीं
यांनीं पूजा केल्याचें फळ मिळतें। सर्व तीर्थें, ऋषि, देव यज्ञ हे सर्व कार्तिकमासीं ॥ २३ ॥ तुळा राशीस सूर्य असतां

आवळीमध्यें सर्वकाळ असतात ॥ २४ ॥ कार्तिकमहिन्यांत द्वादशीला तुळशीचें किंवा आवळीचें पान जो तोडील तो निंद्य अशा नरकास जाईल ॥ २५ ॥ कार्तिकमहिन्यांत जो आवळीचे छायेखालीं भोजन करील, त्याचें एक वर्षपर्यंतचें अन्नसंसार्गाचें पातक जाईल ॥ २६ ॥ जो कार्तिकमासीं आवळीचे मूळापाशीं विष्णूची पूजा करील त्याला सर्व क्षेत्रांत विष्णूची पूजा केल्याचें पुण्य मिळेल. जसें विष्णूचें माहात्म्य वर्णन करण्यास ब्रह्मदेव समर्थ नाहीं,

लुनातिसनरोगच्छेन्निरयानतिगर्हितान् ॥ धात्रीच्छायांसमाश्रित्यकार्तिकेऽन्नंभुनक्तियः ॥ २५ ॥ अन्नसंसर्गजंपापमावर्षंतस्यगच्छति ॥ धात्रीमूलेतुयोविष्णुंकार्तिकेपूजयेन्नरः ॥ २६ ॥ विष्णुःक्षेत्रेषुसर्वेषुपूजितस्तेनसर्वदा ॥ धात्रीतुलस्योर्माहात्म्यमपिदेवश्चतुर्मुखः ॥ २७ ॥ नसमर्थोभवेद्वक्तुंयथादेवस्यशार्ङ्गिणः ॥ धात्रीतुलस्युद्भवकारणंयःश्रृणोतियःश्रावयतेचभक्त्या ॥ २८ ॥ विधूतपाप्मासहपूर्वजैस्स्वैःस्वर्गंव्रजत्यग्रविमानसंस्थैः ॥ इतिश्रीपद्मपुराणेकार्तिकमाहात्म्येश्रीकृष्णसत्यासंवादेधात्रीतुलस्योर्महिमकथनंनामाष्टादशोऽध्यायः ॥ १८ ॥ ॥ पृथुरुवाच ॥ ॥ सेतिहासमिमंब्रह्मन्माहात्म्यंकथितंमम ॥ अत्याश्चर्यकरंसम्यक्तुलस्यास्तच्छ्रुतंमया ॥ १ ॥

तसें आवळी व व तुळशी यांचें माहात्म्यही वर्णन करण्यास तो समर्थ नाहीं ॥ २७ ॥ जो मनुष्य, आवळी व तुळशी यांच्या उत्पत्तीचें कारण ऐकेल व दुसऱ्याला ऐकवील, त्याचीं सर्व पापें नाहींशीं होऊन उत्तम विमानांत पूर्वजांसह बसून स्वर्गास जातो ॥ २८ ॥ इतिश्रीपद्मपुराणे कार्तिकामहात्म्ये धात्रीतुलसीमहिमाव० अष्टादशोध्यायः ॥ १८ ॥ पृथु प्रश्न करतात—नारदा! तुह्मी इतिहासासह अतिआश्चर्यकारक तुळसीचें माहात्म्य मला सांगितलें, तें मी ऐकिलें ॥१॥

कार्तिकव्रत करणाराचें मोठें पुण्यफल सांगितलें; तें शुभकारक व्रत कोणीं आचरण केलें तें सांगा ॥ २ ॥ नारद ह्मणतात—पूर्वीं सह्याद्रीचे प्रदेशांत करवीर नगरांत धर्म जाणणारा कोणी धर्मदत्त नांवाचा एक ब्राह्मण राहत होता. ॥ ३ ॥ तो नेहमीं विष्णुव्रत करणारा, विष्णूचे पूजेंत निमग्न असणारा, द्वादशाक्षरी वासुदेव मंत्राचा जप करणारा व अतिथीचा आदर करणारा असा होता ॥ ४ ॥ एकदा कार्तिकमासीं पहाटे प्रहररात्रीं हरिजागराकरितां

यदूर्जव्रतिनःपुंसःफलंमहदुदाहृतम् ॥ तत्पुनर्ब्रूहिमाहात्म्यंकेनचीर्णमिदंशुभम् ॥२॥ ॥नारद उवाच ॥ ॥ आसीत्सह्याद्रिविषयेकरवीरपुरेपुरा ॥ ब्राह्मणोधर्मवित्कश्चिद्धर्मदत्तेतिविश्रुतः ॥३॥ विष्णुव्रतकरःसम्यग्विष्णुपूजारतःसदा॥द्वादशाक्षरविद्यायाजपनिष्ठोऽतिथिप्रियः ॥४॥ कदाचित्कार्तिकेमासिहरिजागरणायसः ॥ रात्र्यांतुर्य्यांवशेषायांजगामहरिमंदिरम् ॥५॥हरिपूजोपकरणान्प्रगृह्यव्रजतातदा ॥ तेनदृष्टासमायाताराक्षसीभीमदर्शना ॥६॥ वक्रदंष्ट्रालल्लज्जिह्वा निमग्नारक्तलोचना ॥ दिगंबराशुष्कमांसालंबोष्ठीघर्घरस्वरा ॥७॥ तांदृष्ट्वाभयवित्रस्तःकंपितावयवस्तदा ॥ पूजोपकरणैःसर्वैःपयोभिश्चाहनद्भयात् ॥ ८ ॥

विष्णुमंदिरास निघाला ॥ ५ ॥ हरीच्या पूजेचें साहित्य घेऊन जात असतां वाटेंत एक भयंकर राक्षसी येत आहे अशी पाहिली ॥ ६ ॥ तिच्या दाढा वांकड्या होत्या, जीभ लळलळ करीत होती, डोळे खोल गेलेले लाल होते, नग्न असून रोडकी, लांब ओठाची व घर्घर शब्द करणारी अशी ती होती ॥७॥ त्या राक्षसीला पाहून धर्मदत्त भ्याला,

त्याचे हात पाय लटलट कांपूं लागले व भीतीनें हरीचें नांव घेऊन पूजेचें साहित्य पाण्याचें भांडें वगैरे सर्व त्यानें तिला मारलें ॥ ८ ॥ तें हरीचें नामस्मरण करून तुळसीसह उदक तिचे आंगावर फेकलें; त्यामुळें तिचें सर्व पाप नाश पावलें ॥ ९ ॥ तेव्हां तिला पूर्वजन्मींच्या पापकर्मांचें स्मरण झालें व त्या ब्राह्मणास साष्टांग नमस्कार घालून आपली पूर्वदशा सांगूं लागली ॥ १० ॥ कलहा ह्मणत्ये—पूर्वींच्या कर्मांच्या परिणामानें मला ही दशा प्राप्त झाली आहे. तर

संस्मृत्यतद्धरेर्नामतुलसीयुक्तवारिणा॥सोहनत्पातकंयस्मात्तस्मात्तस्याह्यगाल्लयम् ॥९॥अथसं स्मृत्यसापूर्वजन्मकर्मविपाकजाम् ॥ स्वांदशामब्रवीद्विप्रंदंडवच्चप्रणम्यसा ॥१०॥ कलहोवाच ॥ पूर्वकर्मविपाकेनदशामेतांगतास्म्यहम् ॥ तत्कथंतुपुनर्विप्रप्रयास्याम्युत्तमांगतिम् ॥ ११ ॥ नारदउवाच ॥ तांदृष्ट्वाप्रणतांसम्यग्वदमानांस्वकर्मतत्॥अतीवविस्मितोविप्रस्तदावचनमब्रवीत् ॥१२॥ धर्मदत्तउवाच ॥ केनकर्मविपाकेनत्वंदशामीदृशींगता ॥ कुतस्त्याकाचकिंशीलातत्सर्वं कथयस्वमे ॥ १३ ॥ कलहोवाच ॥ सौराष्ट्रनगरेब्रह्मन्भिक्षुर्नामाभवद्विजः ॥ तस्याहंगृहिणी पूर्वंकलहाख्यातिनिष्ठुरा ॥ १४ ॥

हे ब्राह्मणा ! मी पुनः उत्तम गतीला कशी जाईन ? ॥ ११ ॥ नारद ह्मणालेः—तिनें आपणाला नमस्कार केला व आपलें कर्म सांगितलें. तेव्हां त्या ब्राह्मणाला मोठा चमत्कार वाटून तो ब्राह्मण त्या राक्षसीला प्रश्न करितो ॥ १२ ॥ धर्मदत्त ह्मणतोः—कोणत्या कर्मानें ही दशा तुला प्राप्त झाली ? तूं कोठली व कोण ? तुझें शील काय तें सर्व मला सांग ॥ १३ ॥ कलहा ह्मणाली—हे ब्राह्मणा ! सौराष्ट्र नगरामध्यें भिक्षु नांवाचा एक ब्राह्मण होता, त्याची मी बायको;

माझें नांव कलहा. मी मोठी निष्ठुर होतें ॥ १४ ॥ मी कधींही पतीला गोड बोलून देखील समाधान दिलें नाहीं, व त्यानें सांगितलें तरी त्याला मिष्टान्न करून घातलें नाहीं ॥ १५ ॥ मी मोठी भांडखोर असल्यामुळें तो मला भिऊन नेहमीं उदास होता. तेव्हां मला कंटाळून दुसरी बायको करावी असा त्यानें बेत केला ॥१६॥ तेव्हां मी विष खाऊन प्राणत्याग केला. ग यमाचे दूतांना मला बांधून मारीत मारीत यमापुढें नेलें ॥ १७ ॥

नकदाचिन्मयाभर्तुर्वचसापिशुभंकृतम् ॥ नार्पितंतस्यमिष्टान्नंभर्तुर्वचनशीलया ॥ १५ ॥ कलह प्रिययानित्यंभयोद्विग्नमनायदा ॥ परिणेतुंयदान्यांसमतिंचक्रेपतिर्मम ॥१६॥ ततोगरंसमादायप्रा णास्त्यक्तामयाद्विज ॥ अथबद्ध्वावध्यमानांमांनिन्युर्यमकिङ्कराः ॥ १७ ॥ यमश्चमांतदादृष्ट्वाचित्र गुप्तमपृच्छत ॥ यमउवाच ॥ अनयाकिंकृतंकर्मचित्रगुप्तविलोकय ॥ प्राप्नोत्वेषाचतत्कर्मशुभंवा यदिवाऽशुभम् ॥ १८ ॥ कलहोवाच ॥ चित्रगुप्तस्तदावाक्यंभर्त्सयन्मामुवाचसः ॥ १९ ॥ चित्र गुप्तउवाच ॥ अनयातुकृतंकर्मशुभंकिंचिन्नविद्यते ॥ मिष्टान्नंभुंजमानेयंनभर्तरितदर्पितम् ॥ २० ॥

यमानें मला पाहतांच चित्रगुप्ताला विचारिलें । यम ह्मणालाः—चित्रगुप्ता ! हिनें काय काय कर्में केलीं आहेत तीं पहा. त्या कर्मांप्रमाणें शुभ किंवा अशुभ फळ तिला मिळेल ॥ १८ ॥ कलहा ह्मणते—तेव्हां चित्रगुप्त माझी निर्भर्त्सना करून ह्मणाला ॥ १९ ॥ चित्रगुप्त ह्मणालाः—हिनें शुभ कर्म तर कांहींच केलें नाहीं. नवऱ्याला न

देतां आपणच गोड गोड अन्न खात होती ॥ २० ॥ ह्मणून वडवागुळीच्या नीच योनीमध्यें आपली विष्ठा खाणारी ही व्हावी । ही नवऱ्याचा द्वेष करून नित्य त्याशीं भांडत होती ॥ २१ ॥ ह्मणून विष्ठा खाणारी डुकरयोनी तिला प्राप्त व्हावी । स्वयंपाकाच्या भांड्यांत जेवीत होती व नवऱ्याला टाकून एकटीच भोजन करीत होती ॥ २२ ॥ ह्मणून आपलींच पिलें खाणारी अशी मांजरीची योनि हिला प्राप्त व्हावी । पतीच्या उद्देशानें तिनें आत्मघात केला ॥ २३ ॥

अतश्चवल्गुलीयोन्यांस्वविष्ठादावतिष्ठतु ॥ भर्तुर्द्वेषात्तदाप्येषानित्यंकलहकारिणी ॥ २१ ॥ विष्ठादांसूकरींयोनिंतस्मात्तिष्ठत्वियंहरे ॥ पाकभांडेसदाभुंक्तेभुंक्ते चैकायतस्ततः ॥२२॥ तस्मादेषा बिडाल्यस्तुस्वजातापत्यभक्षिणी ॥ भर्तारमपिचोद्दिश्यह्यात्मघातःकृतोऽनया ॥२३॥ तस्मात्प्रेत शरीरेपितिष्ठत्वेषातिनिंदिता ॥ अतश्चैषामरुद्देशंप्रापितव्याभटैरियम् ॥ २४ ॥ तत्रप्रेतशरीर स्थाचिरंतिष्ठत्वियंततः ॥ ऊर्ध्वंयोनित्रयंचैषाभुनक्त्वशुभकारिणी ॥ २५ ॥ कलहोवाच ॥ ॥ साहं पंच शताब्दानिप्रेतदेहेस्थिताकिल ॥ क्षुत्तृड्भ्यांपीडितानित्यंदुःखितास्वेनकर्मणा ॥ २६ ॥

ह्मणून अति निंद्य अशा पिशाचयोनींत तिनें राहावें ह्मणून तिला यमदूतांनीं निर्जल मारवाड देशांत सोडावी ॥२४॥ तेथें तिनें बहुत काळ पिशाच योनींत राहून नंतर तीन प्रकारचे अशुभ वडवागुळ, मांजर व डुकर असे जन्म घ्यावे ॥ २५ ॥ कलहा ह्मणाली:—ती मी पांचशें वर्षें या प्रेतदेहामध्यें आहें; आपल्या कर्मानें भूक व तहान यांचे पीडेनें

फार दुःखित अशी आहें ॥ २६ ॥ भूक व तहान यांचे पीडेमुळें मी एका वाण्याच्या शरीरांत प्रवेश केला व दक्षिण देशांत कृष्णावेण्यांच्या संगमाला आलें ॥ २७ ॥ कृष्ण वेणीच्या तीराला येतें इतक्यांत शिव व विष्णु यांच्या दूतांनीं मला त्या वाण्याच्या शरीरांतून जबरदस्तीनें ओढून लांब टाकिलें॥२८॥तेव्हां मी क्षुधेनें पीडित असतां ब्राह्मणा मला तुझें दर्शन झालें. तुझ्या हातांतील तुळशीच्या उदकानें माझें सर्व पाप गेलें ॥ २९ ॥ हे विप्रेंद्रा! आतां काय करणें

क्षुत्तृड्भ्यांपीडिताविश्यशरीरंवणिजस्त्वहम् ॥ आयातादक्षिणंदेशंकृष्णावेण्योश्चसंगमम् ॥ २७ ॥ तत्तीरंसंश्रितायावत्तावत्तस्यशरीरतः ॥ शिवविष्णुगणैर्दूरमपकृष्टाबलादहम् ॥ २८ ॥ ततःक्षुत्क्षा मयादृष्टोमयाहित्वंद्विजोत्तम ॥ त्वद्धस्ततुलसीवारिसंसर्गगतपापया ॥२९॥ तत्कृतंकुरुविप्रेंद्रकथंमु क्तिमियामहम् ॥ योनित्रयादग्रभवादस्माच्चप्रेतदेहतः ॥३०॥ इत्थंविचिंत्यकलहावचनंद्विजाग्रणी स्तत्कर्मपाकभवविस्मयदुःखयुक्तः ॥ तद्ग्लानिदर्शनकृपाचलचित्तवृत्तिर्ध्यात्वाचिरंसवचनंनिजगा ददुःखात् ॥३१॥ इतिश्रीपद्मपुराणेकार्तिकमाहात्म्ये श्रीकृष्णसत्यासंवादेएकोनविंशोऽध्यायः १९

तें कर ह्मणजे पुढें भोगाव्या लागणाऱ्या तीन योनि व हा प्रेतदेह यांपासून माझी मुक्तता होईल ॥ ३० ॥ तो श्रेष्ठ ब्राह्मण असें तें कलहेचें भाषण ऐकून तिच्या कर्मपाकाच्या फळानें तिला प्राप्त झालेलें दुःख पाहून विस्मित व दुःखित झाला. तिची दीन स्थिति पाहून कृपेनें दया आली त्यामुळें चित्तवृत्ति चंचळ झाल्याकारणानें बराच वेळ विचार करून तो ब्राह्मण

दुःखित अतःकरणानें बोलूं लागला ॥ २१ ॥ इति श्रीपद्मपु० कार्तिकमा० एकोनविंशोध्यायः ॥ १९ ॥ धर्मदत्त ह्मणाला- हे कलहे ! तीर्थे, दान, व्रत यांनीं पापें नाहींशीं होतात परंतु तूं प्रेतदेहांत आहेस ह्मणून तो अधिकार तुला नाहीं ॥ १ ॥ तुझी अशी खिन्न स्थिति पाहून माझे मनाला फार दुःख होतें, तुझा उद्धार केल्याशिवाय माझे मनाला समाधान होणार नाहीं ॥ २ ॥ तुझें पातक फार मोठें आहे. तीन योनि भोगावें लागणारें पातक, व ही अति निंदित पिशाच

धर्मदत्तउवाच ॥ विलयंयांतिपापानितीर्थदानव्रतादिभिः ॥ प्रेतदेहस्थितायास्तेतेषुनैवाधिकारिता ॥ १ ॥ त्वद्ग्लानिदर्शनादस्मात्खिन्नंचममानसम् ॥ नैवनिर्वृतिमायातित्वामनुद्धृत्यदुःखिताम् ॥ २ ॥ पातकंचतवात्युग्रंयोनित्रयविपादकं ॥ नैवाल्पैःक्षीयतेपुण्यैःप्रेतत्वंचातिगर्हितम् ॥ ३ ॥ तस्मादाजन्मजनितंयन्मयाकार्तिकव्रतम् ॥ तत्पुण्यस्यार्द्धभागेनसद्गतिंत्वमवाप्नुहि ॥ ४ ॥ कार्तिकव्रतपुण्येननसाम्यंयांतिसर्वथा ॥ यज्ञदानानितीर्थानिव्रतान्यपियतो ध्रुवम् ॥ ५ ॥ नारदउवाच ॥ इत्युक्त्वाधर्मदत्तोसौयावत्तामभ्यषेचयत् ॥ तुलसीमिश्रतोयेनश्रावयन्द्वादशाक्षरम् ॥ ६ ॥

योनि थोड्याशा पुण्यानें नाहींशी होणार नाहीं ॥ ३ ॥ याकरितां, मी जन्मापासून आजपर्यंत जें कार्तिकव्रत केलें त्याचें अर्धें पुण्य तुला देतों; त्या योगानें तुला सद्गति प्राप्त होवो ॥ ४ ॥ यज्ञ, दान, तीर्थें, व्रतें हीं कोणातींही कार्तिक व्रताच्या पुण्याची बरोबरी केव्हांही करणार नाहींत ॥ ५ ॥ नारद ह्मणालेः—याप्रमाणें धर्मदत्तानें बोलून ति-

च्या अंगावर तुलसीयुक्त पाणी शिंपडलें व तिला द्वादशाक्षर मंत्र ऐकविला ॥ ६ ॥ इतक्यांत ती प्रेतदेहांतून मुक्त होऊन लक्ष्मीप्रमाणें दिव्य स्वरूपवान् व अग्निज्वालेप्रमाणें तेजस्वी झाली ॥ ७ ॥ तेव्हां तिनें हर्षानें त्या ब्राह्मणास दंडवत् नमस्कार घातला व सद्गदितवाणीनें बोलूं लागली ॥ ८ ॥ कलहा ह्मणालीः—हे ब्राह्मणश्रेष्ठा ! मी तुझ्या कृपेनें या नरकापासून मुक्त झालें. पापसमुद्रांत मी बुडालें होतें, त्यांतून तारण्याला तूंच नौका झालास ॥ ९ ॥

तावत्प्रेतत्वनिर्मुक्ताज्वलदग्निशिखोपमा ॥ दिव्यरूपधराजातालावण्येनयथेंदिरा ॥ ७ ॥ ततःसादंडवद्भूमौप्रणनामाथतंद्विजम् ॥ उवाचसातदावाक्यैर्हर्षगद्गदभाषिणी ॥ ८ ॥ कलहोवाच ॥ त्वत्प्रसादाद्द्विजश्रेष्ठविमुक्तानिरयादहम् ॥ पापाब्धौमज्जमानायास्त्वंनौभूतोसिमेध्रुवम् ॥ ९ ॥ नारदउवाच ॥ इत्थंसावदतीविप्रंददर्शायांतमंबरात् ॥ विमानंभास्वरंयुक्तंविष्णुरूपधरैर्गणैः ॥ १० ॥ अथसातद्विमानाग्र्यंद्वाःस्थाभ्यामवरोपिता ॥ पुण्यशीलसुशीलाभ्यामप्सरोगणसेविता ॥ ११ ॥ तद्विमानंतदापश्यद्धर्मदत्तःसविस्मयः ॥ पपातदंडवद्भूमौदृष्ट्वातौविष्णुरूपिणौ ॥ १२ ॥

नारद ह्मणतातः—असें ती कलहा त्या ब्राह्मणाशीं बोलत आहे इतक्यांत आकाशांतून विष्णुरूप धारण करणाऱ्या दूतगणांनीं युक्त एक तेजस्वी विमान, आलें आहे असें तिनें पाहिलें ॥ १० ॥ नंतर त्यांतील पुण्यशील सुशील द्वारपालांनीं तिला श्रेष्ठ विमानांत बसविलें व अप्सरा तिची सेवा करूं लागल्या ॥ ११ ॥ तें विमान पाहून धर्मदत्ताला विस्मय

वाटला व ते विष्णुस्वरूपी दोन दूत पाहून धर्मदत्तानें त्यांना साष्टांग नमस्कार घातला ॥ १२ ॥ ते पुण्यशील व सुशील नांवाचे दूत त्याला उठवून त्याचें अभिनंदन करून धर्मयुक्त भाषण करूं लागले ॥ १३ ॥ पुण्यशीलसुशील ह्मणतात—हे द्विजश्रेष्ठा ! तूं विष्णुभक्त, दीनावर दया करणारा, सर्वज्ञ व विष्णुव्रत करणारा असा उत्तम आहेस ॥ १४ ॥ तूं लहानपणापासून जें कार्तिकव्रत केलेंस त्याचें अर्धें पुण्यदान केल्यानें त्याचे दुप्पट पुण्य तुला प्राप्त झालें ॥ १५ ॥

पुण्यशीलसुशीलौचतमुत्थाप्यानतंद्विजम् ॥ समभ्यनंदतुर्वाक्यमूचतुर्धर्मसंयुतम् ॥ १३ ॥ गणावूचतुः ॥ साधुसाधुद्विजश्रेष्ठयत्त्वंविष्णुरतःसदा ॥ दीनानुकंपीसर्वज्ञोविष्णुव्रतपरायणः ॥ १४ ॥ आबालत्वाच्छुभंत्वेतद्यत्त्वयाकार्तिकव्रतम् ॥ कृतंतस्यार्द्धदानेनपुण्यंद्वैगुण्यमागतम् ॥ १५ ॥ जन्मांतरशतोद्भूतंपापंतद्विलयंगतम् ॥ स्नानैरेवगतंपापंयदस्याःपूर्वकर्मजम् ॥ १६ ॥ हरिजागरणाद्यैश्चविमानमिदमास्थिता ॥ वैकुंठंनीयतेसाधोनानाभोगयुताप्त्वियम् ॥ १७ ॥ दीपदानभवैःपुण्यैस्तेनसारूप्यमास्थिता ॥ तुलसीपूजनाद्यैश्चकार्तिकव्रतकैःशुभैः ॥ १८ ॥ विष्णुसान्निध्यगाजातात्वयादत्तैःकृपानिधे ॥ त्वमप्यस्यभवस्यांतेभार्याभ्यांसहयास्यसि ॥ १९ ॥

इचेंही मागील शंभर जन्मांचें पातक नाहींसें झालें व स्नानाचे पुण्यानेंच जें हिचें पूर्वजन्माचें पातक तें गेलें ॥१६॥ हरिजागराच्या पुण्यानें ह्या विमानांत बसली. उत्तम प्रकारचीं सर्व सुखें व भोगानीं युक्त हिला वैकुंठास नेतों ॥ १७ ॥ दीपदानाच्या पुण्यानें हिला विष्णुप्रमाणें रूप प्राप्त झालें. तुलसीपूजादिक कार्तिकव्रतें यांचे शुभपुण्यांनीं ही विष्णूच्या सन्निध गमन करणारी झाली ॥ १८ ॥ हे कृपानिधे ! तूं हें पुण्य तिला दिलेंस त्याचें हें सर्व फळ हिला मिळालें व

तूंही या जन्माच्या शेवटीं आपल्या दोनी स्त्रियांसह वैकुंठास येशालि ॥ १९ ॥ वैकुंठांत विष्णुस्वरूप प्राप्त होऊन विष्णूजवळ राहशील. हे धर्मदत्ता ! ज्यानीं तुझ्याप्रमाणें विष्णूची भक्तीनें आराधना केली तेच धन्य, कृतकृत्य व त्यांच्याच जन्माचें सार्थक झालें॥२०॥ विष्णूची चांगली आराधना केली तर तो मनुष्यास काय काय देणार नाहीं? सर्व कांहीं देईल ॥ २१ ॥ ज्यानें ध्रुवाला अढळपद दिलें, ज्याच्या नामस्मरणानें मनुष्याला उत्तम गति मिळते ॥ २२ ॥ पूर्वी नाम

वैकुंठभुवनंविष्णोःसान्निध्यंचसरूपतां ॥ तेधन्याःकृतकृत्यास्तेतेषांचसफलोभवः ॥ २० ॥ यैर्भक्त्याराधितोविष्णुर्धर्मदत्तयथात्वया॥सम्यगाराधितोविष्णुःकिन्नयच्छतिदेहिनाम् ॥२१॥ औत्तानचरणिर्येनध्रुवत्वेस्थापितःपुरा ॥ यन्नामस्मरणादेवदेहिनोयांतिसद्गतिम् ॥ २२ ॥ ग्राहग्रहीतोनागेन्द्रोयन्नामस्मरणात्पुरा ॥ विमुक्तःसन्निधिंप्राप्तोजातोयंजयसंज्ञकः ॥ २३ ॥ यतस्त्वयार्चितोविष्णुस्तत्सान्निध्यंप्रयास्यसि ॥ बहून्यब्दसहस्राणिभार्याद्वययुतस्यते ॥ २४ ॥ ततःपुण्यक्षयेजातेयदायास्यसिभूतलम् ॥ सूर्यवंशोद्भवोराजाविख्यातस्त्वंभविष्यसि ॥ २५ ॥

स्मरणानें गजेंद्रनक्रापासून मुक्त होऊन विष्णुसन्निध वैकुंठाला गेला व जय नांवाचा द्वारपाळ झाला ॥ २३ ॥ तूं विष्णूची आराधना केली आहेस ह्मणून विष्णूचे सन्निध येशील व हजारों वर्षें दोनी स्त्रियांसह तेथें राहशील ॥२४॥ व तें पुण्य संपल्यावर जेव्हां पृथ्वीवर येशील तेव्हां सूर्यवंशांतील प्रख्यात असा दशरथ नांवाचा राजा होशील ॥ २५ ॥

तेथेंही दोन स्त्रियानीं युक्त होशील व हिला अर्धे पुण्य दिलेंस, ह्मणून ही तिसरी स्त्री होईल ॥ २६ ॥ व तेथेंही श्रीविष्णु देवकार्याकरितां तुझे पुत्र होऊन तुझ्या जवळ राहतील ॥ २७ ॥ तूं जन्मापासून हें, विष्णूला संतोषकारक व्रत केलेंस, त्यापेक्षां यज्ञ दानें तीर्थें हीं अधिक नाहींत ॥ २८ ॥ हे ब्राह्मणश्रेष्ठा, तूं हें विष्णुला संतोष करणारें असें व्रत केलेंस

नाम्नादशरथस्तत्रभार्याद्वययुतःपुनः ॥ तृतीययानयाचापियातेपुण्यार्द्धभागिनी ॥ २६ ॥ तत्रा पितवसान्निध्यंविष्णुर्यास्यतिभूतले ॥ आत्मानंतवपुत्रत्वेप्रकल्प्यामरकार्यकृत् ॥ २७ ॥ तवजन्म व्रतादस्माद्विष्णुसंतुष्टिकारकात् ॥ नयज्ञानचदानानिनतीर्थान्यधिकानिवै ॥ २८ ॥ धन्योसि विप्राग्ययतस्त्वयैतद्व्रतंकृतंतुष्टिकरंजगद्गुरोः ॥ यदर्धभागात्सफलासुरारेःप्रणीयतेस्माभिरियंस लोकताम् ॥ २९ ॥ इतिश्रीपद्मपुराणेउत्तरखण्डेकार्तिकमाहात्म्येश्रीकृष्णसत्यासंवादेविंशतित मोऽध्यायः ॥ २० ॥ ॥ नारदउवाच ॥ इत्थंतद्वचनं श्रुत्वाधर्मदत्तःसविस्मयः ॥ प्रणम्यदंडव द्भूमौवाक्यमेतदुवाचह ॥ १ ॥ ॥ धर्मदत्तउवाच ॥ आराधयंतिसर्वेपिविष्णुंभक्तार्तिनाशनम् ॥ यज्ञैर्दानैर्व्रतैस्तीर्थैस्तपोभिश्चयथाविधि ॥ २ ॥

ह्मणून धन्य आहेस. त्या व्रताच्या अर्धे भागानें ही सफळ होऊन हिला आह्मी मुरारीच्या वैकुंठास घेऊन जातों ॥ २९ ॥ इति कार्तिकमाहात्म्ये विशंतितमोध्यायः ॥ ३० ॥ नारद ह्मणालेः—याप्रमाणें त्या विष्णुदूतांचें भाषण ऐकून देवत्ताला कौतुक वाटलें, व त्यांना साष्टांग नमस्कार करून भाषण करिता झाला ॥ १ ॥ धर्मदत्त ह्मणालाः—

भक्तांचें संकट नाश करणारा विष्णु याची यज्ञ, दान, व्रत, तीर्थें, तप यांहींकरून लोक यथाविधि आराधना करितात ॥२॥ यांमध्यें विष्णुप्रिय व विष्णुसान्निध्य करणारें असें कोणतें व्रत कीं जें केलें असतां यज्ञदानादि सर्व केल्याचें फळ मिळतें॥३॥गण ह्मणतातः—हे ब्राह्मणा ! तूं चांगलें विचारलेंस; तुला पूर्वीं घडलेली एक पुण्यकारक कथा सांगतों; चित्त देऊन श्रवण कर ॥४॥ पूर्वीं कांतिपुर नगरामध्यें चोल नांवाचा चक्रवर्ति राजा राज्य करीत होता; त्याच्याच कीर्तीमुळें त्या देशाला

विष्णुप्रीतिकरंतेषांकिंचित्सांनिध्यकारकम् ॥ यत्कृत्वातानिचीर्णानिसर्वाण्यपिभवंतिहि ॥ ॥३॥ गणावूचतुः ॥ साधुपृष्टंत्वयाविप्रश्रृणुष्वैकाग्रमानसः ॥ सेतिहासकथांपुण्यांकथ्यमानांपु राभवाम् ॥ ४ ॥ कांतिपुर्यांपुराचोलश्चक्रवर्तीनृपोऽभवत् ॥ यस्याख्ययैवतेदेशाश्चोलाइतिप्रथां गताः ॥ ५ ॥ यस्मिञ्छासतिभूचक्रंदरिद्रोवापिदुःखितः॥पापबुद्धिःसरुग्वापिनैवकश्चिद्भून्नरः ॥ ६ ॥ यस्याप्युन्नतयज्ञस्यताम्रपर्ण्यास्तटावुभौ ॥ सुवर्णयूपैःशोभाढ्यावास्तांचैत्ररथोपमौ ॥ ७ ॥ सकदाचिदगाद्राजाह्यनंतशयनंद्विज ॥ यत्रासौजगतांनाथोयोगनिद्रामुपाश्रितः ॥८॥

चोलदेश हें नांव प्राप्त झालें ॥५॥ तो चोलराजा राज्य करीत असतां त्याच्या राज्यांत कोणीही दरिद्री रोगी, दुःखी, पापकर्मी असे नव्हते ॥ ६ ॥ त्या राजानें बहुत यज्ञ केल्यामुळें ताम्रपर्णी नदीच्या दोन्ही तीराला यज्ञसंबंधीं सोन्याचे केलेले यूप शोभत होते त्यामुळें नदीतीर कुबेराच्या चैत्ररथ बागेप्रमाणें भासत होतें॥७॥हेब्राह्मणा ! तो राजा एकदा अनंत-

शयन क्षेत्राला गेला; जेथें जगत्स्वामी भगवंतानें योगनिद्रेमध्यें शयन केलें आहे ॥८॥ तेथें राजानें दिव्य रत्नें, मोतीं, सुंदर सोन्याचीं फुलें, यांनीं श्रीविष्णूची यथाविधि पूजा केली ॥९॥ देवाला साष्टांग नमस्कार करून तेथें बसला; इतक्यांत तेथें देवाजवळ एक ब्राह्मण आलेला त्यानें पाहिला ॥१०॥ तो विष्णुदास ब्राह्मण त्या राजाचे नगरचाच होता; ज्यानें देवाचे पूजेकरितां हातांत उदक व तुलसी धारण केली होती ॥ ११ ॥ त्या ब्राह्मणानें तेथें येऊन विष्णुसूक्तानें

तत्रश्रीरमणंदेवंसंपूज्यविधिवन्नृपः ॥ मणिमुक्ताफलैर्दिव्यैःस्वर्णपुष्पैश्चशोभनैः ॥ ९ ॥ प्रणम्य दंडवद्भूमावुपविष्टःसतत्रवै ॥ तावद्ब्राह्मणमायांतमपश्यद्देवसन्निधौ ॥ १० ॥ देवार्चनार्थंपाणौतुतुलस्युदकधारिणम् ॥ स्वपुरीवासिनंतत्रविष्णुदासाह्वयंद्विजम् ॥ ११ ॥ सतत्राभ्येत्यविप्रर्षिर्देवदेवमपूजयत् ॥ विष्णुसूक्तेनसंस्नाप्यतुलसीमंजरीदलैः ॥ १२ ॥ तुलसीपूजयातस्यरत्नपूजांपुराकृताम् ॥ आच्छादितांसमालोक्यराजाक्रुद्धोऽब्रवीदिदम् ॥१३॥ चोलउवाच ॥ ॥ माणिक्यस्वर्णपूजात्रशोभाढ्यायाकृता।मया ॥ विष्णुदासकथंसेयमाच्छन्नातुलसीदलैः ॥ १४ ॥

देवदेवाला स्नान घालून तुळशीच्या मंजिरींनीं पूजा केली ॥१२॥ त्याच्या तुळसीच्या पूजेनें पूर्वीं आपण केलेली रत्नपूजा झांकून गेली असें राजानें पाहिलें; तेव्हां राजाला राग येऊन बोलला ॥१३॥ चोलराजा ह्मणतो–हे विष्णुदासा ! माणकें सुवर्ण इत्यादिकांनीं मीं मोठी सुंदर पूजा केली होती ती तूं तुलसीनीं अशी कां झांकून टाकिलीस ॥ १४ ॥

तूं विष्णुभक्ति जाणत नाहींस; जो तूं अशी अतिसुंदर सुशोभित पूजा झांकून टाकतोस यावरून तूं नीच आहेस असें मला वाटतें ॥ १५ ॥ असें राजाचें भाषण ऐकून ब्राह्मण संतापला व राजाच्या मोठेपणाचा मान न राखतां बोलूं लागला ॥ १६ ॥ विष्णुदास ह्मणतोः–राजा ! तुला भक्ति ठाऊक नाहीं; तूं राजलक्ष्मीनें गर्विष्ठ झाला आहेस; तूं पूर्वीं

विष्णुभक्तिंनजानासिवराकोसिमतोमम ॥ यस्त्विमामतिशोभाढ्यांपूजामाच्छादयस्यहो ॥ १५ ॥ इतितद्वचनंश्रुत्वासक्रोधःसद्विजोत्तमः ॥ राज्ञोगौरवमुल्लंघ्यजगादवचनंतदा ॥ १६ ॥ विष्णुदासउवाच ॥ राजन्भक्तिंनजानासिगर्वितोसिनृपश्रिया ॥ कियद्विष्णुव्रतंपूर्वंत्वयाचीर्णंवदस्वतत् ॥ १७ ॥ ॥ गणावूचतुः ॥ तद्ब्राह्मणवचःश्रुत्वाप्रहस्यसनृपोत्तमः ॥ विष्णुदासंतदागर्वादुवाचवचनंद्विजम् ॥ १८ ॥ राजोवाच ॥ इत्थंचेद्वदसेविप्रविष्णुभक्त्यातिगर्वितः ॥ भक्तिस्तेकियतीविष्णोर्दरिद्रस्याधनस्यच ॥ १९ ॥ यज्ञदानादिकंनैवविष्णोस्तुष्टिकरंकृतम् ॥ नापिदेवालयंपूर्वंकृतंविप्रत्वयाक्वचित् ॥ २० ॥

कोणतें विष्णुव्रत केलेंस तें सांग बरें ॥ १७ ॥ गण ह्मणतातः–असें ब्राह्मणाचें वाक्य ऐकून राजा हंसला व गर्वानें विष्णुदासाला ह्मणाला ॥ १८ ॥ राजा ह्मणतोः–ब्राह्मणा ! तूं असें जरी बोललास तरी तुला विष्णुभक्तीचा नुसता गर्व आहे· दरिद्री जो तूं त्या तुला विष्णूची भक्ति कितीशी असणार? ॥ १९ ॥ तूं विष्णूला तुष्ट करणारें असें यज्ञदानादि

केलें नाहींस किंवा हे ब्राह्मणा ! कधीं कोठें देवालयही बांधलें नाहींस ॥ २० ॥ असा तूं असूनही तुला भक्तीचा मोठा गर्व मात्र आहे. हे सर्व ब्राह्मण हो ! माझें भाषण ऐका ॥२१॥ हा वाद विष्णूच्या साक्षात्कारानेंच संपेल; तेव्हां तुह्मी आह्मां दोघांमध्यें कोण भक्त आहे तें जाणाल ॥ २२ ॥ गण ह्मणालेः—राजा याप्रमाणें बोलून आपल्या राजवाड्यांत गेला व त्यानें मुद्गलऋषीस आचार्यत्व देऊन विष्णुसत्र आरंभिलें ॥ २३ ॥ त्या सत्रांत ऋषींचा मोठा समुदाय

ईदृशस्यापितेगर्वएषतिष्ठतिभक्तितः ॥ तच्छृण्वंतुवचोमेद्यसर्वेप्येतेद्विजातयः ॥ २१ ॥ साक्षात्कारमहंविष्णोरेवंवादोगमिष्यति ॥ पश्यंतुसर्वेपिततोभक्तिंज्ञास्यंतिचावयोः ॥ २२ ॥ गणावूचतुः॥ इत्युक्त्वासनृपोऽगच्छन्निजराजगृहंतदा ॥ आरंभद्वैष्णवंसत्रंकृत्वाचार्यंसमुद्गलम् ॥ २३ ॥ ऋषिसंघसमाजुष्टंबह्वन्नंबहुदक्षिणम् ॥ यच्चब्रह्मकृतंपूर्वंगयाक्षेत्रेसमृद्धिमत् ॥ २४ ॥ विष्णुदासोपितत्रैवतस्थौदेवालयेव्रती ॥ यथोक्तनियमान्कुर्वन्विष्णोस्तुष्टिकरान्सदा ॥ २५ ॥ माघोर्ज्जयोर्व्रतंसम्यक्तुलसीवनपालनम् ॥ एकादश्यांहरेर्जाप्यंद्वादशाक्षरविद्यया ॥ २६ ॥

जमला होता; त्याला राजानें अन्नदान बहुत केलें व दक्षिणाही बहुत दिली; जसें पूर्वी ब्रह्मदेवानें गयाक्षेत्रीं विष्णुसत्र केलें त्याप्रमाणें त्या राजानें चालविलें ॥२४॥ इकडे विष्णुदासही त्या देवालयांतच राहिला व तो विष्णूला प्रिय असे नियम चालवीत होता ॥२५॥ माघ व कार्तिक महिन्यांचें व्रत, तुलसीवनाचें रक्षण, एकादशीला "ॐनमो भगवते वासुदेवाय" या

द्वादशाक्षरी मंत्राचा जप, नित्य षोडशोपचारांनीं व गायननृत्य इत्यादि मंगलांनीं विष्णूची पूजा अशीं व्रतें तो ब्राह्मण करिता झाला ॥२६॥२७॥ व नित्य चालतां बसतां निजतां, विष्णूचें स्मरण करीत होता व सर्व प्राणिमात्रांचे अंतर्यामी विष्णु आहे असें समजून त्यांकडे यथायोग्य समदृष्टीनें पाहत होता ॥ २८ ॥ माघ व कार्तिक मासाचे विशेष

उपचारैःषोडशभिर्नृत्यगीतादिमंगलैः ॥ नित्यंविष्णोस्तथापूजांव्रतान्येतानिसोकरोत् ॥ २७ ॥ नित्यंसंस्मरणंविष्णोर्गच्छन्भुविस्वपन्नपि ॥ सर्वभूतस्थितंविष्णुमपश्यत्समदर्शनः ॥ २८ ॥ माघकार्तिकयोर्नित्यंविशेषनियमानपि ॥ अकरोद्विष्णुतुष्ट्यर्थंसोद्यापनविधिंतथा ॥ २९ ॥ एवंसमाराधयतोःश्रियःपतिंतयोश्चचोलेश्वरविष्णुदासयोः॥अगाद्धिकालःसुमहान्व्रतस्थयोस्तन्निष्ठसर्वेंद्रियकर्मणोस्तदा ॥ ३० ॥ इतिश्रीपद्मपुराणेउत्तरकाण्डेकार्तिकमाहात्म्येश्रीकृष्णसत्यासंवादेएकविंशोध्यायः॥२१॥ ॥ नारदउवाच ॥ कदाचिद्विष्णुदासोथकृत्वानित्यविधिंद्विजः॥ सपाकमकरोत्तावदहरत्कोप्यलक्षितः ॥ १ ॥

नियम सर्व करून विष्णुप्रीतीकरितां त्यांचें त्यानें उद्यापन केलें ॥ २९ ॥ याप्रमाणें चोलराजा व विष्णुदास ब्राह्मण हे विष्णूची आराधना करणारे असे मोठे व्रतस्थ राहून सर्व इंद्रियांचीं कर्में केवल भगवंतावर निष्ठा ठेवून करीत असतां बहुत काळ गेला ॥३०॥ इतिश्रीपद्म० कार्तिकमा० एकविंशोध्यायः ॥ २१ ॥ नारद ह्मणतातः—राजा ! एकदां

विष्णुदास नित्यस्नानसंध्याविधि आटोपून त्यानें स्वयंपाक केला, इतक्यांत तो पाक गुप्तपणानें कोणीं हरण केला ॥ ॥ १ ॥ तो स्वयंपाक नाहींसा झाला असें पाहूनही सायंकाळची पूजा वगैरे व्रताचा भंग होईल ह्मणून पुन्हा त्यानें पाक केला नाहीं ॥ २ ॥ दुसरे दिवशीं स्वयंपाक करून श्रीहरीला नैवेद्य अर्पण करण्यास डोळे मिटले तों इतक्यांत पाक पुन्हा कोणीं नेला ॥ ३ ॥ याप्रमाणें सात दिवस त्याचा पाक कोणी हरण करीत होतें; तेव्हां त्याला चमत्कार वाटून

तमदृष्ट्वाप्यसौपाकंपुनर्नैवाकरोत्तदा ॥ सायंकालार्चनस्यासौव्रतभंगभयाद्द्विजः ॥ २ ॥ द्वितीयेह्नि पुनः पाकंकृत्वायावत्सर्विष्णवे ॥ उपहारार्प्पणंकर्तुंगतःकोप्यहरत्पुनः ॥ ३ ॥ एवंसप्तदिनंतस्य पाकंकोप्यहरन्नृप ॥ ततःसविस्मयश्चाथमनस्येवमधारयत् ॥ ४ ॥ अहोनित्यंसमभ्येत्यकःपाकं हरतेमम ॥ क्षेत्रंसंन्यासिनःस्थानंनत्याज्यंममसर्वथा ॥ ५ ॥ पुनःपाकंविधायात्रभुज्यतेयदिचेन्मया ॥ सायंकालार्चनंचैवपरित्याज्यंकथंभवेत् ॥ ६ ॥ यदिपाकंविधायैवभोक्तव्यंतुमयानतत् अनिवेद्यहरौसर्वैर्वैष्णवैर्नतुभुज्यते ॥ ७ ॥

तो विचार करूं लागला ॥ ४ ॥ अहो! रोज येथें येऊन माझा पाक कोण नेतो? हें क्षेत्र संन्याशास राहण्यास योग्य आहे ह्मणून मला ही जागा सोडणें बरें नाहीं ॥ ५ ॥ जर मी पुन्हा पाक करून जेवावें तर संध्याकाळचे पूजानियमाचा भंग होईल तो कसा करावा॥६॥पाक करून तत्काल भोजन करावें तर हरीला अर्पण केल्याशिवाय वैष्णवांनीं भोजन

करूं नये ॥ ७ ॥ आज सात दिवस मी उपोषण करून व्रतस्थ येथें राहिलों, आतां मात्र आज पाक करून त्याचें चांगलें रक्षण करितों ॥ ८ ॥ असें चिंतन करून त्यानें पाक केला व आपण दडून बसला; इतक्यांत एक चांडाल पाक चोरून नेण्यास टपून बसलेला पाहिला ॥ ९ ॥ तो अतिशय क्षुधेनें व्याकूळ, दीनवदन, हाडें व कातडें उरलें आहे इतका कृश असा पाहतांच त्या ब्राह्मणाला त्याची दया आली॥१०॥ तो अन्न घेऊन जाऊं लागला तेव्हां ब्राह्मण त्याला ह्मणाला-

उपोषितोहंसप्ताहंतिष्ठाम्यत्रव्रतस्थितः ॥ अद्यसंरक्षणंसम्यक्पाकस्यात्रकरोम्यहम् ॥८॥ इतिपाकंविधायासौतत्रैवालक्षितःस्थितः ॥ तावद्ददर्शचांडालं पाकान्नहरणेस्थितम् ॥ ९ ॥ क्षुत्क्षामंदीनवदनमस्थिचर्मावशेषितं ॥ तमालोक्यद्विजाग्र्योभूत्कृपयान्वितमानसः ॥ १० ॥ विलोक्यान्नहरंविप्रस्तिष्ठतिष्ठेत्यभाषत ॥ कथमश्नासितद्रूक्षंघृतमेतद्गृहाणभोः ॥ ११ ॥ इत्थंब्रुवंतंविप्राग्र्यमायांतंसविलोक्यच ॥ वेगादधावत्तद्भीत्यामूर्छितश्चपपातह ॥ १२ ॥ भीतंसंमूर्छितंदृष्ट्वाचांडालंस द्विजाग्रणीः ॥ वेगादभ्येत्यकृपयास्ववस्त्रांतैरवीजयत् ॥ १३ ॥

अरे! थांब उभा रहा; असें हे कोरडें रूक्ष अन्न कसें खाशील? हें तूप घे ॥ ११ ॥ याप्रमाणें भाषण करीत तो ब्राह्मण आपल्याजवळ आला असें पाहून तो चांडाळ भिऊन वेगानें पळत असतां पडला व मूर्छित झाला ॥ १२ ॥ तो चांडाळ भीतीनें मूर्छित पडला आहे असें पाहून तो ब्राह्मणश्रेष्ठ विष्णुदास त्वरेनें त्याजवळ जाऊन दयेनें त्यावर आपल्या धोत्राचे पदरानें

वारा घालूं लागला ॥ १३ ॥ नंतर तो उठल्यावर त्याकडे विष्णुदासानें पाहिलें, तों शंख चक्र गदा धारण करणारे साक्षात् नारायण त्याला दिसले ॥ १४ ॥ पीतांबरधारी, चतुर्भुज, श्रीवत्सांकित, किरीट, कुंडलें, कौस्तुभमणी धारण करणारे, जवसाचे फुलाप्रमाणें श्यामवर्ण, हृदयावर कौस्तुभ झळकत आहे असे प्रभु त्यानें पाहिले ॥ १५ ॥ विष्णुदर्शन झाल्याबरोबर अंगावर रोमांच, आनंदाश्रु इत्यादि सात्विक भावामुळें त्या ब्राह्मणाला स्तुति व नमस्कार करण्याचें

अथोत्थितंतमेवासौविष्णुदासोविलोकयत् ॥ साक्षान्नारायणंदेवंशंखचक्रगदाधरम् ॥ १४ ॥ पीताम्बरंचतुर्बाहुंश्रीवत्सांककिरीटिनम् ॥ अतसीपुष्पसंकाशंकौस्तुभोरःस्थलंविभुम् ॥ १५ ॥ तंदृष्ट्वासात्विकैर्भावैराहृतोद्विजसत्तमः ॥ स्तोतुंचैवनमस्कर्तुंतदानालंबभूवसः ॥ १६ ॥ अथशक्रादयोदेवास्तत्रैवाभ्याययुस्तदा ॥ गंधर्वाप्सरसश्चापिजगुश्चननृतुर्मुदा ॥ १७ ॥ विमानशतसंकीर्णंदेवर्षिशतसंकुलं ॥ गीतवादित्रनिर्घोषंतत्स्थानमभवत्तदा ॥ १८ ॥ ततोविष्णुस्समालिंग्यस्वभक्तंसात्विकव्रतं ॥ सारूप्यमात्मनोदत्त्वाऽनयद्वैकुंठमंदिरम् ॥ १९ ॥ विमानवरसंस्थंतंगच्छंतंविष्णुसन्निधिम् ॥ दीक्षितश्चोलनृपतिर्विष्णुदासंददर्शसः ॥ २० ॥

सुचेना ॥ १६ ॥ नंतर इंद्रादिक देव तेथें आले, गंधर्व अप्सरा नाचूं व गाऊं लागल्या ॥ १७ ॥ शेकडों विमानांनीं व देव, ऋषि यांच्या समुदायानीं व गीत, वाद्यें यांचा घोषानीं तें स्थान व्यापून गेलें ॥ १८ ॥ तेव्हां विष्णूंनीं आपल्या सात्विक व्रती भक्ताला आलिंगन देऊन आपलेप्रमाणें त्याला रूप दिलें व विमानांत बसवून वैकुंठाला नेलें ॥ १९ ॥ विष्णुदास विमानांत बसून विष्णुलोकास जाऊं लागला, तेव्हां दीक्षित चोलराजानें त्याला पाहिलें ॥ २० ॥ राजा वैकुंठास जाणाऱ्या विष्णुदासाला पाहून मुद्गलास मोठ्यानें हाक मारून ह्मणाला ॥ २१ ॥ चोल ह्मणालाः—ज्याच्याशीं स्पर्धा करून मी यज्ञ दानादिक केलें तो विष्णुदास, विष्णुरूप धारण करून वैकुंठास चालला ॥ २२ ॥ मी यज्ञकर्ता होऊन या विष्णुक्षेत्रांत तुजकडून अग्नींत हवन केलें व उत्तम दानें देऊन ब्राह्मण संतुष्ट केले ॥ २३ ॥ तथापि अजूनही मला हरि प्रसन्न होत नाहीं,

वैकुंठभवनंयांतंविष्णुदासंविलोक्यसः ॥ स्वगुरुंमुद्गलंवेगादाहूयेत्थंवचोब्रवीत् ॥ २१ ॥ चोल उवाच ॥ यत्स्पर्द्धयामयाचैवयज्ञदानादिकंकृतं ॥ सविष्णुरूपधृग्विप्रोयातिवैकुंठमंदिरम् ॥ २२ ॥ दीक्षितेनमयासम्यक्क्षेत्रेऽस्मिन्वैष्णवेत्वया ॥ हुतमग्नौकृताविप्रादानाद्यैःपूर्णमानसाः ॥ २३ ॥ नैवाद्यापिसमेदेवःप्रसन्नोजायतेध्रुवं ॥ विष्णुदासस्यभक्त्यैवसाक्षात्कारंददौहरिः ॥ २४ ॥ तस्माद्दानैर्नयज्ञैश्चनैवविष्णुःप्रसीदति ॥ भक्तिरेवपरंतस्यनिदानंदर्शनेविभोः ॥ २५ ॥ गणावूचतुः ॥ इत्युक्त्वाभागिनेयंस्वमभ्यषिंचन्नृपासने ॥ आबाल्याद्दीक्षितोयज्ञेह्यपुत्रत्वमगाद्यतः ॥ २६ ॥ तस्माद्द्यापितद्देशेसदाराज्यांशभागिनः ॥ स्वस्रेयाएवजायंतेतत्कृतावधिवर्तिनः ॥ २७ ॥

व विष्णुदासाच्या भक्तीला हरींनीं साक्षात्कार दिला ॥ २४ ॥ याकरितां, दानांनीं व यज्ञांनीं विष्णु प्रसन्न होत नाहीं तर त्याचें दर्शन होण्याला भक्ति हेंच मुख्य कारण आहे ॥ २५ ॥ गण ह्मणालेः—राजा याप्रमाणें बोलून, लहानपणापासून दीक्षित असल्यामुळें त्याला पुत्र झाला नाहीं, ह्मणून त्यानें बहिणीच्या मुलाला राज्यावर बसविलें ॥ २६ ॥ अद्यापि त्या

देशांत चोल राजानें नियम केल्याप्रमाणें तेव्हांपासून राजाच्या बहिणीच्या मुलालाच राज्य मिळतें ॥२७॥ नंतर राजा यज्ञमंडपांत येऊन यज्ञकुंडापुढें उभा राहिला व विष्णूला बोलावून तीन वेळ मोठ्यानें ह्मणाला कीं ॥ २८ ॥ हे विष्णो ! मला काया वाचा मनें करून तुझी स्थिर भक्ति दे· याप्रमाणें बोलून सर्व लोक पाहात असतां त्यांच्या समक्ष त्यानें अग्निकुंडांत उडी टाकिली ॥२९॥ तेव्हां मुद्गलाला राग आला व रागाचे भरांत त्यानें आपली शेंडी उपटली. ह्मणून अद्यापि

यज्ञवाटंततोभ्येत्ययज्ञकुंडाग्रतःस्थितः ॥ त्रिरुच्चैर्व्याजहाराशुविष्णुंसंबोधयंस्तदा ॥ २८ ॥
विष्णोभक्तिंस्थिरांदेहिमनोवाक्कायकर्मभिः ॥ इत्युक्त्वासोऽपतद्वन्हौसर्वेषामेवपश्यताम् ॥ २९ ॥
मुद्गलस्तुतदा क्रोधाच्छिखामुत्पाटयत्स्वकां ॥ ततस्त्वद्यापितद्गोत्रेमुद्गलाविशिखाबभुः ॥ ३० ॥
तावदाविरभूद्विष्णुःकुंडाग्नौभक्तवत्सलः ॥ तमालिंग्यविमानाग्र्यंसमारोहयदच्युतः ॥ ३१ ॥
तमालिंग्यात्मसारूप्यंदत्त्वावैकुंठमंदिरं ॥ तेनैवसहदेवेशोजगामत्रिदशैर्वृतः ॥ ३२ ॥ नारद उवाच ॥
योविष्णुदासस्सतुपुण्यशीलोयश्चोलभूपस्ससुशीलनामा ॥ एतावुभौतत्समरूपभाजौद्वाःस्थौकृतौ तेनरमाप्रियेण ॥ ३३ ॥

त्याचे गोत्रज मुंजींत शेंडी काढितात ॥ ३० ॥ चोल राजा कुंडांत उडी टाकीत आहे इतक्यांत विष्णु कुंडांत प्रगट झाले व त्यांनीं राजाला आलिंगन देऊन विमानांत बसविलें॥३१॥त्याला आलिंगन देऊन व सारूप्य देऊन व त्याला विमानांत घेऊन इंद्रादिकदेवांसह विष्णु वैकुंठास गेले ॥ ३२ ॥ नारद ह्मणालेः—जो विष्णुदास तो पुण्यशील नांवा-

चा व जो चोलराजा तो सुशील नांवाचा असे हे दोघे विष्णुसारखे रूप धारण करणारे असे झाले व त्यांना रमापति विष्णूंनीं आपले द्वारीं राहणारे द्वारपाळगण केलें ॥ इति श्रीकार्तिकमाहात्म्ये द्वाविंशोऽध्यायः ॥ २२ ॥ धर्मदत्त विचारतोः—जय आणि विजय या नांवाचे दोघे विष्णूचे द्वारपाळ आहेत असें मीं ऐकिलें तर त्यांना विष्णुसारूप्य मिळण्याला त्यांनीं कोणतें पुण्य केलें होतें ॥१॥ गण ह्मणतातः—तृणबिंदूची कन्या देवहूती तिला कर्दम ऋषीच्या

इतिश्रीपद्मपुराणे उ० कार्तिकमाहात्म्येश्रीकृष्णसत्यासंवादेद्वाविंशोध्यायः ॥ २२ ॥ धर्मदत्त उवाच ॥ जयश्चविजयश्चैवविष्णोर्द्वाःस्थौश्रुतौमया ॥ किंतुताभ्यांपुराचीर्णंतस्मात्तद्रूपधारिणौ ॥ ॥१॥ गणावूचतुः ॥ तृणबिंदोस्तुकन्यायांदेवहूत्यांपुराद्विज ॥ कर्दमस्यतुदृष्टयैवपुत्रौद्वौसंबभूवतुः ॥ २ ॥ ज्येष्ठोजयःकनिष्ठोभूद्विजयश्चैवनामतः ॥ तस्यामेवाभवत्पश्चात्कपिलोयोगधर्मवित् ॥ ॥ ३ ॥ जयश्चविजयश्चैवविष्णुभक्तिरतौसदा ॥ तौतन्निर्ष्ठेद्रियग्रामौधर्मशीलौबभूवतुः ॥ ४ ॥
नित्यमष्टाक्षरीजाप्यौविष्णुव्रतकरावुभौ ॥ साक्षात्कारंददौविष्णुस्तयोर्नित्यार्चनेसदा ॥ ५ ॥

कृपेनें जय थोरला व विजय धाकटा असे दोन मुलगे झाले॥२॥देवहूतीचे ठिकाणीं मागाहून योग व धर्म जाणणारा असा, कपिल झाला॥३॥जय व विजय विष्णुभक्तीमध्यें अगदीं निमग्न होते· ते इंद्रियांचीं कर्में भगवंताकडे लावून धर्मानें वागणारे असे होते ॥ ४ ॥ नित्य अष्टाक्षरी नारायण मंत्राचा जप करून विष्णूचीं व्रतें करीत होते, ह्मणून त्यांना विष्णु

पूजासमयीं साक्षात् दर्शन देत असत ॥ ५ ॥ ते यज्ञकर्मांत कुशल ह्मणून मरुतराजानें त्यांना यज्ञाकरितां बोलाविलें. देव ऋषिगणानीं पूजित असे ते जय विजय मरुताकडे गेले ॥ ६ ॥ तेथें जय ब्रह्मा झाला व विजय याजक झाला. नंतर त्यांनीं संपूर्ण यज्ञविधि परिपूर्ण केला ॥ ७ ॥ मरुत राजानें अवभृथस्नान करून त्यांना पुष्कळ द्रव्य दिलें, तें द्रव्य घेऊन ते आपल्या आश्रमाला आले ॥८॥ विष्णूची पूजा व यज्ञ वगैरे करण्याकरितां ते द्रव्याचा विभाग

मरुतेनकदाचित्तावाहूतौयज्ञकर्मणि ॥ जग्मतुर्यज्ञकुशलौदेवर्षिगणपूजितौ ॥ ६ ॥ जयस्तत्राभवद्ब्रह्मायाजकोविजयोऽभवत् ॥ ततोयज्ञविधिंकृत्स्नंपरिपूर्णंचचक्रतुः ॥ ७ ॥ मरुतोवभृथस्नातस्ताभ्यांवित्तंददौबहु ॥ तत्समादायतौवित्तंजग्मतुःस्वाश्रमंप्रति ॥ ८ ॥ यजनायपृथग्विष्णोस्तुष्ट्यर्थंतौततोमुनी ॥ तद्धनंविभजंतौतुपस्पर्द्धातेपरस्परम् ॥ ९ ॥ जयोऽब्रवीत्समोभागःक्रियतामितितत्रसः ॥ विजयश्चाब्रवीन्नैतद्यल्लब्धंयेनतस्यतत् ॥ १० ॥ ततोऽशपज्जयःक्रोधाद्विजयंलुब्धमानसम् ॥ गृहीत्वानददास्येतत्तस्माद्ग्राहोभवेतितम् ॥ ११ ॥ विजयस्तस्यतंशापंश्रुत्वासोप्यशपच्चतम् ॥ मदभ्रांतोऽशपस्त्वंमांतस्मान्मातंगतांव्रज ॥ १२ ॥

करूं लागले. विभाग करितांना दोघांत स्पर्धा उत्पन्न झाली ॥ ९ ॥ जय ह्मणाला—दोन भाग बरोबर करावे. विजय ह्मणाला—तसें नाहीं. ज्याला जेवढें मिळालें, तेवढें त्यानें घ्यावे ॥१०॥ तेव्हां जयानें संतापून लोभी विजयाला शाप दिला कीं, तूं घेऊन देत नाहींस ह्मणून ग्राह ह्मणजे नक्र हो ॥ ११ ॥ विजयानें त्याचा तो शाप ऐकून जयाला शाप दिला कीं, मदानें भ्रांत होऊन मला शाप दिलास, तर तूं मातंग ह्मणजे हत्ती हो ॥ १२ ॥ नंतर रोजच्याप्रमाणें ते विष्णूची पूजा करीत असतां त्यानीं ती शापाची हकीकत प्रकट झालेल्या देवाला सांगितली व शापापासून मुक्तता व्हावी ह्मणून रमापति भगवंताची प्रार्थना करूं लागले ॥ १३ ॥ जय विजय ह्मणतातः—देवा! आह्मी तुझ्या भक्तांनीं नक्र व हत्ती यांच्या जन्माला कसें जावें ? याकरितां दयासागरा, देवा ! आमचा शाप नाहींसा करा ॥ १४ ॥

तत्तदाचख्यतुर्विष्णुंदृष्ट्वानित्यार्चनेविभुं ॥ शापयोश्चनिवृत्तिंतौययाचातेरमापतिम् ॥ १३ ॥ जयविजयावूचतुः ॥ भक्तावावांकथंदेवग्राहमातंगयोनिगौ ॥ भविष्यावः कृपासिंधोतच्छापोविनिवर्त्यताम् ॥ १४ ॥ श्रीभगवानुवाच ॥ मद्भक्तयोर्वचोऽसत्यंनकदाचिद्भविष्यति ॥ मयापिनान्यथाकर्तुंशक्यतेतत्कदाचन ॥ १५ ॥ प्रल्हादवचसास्तंभेप्याविर्भूतोह्यहंपुरा ॥ तथांबरीषवाक्येनजातोगर्भेस्वयंकिल ॥ १६ ॥ तस्माद्युवामिमौशापावनुभूयस्वयंकृतौ ॥ लभतांमत्पदंनित्यमित्युक्त्वांतर्दधेहरिः ॥ १७ ॥

भगवान् ह्मणालेः—माझ्या भक्तांचें वचन कधींही खोटें होणार नाहीं व तें भक्तवचन मला कधीं विरुद्ध करितां येत नाहीं. ॥ १५ ॥ मागें मी प्रल्हादाच्या वचनाकरितां खांबांत प्रगट झालों व अंबरीषाच्या वचनाकरितां गर्भवास सोसले. ॥ १६ ॥ ह्मणून तुह्मींच परस्पर दिलेले शाप भोगून नंतर माझे अक्षयस्थानाला प्राप्त व्हा, असें ह्मणून हरि अंतर्धान पावले

॥ १७ ॥ गण ह्मणतातः–नंतर ते गंडकीनदीच्या तीरीं नक्र व हत्ती झाले. पूर्वपुण्यानें त्यांना पूर्वींच्या जन्माचें स्मरण राहून ते विष्णूचीं व्रतें व भक्ति करीत होते ॥१८॥ एकदां तो हत्ती कार्तिकमासीं गंडकींत स्नानाला गेला असतां, नक्राला शापाची आठवण होऊन त्यानें त्या हत्तीला धरिलें ॥ १९ ॥ नक्रानें धरिलें तेव्हां त्या हत्तीनें विष्णूचें स्मरण केलें;

गणावूचतुः ॥ ततस्तौग्राहमातंगावभूतांगंडकीतटे ॥ जातिस्मरौतुतद्योन्यामपिविष्णुव्रते स्थितौ ॥ १८ ॥ कदाचित्सगजःस्नातुंकार्तिकेगंडकींगतः ॥ तावज्जग्राहतंग्राहःसंस्मरन्शाप कारणम् ॥१९॥ ग्राहग्रस्तोह्यसौनागःसस्मारश्रीपतिंतदा ॥ तावदाविर्भवद्विष्णुश्चक्रशंखगदा धरः ॥ २० ॥ ततस्तौग्राहमातंगौचक्रंक्षिप्त्वासमुद्धृतौ ॥ दत्त्वैवनिजसारूप्यंवैकुंठमनय द्विभुः ॥ २१ ॥ ततःप्रभृतितत्स्थानंहरिक्षेत्रमितिस्मृतं ॥ चक्रसंघर्षणाद्यस्मिन्ग्रावाणोपि हिलांछिताः ॥२२॥ ताविमौविश्रुतौलोकेजयश्चविजयस्तथा ॥ नित्यंविष्णुप्रियौद्वाःस्थौपृष्टौ यौहित्वयाद्विज ॥ २३ ॥

तेव्हां शंख, चक्र गदा धारण केलेले असे विष्णु तेथें प्रगट झाले ॥ २० ॥ त्यांनीं चक्र मारून नक्र व हत्ती यांना बाहेर काढिलें. व त्यांना भगवंतानीं आपलें रूप देऊन वैकुंठास नेलें ॥ २१ ॥ तेव्हांपासून तें स्थान हरिक्षेत्र या नां- वानें प्रसिद्ध झालें व चक्राच्या आघातामुळें तेथील धोंडे देखील चक्रचिन्हांकित झाले आहते ॥ २२ ॥ ते हे तूं वि-

चारलेले प्रसिद्ध जय विजय नेहमीं विष्णूला प्रिय असणारे, देवाच्या द्वारांत आहेत ॥ २३ ॥ याकरितां तूं ही धर्म जाणून निरंतर विष्णुव्रत करून मत्सर व गर्व सोडून सर्वांवर समदृष्टि ठेवणारा असा हो ॥२४॥ व तूळ, मकर, मेष या संक्रांतीचे कार्तिक, माघ व वैशाख या महिन्यांत नेहमीं प्रातःस्नान कर. एकादशीव्रत करून तुळसीचें रक्षण कर ॥२५॥ ब्राह्मण, गाई व वैष्णव यांची सेवा कर. मसुरा, कांजी व वांगीं खाऊं नको ॥ २६ ॥ ह्मणजे आमच्याप्रमाणेंच धर्मदत्ता !

अतस्त्वमपिधर्मज्ञनित्यंविष्णुव्रतेस्थितः ॥ त्यक्तमात्सर्यदंभोहिभवस्वसमदर्शनः ॥ २४ ॥ तुला मकरमेषेषुप्रातःस्नायीसदाभव ॥ एकादशीव्रतेतिष्ठतुलसीवनपालकः ॥ २५ ॥ ब्राह्मणानथगा श्चापिवैष्णवांश्चसदाभज ॥ मसूरिकामारनालंवृंताकान्यपिखादमा ॥ २६ ॥ एवंत्वमपिदेहांतेत द्विष्णोःपरमंपदम् ॥ प्राप्नोषिधर्मदत्तत्वंतद्भक्त्यैवयथावयम् ॥ २७ ॥ तवाजन्मव्रतादस्माद्विष्णु संतुष्टिकारकात् ॥ नयज्ञानचदानानिनतीर्थान्यधिकानिवै ॥ २८ ॥ धन्योसिविप्राग्र्ययतस्त्वयैत द्व्रतंकृतंतुष्टिकरंजगद्गुरोः ॥ यदर्द्धभागात्तफलासुरारेःप्रणीयतेऽस्माभिरियंसलोकताम् ॥ २९ ॥

तूं त्या विष्णूच्या भक्तीनें देह सोडल्यावर उत्तम जें विष्णूचें स्थान वैकुंठ, तें पावशील ॥ २७ ॥ विष्णूला संतुष्ट करणारें हें व्रत, तूं जन्मापासून केलेंस त्यापेक्षां यज्ञ, दान, तप, तीर्थें हीं अधिक नाहींत ॥ २८ ॥ हे ब्राह्मणश्रेष्ठा! तूं धन्य आहेस; कारण तूं विष्णूला प्रिय असें कार्तिकव्रत केलेंस व त्याचें अर्धें पुण्य कलहेला मिळाल्यामुळें आह्मी

विष्णूच्या वैकुंठलोकीं इला नेतों ॥ २९ ॥ नारद ह्मणतातः–राजा! याप्रमाणें धर्मदत्ताला उपदेश करून, ते गण त्या कलहेसह विमानांत बसून, वैकुंठास निघून गेले ॥३०॥ प्रत्यक्ष अनुभव आलेला असा धर्मदत्त नित्य कार्तिकादिव्रत करीत असतां, देह सोडल्यावर तो दोन्ही स्त्रियांसहवर्तमान वैकुंठास गेला ॥ ३१ ॥ ही पूर्वीं घडलेली कथा जो कोणी ऐकेल व दुसऱ्याला श्रवण करवील, त्याला विष्णूच्या कृपेनें हरीची प्राप्ति करून देणारी बुद्धि उत्पन्न

॥ नारदउवाच ॥ इत्थंतौधर्मदत्तंतमुपदिश्यविमानगौ ॥ तयाकलहयासार्धंवैकुंठभवनंगतौ ॥३०॥ धर्मदत्तोह्यसौजातप्रत्ययस्तद्व्रतेस्थितः ॥ देहांतेतद्विभोःस्थानंभार्याभ्यांसंयुतोऽभ्ययात् ॥ ३१ ॥ इतिहासमिमंश्रृणुतेश्रावयतेचयःपुमान्॥हरिसन्निधिकारिणींमतिंलभतेऽसौकृपयाजगद्गुरोः ॥३२॥ इति श्रीपद्मपुराणेकार्तिकमाहात्म्येश्रीकृष्णसत्यासंवादेकलहायावैकुंठप्राप्तिर्नामत्रयोविंशोऽध्यायः ॥ २३ ॥ पृथुरुवाच ॥ कृष्णावेण्योस्तटाद्यस्माच्छिवविष्णुगणैःपुरा ॥ वणिक्छरीरात्कलहानिरस्ताकथितात्वया ॥ १ ॥ प्रभावोयंतयोर्नद्योः किंवाक्षेत्रस्यतस्यवा ॥ तन्मेकथयधर्मज्ञविस्मयोऽत्रमहान्मम ॥ २ ॥

होईल ॥ ३२ ॥ इति श्रीकार्तिकमा० त्रयोविंशोऽध्यायः ॥ २३ ॥ पृथु ह्मणतातः–नारदा! कृष्णा व वेण्या यांच्या तीरीं, शिव व विष्णु यांच्या गणांनीं वाण्याच्या देहांतून पिशाचीण कलहेला काढून टाकिली असें आपण पूर्वीं सांगितलें ॥ १ ॥ तर हे धर्मज्ञा! हा प्रभाव त्या नद्यांचा कीं त्या क्षेत्राचें सामर्थ्य हें आपण मला सांगा. कारण मला त्या

सामर्थ्याचा मोठा चमत्कार वाटला ॥ २ ॥ नारद ह्मणतातः–ही कृष्णानदी प्रत्यक्ष विष्णूचें स्वरूप व वेण्या शिवस्वरूप अशा आहेत, त्या कृष्णावेणीच्या संगमाचा महिमा वर्णन करण्यास चतुर्मुख ब्रह्मदेवही समर्थ नाहीं ॥ ३ ॥ तथापि कृष्ण वेणींची उत्पत्ति तुला सांगतों ऐक. पूर्वीं चाक्षुष मनूच्या मन्वंतरामध्यें, रम्य अशा सह्याद्रि पर्वताच्या शिखरावर यज्ञ करावा असा विचार करून ब्रह्मदेवानें त्या यज्ञाकरितां सर्व देवांस बोलाविलें त्यांच्यासह त्यानें यज्ञाची तयारी केली॥४

॥ नारदउवाच ॥ कृष्णाकृष्णतनुःसाक्षाद्वेण्यादेवोमहेश्वरः ॥ तत्संगमप्रभावन्तुनालंवक्तुंचतुर्मुखः ॥ ३ ॥ तथापितत्समुत्पत्तिंकीर्तयिष्यामितांश्रृणु ॥ चाक्षुषेप्यंतरेपूर्वंमनोर्देवःपितामहः ॥४॥ सह्याद्रिशिखरेरम्येयजनायोद्यतोभवत् ॥ सकृत्वायज्ञसंभारान्सर्वदेवगणैःसह ॥ ५ ॥ युक्तोहरिहराभ्यांचतद्गिरेःशिखरंययौ ॥ भृग्वादयोमुनिगणामुहूर्तेब्रह्मदैवते ॥ ६ ॥ तस्यदीक्षाविधानायसमाजंचक्रुरादृताः ॥ अथज्येष्ठांस्वरांपत्नीमाह्वयांचक्रुरंजसा ॥ ७ ॥ साशनैरायर्यौतावद्भृगुर्विष्णुमुवाचह ॥ भृगुरुवाच ॥ विष्णोस्वरात्वयाहूताप्यायातानकथंजवात् ॥ ८ ॥

॥५॥ विष्णु व शंकर यांसह आपण त्या पर्वताच्या शिखरावर आला तेथें भृगु आदिकरून सर्व ऋषींनीं उत्तम, ब्राह्म मुहूर्तावर ब्रह्मदेवाला यज्ञदीक्षा देण्याकरितां तेथें आदरानें सभा भरविली; तेव्हां ऋषि ब्रह्मदेवाची थोरली स्त्री सावित्री हिला बोलाविते झाले ॥६॥७॥ तिला येण्यास उशीर लागला, तेव्हां भृगु विष्णूला विचारते झाले–भृगु ह्मण-

तातः—हे विष्णो ! सावित्रीला आपण बोलाविलें तरी ती लौकर कां येत नाहीं ॥८॥ मुहूर्त संपण्याची वेळ आली; दीक्षा-
विधि कसा संपूर्ण होणार ? विष्णु ह्मणालेः—सावित्री लौकर येत नाहीं, तर गायात्री येथें आहे; तिजकडून कार्य पूर्ण
करावें. पुण्यकार्यांत ब्रह्मदेवाची ही पत्नी नाहीं काय ॥ ९ ॥ नारद ह्मणतातः—या विष्णूच्या ह्मणण्याला शंकरांनींही
अनुमोदन दिलें॥ १० ॥ हें भाषण ऐकून, भृगूनें ब्रह्मदेवाच्या उजव्या बाजूला गायत्रीला बसवून पुण्याहवाचनादि यज्ञाचा

मुहूर्तातिक्रमश्चैवकार्योदीक्षाविधिःकथम् ॥ विष्णुरुवाच ॥ नायातिचेत्स्वराशीघ्रंगायत्र्यत्रविधी
यताम् ॥ एषापिनभवेत्तस्यभार्याकिंपुण्यकर्मणि॥ ९ ॥ ॥ नारदउवाच ॥ एवमेवहिरुद्रोपिवि
ष्णोर्वाक्यममन्यत ॥ १० ॥ तच्छ्रुत्वाचभृगुर्वाक्यंगायत्रींब्रह्मणस्तदा ॥ निवेश्यदक्षिणेभागेदीक्षा
विधिमथाकरोत् ॥ ११ ॥ यावद्दीक्षाविधिंतस्यविधेश्चक्रुर्मुनीश्वराः ॥ तावदभ्याययौतत्रस्वराय
ज्ञस्थलंनृप ॥१२॥ ततःसादीक्षितांदृष्ट्वागायत्रीं ब्रह्मणासह ॥ सापत्न्येर्ष्यापराक्रोधात्स्वरावचनम
ब्रवीत् ॥ १३ ॥ स्वरोवाच ॥ अपूज्यायत्रपूज्यन्तेपूज्यानांचव्यतिक्रमः ॥ त्रीणितत्रभविष्यंतिदु
र्भिक्षंमरणंभयम् ॥ १४ ॥

दीक्षाविधि केला ॥ ११ ॥ हे राजा ! तें ब्रह्मदेवाचें दीक्षाविधीचें काम ऋषि चालवीत आहेत इतक्यांत त्या यज्ञस्थळाला
सावित्री आली ॥ १२ ॥ हे राजा ! तेव्हां ब्रह्मदेवासह गायत्रीला दीक्षाविधि झाला असें पाहून, सवतीमत्सर मनांत
येऊन रागानें सावित्री बोलती झाली ॥ १३ ॥ सावित्री ह्मणत्येः—जेथें पूजेला योग्य नाहींत त्यांची पूजा होते व पूज्-

आहेत त्यांचा अपमान होतो तेथें दुष्काळ, मरण व भय हीं तीन उत्पन्न होतात ॥ १४ ॥ माझ्या स्थानावर
या माझ्याहून धाकटीला तुह्मी बसविलें, ह्मणून तुह्मी जड देहाचे असे नदीरूप व्हाल ॥ १५ ॥ ही गायत्री
ब्रह्मदेवाचा उजव्या बाजूला माझ्या आसनावर बसली, ह्मणून लोकांना न दिसणारी अशी गुप्तरूपी नदी होऊन रा-
हील ॥ १६ ॥ नारद ह्मणतातः—याप्रमाणें स्वरेचा शाप ऐकून, संतापानेंच जिचे ओंठ थरथर कांपताहेत अशी

मदासनेकनिष्ठेयंभवद्भिःसन्निवेशिता ॥ तस्मात्सर्वेजडीभूतानदीरूपाभविष्यथ ॥ १५ ॥ इयंचद
क्षिणेभागेउपविष्टामदासने ॥ तस्माल्लोकैस्सदाऽदृश्यागुप्तरूपातुनिम्नगा ॥१६॥ नारदउवाच ॥
ततस्तच्छापमाकर्ण्यगायत्रीकंपिताधरा ॥ समुत्थायाशपद्देवैर्वार्यमाणापितांस्वराम् ॥ १७ ॥
॥ गायत्र्युवाच ॥ तवभर्त्तायथाब्रह्मामममाप्येषतथाखलु ॥ वृथाशापस्त्वयादत्तोभवत्वमपिनि
म्नगा ॥१८॥ ॥ नारदउवाच ॥ ततोहाहाकृताःसर्वेशिवविष्णुमुखाःसुराः ॥ प्रणम्यदंडवद्भूमौ
स्वरांतत्रविजिज्ञपुः ॥ १९ ॥

गायत्री उठली व देवांनीं निवारण केलें असतांही तिनें सावित्रीला शाप दिला॥१७॥गायत्री ह्मणतेः—ब्रह्मदेव जसा तुझा
पति तसा माझाही पति आहे. असें असतां तूं मला व्यर्थ शाप दिलास, तर मजप्रमाणें तूंही नदी हो॥१८॥ नारद ह्मणालेः-राजा !
तेव्हां मोठा हाहाकार झाला. शंकर विष्णु आदि करून सर्व देव सावित्रीला नमस्कार करून तिची विनंति करूं ला-

गले ॥१९॥ देव ह्मणालेः–हे देवी ! ब्रह्मादिक सव देवानां तूं शाप दिलास कीं, आह्मी आतां सर्व जड अशा नंद्या होऊं ॥२०॥परंतु आह्मी जड नद्या झालों तर त्या योगानें आमचे व्यवहार बंद राहून हें त्रैलोक्य खरोखर नाश पावेल. तूं फार अविचारानें दिलेल्या या शापाचें निवारण कर ॥२१॥ सावित्री ह्मणालीः–हे देवहो ! तुह्मी यज्ञाचे आरंभीं गण-

॥ देवाऊचुः ॥ देविसर्वैर्वयंशप्ताब्रह्माद्यायत्त्वयाधुना ॥ यदिसर्वेजडीभूताभविष्यामोत्रनिम्नगाः ॥२०॥ तदालोकत्रयंह्येतद्विनश्यतिहिनिश्चितम् ॥ अविवेकःकृतस्तस्माच्छापोयंविनिवर्त्यताम् ॥ २१ ॥ स्वरोवाच ॥ नार्चितोहिगणाध्यक्षोयज्ञादौयत्सुरोत्तमाः ॥ तस्माद्विघ्नंसमुत्पन्नं मत्क्रोधजमिदंखलु ॥ २२ ॥ नापिमद्वचनंह्येतदसत्यंखलुजायते ॥ तस्मात्स्वांशैर्जडीभूतायूयं भवतनिम्नगाः ॥ २३ ॥ आवामपिसपत्न्यौचस्वांशाभ्यामपिनिम्नगे ॥ भविष्यावोत्रभोदेवाः पश्चिमाभिमुखावहे ॥ २४ ॥ ॥ नारदउवाच ॥ इतितद्वचनंश्रुत्वाब्रह्मविष्णुमहेश्वराः ॥ जडीभूताऽभवन्नद्यःस्वांशैर्वैततदान्नृप ॥ २५ ॥

पतिपूजन केलें नाहीं, ह्मणून हें माझ्या क्रोधापासून विघ्न उत्पन्न झालें असें वाटतें ॥२२॥ आतां माझें भाषण कधींही खोटें होऊं शकणार नाहीं, ह्मणून हे देवहो ! तुह्मी आतां अंशरूपानें नद्या व्हा ॥२३॥ व आह्मी दोघी सवती पश्चिमेकडे वाहाणाऱ्या अशा अंशरूपानेंच नद्या होऊं॥२४॥नारद ह्मणालेः–हे राजा ! असें तिचें भाषण ऐकून त्या कालीं ब्रह्मा विष्णु

व शंकर हे आपआपल्या अंशानें नद्या झाले ॥ २५ ॥ त्या नद्यांत विष्णु कृष्णा नदी, शंकर वेण्या नदी व ब्रह्मदेव ककुद्मती ‘ कोयना ’ नदी, याप्रमाणें पृथक् पृथक् अंशानें नदीरूप झाले ॥२६॥सर्व देवही आपआपल्या अंशानें सह्याद्रिशिखरापासून निरनिराळ्या लहान लहान नद्या झाले ॥ २७ ॥ देवांचे अंश ते पूर्वेकडे वाहणाऱ्या नद्या व त्यांच्या स्त्रियांचे अंश त्या पश्चिमेकडे वाहणाऱ्या नद्या असे शेंकडों उदकप्रवाह झाले ॥२८॥ गायत्री व सावित्री या जोडीनें

तत्रविष्णुरभूत्कृष्णावेण्यादेवोमहेश्वरः ॥ ब्रह्माककुद्मतीचापिपृथगेवाभवन्नृप ॥ २६ ॥ देवाःस्वानपितानंशाञ्जडीकृत्वाविचिक्षिपुः ॥ सह्याद्रिशिखरेभ्यस्तेपृथगासंस्तुनिम्नगाः ॥ २७ ॥ देवांशैः पूर्ववाहिन्योबभूवुःपश्चिमावहाः ॥ तत्पत्न्यंशैःपृथक्तत्रशतशोथसहस्रशः ॥ २८ ॥ गायत्रीच स्वराचैवपश्चिमाभिमुखेतदा ॥ योगेनाभवतान्नद्यौसावित्रीतिप्रथांगते ॥ २९ ॥ ब्रह्मणास्थापितौतत्रयज्ञेहरिहरावुभौ ॥ महाबलातिबलिनौनाम्नादेवौबभूवतुः ॥ ३० ॥ तयोर्नद्योस्तुमाहात्म्यं नाहंवक्तुंक्षमोनृप ॥ यत्रब्रह्मादयोदेवाःस्वांशैस्तिष्ठन्तिचापरे ॥ ३१ ॥

पश्चिमेकडे एकप्रवाहनें वाहणाऱ्या नद्या झाल्या व त्या एकत्र असल्यामुळें सावित्री हें एकच नांव पावल्या ॥ २९ ॥ ब्रम्हदेवानें यज्ञाचे वेळीं तेथें विष्णु व शंकर यांची स्थापना केली; ते तेथें महाबळेश्वर व अतिबळेश्वर या नावांनें प्रसिद्ध झाले॥३०॥ज्यामध्यें सर्व ब्रम्हादिदेव आपापल्या अंशांनीं राहतात त्यांतील कृष्णा व वेण्या या दोन नद्यांचें माहात्म्य,

वर्णन करण्यास मी समर्थ नाहीं ॥ ३१ ॥ हें पाप हरण करणारें कृष्णावेणीचें माहात्म्य, जो भक्तीनें श्रवण करील. किंवा दुसऱ्याला श्रवण करवील त्या मनुष्याला त्यांचें दर्शन स्नान व यात्रा केल्याचें संपूर्ण पुण्यफळ प्राप्त होईल ॥ ३२ ॥ इति श्रीपद्मपु० कार्तिकमाहात्म्ये चतुर्विंशोध्यायः ॥ २४ ॥ श्रीकृष्ण म्हणालेः—हे प्रिये सत्यभामे, याप्रमाणें नारदाचें भाषण ऐकून पृथुराजाच्या मनाला अद्भुत कथेबद्दल विस्मय व आनंद झाला; नंतर नारदाची उत्तम प्रकारें

कृष्णोद्भवंपापहरंपुमान्यःश्रृणोतियःश्रावयतेचभक्त्या ॥ स्यात्तस्यपुंसःसकलंफलंयत्तद्दर्शन स्नानगमोद्भवंस्मृतम् ॥ ३२॥ इतिश्रीपद्मपुराणेकार्तिकमाहात्म्येश्रीकृष्णसत्यासंवादेकृष्णोत्प त्तिर्नामचतुर्विंशोऽध्यायः ॥२४॥ श्रीकृष्णउवाच ॥ इतितद्वचनंश्रुत्वापृथुर्विस्मितमानसः ॥ संपूज्यनारदंसम्यग्विससर्जतदाप्रिये ॥ १ ॥ तस्माद्व्रतत्रयंह्येतन्ममातीवप्रियंकरम् ॥ माघकार्ति कयोस्तद्वत्तथैवैकादशीव्रतम् ॥२॥वनस्पतीनांतुलसीमासानांकार्तिकःप्रियः ॥ एकादशीतिथी नांचक्षेत्राणांद्वारकामम ॥ ३ ॥ एतेषांसेवनंयस्तुकरोतिनियतेंद्रियः ॥ समेवल्लभतांयातिनत थायजनादिभिः ॥ ४ ॥

पूजा करून त्यांना निरोप दिला ॥ १ ॥ याकारणाकरितां माघमास, कार्तिकमास व एकादशीव्रत हीं तीन व्रतें मला फार प्रिय आहेत ॥ २ ॥ वनस्पतींत तुळसी, महिन्यांत कार्तिकमास, तिथींत एकादशी तिथि व क्षेत्रांत द्वारका हीं मला फार प्रिय आहेत ॥३॥ इंद्रियनिग्रह करून या तिहींचें जो सेवन करील तो मला जसा फार प्रिय होतो, तसा

यज्ञादिकांनीं प्रिय होणार नाहीं॥४॥या व्रतत्रयाचें सेवन करणाराला माझे कृपेनें पातकांसंबंधीं भय करण्याचें मुळींच कारण नाहीं ॥ ५ ॥ सत्यभामा ह्मणत्येः—हे नाथ! तुह्मी जें दुसऱ्यानें दिलेल्या पुण्यानें कलहा मुक्तीला गेली असें सांगितलें, हें मोठें आश्चर्यकारक आहे ॥ ६ ॥ असें सामर्थ्य ह्या कार्तिकमासाचें आहे ह्मणून तुह्मांला तो प्रिय आहे कीं त्यांतील केवळ स्नानाच्या पुण्यानें पतिद्रोहादि पातकें गेलीं ॥ ७ ॥ दुसऱ्याना केलेस पुण्य दिलें तर मिळतें; नदिलेलें पुण्य मिळ-

पापेभ्योनभयंतेनकर्त्तव्यंनियमादपि ॥ एतेषांसेवनंकान्तेकुर्वतांमत्प्रसादतः ॥ ५ ॥ सत्यभामो वाच ॥ विस्मापनीयंतन्नाथयत्त्वयाकथितंमम ॥ परदत्तेनपुण्येनकलहामुक्तिमागता ॥ ६ ॥ इत्थं प्रभावोयंमासःकार्तिकस्तेप्रियंकरः ॥ स्वामिद्रोहादिपापानिस्नानपुण्येर्गतानियत् ॥ ७ ॥ दत्तंचे ल्लभ्यतेपुण्यंतत्परेणकृतंविभो ॥ अदत्तंकेनमार्गेणलभ्यतेवानवेतिच ॥ ८ ॥ ॥ श्रीकृष्णउवाच ॥ अदत्तान्यपिपुण्यानिपापान्यपियथानरैः ॥ प्राप्यंतेकर्मणायेनतद्यथावन्निशामय ॥ ९ ॥ देशग्रा मकुलानिस्युर्भागभाञ्जिकृतादिषु ॥ कलौतुकेवलंकर्त्ताफलभुक्पुण्यपापयोः ॥ १० ॥ अकृतेपि हिसंसर्गेव्यवस्थेयमुदाहृता ॥ संसर्गात्पुण्यपापानियथायांतितिनिबोधितत् ॥ ११ ॥

ण्याचा कांहीं मार्ग आहे कीं नाहीं तें सांगा ॥ ८ ॥ श्रीकृष्ण ह्मणालेः—दुसऱ्यांनीं न दिलेलीं पुण्य पातकें जशीं ज्या कर्मांनीं प्राप्त होतात तें तुला विस्तारानें सांगतों; श्रवण कर ॥ ९ ॥ कृतादि तीन युगामध्यें कर्म करणाराचे फलभागी क्रमानें देश, गांव व कुल हीं होतात; कलींत मात्र पाप पुण्य करणारासच सुख दुःख फल भोगावें लागतें ॥ १० ॥ संसर्ग न करितां

फल कसें प्राप्त होतें त्याची व्यवस्था सांगितली; आता संसर्गापासून पाप पुण्य दुसऱ्यास कसें प्राप्त होतें तें ऐक ॥ ११ ॥ एकत्र मैथुनानें, विवाहादि शरीरसंबंध केल्यानें, एका पात्रांत भोज केल्यानें, पुण्य पाप जें असेल त्याचें अर्ध फल प्राप्त होतें. ॥१२ ॥ अध्ययन शिकविल्यानें, दुसऱ्याचें याज्ञिक केल्यानें व एका पंक्तीला जेवल्यानेंही, पापपुण्याचा चवथा भाग अप्रत्यक्ष पर्यायानें प्राप्त होतो ॥ १३ ॥ एक आसनावर बसल्यानें, एका यानांत बसल्यानें, अंगाला अंग लागल्यामुळें,

एकत्रमैथुनाद्यौनादेकपात्रस्थभोजनात् ॥ फलार्धंप्राप्नुयान्मर्त्योयथावत्पुण्यपापयोः ॥१२॥
अध्यापनाद्याजनाद्वाप्येकपंक्त्यशनादपि ॥ तुर्य्यांशंपुण्यपापानांपरोक्षंलभतेनरः ॥ १३ ॥
एकासनादेकयानान्निःश्वासस्यांगसंगतः ॥ षडंशंफलभागीस्यान्नियतंपुण्यपापयोः ॥ १४ ॥
स्पर्शनाद्भाषणाद्वापिपरस्यस्तवनादपि ॥ दशांशंपुण्यपापानांनित्यंप्राप्नोतिमानवः ॥१५ ॥
दर्शनश्रवणाभ्यांचमनोध्यानात्तथैवच ॥ परस्यपुण्यपापानांशतांशंप्राप्नुयान्नरः ॥ १६ ॥ पर
स्यनिंदांपैशुन्यंधिक्कारंचकरोतियः ॥ तत्कृतंपातकंप्राप्यस्वपुण्यंप्रददातिसः ॥ १७ ॥

व दुसऱ्याचा उच्छ्वास लागल्यानें त्याच्या पापपुण्याचा सहावा भाग प्राप्त होतो॥१४॥स्पर्शास्पर्श केल्यानें, भाषण केल्यानें व दुसऱ्याची स्तुति केल्यानें, त्याच्या पापपुण्याचा दहावा भाग प्राप्त होतो॥१५॥एखाद्याची भेट घेणें अथवा त्याच गोष्टी ऐकणें व त्याचें स्वरूप मनांत आणणें यापासून त्याचे पापपुण्याचा शंभरावा हिस्सा प्राप्त होतो ॥ १६ ॥ जो दुसऱ्याची निंदा, कपट

व धिक्कार करितो, तो आपलें पुण्य त्याला देतो व त्याचें पातक आपण घेतो॥१७॥जो मनुष्य पुण्य करणाराची सेवा करितो तो त्याची स्त्री, चाकर किंवा शिष्य नसेल व सेवेप्रमाणें त्याला द्रव्य दिलें नसेल तर तोही सेवेच्या योग्यतेप्रमाणें पुण्य करणाराचे पुण्यांशाचा भागी होतो ॥१८॥१९॥ एकापंक्तीला जेवणारांकरितां वाढलेल्या पात्रांचें जो उल्लंघन करील तो त्याला स्वपुण्याचा सहावा हिसा देईल ॥ २० ॥ स्नानसंध्यादिक करीत असतां जो दुसऱ्याला स्पर्श करील किंवा

कुर्वतःपुण्यकर्माणिसेवांयःकुरुतेनरः ॥ पत्नीभृतकशिष्येभ्योयदन्यःकोपिमानवः ॥ १८ ॥
तस्यसेवानुरूपंचद्रव्यंकिंचिन्नदीयते ॥ सोपिसेवानुरूपेणतत्पुण्यफलभाग्भवेत् ॥ १९ ॥ एकपं
क्त्यश्नतांयस्तुलंघयेत्परिवेषणम् ॥ तत्पुण्यस्यषडंशंचलभेद्यस्तुविलंघितः ॥ २० ॥ स्नानसंध्या
दिकंकुर्वन्यःस्पृष्टोद्वाथभाषते ॥ सत्कर्मपुण्यषष्ठांशंदद्यात्तस्मैविनिश्चितम् ॥ २१ ॥ धर्मोद्देशेनयो ॥
द्रव्यमपरंयाचतेनरः ॥ तत्पुण्यंकर्मजंयस्यधनंसप्राप्नुयात्फलम् ॥ २२ ॥ अपहृत्यपरद्रव्यंपुण्यंक
र्मकरोतियः ॥ कर्मकृत्पापभाक्तत्रधनिनंस्तद्भवंफलम् ॥ २३ ॥ नापकृत्यऋणंयस्तुपरस्यम्रियते
नरः ॥ धनीतत्पुण्यमादत्तेतद्धनस्यानुरूपतः ॥ २४ ॥

त्याशीं भाषण करील, त्याला आपले कर्मांचे पुण्याचा सहावा हिस्सा देईल ॥ २१ ॥ धर्मकृत्याकरितां जो दुसऱ्याजवळ द्रव्य मागतो व त्या द्रव्यानें जें धर्मकृत्य करितो त्या धर्मकृत्याचें सर्व पुण्य द्रव्य देणाराला मिळतें ॥२२॥दुसऱ्याचे द्रव्याचें हरण करून जो पुण्यकर्म करितो त्याला द्रव्य चोरल्याचें पाप लागतें व पुण्यकर्मांचें फल द्रव्याचे मालकाला मिळतें॥२३॥दुसऱ्याचें ऋण परत न देतां जो मरतो, त्याचें पुण्य द्रव्याचे मानाप्रमाणें त्या सावकाराला मिळतें ॥२४ ॥

बुद्धि सांगणारा, अनुमोदन देणारा, साहित्य देणारा, बळ उत्पन्न करणारा हे पापपुण्याचा सहावा हिस्सा घेणारे आहेत२५ राजा आपल्या प्रजेच्या पापपुण्याचा सहावा हिस्सा घेतो॥२६॥ शिष्यापासून गुरु, स्त्रीपासून पति,पुत्रापासून बाप;तसें पतीपासून स्त्री हीं पुण्याचा अर्धा भाग घेतात॥मात्र ती स्त्री पतीच्या मर्जीप्रमाणें वागणारी पतीला संतोष देणारी असावी ॥२७॥

बुद्धिदातानुमंताचयश्चोपकरणप्रदः ॥ बलकृच्चापिषष्ठांशंप्राप्नुयात्पुण्यपापयोः ॥ २५ ॥
प्रजाभ्यःपुण्यपापानांराजाषष्ठांशमुद्धरेत् ॥ २६ ॥ शिष्याद्गुरुःस्त्रियाभर्त्तापितापुत्रात्तथैवच ॥
स्वपतेरपिपुण्यस्ययोषिदर्द्धमवाप्नुयात्॥चित्तस्यानुव्रताशश्वद्वर्ततेतुष्टिकारिणी॥२७॥परहस्ते
नदानादिकुर्वतःपुण्यकर्मणः ॥ विनाभृतकपुत्राभ्यांकर्त्ताषष्ठांशमुद्धरेत् ॥ २८ ॥ वृत्तिदोवृत्तिसं
भोक्तुःपुण्यंषष्ठांशमुद्धरेत् ॥ आत्मनोवापरस्यापियदिसेवांनकारयेत् ॥२९॥ इत्थंह्यदत्तान्यपिपु
ण्यपापान्यायांतिनित्यंपरसंचितानि॥कलौत्वयंवैनियमोनकार्यःकर्त्तैवभोक्ताखलुपुण्यपापयोः ३०

दुसऱ्याकडून दानादिक पुण्यकर्म करविणाराचें पुण्य त्याचे ते करणारे चाकर किंवा पुत्र नसतील तर कर्त्याला सहावा भाग मिळतो ॥ २८ ॥ वृत्ति देणारा, वृत्ति भोगणाराच्या पुण्याचा सहावा भाग घेतो; मात्र तो त्यापासून आपली किंवा दुसऱ्याची सेवा करून घेणारा नसावा ॥ २९ ॥ याप्रमाणें दुसऱ्यांनीं केलेलीं पापपुण्यें, त्यांनीं दिलीं

नाहीं तरी प्राप्त होतात; कलीमध्यें हा नियम नाहीं. पापपुण्य करणारा ज्याचा तो आपल्या कर्माचें फळ भोगतो ॥ ॥ ३० ॥ पूर्वीं याविषयीं एक पुण्यकारक गोष्ट घडली ती तुला सांगतों ऐक. जी ऐकली असतां पुण्य व ज्ञान प्राप्त होतें ॥ ३१ ॥ इति श्रीपद्मपुराणे कार्तिकमाहात्म्ये पंचविंशोऽध्यायः ॥ २५ ॥ श्रीकृष्ण ह्मणतातः– पूर्वीं अवंती नगरामध्यें कोणी धनेश्वर नांवाचा ब्राह्मण होता; तो ब्राह्मणाचे कर्मापासून भ्रष्ट, दुष्टबुद्धी, पापकर्मं करणारा, मीठ, गूळ वगैरे

श्रृणुष्वचास्मिन्नितिहासमग्र्यंपुराभवंपुण्यमतिप्रदंच ॥ ३१ ॥ इतिश्रीपद्मपुराणेउत्तरखण्डेकार्ति
कमाहात्म्येश्रीकृष्णसत्यासंवादेपंचविंशोध्याऽयः ॥२५॥ श्रीकृष्णउवाच ॥ पुराऽवंतीपुरेकश्चिद्द्वि
प्रआसीद्धनेश्वरः ॥ ब्रह्मकर्मपरिभ्रष्टःपापकर्मासुदुर्मतिः ॥ १ ॥ रसकंबलचर्माद्यैःससत्यानृतवृत्ति
कः ॥ स्तेयवेश्यासुरापानद्यूतसंतृप्तमानसः ॥ २ ॥ देशाद्देशान्तरंगच्छन्क्रयविक्रयकारणात् ॥ मा
हिष्मतींपुरीमागात्कदाचित्सधनेश्वरः ॥ ३ ॥ महिषेणकृतापूर्वंतस्मान्माहिष्मतीतिसा ॥ यस्यां
वप्रगताभातिनर्मदापापनाशिनी ॥ ४ ॥

रस, लोकरीचीं वस्त्रें, कातडीं यांचा व्यापार करणारा, वरवर खरें पण खोटें बोलून वागणारा, चोरी, वेश्यागमन, दारू पिणें, जुगार खेळणें अशीं कर्में करून मनाला समाधान मानणारा असा होता ॥ १ ॥ २ ॥ व्यापार करण्याकरितां देशोदेश फिरत असतां, एकदां तो माहिष्मती नगरीला आला ॥ ३ ॥ महिष्मत राजानें तें नगर केलें ह्मणून

त्याला माहिष्मती असें नांव पडलें; पापनाशिनी नर्मदा नदीच्या तीराला ती नगरी आहे ॥ ४ ॥ तेथें कार्तिकव्रत करणारे नाना देशचे लोक पुष्कळ आलेले पाहून विक्री करण्याकरितां तो धनेश्वर तेथें एक महिनाभर राहिला ॥ ५ ॥ तो विक्रीकरितां माल घेऊन नर्मदेच्या तीरीं यात्रेकरी लोकांत फिरत असतां, स्नान, जप, देवपूजा करीत आहेत असे ब्राह्मण पाहता झाला ॥६॥ कोणी पुराण वाचीत आहेत, कोणी तें ऐकण्यांत निमग्न आहेत, कोणी विष्णुप्रीत्यर्थ

कार्तिकव्रतिनस्तत्रनानादेशागतान्नरान् ॥ सदृष्ट्वाविक्रयंकुर्वन्मासमेकमुवासस: ॥ ५ ॥ सनित्यं नर्मदातीरेभ्रमन्विक्रयकारणात ॥ ददर्शब्राह्मणान्स्नानजपदेवार्चनेस्थितान् ॥ ६ ॥ कांश्चित्पुराणंपठत:कांश्चित्तच्छ्रवणेरतान् ॥ नृत्यगायनवादित्रविष्णुश्रवणतत्परान् ॥ ७ ॥ विष्णुमुद्रांकितान्कांश्चिन्मालातुलसिधारिण: ॥ ददर्शकौतुकाविष्टस्तत्रतत्रधनेश्वर: ॥८॥ नित्यंपरिभ्रमंस्तत्रदर्शनस्पर्शभाषणान् ॥ वैष्णवानांतथाविष्णोर्नामश्रावादिसोलभत्॥९॥एवं मासं स्थित: सोऽथकार्तिकोद्यापनेविधिम् ॥ क्रियमाणंददर्शासौभक्तैर्जागरणंहरे: ॥ १० ॥

नृत्य, गायन, वाद्यें वाजविणें वगैरे कामें करीत आहेत॥७॥कोणीं मुद्रा गोपीचंदन लावून आंगावर तुळशीच्या माळा धारण केल्या आहेत असें जिकडे तिकडे पाहून धनेश्वराला मोठी मौज वाटली॥८॥याप्रमाणें नित्य हिंडत असतां, त्या वैष्णव लोकांचें दर्शन, भेट, भाषण व विष्णूचें नामश्रवण यांचा त्याला लाभ होत होता ॥ ९ ॥ असा एक महिना तेथें अ-

सतां त्यांनें ते विष्णुभक्त कार्तिकव्रताचें उद्यापन करीत आहेत व हरिजागर करीत आहेत असें पाहिलें ॥ १० ॥ पौर्णिमेच्या दिवशीं व्रत करणारे लोक ब्राह्मण व गाई यांची पूजा करून ब्राह्मणानां भोजन व दक्षिणा देत आहेत ॥११॥ व सूर्यास्तसमयीं त्रिपुरारि शंकराप्रीत्यर्थ दीपोत्सव करीत आहेत असें पाहिलें ॥ १२ ॥ त्या कार्तिकमहिन्यांतील पौर्णिमातिथीला शंकरांनीं त्रिपुराला जाळिलें, ह्मणून त्या दिवशीं भक्त मोठा दीपोत्सव करितात ॥ १३ ॥ जो मजम-

पौर्णमास्यांततोऽपश्यद्विप्रगोपूजनादिकम् ॥ दक्षिणाभोजनाद्यंचदीयमानंव्रतस्थितै: ॥ ११ ॥ ततोर्कास्तमयेचैवदीपोत्सवविधिंतदा ॥ क्रियमाणंददर्शासौप्रीत्यर्थंत्रिपुरद्विष: ॥ १२ ॥ त्रिपुराणांकृतोदाहोयतस्तस्यांशिवेनतु ॥ अतस्तुक्रियतेतस्यांतिथौभक्तैर्महोत्सव: ॥१३॥ ममरुद्रस्ययःकश्चिदंतरंपरिकल्पयेत् ॥ तस्यपुण्यक्रिया:सर्वानिष्फला:स्युर्नसंशय: ॥ १४ ॥ तत:पूजादिकंपश्यन्बभ्रामसधनेश्वर: ॥ तावत्कृष्णाहिनादष्टोविह्वल:सपपातह ॥ १५ ॥ जनास्तंपतितंदृष्ट्वापरिवव्रु:कृपान्विता: ॥ तुलसीमिश्रितैस्तोयैस्तन्मुखंसिषिचुस्तदा ॥ १६ ॥

ध्यें व शंकरामध्यें भेद समजतो त्याचीं सर्व पुण्यकर्में निष्फळ होतात ॥ १४ ॥ याप्रमाणें सर्व पुण्यकर्में चाललीं आहेत, असें पाहत पाहत तो धनेश्वर व्यापाराकरितां फिरत होता. इतक्यांत एक कृष्णसर्प त्याला चावला तेव्हां तो विव्हळ होऊन पडला ॥१५॥ तो असा पडलेला पाहून दयाळु लोक त्याच्या भोवतीं जमले व त्यांनीं तो सावध होण्या-

करितां तुलसीमिश्रित पाणी त्याचे मुखावर शिंपडलें व तोंडांत घातलें. तोंच त्यानें प्राण सोडले ॥ १६ ॥ त्यानें प्राण सोडतांच यमदूत त्याला रागानें बांधून चाबुकानें मारीत मारीत यमपुरी संयमिनीला नेते झाले॥१७॥चित्रगुप्त त्याला पाहतांच त्याची निर्भर्त्सना करून, त्यानें बाळपणापासून केलेलीं सर्व पातकें यमाला सांगूं लागला ॥ १८ ॥ चित्रगुप्त ह्मणालाः—हे यमा यानें उपजल्यापासून कांहीं देखील पुण्य केलें नाहीं. यानें इतकीं पापें केलीं आहेत कीं, तीं

अथदेहपरित्यक्तंतंबद्ध्वायमकिंकराः ॥ ताडयन्तःकशाघातैर्निन्युःसंयमनीरुषा ॥ १७ ॥ चित्रगुप्तस्तुतंदृष्ट्वानिर्भर्त्स्यावेदयत्तदा ॥ यमायतेनबालत्वात्कर्मयद्दुष्कृतंकृतम् ॥ १८ ॥ चित्रगुप्तउवाच नैवास्यदृश्यतेकिंचिदाबाल्यात्सुकृतंक्वचित् ॥ दुष्कृतंशक्यतेवक्तुंवर्षेणापिनभास्करे ॥ १९ ॥ पापमूर्त्तिरयंदुष्टःकेवलंदृश्यतेविभो ॥ तस्मादाकल्पमर्यादंनिरयेपरिपच्यताम् ॥ २० ॥ श्रीकृष्णउवाच ॥ निशम्येत्थंवचःक्रोधाद्यमःप्राहस्वकिंकरान् ॥ दर्शयन्नात्मनोरूपंतच्चकालाग्निसंनिभम् ॥ ॥ २१ ॥ यमउवाच ॥ भोःप्रेतपतयश्चैनंवध्यमानंस्वमुद्गरैः ॥ कुंभीपाकेनिक्षिपतदुष्टंकल्मषदर्शनम् ॥ २२ ॥

सांगण्याला एक वर्षेही पुरणार नाहीं ॥ १९ ॥ हा दुष्ट केवळ पापाची मूर्ति दिसत आहे, ह्मणून कल्पांतापर्यंत यानें नरकांत तळत पडावें ॥ २० ॥ श्रीकृष्ण ह्मणालेः—याप्रमाणें चित्रगुप्ताचें भाषण ऐकून यम संतापला व आपलें प्रलयकाळचें अग्नीप्रमाणें उग्ररूप प्रगट करून दूताला ह्मणाला ॥ २१ ॥ यम ह्मणतोः—अरे, े पतींनों ! तुह्मी

आपल्या मुद्गलांनीं या दुष्ट पाप्याला मारीत मारीत कुंभीपाक नरकामध्यें टाकून द्या ॥ २२ ॥ श्रीकृष्ण ह्मणालेः—त्या प्रेतपतींनीं मुद्गलानें त्याचें मस्तक फोडलें व ज्यामध्यें तेल कडकड कढत आहे अशा कुंभीपाकांत त्याला टाकिलें॥२३॥ त्यांत टाकतांच तो कुंभीपाक, जसा पूर्वीं प्रल्हादाचे रक्षणाकरितां अग्नि थंड झाला तसा थंड झाला ॥ २४ तो मोठा चमत्कार पाहून प्रेतपतींना विस्मय वाटला व त्यामुळें ते धांवत जाऊन यमाला सर्व हकीकत सांगूं लागले ॥२५॥ तें

॥ श्रीकृष्णउवाच ॥ ततोमुद्गरनिर्भिन्नमूर्धानंप्रेतपास्तदा ॥ कुंभीपाकेचिक्षिपुस्तेतैलक्वथनशब्दिते ॥२३॥ यावत्क्षिप्तश्चतत्रासौतावच्छीतलतांययौ ॥ कुंभीपाकोयथावह्निःप्रल्हादक्षेपणात्पुरा ॥२४॥ तद्दृष्ट्वामहदाश्चर्यंप्रेतपाविस्मयान्विताः॥वेगादागत्यतत्सर्वंयमायावेदयंस्तदा ॥२५॥ यमस्तुकौतुकंदृष्ट्वाप्रेतपैश्चनिवेदितम्॥आःकिमेतदितिप्रोच्यतमानीयपप्रच्छच ॥ २६ ॥ तावदभ्यागतस्तत्रनारदःप्राहसत्वरम् ॥ यमेनपूजितःसम्यक्तंदृष्ट्वावाक्यमब्रवीत् ॥ २७ ॥ ॥ नारदउवाच ॥ नैवायंनिरयान्भोक्तुमर्होह्यरुणनंदन ॥ यस्मादंतेऽस्यसंजातंकर्मयन्निरयापहम् ॥ २८ ॥

ऐकून यमानें प्रत्यक्ष जाऊन पाहिलें, तेव्हां त्याला चमत्कार वाटून अहो ! हें काय आश्चर्य असें बोलून व त्या धनेश्वराला बोलावून विचारूं लागला ॥ २६ ॥ इतक्यांत तेथें नारद आले; यमानें त्यांना पाहतांच त्यांची पूजा करून त्यांना हें वर्तमान सांगितलें, तेव्हां त्या धनेश्वराला पाहून नारद ह्मणाले ॥ २७ ॥ नारद ह्मणतातः—हे अरुणनंदना,

यमा ! हा नरक भोगण्याला योग्य नाहीं. कारण, याचे हातून शेवटीं नरकभोग चुकविण्याजोगें पुण्य घडलें आहे ॥ २८ ॥ जो कोणी मनुष्य पुण्यकर्म करणारांचें दर्शन, स्पर्शन व त्यांशीं भाषण करील त्याला त्यांचे पुण्याचा सहावा भाग निश्चयानें मिळतो ॥ २९ ॥ या धनेश्वरानें कार्त्तिकव्रत करणारांचें सख्य करून एक महिना सहवास केला ह्मणून त्यांचे पुण्याचा भाग याला मिळाला ॥ ३० ॥ व त्यांची सेवा केली तिचें सर्व पुण्य याला मिळालें. ह्मणून

यःपुण्यकर्मिणांकुर्याद्दर्शनस्पर्शभाषणम् ॥ ततःषडंशमाप्नोतिपुण्यस्यनियतंनरः ॥ २९ ॥
सख्यंतुतैस्तुसंसर्गंकृतवान्वैधनेश्वरः ॥ कार्तिकव्रतिभिर्मासंतेषांपुण्यांशभागयम् ॥ ३० ॥
परिचर्यागतस्तेषांसंपूर्णव्रतभागयम् ॥ अतऊर्जव्रतोद्भूतपुण्यसंख्यानविद्यते ॥ ३१ ॥ कार्ति-
कव्रतिनांपुंसांपातकानिमहांत्यपि ॥ नाशयत्येवसर्वाणिविष्णुःसद्भक्तवत्सलः ॥ ३२ ॥ अंतेच
नर्मदातोयैस्तुलसीभिश्रितैस्स्वयम् ॥ वैष्णवैःस्नापितोविष्णोर्नामसंश्रावितोमृतः ॥ ३३ ॥
तस्मान्निर्हृतपापोयंसद्गतिंप्राप्तुमर्हति ॥ वैष्णवानुगृहीतोसौनिरयेनैवपच्यताम् ॥ ३४ ॥

कार्तिकव्रतापासून किती पुण्य प्राप्त होतें त्याची गणती नाहीं ॥ ३१ ॥ कार्तिकव्रत करणारांचीं पातकें कितीही मोठीं असलीं तरी भक्तवत्सल विष्णु तीं सर्व नाहींशीं करितो ॥ ३२ ॥ याचे मरणकालीं विष्णुभक्तांनीं याला तुलसीयुक्त नर्मदेच्या पाण्यानें स्नान घातलें व विष्णुनामाचें श्रवण करवीत असतां हा मेला॥३३॥ह्मणून याचीं सर्व पापें गेलीं आहेत; वैष्णवांनीं याजवर अनुग्रह केला आहे; करितां हा नरक भोगण्यास योग्य नाहीं. याला सद्गतिच मिळाली

पाहिजे ॥ ३४ ॥ आर्द्र व शुष्क पातकांनीं जसा नरक भोगावा लागतो, तसा पुण्यकर्मांनीं स्वर्ग प्राप्त होतो ॥ ३५ ॥ याजकरितां याचे हातून नकळत सहज पुण्य घडलें आहे, ह्मणून हा हे सर्व पापामुळें भोगावे लागणारे नरक पाहून नंतर यक्षाचे योनींत राहील ॥३६॥ श्रीकृष्ण ह्मणालेः—याप्रमाणें बोलून नारद गेल्यानंतर नारदाच्या भाषणानें त्या धनेश्वराचें

आर्द्रैःशुष्कैस्तथापापैर्निरयेभोगसन्निधिः ॥ प्राप्यतेसुकृतैस्तद्वत्स्वर्गेसन्निहितिस्तथा ॥ ३५ ॥
तस्मादकामपुण्योहियक्षयोनिस्थितोह्ययम् ॥ विलोक्यनिरयान्सर्वान्पापभोगप्रदर्शकान् ॥ ३६ ॥
श्रीकृष्णउवाच ॥ इत्युक्त्वागतवतिनारदेससौरिस्तद्वाक्यश्रवणविबुद्धतत्सुकर्मा ॥ तंविप्रंपुनरनय
त्स्वकिंकरेणतान्सर्वान्निरयगणान्प्रदर्शयिष्यन् ॥ ३७ ॥ इतिश्रीपद्मपुराणेकार्तिकमाहात्म्येश्री
कृष्णसत्यासंवादेषड्विंशतितमोध्यायः ॥ २६ ॥ श्रीकृष्णउवाच ॥ ततोधनेश्वरंनीत्वानिरयान्प्रेत
पोऽब्रवीत् ॥ दर्शयिष्यंस्तुतान्सर्वान्यमानुज्ञाकरस्तदा ॥ १ ॥ प्रेतउवाच ॥ पश्येमान्निरया
न्घोरान्धनेश्वरमहाभयान् ॥ येषुपापकरानित्यंपच्यंतेयमकिंकरैः ॥ २ ॥

पुण्यकर्म ज्याला समजलें आहे असा तो यम आपले दूतांकडून त्या धनेश्वराला नरकदर्शन करवून आणविता झाला ॥ ३७ ॥ इति श्रीकार्तिकमाहात्म्ये षड्विंशतितमोध्यायः ॥ २६ ॥ श्रीकृष्ण ह्मणालेः—नंतर प्रेतपती यमाच्या आज्ञेनें धनेश्वराला नेऊन सर्व नरक दाखवीत असतां ह्मणाला ॥ १ ॥ प्रेतपति ह्मणतोः—हे धनेश्वरा ! हे महाभयंकर नरक पहा;

या नरकामध्यें पापी लोकांना यमाचे दूत नेऊन पचवितात ॥ २ ॥ हा तापलेल्या वाळूचा तप्तवालुक नांवाचा भयंकर नरक पहा; यांत हे पापी लोक देह भाजत असतां ओरडत आहेत ॥ ३ ॥ जे वैश्वदेवाचे अंतीं भुकेलेला अतिथी आला असतां त्याची पूजा करून अन्नदान करीत नाहींत, ते या तप्तवालुक नरकांत आपले कर्मानें भाजले जातात ॥ ४ ॥ जे गुरु, ब्राह्मण, अग्नि, गाई, अभिषिक्त राजे व देव यांना ताडन करितात, ते आपआपल्या कर्मानें या नर-

तप्तवालुकनामायंनिरयोघोरदर्शनः ॥ यस्मिन्नेतेदग्धदेहाःक्रंदंतेपापकारिणः ॥३॥ अतिथीन्वैश्वदेवान्तेक्षुत्क्षामानागतांश्चये ॥ नपूजयंतितेह्येतेपच्यंतेस्वेनकर्मणा ॥ ४ ॥ गुर्वग्निब्राह्मणान्गाश्चदेवान्मूर्द्धाभिषिक्तकान् ॥ ताडयंतिसदायेवैतेनिर्दग्धायतत्स्विमे ॥ ५ ॥ षड्भेदस्त्वेषनिरयोनानापापैःप्रपद्यते ॥ तथैवांधतमिश्रोयंद्वितीयोनिरयोमहान् ॥ ६ ॥ पश्यसूचीमुखैर्देहाभिद्यंतेपापकारिणाम् ॥ कृमिभिर्घोरवक्त्रैश्चतमोवाक्यागमैर्द्विज ॥ ७ ॥ असावपिस्थितःषोढाश्वगृध्रपक्षिभिस्तथा ॥ परमर्मभिदोमर्त्याःपच्यंतेतेषुपापिनः ॥ ८ ॥

कांत भाजले जातात ॥ ५ ॥ या नरकाचे दुसरे सहा प्रकार आहेत; नाना प्रकारचे पातक्यांना ते प्राप्त होतात. हा दुसरा अंधतामिश्र नांवाचा मोठा नरक पहा ॥ ६ ॥ येथें अंधार असून यांत पापी लोकांना सुयीच्या अग्राप्रमाणें भयंकर मुखाच्या किड्यांनीं, टोचून देहाला फाडून टाकलें जातें ॥ ७ ॥ याचेही सहा प्रकार आहेत;

यांत कुत्रे, गिधाड इत्यादिक पक्ष्यांनीं दुसऱ्याचा मर्मभेद करणारे पाप्याला पचविलें जातें ॥ ८ ॥ तिसरा क्रकच नांवाचा भयंकर नरक पहा; येथें पापी मनुष्याला करवतीनें कापून पीडा देतात ॥ ९ ॥ असिपत्र (तरवारींचें) वन आदि करून ह्याचे सहा प्रकार आहेत; जे दुसऱ्याच्या स्त्री पुत्र यांचा व इष्टमित्रांचा वियोग करवितात ते या नरकांत दुःख भोगताहेत पहा ॥ १० ॥ कोणाला तरवारीनें तोडताहेत, कोणी तोडण्याचे भयानें पळताहेत असे हे पापी आरडत ओरडत

तृतीयःक्रकचोह्येषनिरयोघोरदर्शनः ॥ यत्रेमेक्रकचैर्मर्त्याःपच्यंतेपापकारिणः ॥ ९ ॥ असिपत्रवनाद्यैस्तुषट्प्रकारोप्ययंस्थितः ॥ पत्नीपुत्रादिभिर्येवैवियोगंप्रापयंतिहि ॥ १० ॥ इष्टैरन्यैरपि नरान्पच्यंतेतइमेनराः ॥ असिपत्रैश्छिद्यमानाश्छेदभीत्यापलायिताः ॥ पच्यंतेपापिनःपश्यक्रंदमानानितस्ततः ॥ ११ ॥ अर्गलाख्योमहारौद्रश्चतुर्थोनिरयोह्ययम् ॥१२॥ पश्यनानाविधैःपाशैराबध्ययमकिंकरैः ॥ असावपिचषड्भेदोवधभेदादिभिःस्थितः ॥ १३ ॥ कूटशाल्मलिनामानंनिरयंपश्यपंचमम् ॥ यत्रांगारनिभाह्येताःशाल्मल्योलोमसन्निभाः ॥ १४ ॥

धावत पळत नरकांत पचताहेत ते पहा ॥ ११ ॥ अर्गल नांवाचा हा चौथा नरक पहा ॥ १२ ॥ येथें यमाचे दूत नानाप्रकारच्या पाशांनीं पापी लोकांना बांधतात व अडसारानीं मारतात; याचेही वधादि भेदानें सहा भेद आहेत. ॥ १३ ॥ कूटशाल्मली नांवाचा हा पांचवा नरक पहा, येथें अग्नीप्रमाणें संतप्त अशा कांट्यानीं युक्त सावरी आहेत.

॥ १४॥ येथेंही पापीलोकांना सहा प्रकारच्या यातनांनीं दुःख देतात. जे दुसऱ्याची स्त्री हरण करितात, दुसऱ्याचा द्वेष करितात व दुसऱ्याचें द्रव्य घेतात, त्यानां येथें तप्तसावरीला बांधतात ॥ १५ ॥ रक्तपूय नांवाचा हा सहावा घोर नरक पहा. येथें पापी मनुष्याला वर पाय खालीं तोंड करून रक्तपूयामध्यें लोंबत सोडतात ॥ १६ ॥ अभक्ष्य पदार्थ व मद्य मांसादि भक्षण करणारे, दुसऱ्याची निंदा करणारे, व दुसऱ्याचें कपटानें छिद्र उघडकीस आणणारे, नीच यांना येथें मार-

यत्रषोढाविपच्यंतेयातनाभिरिमेजनाः ॥ परदारहरद्रोहपरद्रव्यरताश्चये ॥ १५ ॥ रक्तपूयमिमंप
श्यषष्ठंनिरयमुल्बणम् ॥ अधोमुखाविपच्यंतेयत्रपापकृतोनराः ॥ १६ ॥ अभक्ष्यभक्षकानिंदापैशू
न्याभिरताइमे ॥ भज्यमानावध्यमानाःक्रंदंतेभैरवान्रवान् ॥ षट्प्रकारोविगंधाद्यैरसावपिहिसंस्थि
तः ॥ १७ ॥ कुंभीपाकःसप्तमोयंनिरयोघोरदर्शनः ॥१८॥ षोढातैलादिभिर्द्रव्यैर्धनेश्वरविलोकय॥
महापातकिनोयत्रपच्यंतेयमकिंकरैः ॥ १९ ॥

तात, तोडतात; त्या मुळें ते मोठमोठ्यानें भयंकर ओरडतात. विगंध आदि करून याचेही सहा प्रकार आहेत ॥ १७ ॥ हे धनेश्वरा! कुंभीपाक नांवाचा हा सातवा भयंकर नरक पहा ॥ १८ ॥ तप्त तेल आदि करून सहा प्रकारच्या द्रव्यांनीं याचे सहा प्रकार आहेत. ब्रह्महत्यादि महापातकें करणारे लोकांना यमाचे दूत येथें यातना भोगवितात ॥ १९ ॥

हजारों वर्षें यमयातना जेथें भोगतात, ते हे चाळीसापेक्षां जास्त रौरव नरक आहेत पहा ॥ २० ॥ न समजून घडलेलें तें शुष्कपातक व मुद्दाम केलेलें तें आर्द्र पातक, अशीं दोन प्रकारांनीं असलेलीं. चौऱ्यायशीं पातकें पृथक् पृथक् भेदानीं आहेत ॥ २१ ॥ तीं प्रकीर्ण, अपांक्तेय, मलिनीकरण, जातिभ्रंशकर, उपपातक, अतिपातक, महापातक अशीं

बहून्यब्दसहस्राणिभुंजतेयमयातनाः ॥ चत्वारिंशन्मितानेतानधिकान्पश्यरौरवान् ॥ २० ॥
अकामात्पातकंशुष्कंकामादार्द्रमुदाहृतम् ॥ आर्द्रशुष्कादिभिःपापैर्द्विप्रकारानवस्थितान् ॥ चतु
राशीतिसंख्याकैःपृथग्भेदैरवस्थितान् ॥ २१ ॥ यत्प्रकीर्णमपांक्तेयंमलिनीकरणंतथा ॥ २२ ॥
जातिभ्रंशकरंतद्वदुपपातकसंज्ञकम् ॥ अतिपापंमहापापंसप्तधापातकंस्मृतम् ॥ एभिःसप्तसुपच्यं
तेनिरयेषुयथाक्रमम् ॥ २३ ॥ कार्तिकव्रतिभिर्यस्मात्संसर्गोह्यभवत्तव ॥ तत्पुण्योपचयादेतेनि
हृतानिरयाःखलु ॥ २४ ॥ श्रीकृष्णउवाच ॥ दर्शयित्वेतिनिरयान्प्रेतपस्तमथाहरत् ॥ २५ ॥
धनेश्वरंयक्षलोकंयक्षश्चाभूत्सतत्रहि ॥ धनदस्यानुगःसोयंधनयक्षेतिविश्रुतः ॥ २६ ॥

सात प्रकारचीं मुख्य पातकें आहेत ॥ २२ ॥ त्या सात पातकांनीं क्रमाप्रमाणें सात नरक भोगावे लागतात ॥ २३ ॥ तुला कार्तिकव्रत करणारांचा सहवास झाला. त्या पुण्यानें तुझे हे नरक चुकले ॥ २४ ॥ श्रीकृष्ण म्हणालेः—याप्रमाणें प्रेतपतीनें त्याला सर्व नरक दाखवून यक्ष लोकाला आणिलें ॥ २५ ॥ व तो धनेश्वर तेथें धनयक्ष

नांवाचा दक्ष होऊन कुबेराचा सेवक झाला ॥ २६ ॥ त्याच्या नावांनें विश्वामित्रानें अयोध्येंत एक तीर्थ केलें आहे ॥ २७ ॥ कार्तिकमासाचा एवढा महिमा आहे कीं, त्याचे योगानें सर्व भोग व मुक्ति मिळते,व त्या व्रताचे दर्शनानें हीं सर्व पापें जाऊन मुक्ति मिळते॥२८॥इति श्रीपद्मपुराणे कार्तिकमाहात्म्ये सप्तविंशोऽध्यायः ॥२७ ॥ सूत ह्मणतातः—राजा श्रीकृष्ण या प्रमाणें सत्यभामेशीं असें अति प्रिय भाषण करून संध्याकाळचा संध्याविधि करण्याकरितां मातोश्रीदेव-

यदाख्ययाकरोत्तीर्थमयोध्यायांतुगाधिजः ॥ २७ ॥ एवंप्रभावःखलुकार्तिकोयोमुक्तिप्रदोभुक्तिकर श्चयस्मात् ॥ प्रयांत्यनेकार्जितपातकानिव्रतस्यसंदर्शयतोपिमुक्तिम् ॥ २८ ॥ इतिश्रीपद्मपुराणेउत्तरखण्डेकार्तिकमाहात्म्येश्रीकृष्णसंवादेसप्तविंशोऽध्यायः ॥ २७ ॥ सूतउवाच ॥ इत्युक्त्वावासुदेवोऽसौसत्यभामामतिप्रियम् ॥ सायंसंध्याविधिंकर्तुंजगामजननीगृहम् ॥ १ ॥ एवंप्रभावःप्रोक्तोयंकार्तिकःपापनाशनः ॥ विष्णुप्रियकरोऽत्यन्तंभुक्तिमुक्तिफलप्रदः ॥२॥ हरिजागरणंप्रातःस्नानंतुलसिसेवनम् ॥ उद्यापनंदीपदानंव्रतान्येतानिकार्तिके ॥३ ॥ पंचकैर्व्रतकैरेभिःसंपूर्णकार्तिकव्रतं ॥ फलमाप्नोतितत्प्रोक्तंभुक्तिमुक्तिफलप्रदम् ॥ ४ ॥

कीच्या घरास गेले ॥ १ ॥ सूत ह्मणतातः—ऋषिहो ! या प्रकारचा कार्तिकव्रताचा महिमा पापनाश करणारा ! विष्णूला प्रिय, भोग व मोक्ष देणारा असा तुह्मांला सांगितला ॥ २ ॥ हरिजागर, प्रातःस्नान, तुळसीची सेवा, उद्यापन व दीपदान अशीं कार्तिकांत पांच व्रतें आहेत ॥ ३ ॥ अशा पांच प्रकारांनीं कार्तिकव्रत संपूर्ण होतें व त्यापासून सांगितल्याप्रमाणें मुक्तिभुक्ति आदिकरून फळ मिळतें ॥ ४ ॥ ऋषि ह्मणतातः— हे सूता ! विष्णूला प्रिय असा हा कार्तिकव्रताचा महिमा इतिहासासह मोठा चमत्कारिक व आनंदकारक आपण सांगितला ॥५॥ त्याप्रमाणें हें कार्तिकव्रत पाप व दुःखनिवारणाकरितां व ऐश्वर्याची व मोक्षाची इच्छा करणारांनींही अवश्य करावें ॥ ६ ॥ पण याप्रमाणें कार्तिकव्रत करणारा जर कदाचित् संकटांत असला किंवा घोर अरण्यांत पडला किंवा व्याधींनीं पिडला ॥ ७ ॥

॥ ऋषयऊचुः ॥ विष्णुप्रियोऽतिफलदःप्रोक्तोयंरोमहर्षणः ॥ कार्तिकप्रभवःसम्यक्सेतिहासोतिविस्मितः ॥ ५ ॥ अवश्यं चतथाकार्यःपापदुःखनिवृत्तये ॥ मोक्षार्थिभिर्नरैःसम्यग्भोगकामैस्तथापिवा ॥ ६ ॥ एवंस्थितोयदाकश्चिद्व्रतस्थःसंकटेस्थितः ॥ दुर्गारण्यस्थितोवापिव्याधिभिःपरिपीडितः ॥ ७ ॥ कथंतेनप्रकर्त्तव्यंकार्तिकव्रतकंशुभम् ॥ यस्माद्त्यंतफलदमत्याज्यंसर्वदानरैः॥ ८ ॥ सूतउवाच ॥ एवमापद्गतोयस्तुनरोनित्यंदृढव्रतः ॥ कार्तिकव्रतकंतेनकर्तव्यंतुयथाभवेत् ॥ ९ ॥ तत्सर्वंकथयिष्येहंश्शृणुध्वंमुनिपुङ्गवाः ॥ विष्णोःशिवस्यवाकुर्यादालयेपरिजागरम् ॥ १० ॥

तर त्यानें हें शुभ कार्तिकव्रत कसें करावें ? कारण मनुष्यानीं हें अत्यंत फल देणारें कार्तिकव्रत अत्याज्य आहे ॥८॥ सूत ह्मणालेः—नेहमीं नेमानें व्रत करणारा याप्रमाणें संकटांत पडला असतां त्यानें कार्तिकव्रत कसें केलें असतां पूर्ण होईल॥९॥ तें तुह्मांला सांगतों; हे ऋषिहो ! ऐका- कार्तिकव्रत करणारानें विष्णूच्या किंवा शिवाच्या देवालयांत हरिजागर

करावा ॥ १० ॥ शिवविष्णूचीं देवळें नसतील तर कोणत्याही देवालयांत करावा; अरण्यांत किंवा डोंगरावर असेल तर किंवा इतर विपत्तींत असेल तर ॥ ११ ॥ पिंपळाखालीं किंवा तुळशीच्या वनांत विष्णुशेजारीं विष्णूची नामें, गीतें, पदें गावीं ॥ १२ ॥ विष्णूच्या संनिध गायन केलें असतां, हजार गाई दान दिल्याचें पुण्य मिळतें व वाद्य वाजविणाराला वाजपेय यज्ञाचें फळ मिळतें ॥ १३ ॥ नाचणाराला सर्व तीर्थांत स्नान केल्याचें पुण्य मिळतें; या सर्वांना द्रव्य

शिवविष्णुगृहाभावेसर्वदेवालयेष्वपि ॥ दुर्गाटव्यास्थितोवाथयदिवापद्गतोभवेत् ॥ ११ ॥ कुर्यादश्वत्थमूलेतुतुलसीनांवनेष्वपि ॥ विष्णुनामप्रबंधानांगायनंविष्णुसन्निधौ ॥१२॥ गोसहस्रप्रदानस्यफलमाप्नोतिमानवः ॥ वाद्यकृत्पुरुषश्चापिवाजपेयफलंलभेत् ॥ १३ ॥ सर्वतीर्थावगाहोत्थंनर्त्तकःफलमाप्नुयात् ॥ सर्वमेतल्लभेत्पुण्यमेतेषांद्रव्यदःपुमान् ॥ १४ ॥ श्रवणाद्दर्शनाद्वापिषडंशंफलमाप्नुयात् ॥ आपद्गतोयदाप्यंभोनलभेत्कुत्रचिन्नरः ॥ १५ ॥ व्याधितोवायथाकुर्याद्विष्णोर्नाम्नापिमार्जनम् ॥ उद्यापनविधिंकर्तुमशक्तोयोव्रतेस्थितः ॥ १६ ॥ ब्राह्मणान्भोजयेत्पश्चाद्व्रतसंपूर्णहेतवे ॥ अव्यक्तरूपिणोविष्णोःस्वरूपंब्राह्मणाभुवि ॥ १७ ॥

देणाराला हें सर्व पुण्य मिळतें ॥ १४ ॥ नृत्य, गीत पाहिल्यानें व ऐकल्यानें पुण्याचा सहावा भाग मिळतो ॥ संकटांत असतां, जर कोठें स्नानाकरितां पाणी न मिळेल तर ॥ १५ ॥ अथवा आजारी असून स्नानाला अशक्त असेल तर विष्णूच्या नामांनीं मार्जन करावें ॥ कोणास सांग उद्यापन करण्यास सामर्थ्य नसेल तर ॥ १६ ॥ व्रत संपूर्ण

होण्याकरितां शेवटीं ब्राह्मणभोजन घालावें. ब्राह्मण हे पृथ्वीवर विष्णूचीं अव्यक्तरूपी स्वरूपें आहेत ॥ १७ ॥ त्यांचा संतोष झाला म्हणजे विष्णु सर्वदा संतुष्ट होतात. कोणास दीपदान देण्यास सामर्थ्य नसल्यास दुसऱ्यानें लाविलेल्या दिव्याची वात सारावी ॥ १८ ॥ किंवा त्या दिव्याचें प्रयत्नानें वातादिकांपासून रक्षण करावें ॥ तुळशीवनादि न मिळाल्यास विष्णुभक्त ब्राह्मणाची पूजा करावी ॥ १९ ॥ कारण, विष्णु आपल्या भक्ताजवळ सर्वदा राहतात. वैष्णव ब्रा-

तत्संतुष्ट्यातुसंतुष्टःसर्वदास्यान्नसंशयः ॥ अशक्तोदीपदानायपरदीपंप्रबोधयेत् ॥ १८ ॥ तस्यवारक्षणंकुर्य्याद्वातादिभ्यःप्रयत्नतः ॥ अभावेतुलसीनांचपूजयेद्वैष्णवंद्विजम् ॥ १९ ॥ यस्मात्सन्निहितोविष्णुःस्वभक्तेष्वेवसर्वदा ॥ सर्वाभावेव्रतीकुर्याद्ब्राह्मणानांगवामपि ॥ २० ॥ सेवामश्वत्थवटयोर्व्रतपूरणहेतवे ॥ ऋषयऊचुः ॥ कथंत्वयाऽश्वत्थवटौब्राह्मणेनसमौस्मृतौ ॥ २१ ॥ सर्वेभ्यस्तुतरुभ्यस्तौकस्मात्पूज्यतमौकृतौ ॥ सूतउवाच ॥ अश्वत्थरूपीभगवान्विष्णुरेवनसंशयः ॥२२॥ रुद्ररूपीवटस्तद्वत्पालाशोब्रह्मरूपधृक् ॥ दर्शनंपूजनंसेवातेषामघहरास्मृता ॥ २३ ॥

ह्मण न मिळाल्यास व्रत करणारानें व्रत संपूर्ण होण्याकरितां गाई, पिंपळ, वड यांची सेवा करावी ॥ २० ॥ ऋषि ह्मणालेः—पिंपळ व वड हे ब्राह्मणाचे बरोबरीचे कसे सांगितले ॥ २१ ॥ सर्व वृक्षांपेक्षां तेच पूज्यतम कशाकरितां केले ? सूत ह्मणालेः—भगवान् विष्णुच, प्रत्यक्ष अश्वत्थरूपी आहेत; यांत संशय नाहीं ॥ २२ ॥ वड हा रुद्ररूपी आहे

व पळस ब्रह्मदेवस्वरूपी आहे ॥ त्यांचें दर्शन व पूजा पापनाश करणारीं आहेत ॥ २३ ॥ व त्यांपासून दुःख, वि-
पत्ति, व्याधि व शत्रु या.चा नाश होतो । ऋषि ह्मणतातः–सूता ! ब्रह्मा, विष्णु व शंकर हे वृक्षरूप कसे झाले
॥ २४ ॥ याविषयीं आह्माला मोठी शंका उत्पन्न झाली आहे; तरी हे धर्मज्ञा ! ती कथा सांगा ॥ सूत ह्मणतात–पूर्वी
देवांनीं पार्वती व शंकर यांचें सुरत चाललें असतां अग्नीला ब्राह्मणरूपानें पाठवून विघ्न केलें ॥ तेव्हां रतिसुखांत

दुःखापद्व्याधिदुष्टानांविनाशेकारणंध्रुवम् ॥ ऋषयऊचुः ॥ कथंवृक्षत्वमापन्नाब्रह्मविष्णुमहेश्वराः
॥ २४ ॥ एतत्कथयधर्मज्ञसंशयोऽत्रमहान्हिनः ॥ सूतउवाच ॥ पार्वतीशिवयोर्देवैःसुरतंकुर्वतो
किल ॥ २५ ॥ अग्निर्ब्राह्मणवेषेणप्रेष्यविघ्नंकृतंपुरा ॥ ततश्चपार्वतीक्रुद्धाशशापत्रिदिवौकसः ॥
रतोत्सवसुखभ्रंशात्कंपमानारुषातदा ॥ २६ ॥ पार्वत्युवाच ॥ कृमिकीटादयोप्येतेजानंतिसुरते
सुखम् ॥ तद्विघ्नकारिणोदेवायूयंवृक्षत्वमाप्नुथ ॥ २७ ॥ सूतउवाच ॥ एवंसापार्वतीदेवान्शशा
पक्रुद्धमानसा ॥ तस्माद्वृक्षत्वमापन्नास्सर्वेदेवगणाःकिल ॥ २८ ॥ तस्मादिमौविष्णुमहेश्वरावु
भौबभूवतुर्बोधिवटौमुनीश्वराः॥बोधिस्त्वगादार्किदिनंवितानसंस्पृश्यतामर्कजविष्णुयोगात्॥२९॥

विघ्न झालें ह्मणून पार्वती संतापानें थरथर कंपायमान होऊन देवांनां शाप देती झाली ॥ २५ ॥ २६ ॥ पार्वती
ह्मणालीः–हे कृमिकीटादिक सुद्धां रतिसुख जाणतात, त्या रतिसुखाला विघ्न करणारे देवहो ! तुह्मी वृक्ष व्हा ॥ २७॥
सूत ह्मणालेः–याप्रमाणें पार्वतीनें संतापून देवांनां शाप दिला. त्यामुळें सर्व देवसमुदाय वृक्ष झाले ॥ २८ ॥ हे ऋषिहो !
तेव्हांपासून विष्णु अश्वत्थ (पिंपळ) व शंकर वड झाले. पिंपळाला शनिवारीं स्पर्श करावा, इतर वारीं त्याला स्पर्श

करूं नये ॥ २९ ॥ इति श्रीपद्मपुराणे कार्तिकमाहात्म्ये अष्टाविंशोध्यायः ॥ २८ ॥ ऋषि ह्मणालेः–हे सूता ! पिंपळाचा
वृक्ष इतर दिवशीं शिवण्यास अयोग्य व शनिवारीं शिवण्यास योग्य कसा झाला हें सांगा ॥ १ ॥ सूत ह्मणालेः–
समुद्रमंथनापासून जीं रत्नें देवांनीं मिळविलीं, त्यांपैकीं लक्ष्मी व कौस्तुभ त्यांनीं विष्णूला दिलीं ॥ २ ॥ जेव्हां विष्णु

इतिश्रीपद्मपुराणेउत्तरखण्डेकार्तिकमाहात्म्येश्रीकृष्णसत्यासंवादेअष्टाविंशोऽध्यायः ॥२८॥ ऋष
यऊचुः॥अस्पृश्यत्वंकथंयातःसूतबोधितरुस्त्वयम् ॥ स्पृश्यत्वंहिकथंयातस्तथाऽयंशनिवासरे ॥१॥
सूतउवाच॥समुद्रमथनाद्यानिरत्नान्यापुःसुरोत्तमाः॥श्रियंचकौस्तुभंतेषांविष्णवेप्रददुःसुराः ॥२॥
यावदंगीचकारासौलक्ष्मींभार्यार्थमात्मनः॥तावद्विज्ञापयामासलक्ष्मीस्तंचक्रपाणिनम्॥३॥लक्ष्मी
रुवाच॥असंस्कृत्यकथंज्येष्ठांकनिष्ठापरिणीयते॥तस्मान्ममाग्रजामेतामलक्ष्मींमधुसूदन ॥४॥ विवा
ह्य नयमांपश्चादेषधर्मःसनातनः ॥ सूतउवाच ॥ इतितद्वचनंश्रुत्वासविष्णुर्लोकभावनः ॥ ५ ॥

लक्ष्मीला आपल्या स्त्रीत्वानें वरूं लागले, तेव्हां लक्ष्मी त्या चक्रपाणी विष्णूची प्रार्थना करूं लागली ॥ ३ ॥ लक्ष्मी
ह्मणालीः–थोरलीचा विवाह झाल्याशिवाय धाकटीचें लग्न कसें करितां ? याकरितां माझी थोरली बहीण अलक्ष्मी
॥ ४ ॥ हिचें लग्न करून मग मला वरा. असाच परंपरेचा धर्म आहे ॥ सूत ह्मणालेः–असें लक्ष्मीचें भाषण ऐकिलें

तेव्हां श्रीविष्णूंनीं महान् तपस्वी उद्दालक ऋषि याला ती आक्काबाई दिली व त्यानें विष्णूचे आज्ञेनें वरली ॥ ५ ॥ ॥ ६ ॥ ती अलक्ष्मी मोठें तोंड, दांत पांढरे, रजोगुण शरीर, लाल व विस्तृत डोळे, अंग व डोकीचे केस रूक्ष, अशी होती ॥ ७ ॥ तो धर्मज्ञ ऋषि विष्णूच्या आज्ञेनें अशा त्या अलक्ष्मीचा स्वीकार करून, वेदघोषानें युक्त अशा आपल्या आश्रमाला तिला घेऊन गेला ॥ ८ ॥ होमाच्या धुरानें सुगंधित झालेला व वेदाच्या घोषानें गर्जलेला असा तो

उद्दालकायमुनयेसुदीर्घतपसेतदा ॥ आत्मवाक्यानुरोधेनतामलक्ष्मींददौकिल ॥ ६ ॥ स्थूलास्यां शुभ्रदंशनांराजसींबिभ्रतींतनुं ॥ वितताक्तनयनांरूक्षगात्रशिरोरुहाम् ॥ ७ ॥ समुनिर्विष्णुवाक्यात्तामंगीकृत्यस्वमाश्रमम् ॥ वेदध्वनिसमायुक्तमानयामासधर्मवित् ॥ ८ ॥ होमधूमसुगंधाढ्यंवेदघोषनिनादितम् ॥ आश्रमंतंसमालोक्यव्यथितासाब्रवीदिदम् ॥ ९ ॥ ज्येष्ठोवाच ॥ नहिवासोनुरूपोयंवेदध्वनियुतोमम ॥ नात्रागमिष्येभोब्रह्मन्नयस्वान्यत्रमाम्ध्रुवम् ॥ १० ॥ उद्दालक उवाच ॥ कथंनायासिकिंचात्रवर्त्ततेऽसंमतंतव ॥ तवयोग्याचवसतिःकाभवेत्त्ववदस्वतत् ॥ ११ ॥

आश्रम पाहून तिला दुःख झालें व ती पतीला ह्मणाली ॥ ९ ॥ ज्येष्ठा ह्मणालीः—हा वेदध्वनियुक्त आश्रम मला राहण्याला योग्य नाहीं; हे ब्राह्मणा ! मला दुसरे ठिकाणीं ने. मी येथें येणार नाहीं ॥ १० ॥ उद्दालक ह्मणालाः—तूं येथें कां येत नाहींस? येथें तुला अमान्य काय आहे? तुला राहण्याला योग्य जागा तरी कोणती तें मला सांग ॥११॥

ज्येष्ठा ह्मणालीः—जेथें वेदघोष होत असेल, अतिथींची पूजा होत असेल, यज्ञदानादिक कर्मे होत असतील, तेथें मी कधीं राहणार नाहीं ॥ १२ ॥ जेथें नवराबायको एकमेकांत प्रीति करीत असतील व पितर व देव यांची जेथें पूजा होत असेल तेथें मी राहणार नाहीं ॥ १३ ॥ जेथें व्यापारी नीतीनें वागणारे, कुशळ, धर्मानें चालणारे, गोड बोलणारे, गुरूची पूजा करणारे असे लोक जेथें आहेत तेथें मी कधींही राहणार नाहीं ॥१४॥ जेथें प्रत्येक रात्रीं नवरा-

॥ ज्येष्ठोवाच ॥ वेदध्वनिर्भवेद्यस्मिन्नतिथीनांचपूजनं॥यज्ञदानादिकंवापिनैवतत्रवसाम्यहम् ॥१२॥ परस्परानुरागेणदांपत्यंयत्रवर्तते ॥ पितृदेवार्चनंयत्रतत्रनैववसाम्यहम् ॥ १३ ॥ उद्यमीनीतिकुशलोधर्मयुक्तःप्रियंवदः ॥ गुरुपूजारतोयत्रतस्मिन्नैववसाम्यहम् ॥ १४ ॥ रात्रौरात्रौगृहेयस्मिन्दंपत्योःकलहोभवेत् ॥ निराशायांत्यतिथयस्तस्मिन्स्थानेरतिर्मम ॥ १५ ॥ वृद्धसज्जनविप्राणांयत्रस्यादपमाननम् ॥ निष्ठुरंभाषणंयत्रतत्रनित्यंवसाम्यहम् ॥ १६ ॥ दुरोदररतायत्रपरद्रव्यापहारिणः ॥ परदाररताश्चापितस्मिन्स्थानेरतिर्मम ॥ १७ ॥

बायकोचें भांडण असेल व अतिथि निराश होऊन उपाशीं जेथून जात असेल, तेथें राहण्याची मला आवड आहे. ॥ १५ ॥ वृद्ध व सज्जन यांचा व ब्राह्मणांचा जेथें अपमान होतो व जेथें कठोर भाषण बोलतात, तेथें मी नित्य राहत्यें ॥ १६ ॥ द्यूत खेळणारे, दुसऱ्याचें द्रव्य हरण करणारे, परस्त्रीशीं रममाण होणारे असे लोक जेथें

आहेत तेथें मी प्रेमानें राहत्यें ॥ १७ ॥ जेथें गाईंचा वध व मद्यप्राशन रात्रंदिवस चालतें व ब्रह्महत्यादिक पापें घडतात, त्या जाग्याची मला फार आवड आहे ॥ १८ ॥ सूत ह्मणालेः—हें त्या ज्येष्ठेचें भाषण ऐकून उद्दालक खिन्न मुख झाला व विष्णूची आज्ञा मानून पुन्हा कांहीं बोलला नाहीं ॥ १९ ॥ तो ज्येष्ठेला मान्य असें स्थल पाहण्याकरितां जेथें जेथें गेला, तेथें तेथें त्याची पूजा होत होती, तें पाहून ती ज्येष्ठा ह्मणाली—अशा स्थलीं मी येत नाहीं.

गोवधोमद्यपानंचयत्रसंजायतेऽनिशम् ॥ ब्रह्महत्यादिपापानितस्मिन्स्थानेरतिर्मम ॥१८॥ सूतउवाच॥इतितद्वचनंश्रुत्वाविषण्णवदनोभवत्॥उद्दालकःपुनर्विष्णोर्वाक्यंश्रुत्वानचोचिवान् ॥ १९ ॥ सोगच्छद्यत्रतत्रास्यपूजामालोक्यसाब्रवीत् ॥ नायामीतिततःसोपिभ्रमन्नेवातुरोभवत् ॥ २० ॥ उद्दालकस्ततोवाक्यंतामलक्ष्मीमुवाचह ॥ उद्दालकउवाच ॥ अश्वत्थवृक्षमूलेऽस्मिन्नलक्ष्मित्वंस्थिराभव ॥ २१ ॥ आवासस्थानमालोक्ययावच्चायाम्यहंपुनः ॥ सूतउवाच ॥ इतितांतत्रसंस्थाप्यजगामोद्दालकस्तदा ॥ २२ ॥ प्रतीक्ष्यापिचिरंतत्रतदातंनददर्शसा ॥ तदारुरोदकरुणंभर्तृत्यागेनदुःखिता ॥ २३ ॥

तेव्हां तो उद्दालकही तिजबरोबर फिरतां फिरतां थकून गेला ॥ २० ॥ नंतर उद्दालक त्या अलक्ष्मीला ह्मणाला—उद्दालक ह्मणतो—हे अलक्ष्मी ! मी तुला राहण्याला जागा पाहून येतों तोंपर्यंत या पिंपळाच्या बुंधाशीं स्वस्थ बैस ॥ सूत ह्मणतातः—उद्दालक याप्रमाणें तिला तेथें बसवून निघून गेला ॥ २१ ॥ २२ ॥ तिनें तेथें बसून बहुतकालपर्यंत त्या

उद्दालकाची वाट पाहिली, परंतु तो तिला भेटला नाहीं. तेव्हां नवरा टाकून गेला ह्मणून दुःखित होत्साती ती अलक्ष्मी करुणस्वरानें रडूं लगली ॥ २३ ॥ तिचें तें रडणें वैकुंठांत लक्ष्मीनें ऐकिलें, तेव्हां तिला दुःख होऊन ती विष्णूची प्रार्थना करूं लागली ॥२४॥ लक्ष्मी ह्मणालीः—हे स्वामिन् माझी थोरली बहीण नवऱ्यानें टाकल्यामुळें दुःखित आहे. तुमची माझ्यावर प्रीति असेल तर तुह्मी तिचें शांतवन करण्यास चलावें ॥२५॥ सूत ह्मणालेः—नंतर कृपानिधि

तत्तस्यारुदितंसाश्रीर्वैकुंठभुवनेश्रृणोत् ॥ तदाविज्ञापयामासविष्णुमुद्विग्नमानसा ॥ लक्ष्मीरुवाच॥ स्वामिन्मद्भगिनीज्येष्ठाभर्तृत्यागेनदुःखिता॥२४॥तामाश्वासयितुंयाहिकृपालोयद्यहंप्रिया॥सूतउवाच॥लक्ष्म्यासहततोविष्णुस्तत्रागच्छत्कृपानिधिः ॥२५॥ आश्वासयन्नलक्ष्मींतामिदंवचनमब्रवीत्॥अश्वत्थमूलमासाद्यसदाऽलक्ष्मिस्थिराभव ॥२६॥ ममांशसंभवोश्वत्थआवासस्तुमयाकृतः ॥ प्रत्यब्दंयेऽर्चयिष्यंतित्वांज्येष्ठांगृहधर्मिणः ॥२७॥ तेष्वियंश्रीःकनिष्ठातेभगिनीनिश्चलास्तुवै ॥ अंगनाभिःसदापूज्याबलिभिर्विविधैस्तदा ॥ २८ ॥

विष्णु लक्ष्मीसह तेथें आले व तिचें शांतवन करून तिला ह्मणाले ॥ २६ ॥ विष्णु ह्मणतातः—हे अलक्ष्मी ! तूं पिंपळाच्या बुंधाशीं कायम स्वस्थ बसून रहा. पिंपळ हा माझा अंशसंभव आहे, ह्मणून मीही पिंपळाजवळ वास केला आहे ॥ २७ ॥ जे गृहस्थाश्रमी दरवर्षीं तुझी ज्येष्ठेची पूजा करितील त्यांचे घरीं ही तुझी धाकटी बहीण

लक्ष्मी स्थिर वास करो ॥ २८ ॥ सर्व स्त्रियांनीं नानाप्रकारचे बळी, फुलें, धूप, इत्यादिकांनीं तुझी पूजा करावी· ह्मणजे त्यांना लक्ष्मी प्रसन्न होईल ॥ २९ ॥ ही कथा जो ऐकेल किंवा दुसऱ्याला ऐकवील, त्याचीं सर्व पापें नाहींशीं होऊन त्याला विष्णूचें सान्निध्य प्राप्त होईल ॥ ३० ॥ इति श्रीपद्मपुराणे कार्तिकमाहात्म्ये

पुष्पधूपादिभिश्चैवतासांलक्ष्मीःप्रसीदति ॥ २९ ॥ यइदंश्शृणुयाद्वापिश्रावयेद्वानरोत्तमान् ॥ सर्व पापैःप्रमुच्येतविष्णुसायुज्यमाप्नुयात् ॥ ३० ॥ इतिश्रीपद्मपुराणेकार्तिकमाहात्म्येश्रीकृष्णस त्यासंवादेज्येष्ठाख्यानंनामैकोनत्रिंशोऽध्यायः ॥ २९ ॥ ॥ सूतउवाच ॥ इतिसर्वंसमाकर्ण्य सत्राजितसुतातदा ॥ हरेर्वाक्यंमहाभागासत्यावचनमब्रवीत् ॥ १ ॥ ॥ सत्योवाच ॥ कार्तिकस्य चमाहात्म्यंनश्रुतंविस्तरात्प्रभो ॥ सर्वेषामेवमासानांकार्तिकःप्रवरःकथम् ॥ २ ॥ कृष्णउवाच ॥ साधुपृष्टंत्वयासत्येकार्तिकव्रतमादरात् ॥ शौनकायपुराप्रोक्तंसूतेनसुमहात्मना ॥ ३ ॥

एकोनत्रिंशोध्यायः ॥ २९ ॥ सूत ह्मणालेः—याप्रमाणें श्रीकृष्णाचें भाषण ऐकून भाग्यशाली सत्राजिताची कन्या सत्यभामा भाषण करूं लागली ॥ १ ॥ सत्या ह्मणालीः—हे प्रभो ! कार्तिकाचें माहात्म्य विस्तारानें ऐकिलें नाहीं· सर्व महिन्यांत कार्तिक महिनाच श्रेष्ठ कसा झाला हें मला सांगा ॥२॥ कृष्ण ह्मणतातः—सत्यभामे ! तूं कार्तिकव्रत

विचारिलेंस हें उत्तम केलेंस; पूर्वीं श्रेष्ठ सूतांनीं शौनकादिऋषींना ही कथा सांगितली आहे, ती तूं ऐक ॥ ३ ॥ सूत ह्मणालेः—हे ऋषिश्रेष्ठहो! पूर्वीं प्रश्न केला असतां शंकरांनीं कार्तिकस्वामीला जें सांगितलें आहे तें तुह्मांला सांगतों ऐका ॥४॥कार्तिकस्वामी ह्मणालेः—हे विष्णुभक्ता शंकरा ! तुह्मी मला विष्णूच्या पुष्कळ प्रिय व रहस्य कथा सांगितल्या त्या मी

सूतउवाच ॥ श्रूयतांमुनिशार्दूलएतत्प्रश्नोत्तरंशुभम् ॥ ईश्वरेणपुराप्रोक्तंपृच्छतेषण्मुखायवै ॥ ४ ॥ ॥ कार्तिकेयउवाच ॥ बहूनिपद्मनाभस्यरहस्यानिश्रुतानिच ॥ यथाहिप्रोच्यमानानिवैष्णवेनत्व याप्रभो ॥ ५ ॥ संसारसागरेप्राप्तादुःखोरुलहरींचये ॥ तेषामुत्तारणार्थायकथयस्वप्रयत्नतः ॥६॥ कार्तिकस्यविधिंचैवस्नानस्यवदतांवर ॥ येनदुःखांबुधिंतीर्त्वासंतरिष्यंतिमानवाः ॥ ७॥ फलं वैष्णवधर्मस्यकथयस्वसविस्तरम् ॥ येनधर्मप्रभावेणपदंगच्छंतिवैष्णवम् ॥ ८ ॥ दीपदानस्यमा हात्म्यंमुनिपुष्पस्यसुव्रत ॥ गोपीचंदनमाहात्म्यंतुलस्यास्तुतथाविभो ॥ ९ ॥

ऐकल्या॥५॥आतां संसारसागरामध्यें ज्या दुःखलहरी प्राप्त होतात, त्यांतून तरून पार निघण्याला कांहीं उपाय सांगा॥६॥ ज्या योगानें मनुष्यें दुःखसमुद्रांतून तरून उद्धार पावतात अशा कार्तिकमासाच्या व्रताचा व कार्तिकस्नानाचा विधि सांगा ॥७॥वैष्णवधर्माचें फल विस्तारानें सांगा कीं,ज्या धर्माच्या सामर्थ्यानें लोक वैकुंठास जातील॥८॥दीपदानाचें माहात्म्य,अग-

स्त्याच्या फुलाचें, गोपीचंदनाचें व तुळसीचें माहात्म्य सांगा ॥९॥ मालिनीफुलाचें, कमळांचें, आंवळ्याचें तसेंच दंवण्याचें, केवड्याच्या फुलाचें माहात्म्य व देवाचे नैवद्याचें व तीर्थोदकाचें माहाम्य व माघस्नानाचें फल सांगा।१०।११। तसेंच पळसाच्या पानावर भोजनाचें फल, देवाच्या आरतीचें नंदादीपाचें व दुसऱ्याचा दिवा सारण्याचें माहात्म्य सांगा ॥१२॥ पुष्कर क्षेत्राचें, व शूकर क्षेत्रांचें, शालिग्रामाचें, माहात्म्य व स्वस्तिक घालण्याचें विधान सांगा ॥ १३ ॥ दानांचें, परान्न सोडल्याचें, महिनाभर

मालिनीपुष्पमाहात्म्यंवारिजानांतथावद ॥ धात्रीफलानांमाहात्म्यंतथादमनकस्यच ॥ १० ॥ केतकीपुष्पमाहात्म्यंनैवेद्यस्यपरंतप ॥ तीर्थोदकस्यमाहात्म्यंमाघस्नानफलंविभो ॥ ११ ॥ फलंब्रूहिसुरश्रेष्ठब्रह्मपत्रेषुभोजनात् ॥ नीराजनफलंस्थाणोःपरदीपप्रबोधनात् ॥ १२ ॥ पुष्करक्षेत्रमाहात्म्यंशूकरस्यतथाविभो ॥ शालिग्रामस्यमाहात्म्यंस्वस्तिकस्यविधानकम् ॥ १३ ॥ दानानांचफलंब्रूहिपरान्नस्यचवर्जनात् ॥ मासोपवासस्यफलंखट्वायामोक्षणंविभो ॥ १४ ॥ दीपावल्याश्चमाहात्म्यंप्रबोधिन्याश्चसुव्रत ॥ पंचभीष्मस्यमाहात्म्यंकथयस्वसविस्तरात् ॥ १५ ॥ ईश्वरउवाच ॥ साधुपृष्टंत्वयावत्सलोकोद्धारणहेतवे । कथयामिनसंदेहस्त्वत्समोनास्तिवैष्णवः ॥ १६ ॥ सत्पुत्रेणत्वयावत्सतारितोहंनसंशयः ॥ निश्चलाकेशवेभक्तिस्त्वयितिष्ठतिसर्वदा ॥ १७ ॥

उपोषण केल्याचें व पलंगशयन सोडल्याचें फल सांगा ॥ १४ ॥ दीपावलीचें व प्रबोधिनीएकादशीचें व भीष्मपंचकाचें माहात्म्य, विस्तारानें कृपा करून सांगा॥१५॥ शंकर ह्मणालेः—पुत्रा ! तूं लोकांचा उद्धार व्हावा; ह्मणून फार चांगलें विचारलेंस. तुझ्यासारखा विष्णुभक्त कोणी नाहीं ह्मणून तुला हें विस्तारानें सांगतों श्रवण कर ॥ १६ ॥ तूं सत्पुत्र आहेस

ह्मणून माझा उद्धार झाला; तुझी विष्णूचे ठिकाणीं दृढ व निश्चल भक्ति आहे ॥ १७ ॥ जो ब्राह्मण मनुष्याला वैष्णवधर्म सांगतो त्या ब्राह्मणाला समुद्रवलयांकित पृथ्वीदान केल्याचें पुण्य प्राप्त होतें ॥ १८ ॥ सर्व तीर्थें व सर्व दानें यांचें पुण्य एकत्र केलें तरी, तें कार्तिक महिन्याच्या पुण्याच्या कोटि हिशानेंही बरोबरी करणार नाहीं ॥ १९ ॥ एकीकडे गोप्रदानें, दक्षिणायुक्त सर्व यज्ञ एकीकडे, पुष्करक्षेत्र, हिमालय व कुरुक्षेत्र यांचे ठिकाणीं वस्ती व ॥ २० ॥

नरेभ्योवैष्णवंधर्मंयोददातिद्विजोत्तमः ॥ ससागरमहीदानेतत्पुण्यंलभतेहिसः ॥ १८ ॥ कार्तिकस्यचमासस्यकोटयंशेनापिनार्हति ॥ एकतःसर्वतीर्थानिसर्वदानानिचैकतः ॥ १९ ॥ एकतोगोप्रदानानिसर्वेयज्ञाःसदक्षिणाः ॥ एकतःपुष्करेवासःकुरुक्षेत्रेहिमालये ॥ २० ॥ एकतोमथुरातीर्थेवाराणस्यांचसूकरे ॥ एकतःकार्तिकोवत्ससर्वदाकेशवप्रियः ॥ २१ ॥ सूतउवाच ॥ इत्युक्त्वासुनिशार्दूलपुनर्वाक्यंजगौहरः ॥ कार्तिकस्नानमाहात्म्यंकथयिष्येसुविस्तरात् ॥२२॥ ॥ ईश्वरउवाच ॥ ब्राह्मंकृतयुगंप्रोक्तंत्रेतातुक्षत्रियंयुगम् ॥ द्वापरंवैश्यमित्याहुःशौद्रंकलियुगंस्मृतम् ॥ २३ ॥

मथुरा काशी वराह या क्षेत्रांत वास हीं एकीकडे व केशवाला प्रिय असा कार्तिकमास एकटा एकीकडे; या सर्वांबरोबर आहे ॥ २१ ॥ सूत ह्मणालेः—ऋषिहो ! शंकर याप्रमाणें बोलून पुन्हा कार्तिकस्नानाचें माहात्म्य विचारानें सांगतों असें ह्मणाले ॥ २२ ॥ शंकर ह्मणालेः—कार्तिकेया ! कृतयुग ब्राह्मणाचें, त्रेतायुग क्षत्रियाचें व द्वापार युग

वैश्यांचें, आणि कलियुग शूद्रांचें असें सांगितलें आहे ॥ २३ ॥ पुत्रा ! कलीमध्यें मनुष्याला स्नानाचा आळस असतो; तरी कार्तिकस्नान व माघस्नान यांचें फल सांगतों ॥२४॥ ज्याचे हात, पाय, वाणी व मन हीं चांगलीं स्वाधीन आहेत व विद्या, तप, कीर्ति चांगलीं आहेत त्यालाच तीर्थांचें सर्व फळ मिळतें ॥ २५ ॥ ज्याला श्रद्धा नाहीं, मन पापी आहे, नास्तिक आहे, मनाचा कुचका आहे व भलतीच मनाप्रमाणें बडबड करणारा या पांचानां तीर्थांचें फल

कलौवत्समनुष्याणांशैथिल्यंस्नानकर्मणि॥तथापिकथयिष्यामिस्नानंकार्तिकमाघयोः॥२४॥ यस्यहस्तौचपादौचवाङ्मनश्चसुसंयतम् ॥ विद्यातपश्चकीर्तिश्चसतीर्थफलभाङ्नरः ॥ २५ ॥ अश्रद्दधानःपापात्मानास्तिकश्छिन्नमानसः ॥ हेतुवादीचपंचैतेनतीर्थफलभागिनः ॥ २६ ॥ प्रातरुत्थाययोविप्रस्तीर्थस्नायीसदाभवेत् ॥ सर्वपापविनिर्मुक्तःपरंब्रह्माधिगच्छति ॥ २७ ॥ स्नानंचतुर्विधंप्रोक्तंस्नानविद्भिःषडानन ॥ वायव्यंवारुणंदिव्यंब्राह्मंचेतितथास्मृतम् ॥ २८ ॥ सत्योवाच ॥ स्नानानांतुचतुर्णांतुलक्षणंवदमेप्रभो ॥ येषांविज्ञानमात्रेणस्वस्थास्थास्यामितेगृहे ॥ २९ ॥

मिळत नाहीं ॥ २६ ॥ जो ब्राह्मण प्रातःकाळीं उठून नेहमीं तीर्थांत प्रातःस्नान करितो, त्याचीं सर्व पापें नाहींशीं होऊन त्याला ब्रह्मप्राप्ति होते ॥ २७ ॥ षडानना ! ज्ञात्यानीं स्नानाचे वायव्य, वारुण, दिव्य व ब्राह्म असे चार प्रकार सांगितले आहेत ॥ २८ ॥ सत्यभामा ह्मणालीः—हे प्रभो श्रीकृष्णा ! या चार प्रकारच्या स्नानांचीं

लक्षणें सांगा; ह्मणजे तीं ऐकून मी आपले गृहांत समाधानानें राहीन ॥ २९ ॥ कृष्ण ह्मणालेः—हे प्रिये ! गाईची धुळी आंगावर येऊं देणें तें वायव्यस्नान, समुद्र नद्या इत्यादिकांच्या पाण्यानें केलेलें तें वारुणस्नान, ब्राह्मणांच्या मंत्रांनीं केलेलें ब्राह्मस्नान व पर्जन्यांत उभें राहून केलेलें तें दिव्य अथवा भास्करस्नान ॥ ३० ॥ ह्या सर्व स्नानांमध्यें वारुणस्नान श्रेष्ठ आहे । ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य यांनीं समंत्रक स्नान करावें ॥ ३१ ॥ हे षडानना ! शूद्रांनीं

॥ कृष्णउवाच ॥ ॥ वायव्यंगोरजःस्नानंवारुणंसागरादिषु ॥ ब्राह्मंब्राह्मणमंत्रोक्तंदिव्यंमेघांबुभास्करम् ॥ ३० ॥ स्नानानांचैवसर्वेषांविशिष्टंतत्रवारुणम् ॥ ब्राह्मणःक्षत्रियोवैश्योमंत्रवत्स्नानमाचरेत् ॥ ३१ ॥ तूष्णीमेवहिशूद्रस्यस्त्रीणांचैवषडानन ॥ बालाश्चतरुणावृद्धानरनारीनपुंसकाः ॥ ३२ ॥ पापैःसर्वैःप्रमुच्यंतेस्नानात्कार्तिकमाघयोः ॥ स्नातावैकार्तिकेलोकाःप्राप्नुवंतीप्सितंफलम् ॥ ३३ ॥ ॥ इति श्रीपद्मपुराणेउत्तरखण्डेकार्तिकमाहात्म्येकृष्णसत्यभामासंवादेत्रिंशोध्यायः ॥ ३० ॥ सूतउवाच ॥ पुनःप्रोवाचभगवान्महादेवोवृषध्वजः ॥ श्रोतारमुपसंगम्यभक्तियुक्तंषडाननम् ॥ १ ॥

व स्त्रियांनीं अमंत्रक स्नान करावें. बाळ, तरुण, वृद्ध असे पुरुष, स्त्रिया व नपुंसक, हे सर्व कार्तिक व माघस्नानानें सर्वपापांपासून मुक्त होतात; कार्तिकस्नान करणारे सर्व इच्छित फलाला पावतात ॥ ३२ ॥ ३३ ॥ इति श्री का. मा. त्रिंशोध्यायः ॥ ३० ॥ सूत ह्मणालेः—वृषध्वजशंकर भक्तिमान् कार्तिकस्वामीस जवळ बोलावून

पुन्हा कथन करूं लागले ॥ १ ॥ शंकर ह्मणालेः—विष्णूला प्रिय, कार्तिक महिना सर्व महिन्यांत उत्तम आहे; कलियुगांत या महिन्यामध्यें तेहतीसकोटी देव वास्तव्य करितात ॥ २ ॥ कार्तिकमहिन्यांत ब्राह्मणाला भोजन घालावें, तिल, धेनु, सोनें, रुपें, जमीन, वस्त्रें, गोप्रदानें विष्णुप्रीतीकरितां प्रेमानें देतात. सर्व दानांमध्यें कन्यादान श्रेष्ठ आहे ॥ ३ ॥ ४ ॥ जे यथाविधि ब्राह्मणाला कन्यादान देतात, त्यांना चौदा इंद्र होततोंपर्यंत वैकुंठांत वास्तव्य घडतें ॥ ५ ॥

॥ ईश्वरउवाच ॥ कार्तिकोवैष्णवोमासःसर्वमासेषुचोत्तमः ॥ अस्मिन्मासेत्रयस्त्रिंशद्देवाःसंनिहिताःकलौ ॥ २ ॥ ऊर्जेमासिमहाभागभोजनानिद्विजातये ॥ तिलधेनुंहिरण्यंचरजतंभूमिवाससी ॥ ३ ॥ गोप्रदानानिदास्यंतिसर्वभावेनसुव्रत ॥ सर्वेषामेवदानानांकन्यादानंविशिष्यते ॥ ४ ॥ ब्राह्मणायचयेकन्यांदास्यंतिविधिवन्नराः ॥ वैकुंठेवसतिस्तेषांयावदिंद्राश्चतुर्दश ॥ ५ ॥ रोमकालेतुसंप्राप्तेसोमोभुंक्तेतुकन्यकाम् ॥ रजःकालेतुगंधर्वावह्निस्तुकुचदर्शने ॥ ६ ॥ तावद्विवाहयेत्कन्यांयावन्नर्तुमतीभवेत् ॥ विवाहस्त्वष्टवर्षायाःकन्यायाःशस्यतेबुधैः ॥ ७ ॥ दातव्याश्रोत्रियायैवब्राह्मणायतपस्विने ॥ साक्षादधीतवेदायविधिनाब्रह्मचारिणे ॥ ८ ॥

लव उत्पन्न होण्याचे वेळीं कन्येचा उपभोग चंद्र घेतो, रजाचे वेळीं गंधर्व व कुचदर्शनाचे वेळीं अग्नि हे उपभोग घेतात ॥ ६ ॥ याकरितां ऋतुप्राप्तीचे पूर्वीं बारावर्षांचे आंत कन्येचा विवाह करावा. आठवे वर्षीं विवाह करणें हें सुज्ञानीं प्रशस्त मानिलें आहे ॥ ७ ॥ श्रोत्रिय, तपस्वी, विधिपूर्वक वेद पठण केलेला व ब्रह्मचारी असा ब्राह्मण पाहून

त्याला विधीनें कन्यादान करावें ॥ ८ ॥ कन्यादान करण्याचा हा मुख्य विधि आहे. याप्रमाणें दान केलें असतां, कन्येच्या आंगावर जितकीं रोमांच असतील तितके हजार वर्षें, कन्यादान करणारा रुद्रलोकीं राहतो ॥ ९ ॥ हजार गाई दानाबरोबर शंभर बैलांचें दान, दहा बैलांबरोबर एक यानदान, दहा यानांबरोबर एक अश्वदान, व हजार घोडे दिल्यापेक्षां एक हत्तीदान अधिक आहे ॥ १० ॥ ११ ॥ हजार हत्तीदानाबरोबर एक सुवर्णदान आहे

कन्यावरप्रमाणायाएषएवविधिःस्मृतः ॥ यावंतिचैवरोमाणिकन्यायास्तुतनौसुत ॥ तावद्वर्षसहस्राणिरुद्रलोकेमहीयते ॥ ९ ॥ सहस्रमेवधेनूनांशतंचानडुहांसमम् ॥ १० ॥ दशाऽनडुत्समंयानंदशयानसमोहयः ॥ हयदानसहस्रेभ्योजगदानंविशिष्यते ॥ ११ ॥ गजदानसहस्राणांस्वर्णदानंचतत्समम् ॥ स्वर्णदानसहस्राणांविद्यादानंचतत्समम् ॥ १२ ॥ विद्यादानात्कोटिगुणंभूमिदानंविशिष्यते ॥ भूमिदानसहस्रेणगोप्रदानंविशिष्यते ॥ १३ ॥ गोप्रदानसहस्रेभ्योह्यन्नदानंविशिष्यते ॥ अन्नाधारमिदंप्रोक्तंजगत्स्थावरजंगमम् ॥१४॥ तस्माद्देयंप्रयत्नेनकार्तिकेशिखिवाहन ॥ त्रीणितुल्यानिदानानिप्रवदंतिमनीषिणः ॥ १५ ॥

व हजार सुवर्णदानाबरोबर एक विद्यादान आहे ॥ १२ ॥ विद्यादानाच्या कोटीपट भूमीदानाचें पुण्य आहे व हजार भूमीदानापेक्षां गोप्रदान विशेष आहे ॥ १३ ॥ व हजार गोप्रदानांपेक्षां वेळेवर अन्नदानाचें पुण्य अधिक आहे. कारण, हें सर्व स्थावर जंगम ॥ (अचल व चल) जग अन्नाच्या आधारावर आहे ॥१४॥ याकरितां षडानना !

कार्तिकांत अन्नदान द्यावें ॥ सर्व इच्छा पूर्ण करणारी गाय, भूमि व विद्या, हीं तीन दानें सारखीं आहेत, असें विद्वान् ह्मणतात ॥१५॥ कार्तिकेय ह्मणतात–देवा ! आणखी कांहीं दुसरे धर्म सांगा; कीं जे केले असतां सर्व पापें जाऊन देवतुल्य होतो ॥ १६ ॥ सूत ह्मणालेः–याप्रमाणें विचारल्यावर शंकर कार्तिकेयाचें बहुत अभिनंदन करून

सर्वकामदुधाधेनुःपृथ्वीचैवसरस्वती ॥ ॥ कार्तिकउवाच ॥ ॥ अन्यानपिमहादेवधर्मान्मे वक्तुमर्हसि ॥ १६ ॥ यान्कृत्वासर्वपापानिप्रक्षाल्यत्रिदशोभवेत् ॥ सूतउवाच ॥ ॥ इति पृष्टस्तदाशंभुःपुनर्वक्तुंप्रचक्रमे ॥ पावकिंबहुधास्तुत्वातच्छृणुध्वंतपोधनाः ॥ १७ ॥ ईश्वर उवाच ॥ ॥ परान्नंवर्जयेद्यस्तुकार्तिकेनियमेकृते ॥ १८ ॥ परान्नवर्जनादेवलभेच्चांद्रायणंफलम् संप्राप्तंकार्तिकंदृष्ट्वापरान्नंयस्तुवर्जयेत् ॥ १९ ॥ दिनेदिनेतिकृच्छ्रस्यफलंप्राप्नोतिमानवः ॥ कार्तिकेवर्जयेत्तैलंकार्तिकेवर्जयेन्मधु ॥ २० ॥ कार्तिकेवर्जयेत्कांस्यंसंधानंचविशेषतः ॥ राक्षसीं योनिमाप्नोतिसकृन्मांसस्यभक्षणात् ॥ २१ ॥

भाषण करूं लागले तें तुह्मांला सांगतों; तर सर्व तपोधनहो ! श्रवण करा ॥१७॥ शंकर ह्मणाले;–जो कार्तिकव्रत करून परान्न सोडील, त्याला चांद्रायणव्रताचें फळ मिळेल ॥ १८ ॥ कार्तिकमास प्राप्त होतांच जो परान्न वर्ज करील त्याला दररोज अतिकृच्छ्राचें फल मिळेल ॥ १९ ॥ कार्तिकांत तेल व मध सोडावीं ॥ २० ॥ कार्तिकांत काशाचें पात्र वर्ज्य करावें

व विशेषेंकरून मद्य उत्पन्न करूं नये । कार्तिकांत जर एक वेळ मांस भक्षण केलें तर त्याला राक्षस जन्म प्राप्त होतो ॥ २१ ॥ व साठ हजार वर्षें विष्टेमध्यें दुःख भोगतो; नंतर त्यांतून निघाल्यावर विष्ठा भक्षण करणारा गांवडुकर होतो. ॥ २२ ॥ जो शाकव्रतादि भक्ष्यांचा कार्तिक महिन्यांत नियम करितो त्याला मोक्ष देणारें असें विष्णुस्वरूप व वैकुंठ प्राप्त होतें ॥ २३ ॥ कार्तिकासारखा उत्तम महिना नाहीं. केशवापेक्षां दुसरा श्रेष्ठ देव नाहीं, वेदासारखें शास्त्र

षष्ठिवर्षसहस्राणिविष्ठायांपरिपच्यते ॥ तन्मुक्तोजायतेपापोविष्ठाशीग्रामशूकरः ॥ २२ ॥ प्रवृत्ता नांतुभक्ष्याणांकार्तिकेनियमेकृते ॥ अवश्यंविष्णुरूपत्वंप्राप्यतेमोक्षदंपदम् ॥ २३ ॥ नकार्तिक समोमासोनदेवःकेशवात्परः ॥ नवेदसदृशंशास्त्रंनतीर्थंगंगयासमम् ॥ २४ ॥ नसत्येनसमंवृत्तंन कृतेनसमंयुगम् ॥ नतृप्तोरशनात्तुल्यानदानसदृशंसुखम् ॥ २५ ॥ नधर्मसदृशंमित्रंनज्योतिश्च क्षुषासमम् ॥ २६ ॥ अव्रतेनक्षपेद्यस्तुमासंदामोदरप्रियम् ॥ कर्मभ्रष्टःसविज्ञेयोहीनयोनिषुजा यते ॥ कार्तिकःप्रवरोमासोवैष्णवानांसदाप्रियः ॥ २७ ॥

नाहीं. व गंगेसारखें तीर्थ नाहीं ॥ २४ ॥ सत्याप्रमाणें दुसरें श्रेष्ठ वर्तन नाहीं, कृतयुगासारखें दुसरें युग नाहीं, भोज-नासारखी तृप्ति नाहीं व दानासारखें सुख नाहीं ॥२५॥ धर्मासारखा मित्र नाहीं व नेत्रासारखें दुसरें तेज नाहीं ॥ २६ ॥ जो दामोदराला प्रिय असा कार्तिकमास व्रतावांचून घालवील ॥ २६ ॥ तो कर्मभ्रष्ट समजावा व तो नीच योनींत

जन्म पावेल; कार्तिकमास हा श्रेष्ठ ह्मणून वैष्णवांना सदा प्रिय आहे ॥ २७ ॥ समुद्राला मिळणारी पुण्य नदी स्नानाला मिळणें दुर्लभ, उत्तम कुलशीलाची कन्या बायको करण्यास मिळालेलें दांपत्य दुर्लभ ॥ २८ ॥ आई व विशेषतः बाप यांचें फार दिवस सुख मिळणें दुर्लभ, साधूंचा सत्कार दुर्लभ, व धर्मशील पुत्र दुर्लभ ॥ २९ ॥ द्वारकेंत राहण्यास मिळणें दुर्लभ, कृष्णाचें दर्शन दुर्लभ, गोमतीचें स्नान दुर्लभ व कार्तिकाचें व्रत दुर्लभ आहे ॥ ३० ॥

समुद्रगानदीपुण्यादुर्लभास्नानशालिनाम् ॥ कुलशीलवतीकन्यादुर्लभादंपतोन्नृणाम् ॥ २८ ॥ दुर्लभाजननीलोकेपिताचैवविशेषतः ॥ दुर्लभंसाधुसन्मानंदुर्लभोधार्मिकःसुतः ॥ २९ ॥ दुर्लभोद्वारिकावासोदुर्लभंकृष्णदर्शनम् ॥ दुर्लभंगोमतीस्नानंदुर्लभंकार्तिकव्रतम् ॥ ३० ॥ ब्राह्मणेभ्योमहींदत्त्वाग्रहणेसूर्यचंद्रयोः ॥ यत्फलंलभतेवत्सतत्फलंभूमिशायिनः ॥ ३१ ॥ भोजनंद्विजदंपत्योःपूजयेच्चविलेपनैः ॥ कंबलानिचरत्नानिवासांसिविविधानिच ॥ ३२ ॥ तूलिकाश्चप्रदातव्याःप्रच्छादनपटैःसह ॥ उपानहावातपत्रंकार्तिकेदेहिपावके ॥ ३३ ॥

हे कार्तिकेया ! चंद्र व सूर्यग्रहणामध्यें ब्राह्मणाला भूमीदान दिल्याचें जें पुण्य तें कार्तिकांत भूमीवर निजल्यानें मिळतें ॥ ३१ ॥ ब्राह्मणांचे दंपत्यास भोजन घालावें व त्याचें अंगाला चंदन लावून पूजन करावें, शालजोड्या, रत्नें, व नानाप्रकारचीं वस्त्रें ॥ ३२ ॥ अभ्र्यासह गाद्या, जोडा, व छत्री हीं दानें, हे कार्तिकेया! तूं कार्तिकांत दान दे ॥ ३३॥

जो मनुष्य कार्तिक महिन्यांत पानावर भोजन करितो, तो चौदा इंद्र होईत तोंपर्यंत दुर्गतीला जात नाहीं ॥ ३४ ॥ पळसाच्या पानावर जेवलें असतां सर्व मनोरथ पूर्ण होऊन सर्व तीर्थांचें फळ मिळतें व तो कधींही नरक पाहणार नाहीं ॥ ३५ ॥ पळस साक्षात् ब्रह्मदेव आहे ह्मणून सर्व मनोरथ पूर्ण करणारा आहे. हे कार्तिकेया !कार्तिक महिन्यांत

यःकरोतिनरोनित्यंकार्तिकेपत्रभोजनम् ॥ नदुर्गतिमवाप्नोतियावदिंद्राश्चतुर्दश ॥ ३४ ॥ सर्वकामफलंतस्यसर्वतीर्थफलंलभेत् ॥ नचापिनरकंपश्येद्ब्रह्मपत्रेषुभोजनात् ॥ ३५ ॥ ब्रह्माएषःस्मृतःसाक्षात्पालाशःसर्वकामदः ॥ मध्यमंवर्जयेत्पत्रंकार्तिकेशिखिवाहन ॥ ३६ ॥ ब्रह्माविष्णुश्चरुद्रश्चत्रयोदेवास्त्रिपत्रके ॥ ऐश्वरंवर्जयेत्पत्रंब्रह्माविष्णुरनुत्तमम् ॥ ३७ ॥ सर्वपुण्यमवाप्नोतिशेषपत्रेषुभोजनात् ॥ भोजनान्मध्यपत्रेतुकपिलापयसस्तथा ॥ ३८ ॥ प्राशनान्मुनिशार्दूलनरोनरकमाप्नुयात् ॥ अज्ञानाद्भजतेयस्तुशूद्रोवाकपिलापयः ॥ ३९ ॥

त्याचें मध्यम पान वर्ज्य करावें ॥३६॥ ब्रह्मा, विष्णु व शंकर असे तीन देव तीन पानावर आहेत; त्यांत शंकराचें मधलें पान वर्ज्य करावें ॥३७॥ बाकी ब्रह्मा व विष्णूच्या पत्रावर भोजन केलें असतां सर्व पुण्य प्राप्त होतें. शूद्रानीं मधल्या पानावर भोजन व कपिला गाईचें दूध प्राशन केलें असतां नरक प्राप्त होतो ॥ ३८ ॥ जर शूद्र न समजून

कपिला गाईचें दूध प्याला॥३९ ॥तर त्यानें ब्राह्मणाला कपिला गाय दान द्यावी,ह्मणजे शुद्ध होतो॥४०॥ तिळांचें दान, नदीचें स्नान, नेहमीं साधूचें दर्शन व पळसाच्या पानावर भोजन, हीं कार्तिकांत मुक्ति देणारीं आहेत ॥ ४१ ॥ कार्तिकांत मौन धरून पळसाच्या पानावर भोजन करणें तीळ लावून स्नान करणें व नेहमीं क्षमावान् असणें, भुईवर निजणें यांपासून एक युगाचें पाप नाहींसें होतें ॥ ४२ ॥ कार्तिकांत अरुणोदयाचे वेळीं जो विष्णूपुढें हरिजागर करितो, त्याला

कपिलांब्राह्मणेदत्त्वाशुद्धोभवतिकार्तिक ॥ ४० ॥ तिलदानंनदीस्नानंसर्वदासाधुदर्शनम् ॥
भोजनंब्रह्मपत्रेषुकार्तिकेमुक्तिदायकम् ॥४१॥ मौनीपालाशभोजीचतिलस्नायीसदाक्षमी ॥
कार्तिकेक्षितिशायीचहन्यात्पापंयुगार्जितम् ॥४२॥ जागरंकार्तिकेमासियःकरोत्यरुणोदये ॥
दामोदराग्रेसेनानीर्गोसहस्रफलंलभेत् ॥४३॥ पितृपक्षेन्नदानेनज्येष्ठाषाढेचवारिणा ॥ कार्तिके
तत्फलंतेषांपरदीपप्रबोधनात् ॥ ४४ ॥ बोधनात्परदीपस्यवैष्णवानांचसेवनात् ॥ कार्तिकेफल
माप्नोतिराजसूयाश्वमेधयोः ॥ ४५ ॥

हे षडानना ! हजार गाईदान केल्याचें फळ मिळतें ॥ ४३ ॥ पितृपक्षांत अन्न दान दिल्यानें व ज्येष्ठ आषाढ मासीं अर्थात् उन्हाळ्यांत उदक दिल्यानें जें पुण्य मिळतें, तितकेंच कार्तिकांत नंदादीप लावल्यानें फळ मिळतें ॥ ४४ ॥ दुसऱ्याचा नंदादीप उजळणें व वैष्णवांची सेवा करणें हीं कार्तिकांत अश्वमेध व राजसूय यज्ञांचें फळ देणारीं होतात ॥ ४५ ॥

नदीचें स्नान करणें, विष्णूच्या कथा ऐकणें व वैष्णवांचें दर्शन हीं ज्याला कार्तिकांत घडत नाहींत त्याचें दहा वर्षांचें पुण्य जातें ॥ ४६ ॥ कार्तिकमहिन्यांत जो ज्ञानी कर्मानें, मनानें व वाचेनें, पुष्कराचें स्मरण करील, तर त्याला लक्षकोटीपट पुण्य प्राप्त होतें ॥४७॥ माघमासीं प्रयागांत, कार्तिकांत पुष्कर तीर्थांत तसेंच वैशाखांत उज्जयिनी येथें स्नानदानादि केल्यानें एक युगाचें पातक नाहींसें होतें॥४८॥हे स्कंदा! जे मनुष्य नित्य भक्तीनें विशेषतः या कलिकालांत हरीचें

नदीस्नानंकथाविष्णोर्वैष्णवानांचदर्शनम् ॥ नभवेत्कार्तिकेयस्यहरेत्पुण्यंदशाब्दिकम् ॥ ४६ ॥
पुष्करंयःस्मरेत्प्राज्ञःकर्मणामनसागिरा ॥ कार्तिकेमुनिशार्दूललक्षकोटिगुणंभवेत् ॥ ४७ ॥
प्रयागेमाघमासेतुपुष्करंकार्तिकेतथा ॥ अवंतीमाधवेमासिहन्यात्पापंयुगार्जितम् ॥ ४८ ॥
धन्यास्तेमानवालोकेकलिकालेविशेषतः ॥ येकुर्वंतिस्कंदनित्यंप्रीत्यर्थंहरिपूजनम् ॥ ४९ ॥
किंदत्तैर्बहुभिःपिंडैर्गयाश्राद्धादिभिःसुत ॥ तारितास्तेनपितरोनरकान्नसंशयः ॥ ५० ॥ क्षीरा
दिस्नपनंविष्णोःक्रियतेपितृकारणात् ॥ कल्पकोटिंदिवंप्राप्यवसंतित्रिदिवैःसह ॥ ५१ ॥

पूजन करितात ते धन्य आहेत॥४९॥गयेमध्यें पिंड देऊन अथवा श्राद्धादिक करून काय करावयाचें? ज्यानें कार्तिकांत हरीचें पूजन केल्यानेंच आपले पितर नरकापासून तारिले असेंच निःसंशय समजावें ॥ ५० ॥ आपल्या पितरांच्या संतोषाकरितां जे विष्णूला दुग्धादिकांनीं स्नान घालितात, ते कोटिकल्पपर्यंत स्वर्गांत जाऊन देवांसह राहतात ॥५१॥

ज्यांनीं कार्तिकमहिन्यांत कमलनेत्र कृष्णाची पूजा कमळानीं केली नाहीं, त्यांचे घरांत कोटीजन्मपर्यंत लक्ष्मी वास करणार नाहीं ॥ ५२ ॥ अहो ! ज्यांनीं भक्तीनें पांढऱ्या, काळ्या किंवा तांबड्या कमळांनीं हरीची पूजा केली नाहीं ते फसले व ते नाश पावून कलीच्या गुहेमध्यें पडले असें समजावें ॥ ५३ ॥ जो एका कमळानें कमलापति हरीची पूजा करील, तो आपलें दहाहजार वर्षांचें पातक नाहींसें करील ॥ ५४ ॥ विष्णूची एका कमळानें पूजा करून

कार्तिकेनार्चितोयैस्तुकमलैःकमलेक्षणः ॥ जन्मकोटिषुविप्रेंद्रनतेषांकमलागृहे ॥ ५२ ॥ अहो मुष्टाविनष्टास्तेपतिताःकलिकंदरे ॥ यैर्नार्चितोहरिर्भक्त्याकमलैरसितैःसितैः ॥५३॥ पद्मेनैकेनदेवेसंयोर्चयेत्कमलापतिम् ॥ वर्षायुतसहस्रस्यपापस्यकुरुतेक्षयम् ॥ ५४ ॥ अपराधसहस्राणितथा सप्तशतानिच ॥ पद्मेनैकेनदेवेशःक्षमतेप्रणतोर्चितः ॥ ५५ ॥ तुलसीपत्रलक्षेणकार्तिकेयोर्चयेद्धरिम् ॥ पत्रेपत्रेमुनिश्रेष्ठमौक्तिकंलभतेफलम् ॥ ५६ ॥ तुलसीगंधमिश्रंतुयत्किंचित्क्रियतेसुत ॥ कल्पकोटिसहस्राणिप्रीतोभवतिकेशवः ॥ ५७ ॥

नमस्कार केला असतां विष्णु त्याचे एक हजार सातशें अपराधांची क्षमा करितात ॥५५॥ जो कार्तिकमहिन्यांत लक्ष तुलसीपत्रांनीं विष्णूची पूजा करील त्याला दर पत्राला एक एक मोतीं वाहिल्याचें फळ मिळतें ॥५६॥ देवाला अर्पण करण्याचे जलादि पदार्थ तुलसीनीं सुगंधित करून अर्पण केले असतां, त्यानें हजारों कोटी कल्पपर्यंत विष्णु संतुष्ट होतो

॥ ५७ ॥ हे स्कंदा ! जो कृष्णाला वाहून काढलेल्या तुळसी आपल्या मुखांत, मस्तकावर व देहावर प्रीतीनें धारण करील त्याला कलि स्पर्श करणार नाहीं ॥५८॥ हे षण्मुखा ! विष्णूवरच्या तीर्थादिनिर्माल्यानें जो आपलें शरीर परिमार्जन करील, तो सर्व रोगांपासून व पापांपासून मुक्त होतो ॥ ५९ ॥ विष्णूचे निर्माल्याचा ज्याचे आंगाला स्पर्श

मुखेशिरसिदेहेतुकृष्णोत्तीर्णांतुयोवहेत् ॥ तुलसींषण्मुखप्रीत्यानतस्यस्पृशतेकलिः ॥ ५८ ॥ कृष्णोत्तीर्णैस्तुनिर्माल्यैर्योगात्रंपरिमार्जयेत् ॥ सर्वरोगैस्तथापापैर्मुक्तोभवतिषण्मुख ॥ ५९ ॥ विष्णोर्निर्माल्यशेषेणयस्यांगंस्पृशतेसुत ॥ दुरितानिविनश्यंतिव्याधयोपिचखंडशः ॥ ६० ॥ शंखोदकंहरेर्भक्तिर्निर्माल्यंपादयोर्जलम् ॥ चंदनंधूपशेषंचब्रह्महत्यापहारकम् ॥ ६१ ॥ इतिश्रीपद्मपुराणेउत्तरखण्डेकार्तिकमाहात्म्येश्रीकृष्णसत्यभामासंवादेप्रश्नोत्तरंनामैकत्रिंशोध्यायः ॥ ३१ ॥ ईश्वरउवाच ॥ ॥ माघस्नानस्यमाहात्म्यंश्रृणुभागवतोत्तम ॥ त्वत्समोनास्तिलोकेस्मिन्विष्णुभक्तोमहामतिः ॥ १ ॥

होईल, त्याचीं पापें व व्याधि छिन्नभिन्न होऊन नाश पावतात ॥ ६० ॥ शंखोदक, विष्णूची भक्ति, निर्माल्य व शालिग्रामाचें तीर्थ, गंध व अंगारा हीं ब्रह्महत्या नाहींशी करणारीं आहेत॥६१॥इतिश्रीपद्मपुराणे उ० खंडे कार्तिकमा० एकत्रिंशोध्यायः॥३१॥ शंकर म्हणालेः—हे वैष्णवोत्तमा स्कंदा ! तुझ्यासारखा विष्णुभक्त या लोकांत कोणी नाहीं. आतां तुला माघस्नानाचें

माहात्म्य सांगतों ऐक ॥१॥ चक्रतीर्थीं हरीचें दर्शन व मथुरेमध्यें केशवाचें दर्शन घेतल्यानें जेवढें पुण्य प्राप्त होतें तेवढेंच पुण्य माघस्नान केल्यानें प्राप्त होतें॥ २ ॥इंद्रियें जिंकून शांतमनानें व सदाचरणानें जो माघमहिन्यांत प्रातःस्नान करितो, तो पुन्हा मृत्युसंसारांत पडणार नाहीं॥ ३ ॥ कृष्ण ह्मणालेः—शूकरक्षेत्राचें माहात्म्य तुला सांगतों श्रवण कर- ज्याचे

चक्रतीर्थेहरिंदृष्ट्वामथुरायांचकेशवम् ॥ यत्फलंलभतेमर्त्योमाघस्नानेनतत्फलम् ॥ २ ॥ जितेन्द्रियःशांतमनाःसदाचारेणसंयुतः ॥ स्नानंकरोतियोमाघेसंसारीनभवेत्पुनः ॥ ३ ॥ ॥ श्रीकृष्णउवाच ॥ ॥ शूकरस्यचमाहात्म्यंकथयिष्येतवाग्रतः ॥ यस्यविज्ञानमात्रेणसांनिध्यंममसर्वदा ॥ ४ ॥ ॥ सूतउवाच ॥ ॥ इत्युक्त्वाभगवान्कृष्णःसत्यायैबहुधाजगौ ॥ तदहंसंप्रवक्ष्यामितच्छृणुध्वंतपोधनाः ॥ ५ ॥ ॥ श्रीकृष्णउवाच ॥ ॥ पंचयोजनविस्तीर्णेशूकरेममर्मंदिरे ॥ अस्मिन्वसतियोदेविगर्दभोपिचतुर्भुजः ॥ त्रीणिहस्तसहस्राणित्रीणिहस्तशतानिच ॥ ६ ॥ त्रयोहस्ताःशूकरस्यपरिमाणंविधीयते ॥ षष्टिवर्षसहस्राणियोन्यत्रकुरुतेतपः ॥ तत्फलंलभतेदेविप्रहरार्धेनशूकरे ॥ ७ ॥

ज्ञानानें माझी प्राप्ति सर्वदा होते ॥ ४ ॥ सूतं ह्मणालेः—कृष्णांनीं याप्रमाणें बोलून सत्यभामेला सांगितलें, तें तुह्माला सांगतों; सर्व ऋषिहो ! ऐका ॥५॥ श्रीकृष्ण ह्मणाले—शूकरक्षेत्र पांच योजनें विस्तीर्ण असून त्यांत माझें मंदीर आहे. हे देवि ! त्या क्षेत्रांत राहणारा गर्दभ असला तरी मुक्त होऊन चतुर्भुज होतो ॥६॥ तीन हजार हात लांब व तीनशें तीन हात

रुंद असें शूकरक्षेत्राचें परिमाण आहे ॥७॥ साठ हजार वर्षें दुसरे ठिकाणीं तप केल्यानें मिळणारें फळ, शूकर क्षेत्रांत अर्धे प्रहर तप केल्यानें मिळतें ॥ ८ ॥ सूर्यग्रहणाचे वेळीं कुरुक्षेत्रामध्यें तुलापुरुषदान केल्यानें जें फळ मिळतें, त्याचे दसपट काशींत मिळतें व शंभरपट कृष्णवेणीतीरीं मिळतें ॥ ९ ॥ व हजारपट फल गंगा व समुद्र यांचे संगमीं मिळतें व शूकर क्षेत्रांत माझे मंदिरांत अनंतपट फल मिळतें ॥ १० ॥ इतरठिकाणीं लक्षदान दिलें असतां जें पुण्य, तें शूकरक्षेत्रीं

संनिहत्यांकुरुक्षेत्रेराहुग्रस्तेदिवाकरे ॥ ८ ॥ तुलापुरुषदानेनयत्फलंपरिकीर्तितम् ॥ काश्यांदशगुणंप्रोक्तंवेण्यांशतगुणंभवेत् ॥ ९ ॥ सहस्रगुणितंप्रोक्तंगंगासागरसंगमे ॥ अनंतंदेविविज्ञेयंशूकरेममर्मंदिरे ॥ अन्यत्रददतेलक्षंसविधानेनभामिनि ॥ १० ॥ इहैवैकेनदत्तेनशूकरेतत्समंभवेत् ॥ शूकरेचतथावेण्यांगंगासागरसंगमे ॥ ११ ॥ सकृदेवनरःस्नात्वाब्रह्महत्यांव्यपोहति ॥ अलर्केणपुराप्राप्तासप्तद्वीपावसुंधरा ॥ १२ ॥ शूकरक्षेत्रमाहात्म्यंश्रुत्वाचैवषडानन ॥ मार्गशीर्षस्यद्वादश्यांशुक्लायांत्रजपुत्रक ॥ १३ ॥ इति श्रीपद्मपुराणेउत्तरखण्डेकार्तिकमाहात्म्येश्रीकृष्णसत्यभामासंवादेप्रश्नोत्तरंनामद्वात्रिंशोध्यायः ॥ ३२ ॥

एकदा दान दिल्यानें मिळतें ॥ ११ ॥ शूकरक्षेत्रांत, तसेंच कृष्णवेणीतीर्थांत व गंगासागरसगमांत, मनुष्यानें एक वेळ स्नान केलें तरी ब्रह्महत्येचें पातक नाहींसें होतें ॥ १२ ॥ षडानना ! अलर्कानें शूकरक्षेत्राचें माहात्म्य ऐकलें, ह्मणून त्याला सर्व पृथ्वीचें राज्य मिळालें; करितां हे षडानना ! तूं मार्गशीर्ष शुद्ध द्वादशीला

तेथें जा ॥ १३ ॥ इति कार्तिकमाहात्म्ये द्वात्रिंशोऽध्यायः ॥ ३२ ॥ सूत ह्मणालेः—ऋषिहो ! षडानन असें शंकराचें भाषण ऐकून पुन्हा शालग्रामाच्या पूजेचें माहात्म्य शंकरास विचारूं लागला, ती कथा ऐका ॥१॥ कार्तिकेय ह्मणालाः—हे योगिश्रेष्ठ ! देवा, मी सर्व धर्म आपले मुखांतून ऐकले; हे प्रभो ! आतां शालग्रामाच्या पूजेचें माहात्म्य

॥ सूतउवाच ॥ ॥ इतिवाक्यंसमाकर्ण्यपुनःपप्रच्छपावकिः ॥ शालग्रामार्चनंभूयस्तच्छृणुध्वं तपोधनाः ॥ १ ॥ ॥ कार्तिकेयउवाच ॥ ॥ भगवन्योगिनांश्रेष्ठसर्वेधर्माःश्रुतामया ॥ शालग्रामार्चनंब्रूहिविस्तरेणममप्रभो ॥ २ ॥ ॥ ईश्वरउवाच ॥ ॥ साधुसाधुमहाप्राज्ञयन्मांत्वंपरिपृच्छसि ॥ तदहंसंप्रवक्ष्यामिश्रूयतांममवत्सल ॥३ ॥ शालग्रामशिलायांतुत्रैलोक्यंसचराचरम् ॥ महाशयमहासेननित्यंतिष्ठतिसंहितम् ॥४॥ दृष्टंप्रणमितंयेनस्नापितंपूजितंतथा ॥ यज्ञकोटिसमंपुण्यंगवांकोटिफलंलभेत् ॥ ५ ॥

विस्तारानें मला सांगा ॥ २ ॥ शंकर ह्मणाले—हें तूं फार चांगलें विचारलेंस; हे प्रियपुत्रा ! तें तुला सांगतों श्रवण कर ॥ ३ ॥ हे महासेना ! शालग्रामशिलेमध्यें हें सर्व स्थावरजंगमासह त्रैलोक्य सर्वदा भरून असतें ॥ ४ ॥ शालग्रामाचें दर्शन, त्याला नमस्कार, अभिषेक व त्याची पूजा ज्यानें केली त्याला कोटी यज्ञांचें व कोटी

गाई दिल्याचें पुण्य प्राप्त होतें ॥ ५ ॥ ज्यानें विष्णुरूपी शालग्रामाचें तीर्थ प्राशन केलें, त्यानें आपला भयंकर गर्भवास नाहींसा केला ॥ ६ ॥ जो भक्तिभावाखेरीज फलाची इच्छा धरूनही शालग्रामाची पूजा करील, तोही विष्णुरूप होऊन मुक्त होईल ॥ ७ ॥ शालग्राम व शिवाचें लिंग यांचें स्मरण, कीर्तन, ध्यान, पूजा व नमस्कार करणाराचें कोटीहत्यांचें पाप नाहींसें होतें ॥ ८ ॥ सिंहाला पाहून जसे मृग अरण्यांत पळत सुटतात, तसे शालग्रामाचें दर्शन

छिन्नस्तेनतथावत्सगर्भवासःसुदारुणः ॥ पीतंयेनसदाविष्णोःशालग्रामशिलाजलम् ॥ ६ ॥
कामासक्तोप्रियोनित्यंभक्तिभावविवर्जितः ॥ शालग्रामशिलांवत्सपूजयित्वाऽच्युतोभवेत् ॥७॥
शालग्रामंशिवंलिंगंहत्याकोटिविनाशनम् ॥ स्मृतंसंकीर्तितंध्यातंपूजितंचनमस्कृतम् ॥ ८ ॥
शालग्रामशिलांदृष्ट्वायांतिपापान्यनेकशः ॥ सिंहंदृष्ट्वायथायांतिवनेमृगगणाभयात् ॥ ९ ॥
नमस्कारंतुमनुजःशालग्रामशिलार्चने ॥ भक्त्यावायदिवाऽभक्त्याकृत्वामुक्तिमवाप्नुयात् ॥ १० ॥
वैवस्वतभयंनास्तितथामरणजन्मनोः ॥ यःकरोतिनरोनित्यंशालग्रामशिलार्चनम् ॥ ११ ॥
गंधपाद्यार्घ्यनैवेद्यैर्दीपैर्धूपैर्विलेपनैः ॥ गीतैर्वाद्यैस्तथास्तोत्रैःशालग्रामशिलार्चनम् ॥ १२ ॥

घडतांच सर्व पापें दूर जातात ॥ ९ ॥ मनुष्यानें शालग्रामाला भक्तीनें किंवा भक्तीवांचूनही पूजासमयीं नमस्कार केला असतां त्याला मुक्ति प्राप्त होते ॥ १० ॥ जो नित्य शालाग्रामाची पूजा करितो, त्याला यमाचें व जन्ममरणांचें भय नाहीं ॥ ११ ॥ जो मनुष्य, या कलीमध्यें मोठ्या भक्तीनें गंध, पाद्य, अर्घ्य, नैवेद्य, धूप, दीप, उटी, गायन, वाद्य व

स्तोत्र इत्यादि उपचारांनीं शालग्रामाची पूजा करितो, तो सहस्रकोटी कल्पपर्यंत विष्णूच्या वैकुंठलोकांत आनंदानें राहतो ॥ १२ ॥ १३ ॥ मनुष्य अभक्तीनें जरी शालग्रामाला नमस्कार करील, तरी तो पृथ्वीवर मनुष्यजन्माला येणार नाहीं ॥ १४ ॥ हे स्कंदा ! जे माझे भक्त माझ्या भक्तीनें गर्विष्ठ होऊन पापानें मोह पावलेले असे, माझा प्रभु

कुरुतेमानवोयस्तुकलौभक्तिपरायणः ॥ कल्पकोटिसहस्राणिरमतेविष्णुसद्मनि ॥ १३ ॥ शालग्रामनमस्कारोभावेनापिनरैःकृतः ॥ मानुषत्वंकथंतेषांमद्भक्तायेनराभुवि ॥ १४ ॥ मद्भक्तितीव्रगर्विष्ठामत्प्रभुंननमंतिये ॥ वासुदेवंनतेज्ञेयामद्भक्ताःपापमोहिताः ॥ १५ ॥ मद्भक्तोपिचयोभूत्वाभुंक्तेह्येकादशीदिने ॥ सयातिह्यंधतामिस्रनिरयंममघातकः ॥ १६ ॥ मल्लिंगस्पर्शनंकार्यंनान्याशुद्धिर्विधीयते ॥ यातिथिर्दयिताविष्णोःसातिथिर्ममवल्लभा ॥ १७ ॥ यस्तांनोपवसेन्मर्त्यःसपापीश्वपचाधिकः॥शालग्रामशिलायांतुसदापुत्रवसाम्यम् ॥ दत्तंदेवेनतुष्टेनस्वस्थानंममभक्तितः॥१८॥

जो वासुदेव त्याला नमस्कार करणार नाहींत ते खास माझे भक्त नव्हेत असें समजावें॥१५॥जो माझा भक्त होऊन एकादशीला भोजन करील, तो माझा द्वेषी होऊन अंधतामिस्र नरकाला जाईल ॥१६॥ त्यानें माझे लिंगाला स्पर्श करावा; ह्या खेरीज त्याला शुद्धि नाहीं ॥ जी तिथि विष्णूला प्रिय, ती एकादशी तिथि मला प्रिय आहे ॥१७॥ त्या एकादशी तिथीला उपवास करणार नाहीं, तो चांडाळापेक्षांही अधिक पापी समजावा; हे पुत्रा ! मी सर्वदा शालग्रामशिलेमध्यें वास करितों; विष्णूनें संतुष्ट होऊन माझ्या भक्तीकरितां मला आपलें स्थान दिलें ॥ १८ ॥ हजार कोटी कमळांनीं माझी पूजा केली असतां जें फळ मिळतें, त्याच्या कोटीपट फळ शालग्रामाची पूजा केल्यानें प्राप्त होतें ॥ १९ ॥ ज्या मनुष्यांनीं या मृत्युलोकांत शाळिग्रामाची पूजा केली नाहीं त्यांचा नमस्कार व पूजा मी घेत नाहीं ॥ २० ॥

पद्मकोटिसहस्रैस्तुपूजितेमयियत्फलम् ॥ तत्फलंकोटिगुणितंशालग्रामशिलार्चनात् ॥ १९ ॥ पूजितोहंनतैर्मर्त्यैर्नमितोहंनतैर्नरैः ॥ नकृतंमर्त्यलोकेयैःशालग्रामशिलार्चनम् ॥ २० ॥ शालग्रामशिलाग्रेतुयःकरोतिममार्चनम् ॥ तेनार्चितोहंसेनानीर्युगानामेकविंशतिम् ॥ २१ ॥ किमर्चितैर्लिंगशतैर्विष्णुभक्तिविवर्जितैः ॥ शालग्रामशिलाबिंबंनार्चितंयदिपुत्रक ॥ २२ ॥ अनर्हंममनैवेद्यंपत्रंपुष्पंफलंजलम् ॥ शालग्रामशिलाग्रेतुसर्वंयातिपवित्रताम् ॥ २३ ॥ भुक्त्वान्यदेवनैवेद्यंद्विजश्चांद्रायणंचरेत् ॥ भुक्त्वाकेशवनैवेद्यंकोटियज्ञफलंलभेत् ॥ २४ ॥

शालिग्रामशिलेचे पुढें जे माझी पूजा करितात, त्यांना एकवीस युगें माझी पूजा केल्याचें फळ मिळतें ॥ २१ ॥ हे स्कंदा ! शालिग्रामाची पूजा न करितां त्यानीं विष्णूचे भक्तीखेरीज शेंकडों लिंगांची पूजा केली तरी त्याचें फळ काय मिळणार ॥ २२ ॥ माझीं नैवेद्य, पत्र, पुष्प, फल, उदक हीं स्वतंत्र ग्राह्य नाहींत. शालग्रामशिलेचे पुढें मला अर्पण केली तर सर्व पवित्र होतात ॥ २३ ॥ ब्राह्मणांनीं इतर देवांचा नैवेद्य भक्षण केला तर चांद्रायण प्रायश्चित

करावें. विष्णूचा नैवेद्य भक्षण केला तर कोटीयज्ञांचें फल मिळतें ॥ २४ ॥ विष्णूचें पादोदकतीर्थ घेतल्यानें कोटि-हत्या घडल्या असल्या तरी ते शुद्ध होतात. तसाच शंखोदकानेंही शुद्ध होतो ॥ २५ ॥ जो शंकरभक्त होऊन विष्णूची पूजा करीत नाहीं, तो दुष्ट चौदा इंद्र होत तोंपर्यंत नरकांत जातो ॥ २६ ॥ ज्याच्या घरीं सन्यासी एक मुहूर्त राहील, त्याचे पितर आठयुग अमृत भक्षण करणारे असे होतील ॥ २७ ॥ कृष्णाची आराधना न करणारे

पादोदकेनदेवस्यहत्याकोटिसमन्विताः ॥ शुध्यंतिनात्रसंदेहस्तथाशंखोदकेनहि ॥२५॥ योहि माहेश्वरोभूत्वावैष्णवंनचपूजयेत् ॥ द्वेष्टासयातिनरकंयावदिंद्राश्चतुर्दश ॥२६॥ ज्येष्ठाश्रमीगृहे यस्यमुहूर्तमपिविश्रमेत् ॥ पितामहयुगान्यष्टौभवंत्यमृतभोजिताः ॥२७॥ संसारदुःखकांतारे निमज्जंतिनराधमाः ॥ वर्षकोटिसहस्राणिकृष्णाराधनवर्जिताः ॥ २८ ॥ सकृदभ्यर्चितैर्लिंगैः शालग्रामसमुद्भवैः ॥ मुक्तिंप्रयान्तिमनुजायोगसांख्येनवर्जिताः ॥२९ ॥ मल्लिंगकोटिभिर्दृष्टैर्य त्फलंपूजितैःस्तुतैः ॥ शालग्रामशिलायांतुएकेनापीहतद्भवेत् ॥३०॥ द्वादशैवशिलायोवैशाल ग्रामसमुद्भवाः ॥ अर्चयेद्वैष्णवोनित्यंतस्यपुण्यंनिबोधमे ॥ ३१ ॥

नराधम या दुःखमय अरण्यांत हजार कोटी वर्षें गोंधळून जातील ॥ २८ ॥ एकदाच शालग्राम शिलेच्या लिंगाची पूजा केली, तर त्या मनुष्यानां सांख्ययोगाचे मेहनतीखेरीज मुक्ति प्राप्त होत्ये ॥ २९॥ माझ्या कोटिलिंगांचें दर्शन व पूजा केल्यानें जें फळ, मिळतें तें एका शालग्रामाची पूजा व दर्शन यानीं प्राप्त होतें॥३०॥जो विष्णुभक्त नित्य बारा शाल-

ग्रामांची पूजा करील, त्याचें पुण्य फल ऐक ॥ ३१ ॥ हजार कोटिलिंगें भागीरथीच्या तीरीं पूजिल्याचें व आठयुगें काशीवास केल्याचें जें फळ तें त्याला एका दिवसांत मिळतें ॥ ३२॥ मग जो वैष्णव पुष्कळ दिवस शालग्रामाची पूजा करील, त्या वैष्णवाचे पुण्याची संख्या करण्याला मी व ब्रह्मादिक देव समर्थ नाहींत॥ ३३ ॥ यासाठीं हे पुत्रा! माझ्या भक्तांनीं माझ्या प्रीतीकरितां शालग्रामाची भक्तीनें पूजा करून माझी पूजा करावी ॥ ३४ ॥ शालग्राम

कोटिलिंगसहस्रैस्तुपूजितैर्जाह्नवीतटे ॥ काशीवासोयुगान्यष्टौदिनेनैकेनतद्भवेत् ॥ ३२ ॥ किंपु नर्बहुनायस्तुपूजयेद्वैष्णवोनरः ॥ नाहंब्रह्मादयोदेवाःसंख्यांकर्तुंसमीहते ॥ ३३ ॥ तस्माद्भक्त्या चमद्भक्तैःप्रीत्यर्थंममपुत्रक ॥ कर्तव्यंममतद्भक्त्याशालग्रामशिलार्चनम् ॥ ३४ ॥ शालग्रामशि लारूपीयत्रतिष्ठतिकेशवः ॥ तत्रदेवासुरायक्षाभुवनानिचतुर्दश ॥ ३५ ॥ सुराणांकीर्तनैःसर्वैःको टिभिश्चफलंलभेत् ॥ तत्फलंकीर्तनादेवकेशवेसुकृतंकलौ ॥ ३६ ॥ शालग्रामशिलाग्रेतुसकृत्पि ण्डेनतर्पिताः ॥ वसंतिपितरस्तस्यसंख्यातत्रनविद्यते ॥ ३७ ॥ येपिबंतिनराभक्त्याशालग्राम शिलाजलम् ॥ पंचगव्यसहस्रैस्तुप्राशितैःकिंप्रयोजनम् ॥ ३८ ॥

शिलेच्या रूपानें विष्णु जेथें आहेत तेथें सर्व देव असुर यक्ष व चौदा भुवनें राहतात ॥ ३५ ॥ दुसऱ्या कोटिदेवांची कीर्तनें केल्यानें, जें फळ मिळतें तें कलीमध्यें एका विष्णूचे कीर्तनानें मिळतें ॥ ३६ ॥ जे मनुष्य शालग्रामशिलेपुढें एकवेळ पिंड अर्पण करितिल, त्यांचे पितर असंख्य वर्षें स्वर्गांत तृप्त राहतील ॥ ३७ ॥ जे मनुष्य भक्तीनें शालग्राम-

तीर्थ प्राशन करितील, त्यांला हजारों पंचगव्यें पिण्याचें काय कारण आहे ॥ ३८ ॥ प्रायश्चित्त घेण्याचा प्रसंग आल्यास शालिग्रामाचें यथायुक्त तीर्थ घेतलें असतां दान उपोषणें व चांद्रायण हीं करण्याचें कारण उरत नाहीं॥३९॥ जो सरोवरामध्यें मंदिर बांधून जलशायी विष्णूची स्थापना करितो, त्याला माझे ब्राह्म सौर इत्यादि प्रासाद बांधण्याची गरज नाहीं ॥ ४० ॥ सरोवरामध्यें जलशायी प्रतिमेचें पूजन केलें तर दुसऱ्या कोटी देवतांचें पूजन करण्याचें

प्रायश्चित्तेसमुत्पन्नेकिंदानैःकिमुपोषणैः ॥ चांद्रायणैःसुचीर्णैश्चपीत्वापादोदकंहरेः ॥३९॥ यःकरोतितडागेतुप्रतिमांजलशायिनीम् ॥ मामकैर्ब्राह्मसौर्याद्यैःप्रासादैःकिंप्रयोजनम् ॥ ४० ॥ वरमेकातडागेतुप्रतिमाजलशायिनी ॥ कोटिभिश्चापिकिंकार्यमन्यदेवैश्चपूजितैः ॥ ४१ ॥ विष्णुमुख्यास्तुवैदेवास्तत्रजल्पंतिवैगुह ॥ प्रमाणमस्तिसर्वस्यसुकृतस्यहिपुत्रक ॥ ४२ ॥ फलप्रमाणंनैवास्तिशालग्रामशिलार्चने ॥ योददातिखिलांविष्णोःशालग्रामसमुद्भवाम् ॥ ४३ ॥ विप्रायविष्णुभक्तायतेनेष्टंक्रतुभिःशतैः ॥ गृहेपिवसतस्तस्यगंगास्नानंदिनेदिने ॥ ४४ ॥ सस्नातःसर्वतीर्थेषुसर्वयज्ञेषुदीक्षितः ॥ शालग्रामशिलातोयैर्योभिषिंचतिमानवः ॥ ४५ ॥

कर्तव्य काय ॥ ४१ ॥ षडानना! विष्णुप्रमुख सर्व देव ह्मणतात कीं, सर्व पुण्याला परिमिति आहे ॥ ४२ ॥ परंतु शालग्रामाच्या पूजेच्या पुण्याला गणती नाहीं. जो शालग्रामशिला विष्णुभक्त ब्राह्मणाला दान देतो, त्याला शेंकडों यज्ञ केल्याचें फळ मिळतें व घरांत राहूनही दररोज गंगास्नानाचें फळ मिळतें ॥ ४३ ॥ ४४ ॥ जो मनुष्य शालग्रा-

माच्या तीर्थानें मार्जन करितो त्यानें सर्व तीर्थांत स्नान केलें व सर्व यज्ञांत दीक्षा घेतली असें समजावें ॥ ४५ ॥ स्वर्ग, मृत्यु व पाताळ यांमध्यें असंख्य पाषाण आहेत परंतु शालग्रामशिलेची बरोबरी करणारा असा कोणताही नाहीं ॥ ४६ ॥ या दुर्लभ मनुष्यलोकीं रोज रोज शंभर प्रस्थ तीळ भक्तीनें दान करितो त्याचें जीवित सफळ आहे. ते नित्य शंभर शेर तिळ दान केल्याचें फळ केवळ शालिग्रामाच्या पूजेपासून मिळतें ॥ ४७ ॥ पत्र, पुष्प, फळ, उदक,

स्वर्गेमर्त्येचपातालेपाषाणाःसंतिभूरिशः ॥ शालग्रामशिलाग्राव्णानास्तिनास्तिसमापुनः ॥ ४६ ॥ मानुषेदुर्लभेलोकेसफलंतस्यजीवितम् ॥ तिलप्रस्थंशतंभक्त्यायोददातिदिनेदिने ॥ तत्फलंसमवाप्नोतिशालग्रामशिलार्चनात् ॥ ४७ ॥ पत्रंपुष्पंफलंतोयंमूलंदूर्वादलंतथा ॥ जायतेमेरुणातुल्यंशालग्रामसमर्पितम् ॥ ४८ ॥ विधिहीनोपियःकश्चित्क्रियामंत्रविवर्जितः ॥ चक्रांकभुजमाप्नोतिसम्यक्शास्त्रोदितंफलम् ॥ ४९ ॥ यत्पूर्वंतुमयापृष्टंकेशवंक्लेशनाशनम् ॥ तत्सर्वंकथयिष्यामितवस्नेहेनपुत्रक ॥ ५० ॥ क्वत्वंवससिहेविष्णोकिमाधारःकिमाश्रयः ॥ कथंवाप्रीयसेदेवतत्सर्वंकथयस्वनः ॥ ५१ ॥

मूळ, दूर्वा हीं शालग्रामाला समर्पण केलीं असतां, तीं मेरुप्रमाणें दिल्याचें फळ मिळतें ॥ ४८ ॥ विधिवांचून क्रिया व मंत्राखेरीजही जो पूजा करितो तो चक्र धारण करणारा असल्यास त्याला शास्त्रोक्त पूजेचें फल मिळून विष्णूची प्राप्ति होत्ये ॥४९॥ मीं पूर्वी क्लेशहरण करणाऱ्या विष्णूला विचारिलें होतें, तें तुझ्या प्रेमास्तव तुला सांगतों ॥ ५० ॥ हे विष्णो! तुह्मी कोणते ठिकाणीं राहतां, तुमचा आधार व आश्रय कोणता व तुह्मी कशानें संतुष्ट होता तें सर्व मला सांगा ॥ ५१ ॥

श्रीकृष्ण ह्मणालेः–हे शंभो ! मी नेहमीं शालग्रामशिलेचे ठिकाणीं राहतों. शालग्रामावर चक्रें असतात त्यांवरून व आकारावरून त्यांचीं नामें आहेत तीं ऐक ॥ ५२ ॥ ज्या शालग्रामाचे मुखाशीं सारखीं दोन चक्रें जवळ जवळ दिसतात ती शिला वासुदेवमूर्ति जाणावी व ती श्वेत वर्णावर असेल तर ज्यास्त शुभ समजावी ॥ ५३ ॥ द्वादश चक्रांची, नीळसर

॥ श्रीकृष्णउवाच ॥ ॥ निवसामिसदाशंभोशालग्रामोद्भवेऽश्मनि ॥ तत्रैवरथचक्रांकेयानिनामानिमेशृणु ॥ ५२ ॥ द्वारदेशेसमेचक्रेदृश्येतेनांतरंयदि ॥ वासुदेवःसविज्ञेयःशुक्लश्चैवातिशोभनः ॥ ५३ ॥ प्रद्युम्नःसूर्यचक्रस्तुनीलदीप्तिस्तथैवच ॥ सुषिरंछिद्रबहुलंदीर्घाकारंतुतद्भवेत् ॥ ५४ ॥ अनिरुद्धस्तुपीताभोवर्तुलश्चातिशोभनः ॥ रेखात्रयांकितोद्वारिदृष्टः पद्मेनचिह्नितः ॥५५॥ श्यामोनारायणोदेवोनाभिचक्रेतथोन्नते ॥ दीर्घरेखासमोपेतोदक्षिणेसुषिरान्वितः ॥ ५६ ॥

तेजाची, दीर्घ आकाराची, पुष्कळ छिद्रानीं व्याप्त असें जिचें मुख, ती प्रद्युम्न मूर्ति समजावी ॥ ५४ ॥ अनिरुद्ध शिला पिंवळ्या तेजाची वाटोळी उत्तम समजावी, जिचे मुखावर तीन रेषा व पद्माचें चिन्ह असतें ॥ ५५ ॥ जिची नाभि चक्रें वर असतात, ज्या चक्राच्या रेषा लांब लांब असतात व उजवे बाजूस बारिक बारिक छिद्रें असतात व श्यामवर्ण

असते तिला नारायणमूर्ति समजावें ॥ ५६ ॥ ज्या शिलेला मुख ऊर्ध्व असतें तिला हरिमूर्ति समजावें. ती हरिमूर्ति सर्व इच्छा पूर्ण करणारी, द्रव्य देणारी व मोक्ष देणारी अशी आहे ॥ ५७ ॥ तोंडल्याच्या आकाराची, पृष्ठावर मोठें छिद्र असून पद्म व चक्र यानीं युक्त, शुक्लवर्ण ती परमेष्ठीमूर्ति समजावी ॥ ५८ ॥ जिचे मुखाचेवर मध्यरेषेपासून रेषा असते व रेषेचे मुळाशीं दोन चक्रें असतात व शिला कृष्णवर्ण असते तिला विष्णुमूर्ति ह्मणतात ॥ ५९ ॥ नरसिंह

उर्ध्वंमुखंविजानीयात्सुंदरंहरिरूपिणम् ॥ कामदंमोक्षदंचैवअर्थदंचविशेषतः ॥ ५७ ॥
परमेष्ठीचशुक्लाभःपद्मचक्रसमन्वितः ॥ बिंबाकृतिस्तथापृष्ठेसुषिरंचातिपुष्कलम् ॥ ५८ ॥
कृष्णवर्णस्तथाविष्णुर्मूलेचक्रेसुशोभने ॥ द्वारोपरितथारेषालक्ष्यतेमध्येदशतः ॥ ५९ ॥
कपिलोनरसिंहश्चपृथुचक्रःसुशोभितः ॥ ब्रह्मचर्येणपूज्योसावन्यथाविघ्नदोभवेत् ॥ ६० ॥
वाराहःशक्तिलिंगस्तुचक्रेचविषमेस्मृते ॥ इंद्रनीलनिभःस्थूलस्त्रिरेखोनाभितःशुभः ॥ ६१ ॥
दीर्घाकांचनवर्णायाबिंदुत्रयविभूषिता ॥ मत्स्याख्यासाशिलाज्ञेयाभुक्तिमुक्तिफलप्रदा ॥ ६२ ॥
कूर्मस्तथोन्नतःपृष्ठेवर्तुलावर्तपूरितः ॥ हरितंवर्णमाधत्तेकौस्तुभेनतुचिह्नितः ॥ ६३ ॥

मोठाल्या चक्राचा व कपिल वर्ण असतो त्याची ब्रह्मचर्यानें पूजा करावी; नाहीं तर विघ्नें उत्पन्न करितो ॥ ६० ॥ पाठीवर एक व मुखांत दोन अशा विषम चक्रांची इंद्रनील मण्याप्रमाणें तेजस्वी, नाभीपासून तीन रेषांनीं युक्त व स्थूल अशी वराहमूर्ति समजावी ॥ ६१ ॥ लांबट, सुवर्णवर्णाची, तीन बिंदूनीं शोभायमान अशी जी शिला तिला मत्स्यमूर्ति ह्मणतात. ती भोग व मुक्ति देणारी आहे ॥ ६२ ॥ कूर्म मूर्तीची पाठ उंच असून तीवर वर्तुलचक्र असतें.

तिचा रंग हिरवा असून तीवर कौस्तुभाचें चिन्ह असतें ॥ ६३ ॥ हयग्रीवशालग्राम घोड्याच्या मुखाचे आकाराचा असून त्यावर सुशोभित पांच रेखा असतात व नीळसर रंगाचा असून त्यावर पुष्कळ बिंदु असतात ॥ ६४ ॥ वैकुंठमूर्तीवर तरवार, एक चक्र व ध्वज हीं चिन्हें असतात व द्वारावर गुंजाकार एक रेखा असते ॥ ६५ ॥ श्रीधर शालग्रामावर वनमालेचें चिन्ह असतें व त्याचा आकार कदंबाचे फुलासारखा असून तो पांच रेखांनीं भूषित असतो

हयग्रीवोहयाकारोरेखापंचकभूषितः ॥ बहुबिंदुसमाकीर्णःपृष्ठेनीलंचरूपकम् ॥ ६४ ॥ वैकुंठमसिभिन्नांगंचक्रमेकंतथाध्वजम् ॥ द्वारोपरितथारेखागुंजाकारासुशोभना ॥ ६५ ॥ श्रीधरस्तुतथादेवश्चिह्नितोवनमालया ॥ कदंबकुसुमाकारोरेखापंचकभूषितः ॥ ६६ ॥ वर्तुलश्चापिह्रस्वश्चवामनः परिकीर्तितः ॥ अतसीकुसुमप्रख्योबिंदुनापरिशोभितः ॥ ६७ ॥ सुदर्शनस्ततोदेवःश्यामवर्णो महाद्युतिः ॥ वामपार्श्वेगदाचक्रेरेखाचैवतुदक्षिणे ॥ ६८ ॥ दामोदरस्तथास्थूलोमध्येचक्रंप्रतिष्ठितम् ॥ दूर्वाभंद्वारसंकीर्णंपीतरेखंतथैवच ॥ ६९ ॥

॥ ६६ ॥ जवसाच्या फुलाप्रमाणें कांति असून ज्याच्यावर बिंदु असतात व जो वर्तुल असून लहान असतो तो वामनमूर्ति शालग्राम समजावा ॥ ६७ ॥ श्यामवर्ण महातेजस्वी असा तो सुदर्शन मूर्ति ज्याचे डावे बाजूवर गदा व चक्र असतें व उजवे बाजूवर रेखा असते ॥ ६८ ॥ दामोदर मूर्ति मोठी असून मध्यावर एक चक्र असतें; दूर्वा सारखा रंग असून

मुखावर पिंवळ्या रेघा असतात ॥ ६९ ॥ अनंतमूर्ति शालग्राम नाना भोग नाना प्रकारच्या चिन्हांनीं अनेक मूर्तींच्या लक्षणानीं युक्त असा असतो; हा सर्व काम पूर्ण करणारा आहे ॥७० ॥ ज्याचे अर्धावर सभोंवार ऊर्ध्व सर्व बाजूकडे मुखें असतात त्याला पुरुषोत्तम ह्मणावें; तो भोग व मुक्ति देणारा आहे ॥ ७१ ॥ ज्या शालग्रामाचे शिखरावर लिंगासारखें चिन्ह असतें त्याला योगेश्वर ह्मणावें; त्याचे पूजनानें ब्रह्महत्त्या जात्ये ॥ ७२ ॥ पद्मनाभ आरक्तवर्ण असून

नानावर्णोह्यनंतस्तुनानाभोगेनचिन्हितः ॥ अनेकमूर्तिसंभिन्नःसर्वकामफलप्रदः ॥ ७० ॥ विदिक्षुदिक्षुसर्वासुयस्यार्धेदृश्यतेमुखम् ॥ पुरुषोत्तमःसविज्ञेयोभुक्तिमुक्तिफलप्रदः ॥ ७१ ॥ दृश्यतेशिखरेलिंगंशालग्रामशिलोद्भवम् ॥ यस्ययोगेश्वरोदेविब्रह्महत्यांव्यपोहति ॥ ७२ ॥ आरक्तःपद्मनाभस्तुपंकजंचक्रसंयुतम् ॥ तस्याभ्यर्चनतोनित्यंदरिद्रस्त्वीश्वरोभवेत् ॥ ७३ ॥ चक्रांकितंहिरण्यांगंरश्मिजालंविनिर्दिशेत् ॥ सुवर्णरेखाबहुलंस्फटिकद्युतिशोभितम् ॥ ७४ ॥ अतिस्निग्धा सिद्धिकरीकृष्णाकीर्तिंददातिच ॥ ७५ ॥ पाण्डुरापापदहनीपीतापुत्रफलप्रदा ॥ नीलाप्रयच्छते लक्ष्मींरक्तारोगप्रदायिनी ॥ ७६ ॥

त्याजवर चक्रयुक्त कमळ असतें; त्याचे पूजनानें दरिद्री धनसंपन्न होतो ॥ ७३ ॥ शालग्राम चक्रांनीं युक्त, सोन्यासारखा झगझगीत, पुष्कळ सुवर्णाच्या रेघा असलेला स्फटिकाप्रमाणें तेजस्वी असा असावा ॥ ७४ ॥ शिला अति स्निग्ध असेल तर ती सिद्धि देणारी, काळी असेल तर कीर्ति देणारी होत्ये ॥ ७५ ॥ शिला पांढरी

असेल तर पाप नाहींसें करणारी, पिंवळी पुत्रफळ देणारी होत्ये. नीलवर्ण असेल तर लक्ष्मी देणारी व तांबडी रोग उत्पन्न करणारी जाणावी ॥ ७६ ॥ रूक्षवर्ण दुःख उत्पन्न करणारी, वक्र दरिद्र देणारी होत्ये; एकच चक्र असेल तर तो सुदर्शन, दोन चक्र असल्यास लक्ष्मी नारायण ॥ ७७ ॥ तीन चक्रांचा असल्यास अच्युत, चार चक्रांचा असल्यास जनार्दन, पांच चक्रें असल्यास वासुदेव, सहा चक्रें असल्यास प्रद्युम्न, समजावा ॥ ७८ ॥ सात चक्रांचा

रूक्षाउद्वेगजननीवक्रादारिद्र्यभागिनी ॥ एकंसुदर्शनंज्ञेयंलक्ष्मीनारायणंद्वयम् ॥ ७७ ॥ तृतीयं चाच्युतंविद्याच्चतुर्थंतुजनार्दनम् ॥ पंचमंवासुदेवंचषष्ठंप्रद्युम्नमेवच ॥ ७८ ॥ संकर्षणंसप्तमंचअष्टमंपुरुषोत्तमम् ॥ नवमंचनवव्यूहंदशमंतुदशात्मकम् ॥ एकादशंचानिरुद्धंद्वादशंद्वादशात्मकम् ॥ ७९ ॥ अतऊर्ध्वंतुचक्राणिदृश्यंतेऽनंतसंज्ञके ॥ खंडितेत्रुटितेभग्नेशालग्रामेनदोषभाक् ॥ इष्टा चयस्ययामूर्तिःसतांयत्नेनपूजयेत् ॥ ८० ॥ स्कंधेकृत्वातुयोऽध्वानंवहतेशैलनायकम् ॥ तस्यवश्यं भवेत्सर्वंत्रैलोक्यंसचराचरम् ॥ ८१ ॥

संकर्षण व आठ चक्रें असल्यास पुरुषोत्तम, नऊ चक्रें असल्यास नवव्यूह, दहा चक्रें असल्यास दशात्मक ॥ ७९ ॥ अकरा चक्रें असल्यास अनिरुद्ध, बारा चक्रें असल्यास द्वादशात्मक. यांहून जास्त चक्रें अनंतमूर्ति शालग्रामांत दिसतात शालग्राम तुटलेला फुटलेला असला तरी त्याला दोष नाहीं ॥ ज्याला ज्या मूर्तीची आवड असेल, त्यानें त्या मूर्तीची यत्नानें पूजा करावी ॥ ८० ॥ जो शालग्राम खांद्यावर घेऊन मार्ग चालेल, त्याला सर्व जग

वश होईल ॥ ८१ ॥ जेथें शालग्रामशिला आहे तेथें हरीचें सान्निध्य आहे. तेथें स्नान, दान, जप इत्यादि कृत्यें केलीं असतां तीं काशीहून शतपट अधिक फलप्रद होतात ॥ ८२ ॥ कुरुक्षेत्र, प्रयाग, पुष्कर, नैमिषारण्य यां ठिकाणीं केलेलें पुण्य कोटिगुण असतें. काशींत केलेलें त्याहून ज्यास्त होतें ॥ ८३ ॥ ब्रह्महत्यादिक कांहीं पाप मनुष्यानें

शालग्रामशिलायत्रतत्रसंनिहितोहरिः ॥ तत्रदानंजपःस्नानंवाराणस्याःशताधिकम् ॥ ८२ ॥ कुरुक्षेत्रेप्रयागेचपुष्करेनैमिषेतथा ॥ तत्रकोटिगुणंपुण्यंवाराणस्यांमहाफलम् ॥ ८३ ॥ ब्रह्महत्यादिकंपापंयत्किंचित्कुरुतेनरः ॥ तत्सर्वंनिर्दहत्याशुशालग्रामशिलार्चनम् ॥८४ ॥ शालग्रामोद्भवोदेवोयत्रद्वारवतीभवः ॥ उभयोःसंगमोयत्रमुक्तिस्तत्रनसंशयः ॥ ८५॥ ब्रह्मचारिगृहस्थैश्चवानप्रस्थैश्चभिक्षुभिः ॥ भोक्तव्यंविष्णुनैवेद्यंनात्रकार्याविचारणा ॥ ८६ ॥ तत्पूजनेनमंत्राश्चनजपोनचभावना ॥ नस्तुतिर्नापिवाचारःशालग्रामशिलार्चने ॥ ८७ ॥

केलें असतां ॥ ८४ ॥ तें पाप शालग्रामाची पूजा केल्यानें भस्म होतें. जेथें शालग्राममूर्ति व द्वारकेंतील चक्रांकित या दोहोंचा संगम आहे तेथें मोक्ष मिळतो यांत संशय नाहीं ॥ ८५ ॥ ब्रह्मचारी, गृहस्थ, वानप्रस्थ व संन्याशी या सर्वांनीं विष्णूचा नैवेद्य भक्षण करावा; त्याचा विचार करूं नये ॥ ८६ ॥ शालग्रामाच्या पूजेला मंत्र नको, जप

नको, भावना नको, स्तुति नको, आचार नको ॥८७॥ शालग्रामापुढें विशेषेंकरून कार्तिकांत भक्तीनें स्वस्तिक काढलें, तर सात कुळांचा उद्धार होतो ॥८८॥ मृत्तिका व रंग यांनीं अगदीं लहान जरी स्वस्तिक काढिलें, तरी तो कोटिकल्पपर्यंत स्वर्गांत राहील ॥८९॥ कार्तिकांत देवापुढें स्वस्तिक काढिलें असतां त्याच्यापासून मिळणारें फल व एक वर्ष

शालग्रामशिलाग्रेतुकृत्वास्वस्तिकमादरात् ॥ कार्तिकेतुविशेषेणपुनात्यासप्तमंकुलम् ॥ ८८ ॥ अणुमात्रंतुयःकुर्यान्मंडलंकेशवाग्रतः ॥ मृदाधातुविकारैश्चकल्पकोटिदिवंवसेत् ॥ ८९ ॥ यस्तु संवत्सरंपूर्णमग्निहोत्रमुपासते ॥ कार्तिकेस्वस्तिकंकृत्वासममेतन्नसंशयः ॥ ९० ॥ अगम्यागमने चैवह्यभक्ष्यस्यचभक्षणे ॥ तत्पापंनाशमायातिमंडयित्वाहरेर्गृहम् ॥ ९१ ॥ मंडलंकुरुतेनित्यं यानारीकेशवाग्रतः ॥ सप्तजन्मनिवैधव्यंनप्राप्नोतिकदाचन ॥ ९२ ॥ इतिश्रीपद्मपुराणेकार्तिकमाहात्म्येश्रीकृष्णसत्यभामासंवादेशालग्राममाहात्म्यवर्णनंनामत्रयस्त्रिंशोध्यायः ॥३३॥

अग्निहोत्रोपासना करणारास मिळणारें फल हीं दोन्हीं सारखींच आहेत ॥९०॥ अगम्यगमन केलें असतां किंवा खाऊं नये तें खाल्लें असतां जें पाप लागतें, तें पाप हरीच्या मंदिरांत रांगोळ्या घालून मंदिर सुशोभित केलें असतां नाहींसें होतें॥९१॥ जी स्त्री केशवापुढें नित्य रांगोळ्यांनीं मंडलें काढील, तिला सात जन्म सौभाग्य प्राप्त होईल ॥ ९२ ॥ इतिश्रीपद्मपु-

राणे कार्तिकमाहात्म्ये त्रयस्त्रिंशोध्यायः ॥३३॥ शंकर ह्मणतातः—कार्तिकेया ! जो आवळीच्या छायेखालीं बसून पितरांना पिंडदान करील, त्याचे पितर माधवाचे कृपेनें मुक्तीला जातील ॥ १ ॥ जो मस्तकावर, हातांत, मुखांत, बाहूंवर व गळ्यांत आवळे धारण करून भूषित होईल व आवळे भक्षण करील तो मनुष्य नारायण होईल ॥ २ ॥ जो वैष्णव

॥ ईश्वरउवाच ॥ ॥ धात्रीछायांसमाश्रित्यकुर्यात्पिंडंतुयोगुह ॥ प्रयांतिपितरोमुक्तिंप्रसादान्माधवस्यतु ॥ १ ॥ मूर्ध्निपाणौमुखेचैवबाह्वोःकंठेतुयोनरः ॥ धत्तेधात्रीफलंवत्सधात्रीफलविभूषितः ॥ धात्रीफलकृताहारोनरोनारायणोभवेत् ॥ २ ॥ यःकश्चिद्वैष्णवोलोकेधत्तेधात्रीफलंगुह ॥ प्रियोभवतिदेवानांमनुष्याणांतुकाकथा ॥३॥ नजह्यात्तुलसीमालांधात्रीमालांविशेषतः ॥ यावल्लुठतिकंठस्थाधात्रीमालानरस्यहि ॥ तावत्तस्यशरीरेतुप्रीत्यालुठतिकेशवः ॥४॥ धात्रीफलंचतुलसीमृत्तिकाद्वारकोद्भवा ॥ सफलंजीवितंतस्यत्रितयंयस्यवेश्मनि ॥ ५ ॥ यावद्दिनानिवहतेधात्रीमालांकलौनरः ॥ तावद्युगसहस्राणिवैकुंठेवसतिर्भवेत् ॥ ६ ॥

आवळे धारण करितो, तो देवांनाही प्रिय होतो; मग मनुष्यांना प्रिय होईल ह्मणून काय सांगावें ॥ ३ ॥ तुळसीची माळ व आवळ्यांची माळ, ज्याचे कठांत आहे त्याच्या आंगावर केशव लोळतो असें समजावें ॥ ४ ॥ आवळे तुळशी व द्वारकेंतील मृत्तिका (गोपीचंदन) हीं तीन ज्याचे घरांत आहेत, त्याचें जन्म सफळ समजावें ॥ ५ ॥ जितके

दिवस मनुष्य आळीची माळा धारण करील तितके हजार वर्षें पर्यंत त्याची वस्ती वैकुंठांत होईल ॥६॥ तुळसीची व आवळीची आशा दोन माळा जो आपल्या गळ्यांत घालील, तो मनुष्य कोटी कल्पपर्यंत स्वर्गांत राहील ॥ ७ ॥ जो इंद्रियें स्वाधीन ठेवून शालग्रामाची पूजा तुलसीमंजिरींनीं करील, त्याला प्रत्येक तुळसीफुलाला अश्वमेध यज्ञाचें फल मिळतें ॥ ८ ॥ देवांमध्यें जसा विष्णु श्रेष्ठ, तशी फुलांमध्यें तुळसी श्रेष्ठ आहे ॥ ९ ॥ जो दररोज तुळसींनीं विष्णूची

मालायुग्मंवहेद्यस्तुधात्रीतुलसिसंभवम् ॥ योनरःकंठदेशेतुकल्पकोटिदिवंवसेत् ॥ ७ ॥
सन्नियम्यैंद्रियग्रामंशालग्रामशिलार्चनम् ॥ यःकुर्यान्मानवोभक्त्यापुष्पेपुष्पेऽश्वमेधजम् ॥८॥
सुराणांचयथाविष्णुःपुष्पाणांतुलसीतथा ॥ ९ ॥ तुलस्यातुदिनेदेवंयोर्चयेद्गरुडध्वजम् ॥
जन्मदुःखजरारोगैर्मुक्तोसौमुक्तिमाप्नुयात् ॥ १० ॥ तुलसीमालयाविष्णुःपूजितोयेनकार्तिके ॥
पापाक्षरकृतांमालांस्फुटंशौरिःप्रमार्जति ॥ ११ ॥ श्रीचंदनंसकर्पूरमगरुंचसकुंकुमम् ॥
केतकीदीपदानंचसर्वदाकेशवप्रियम् ॥ १२ ॥

पूजा करितो, त्याचीं जन्मापासूनचीं दुःखें, जरा, रोग हीं नाहींशीं होऊन, त्याला मुक्ति मिळते ॥ १० ॥ जो कार्तिकांत तुळसीची माळा करून तिनें विष्णूची पूजा करितो, त्याच्या पापांच्या अक्षरांची माळा कृष्ण खरोखर तोडून टाकून देतो ॥ ११ ॥ श्रीचंदन, कापूर, अगरू व केशर यानीं मिश्रित गंध, केवडा,

व दीपदान हीं केशवाला नेहमीं प्रिय आहेत ॥ १२ ॥ कलियुगांत कार्तिक महिन्यामध्यें केवडा दिला व दीपदान केलें तर हे कार्तिकेया ! त्याच्या शंभर कुळांचा उद्धार होतो ॥ १३ ॥ कमळें, तुळसी, केवडा, अगस्त्याचें फूल व पांचवें दीपदान हीं कार्तिकांत विष्णूला अर्पण करावीं ॥ १४ ॥ हे वत्सा ! जो मालतीच्या माळांनीं कार्तिकांत केशवाचा मंडप शुशोभित करील, त्याला स्वर्गांत वस्ती प्राप्त होईल ॥ १५ ॥

कार्तिकेतकीपुष्पंदत्तंयेनकलौयुगे ॥ दीपदानंमहासेनकुलानांतारयेच्छतम् ॥ १३ ॥ सरोरुहा
णितुलसीकेतकीमुनिपुष्पकम् ॥ कार्तिकेयदितान्येवदीपदानंचपंचमम् ॥ १४ ॥ मालतीमाल
यायेनकार्तिकेपुष्पमंडपम् ॥ केशवस्यकृतंवत्सवसतिर्दिवितस्यच ॥ १५ ॥ केतकीपुष्पकेणैवपू
जितोगरुडध्वजः ॥ समाःसहस्रंसुप्रीतोजायतेगरुडध्वजः ॥ १६ ॥ अर्चयित्वाहृषीकेशंकुसुमैः
केतकीभवैः ॥ पुण्यंतद्भवनंयातिकेशवस्यशिवंगृह ॥ १७ ॥ दमनकेनापिदेवेशसंप्राप्तेमधुमा
धवे ॥ गोशतस्यमुनिश्रेष्ठअर्चनाल्लभतेफलम् ॥ १८ ॥ अगस्त्यकुसुमैर्देवंयोर्चयेत्तुजनार्दनम् ॥
दर्शनात्तस्यभोविप्रनरकाग्निःप्रशाम्यति ॥ १९ ॥

केवड्याच्या पुष्पांनीं जर विष्णूची पूजा केली तर तो त्याला हजार वर्षेंपर्यंत सुप्रसन्न होतो ॥१६॥ हे षडानना ! केवड्याच्या फुलांनीं विष्णूची पूजा केली असतां, त्या पुण्यानें तो मंगलकारक वैकुंठाला जातो ॥ १७ ॥ चैत्र वैशाख माळा असतां दवण्यानें विष्णूची पूजा केली तर शंभर गाई दान दिल्याचें पुण्य मिळतें ॥ १८ ॥ अगस्त्याच्या

फुलांनीं विष्णूची पूजा केली तर त्याला पहातांच नरकाग्नि थंड होतो ॥ १९ ॥ अगस्त्याच्या फुलांनीं पूजा केली असतां जसा विष्णु संतुष्ट होऊन फल देतो, तसा तप करून फल देत नाहीं ॥ २० ॥ कार्तिकांत सर्व फुलें सोडून अगस्त्यपुष्पांनींच केशवाची पूजा केली तर त्याला अश्वमेधाचें फल मिळतें ॥ २१ ॥ अगस्त्य पुष्पांची माळा करून जो विष्णूला अर्पण करितो, त्याची इंद्र देखील स्तुति करितो ॥ २२ ॥ हजार गाई दान केल्यानें

नतत्करोतिविप्रर्षेतपसातोषितोहरिः ॥ यत्करोतिमहासेनमुनिपुष्पैरलंकृतः ॥ २० ॥ विहाय सर्वपुष्पाणिमुनिपुष्पेणकेशवम् ॥ कार्तिकेयोर्चयेद्भक्त्यावाजिमेधफलंलभेत् ॥ २१ ॥ मुनिपुष्पकृतां मालांयोददातिजनार्दने ॥ देवेंद्रोपिमुनिश्रेष्ठकुरुतेतस्यसंकथाम् ॥ २२ ॥ गवामयुतदानेनयत्फलंलभतेगुह ॥ मुनिपुष्पेणचैकेनकार्तिकेलभतेफलम् ॥ २३ ॥ कौस्तुभेनयथाप्रीतो यथाच वनमालया ॥ तुलसीदलेनसंप्रीतःकार्तिकेचतथाहरिः ॥ २४ ॥ सूतउवाच ॥ ॥ प्रश्रयावनतं दृष्ट्वाकुमारंभक्तितत्परम् ॥ पुनःप्रोवाचभगवान्महादेवोवृषध्वजः ॥ २५ ॥

जें फळ मिळतें तें एक अगस्त्यपुष्प कार्तिकांत विष्णूला अर्पण केल्यानें मिळतें ॥ २३ ॥ हरि जसा कौस्तुभमण्यानें किंवा वनमालेनें संतुष्ट होतो, तसाच कार्तिकांत तुलसीपत्रांनीं संतुष्ट होतो ॥ २४ ॥ सूत ह्मणालेः—वृषध्वज शंकर, आपला पुत्र कार्तिकेय भक्तितत्पर होऊन विनयानें नम्र झाला आहे, असें पाहून पुन्हा बोलूं लागले ॥ २५ ॥

ईश्वर ह्मणालेः—मयूरवाहना षडानना ! कार्तिकांतील दीपाचें माहात्म्य सांगतों; श्रवण कर ॥ २६ ॥ पितर पितृगणासह इच्छा करितात कीं, आमच्या कुळांत सत्पुत्र पितृभक्त, जो कार्तिकांत दीपदानानें केशवाला संतुष्ट करणारा, असा होईल काय ॥ २७ ॥ तुपानें किंवा तेलानें देवापुढें जो दिवे लावितो, त्याला अश्वमेध करून काय करावयाचें॥२८॥कार्तिकामध्यें केशवापुढें ज्यानें दीपदान केलें त्यानें सर्व यज्ञ केले, व सर्व तीर्थांत स्नान केल्याप्रमाणें

॥ ईश्वरउवाच ॥ ॥ शृणुदीपस्यमाहात्म्यंकार्तिकेशिखिवाहन ॥ पितरश्चैववांछंतिसदापितृगणैर्वृताः ॥ २६ ॥ भविष्यतिकुलेस्माकंपितृभक्तःसुपुत्रकः ॥ कार्तिकेदीपदानेनयस्तोषयतिकेशवम् ॥ २७ ॥ घृतेनदीपकोयस्यतिलतैलेनवापुनः ॥ ज्वलतेयस्यसेनानीरश्वमेधेनतस्य किम् ॥ २८ ॥ तेनेष्टंक्रतुभिःसर्वैःकृतंतीर्थावगाहनम् ॥ दीपदानंकृतंयेनकार्तिकेकेशवाग्रतः ॥ २९ ॥ कृष्णपक्षविशेषेणपुत्रपंचदिनानिच ॥ पुण्यानितेषुयोदत्तेदीपंसोक्षय्यमाप्नुयात् ॥३०॥ एकादश्यांपरैर्दत्तंदीपंप्रज्वाल्यमूषिका ॥ मानुषंदुर्लभंप्राप्यपरांगतिमवापसा ॥३१॥ लुब्धकोपिचतुर्दश्यांपूजयित्वामहेश्वरम् ॥ निर्भक्षःपरमंप्राप्यविष्णुलोकंजगामसः ॥३२॥

आहे ॥२९॥ विशेषेंकरून कार्तिक कृष्णपक्षांतील शेवटचे दिवाळीचे पांच दिवस विशेष पुण्यकारक आहेत. त्या पांच दिवशीं जो दीपदान करील त्याला पुण्य अक्षय प्राप्त होतें॥३०॥दुसऱ्यानें लाविलेला दिवा एका चिचुंद्रीचे पायानें वात सारून मोठा झाला ह्मणून तिला दुर्लभ असा मनुष्यजन्म प्राप्त होऊन ती उत्तम गतीला गेली ॥ ३१ ॥ एक पारधी

चतुर्दशीला शंकराची पूजा करून सहज उपाशीं राहिला, ह्मणून त्याला उत्तम असा विष्णुलोक प्राप्त झाला ॥ ३२ ॥ लीलावती नांवाची चांडाळीण दुसऱ्यानें लाविलेल्या दिव्याचें संरक्षण केल्यानें शुद्ध होऊन अक्षय स्वर्गाला गेली ॥ ॥३३॥कोणीं एक गोपानें अमावास्येला विष्णूची पूजा पाहून, जयजय असा वरचेवर शब्द उच्चार केला, ह्मणून तो सार्वभौम राजा झाला ॥ ३४ ॥ ह्मणून सूर्यास्त झाल्यावर कार्तिकांत घरांत, गोठ्यांत व सर्व ठिकाणीं दिवे लावावे

श्वपाकीस्वाश्रयाद्वेश्यादीपंकृत्वापरैःकृतम् ॥ शुद्धालीलावतीभूत्वाजगामस्वर्गमक्षयम् ॥ ३३ ॥ गोपःकश्चिदमावास्यांपूजांदृष्ट्वापिशार्ङ्गिणः ॥ मुहुर्मुहुर्जयेत्युक्त्वाराजराजेश्वरोभवत् ॥ ३४ ॥ तस्माद्दीपाःप्रदातव्यारात्रावस्तमितेरवौ ॥ गृहेषुसर्वगोष्ठेषुसर्वेष्वायतनेषुच ॥ ३५ ॥ देवालयेषुदेवानांश्मशानेषुसरःसुच ॥ घृतादिनाशुभार्थायथावत्पंचदिनानिच ॥ ३६ ॥ पापिनःपितरोयेच लुप्तपिंडोदकक्रियाः ॥ तेपियांतिपरांमुक्तिंदीपदानस्यपुण्यतः ॥ ३७ ॥ इतिश्रीपद्मपुराणेकार्तिकमासमाहात्म्येश्रीकृष्णसत्या० धात्रीदीपमाहात्म्यवर्णनंनामचतुस्त्रिंशोध्यायः॥ ३४॥

॥ ३५ ॥ देवळांत, स्मशानांत, सरोवराच्या तीराला, दिपवाळींत पांच दिवस आपल्या कल्याणाकरितां तुपानें अथवा तेलानें दिवे लावावे ॥ ३६ ॥ दीपदानापासून पुण्य प्राप्त होऊन, ज्यांच्या श्राद्धादिक क्रिया नष्ट झाल्या आहेत अशा पापी पितरांचा देखील उद्धार होतो ॥ ३७ ॥ इतिश्रीपद्मपुराणे कार्तिकमाहात्म्ये चतुस्त्रिंशोध्यायः ॥ ३४ ॥

कार्तिकस्वामी ह्मणतातः—हे शंकरा, दिवाळीचें माहात्म्य विस्तारेंकरून सांगा. दिवाळी कशाकरितां करावी व तिची देवता कोण आहे तें सांगा ॥ १ ॥ दिवाळीमध्यें काय दान द्यावें व काय देऊं नये व कोणत्या प्रकारचा आनंद करावा व कोणते खेळ खेळण्याला योग्य आहेत ॥ २ ॥ सूत ह्मणालेः—कामशत्रु शंकर याप्रमाणें स्कंदाचें

॥ कार्तिकेयउवाच ॥ ॥ दीपावलिफलंनाथविशेषाद्ब्रूहिसांप्रतम् ॥ किमर्थंक्रियतेसातुतस्याःकादेवताभवेत् ॥ १ ॥ किंचतत्रभवेद्देयंकिंनदेयंवदप्रभो ॥ प्रहर्षःकोत्रनिर्दिष्टःक्रीडाकात्रप्रकीर्तिता ॥ २ ॥ सूतउवाच ॥ ॥ इतिस्कंदवचःश्रुत्वाभगवान्कामशोषणः ॥ साधूक्त्वाकार्तिकंविप्राःप्रहसन्निदमब्रवीत् ॥ ३ ॥ श्रीशिवउवाच ॥ ॥ कार्तिकस्यासितेपक्षेत्रयोदश्यांतुपावके ॥ यमदीपंबहिर्दद्यात्अपमृत्युर्विनश्यति ॥ ४ ॥ मृत्युनापाशहस्तेनकालेनश्यामयासह ॥ त्रयोदश्यांदीपदानात्सूर्यजःप्रीयतामिति ॥५॥ कार्तिकेकृष्णपक्षेचचतुर्दश्यांविधूदये ॥ अवश्यमेवकर्तव्यंस्नानंनरकभीरुभिः ॥ ६ ॥

भाषण ऐकून हर्ष पावून बरें ह्मणून बोलूं लागले ॥ ३ ॥ शिव ह्मणालेः—(आश्विन) कार्तिकवद्य त्रयोदशीला दरवाज्याबाहेर यमदीप लावावा ह्मणजे अपमृत्यु नाहींसा होतो ॥ ४ ॥ 'दीपमंत्र' " या त्रयोदशीच्या दीपदानापासून पाशहस्त मृत्यु, काल व श्यामा यांसह यम संतुष्ट होवो " असें ह्मणावें ॥ ५ ॥ कार्तिक वद्य चतुर्दशीला पहांटे चंद्रोदयाचे-

वेळीं अवश्य स्नान करावें ह्मणजे नरकाची भीती राहत नाहीं ॥ ६ ॥ पर्व ह्मणजे अमावास्यासह चतुर्दशीला पहांटेस अवश्य आळस टाकून स्नान करावें ॥ ७ ॥ दिवाळीच्या नरकचतुर्दशीला तेलामध्यें लक्ष्मी, व जलामध्यें गंगा असतं. या दिवशीं जो प्रातःस्नान करतो, तो यमलोक पहाणार नाहीं ॥ ८ ॥ स्नान करितांना मध्यें आघाडा, कडुभोपळी, टाकळा, कडुशेंदनीचें फळ हीं नरकाचे क्षयाकरितां आंगावरून ओंवाळून टाकावी ॥ ९ ॥ व आंगावरून फिरवितांना "पांढ-

पर्वविद्धचतुर्दश्यांकार्तिकस्यसितेतरे ॥ पक्षेप्रत्यूषसमयेस्नानंकुर्यादतंद्रितः ॥ ७ ॥ तैलेलक्ष्मीर्जलेगंगादीपावल्याश्चतुर्दशीम् ॥ प्रातःस्नानंहियःकुर्याद्यमलोकंनपश्यति ॥ ८ ॥ अपामार्गंतथातुंबींप्रपुन्नाटंचकट्फलम् ॥ भ्रामयेत्स्नानमध्येतुनरकस्यक्षयायवै ॥ ९ ॥ सीतालोष्ठसमायुक्तसकंटकदलान्वित ॥ हरपापमपामार्गभ्राम्यमाणःपुनःपुनः ॥ १० ॥ अपामार्गंप्रपुन्नाटंभ्रामयेच्छिरसोपरि ॥ ततश्चतर्पणंकार्यंधर्मराजस्यनामभिः ॥ ११ ॥ यमायधर्मराजायमृत्यवेचांतकायच ॥ वैवस्वतायकालायसर्वभूतक्षयायच ॥ १२ ॥

ऱ्या मातीचे ढेंकळासह कांटे व पानासह आघाड्या आंगावरून ओंवाळीत असतां आमचें पाप नाहींसें कर" असें ह्मणावें ॥ १० ॥ स्नान करितांना अपामार्ग (आघाडा) व प्रपुन्नाट (टाकळा) हे मस्तकावरून फिरवावे; नंतर यमधर्माचे नांवांनीं तर्पण करावें ॥ ११ ॥ यमं, धर्मराजं, मृत्युं, अंतकं, वैवस्वतं, कालं, सर्वभूतक्षयकरं, औदुंबरं, दध्नं, नीलं, परमेष्ठिनं, वृकोदरं, चित्रं, चित्रगुप्तं, या नांवांनीं प्रत्येक नांवापुढें 'तर्पयामि' असें ह्मणून तर्पण करावें ॥ १२ ॥ १३ ॥ देवतांची पूजा करून नरकाला दीप द्यावा; नंतर संध्याकाळीं पुष्कळ सुंदर दिवे लावावे ॥ १४ ॥ विशेषानें ब्रह्मा, विष्णु व शंकर यांच्या देवालयांत, तळघरांत, चवाठ्यावर, सभेंत, नदीकांठाला पुष्कळ दिवे लावावे ॥ १५ ॥ बागेंत, गांवकुसवावर, विहिरींत, सज्यावर, दरवाज्यापुढें, पागेंत, हत्तीखान्यांत, दिवे लावावे ॥ १६ ॥ व त्याच प्रमाणें अमावास्येला पहांटे

औदुंबरायदध्नायनीलायपरमेष्ठिने ॥ वृकोदरायचित्रायचित्रगुप्तायवैपुनः ॥ १३ ॥ नरकायप्रदातव्योदीपःसंपूज्यदेवताः ॥ ततःप्रदोषसमयेदीपान्दद्यान्मनोहरान् ॥ १४ ॥ ब्रह्मविष्णुशिवादीभवनेषुविशेषतः ॥ कूटागारेषुचैत्येषुसभासुचनदीषुच ॥ १५ ॥ प्राकारोद्यानवापीषुप्रतोलीनिष्कुटेषुच ॥ मंदुरासुविविक्तासुहस्तिशालासुचैवहि ॥ १६ ॥ एवंप्रभातसमयेह्यमावस्यांतुपावके ॥ स्नात्वादेवान्पितॄन्भक्त्यासंपूज्याथप्रणम्यच ॥ १७ ॥ कृत्वातुपार्वणंश्राद्धंदधिक्षीरघृतादिभिः ॥ भोज्यैर्नानाविधैर्विप्रान्भोजयित्वाक्षमापयेत् ॥ १८ ॥ ततोपराह्णसमयेतोषयेन्नागरान्प्रियैः ॥ तेषांगोष्ठीश्चमानंचकृत्वासंभाषणंनृपः ॥ १९ ॥

दिवे लावावे व स्नान करून देव व पितर यांची भक्तीनें पूजा करून त्यांना नमस्कार करावा ॥ १७ ॥ व पार्वणश्राद्ध करून दूध, दहीं, तूप व नानाप्रकारचे अन्नानीं ब्राह्मणांना भोजन घालावें व त्यांची प्रार्थना करावी ॥ १८ ॥ नंतर राजानें दुपारून गांवांतील लोकांचा आदरसत्कार करून गोष्टी व गोड भाषण बोलून संतोष करावा ॥ १९ ॥

या योगानें पितर एक वर्ष तृप्त राहतात. विष्णु जागृत होण्यापूर्वी स्त्रियांनीं लक्ष्मीला जागृत करावी ॥ २० ॥ लक्ष्मीला जागृत करून तिच्या जागृतीच्या वेळीं जी स्त्री अथवा पुरुष भोजन करितात, त्या मनुष्यांचे घरीं लक्ष्मी एक वर्ष स्थीर राहते ॥ २१ ॥ विष्णुपासून भय पावलेले दैत्य ब्राह्मणापासून अभय पावले. भगवान् क्षीरसमुद्रांत निजलेले

पितॄणांवत्सरंयावत्प्रीतिरुत्पाद्यतेगुह ॥ अप्रबुद्धेहरौपूर्वंस्त्रीभिर्लक्ष्मींप्रबोधयेत् ॥ २० ॥ प्रबोध
समयेलक्ष्मींबोधयित्वाभुनक्तिया ॥ पुमान्वावत्सरंयावत्लक्ष्मीस्तंनैवमुंचति ॥ २१ ॥ अभयं
प्राप्यविप्रेभ्योविष्णुभीताःसुरद्विषः ॥ सुप्तंक्षीरोदधौज्ञात्वालक्ष्मीःपद्माश्रितातथा ॥ २२ ॥
त्वंज्योतिःश्रीरविश्चंद्रोविद्युत्सौवर्णतारकाः ॥ सर्वेषांज्योतिषांज्योतिर्दीपज्योतिःस्थितेनमः
॥ २३ ॥ यालक्ष्मीर्दिवसेपुण्येदीपावल्यांचभूतले ॥ गवांगोष्ठेतुकार्तिक्यांसालक्ष्मीर्वरदामम
॥२४॥शंकरश्चभवानीचक्रीडयाद्यूतमास्थिते॥ भवान्याभ्यर्थितालक्ष्मीर्धेनुरूपेणसंस्थिता॥२५॥

पाहून लक्ष्मी कमळामध्यें निजली ॥२२॥ हे लक्ष्मी, तूं ज्योति, श्री, रवि, चंद्र, वीज, सुवर्ण, तारका, यांचें तेज आहेस व सर्व तेजस्वी पदार्थांचे तेजांत व दीपाचे तेजांत राहणारे हे लक्ष्मी तुला नमस्कार असो।२३।जी लक्ष्मी, कार्तिकमासीं पुण्य दिवसांत दिवाळींत पृथ्वीवर व गाईच्या गोठ्यांत असते, ती लक्ष्मी मला वर देणारी होवो ॥२४ ॥ शंकर व पार्वती हे द्यूत खेळण्यास

बसले असतां, पार्वतीनें प्रार्थना केल्यावरूनन लक्ष्मी गाईच्या रूपानें तेथें राहिली ॥ २५ ॥ पार्वतीनें द्यूतांत शंकराला जिंकून नग्न करून सोडला, म्हणून शंकर दुःखी व पार्वती सुखांत राहिली ॥ २६ ॥ करितां खेळांत प्रथम ज्याला जय येतो तो वर्षभर सुखी असतो, याप्रमाणें खेळत असतां मध्यरात्र झाल्यावर लोक झोपेंत असतांना स्त्रियानीं बुताऱ्या, डमरू वगैरे वाद्यें वाजवून मोठ्या आनंदानें आपल्या घराच्या अंगणांतून अलक्ष्मी घालवून द्यावी.

गौर्याजित्वापुराशंभुर्नग्नोद्यूतेविसर्जितः ॥ अतोयंशंकरोदुःखीगौरीनित्यंसुखस्थिता ॥ २६ ॥
प्रथमंविजयोयस्यतस्यसंवत्सरंसुखम् ॥ एवंगतेनिशीथेतुजनेनिद्रार्धलोचने ॥ २७ ॥ तावन्नग
रनारीभिस्तूर्यडिंडिममादिभिः ॥ निष्कास्यतेप्रहृष्टाभिरलक्ष्मींस्वगृहांगणात् ॥ २८ ॥ पराजयेवि
रुद्धंस्यात्प्रतिपद्युदितेरवौ ॥ प्रातर्गोवर्धनःपूज्योद्यूतंरात्रौसमाचरेत् ॥ २९ ॥ भूषणीयास्तदागा
वोवर्ज्यावहनदोहनात् ॥ गोवर्धनधराधारगोकुलत्राणकारक ॥ ३० ॥

॥ २७ ॥ २८ ॥ प्रतिपदेला सूर्योदयानंतर द्यूत खेळावे, खेळांत पराजय झाला तर अपयश येतें. ॥ सकाळीं गोवर्धनाची पूजा करावी व रात्रींही द्यूत खेळावें ॥२९॥ गायीला अलंकार वस्त्रें घालून सुशोभित कराव्या. त्यांचें दूध काढूं नये, बैलावर ओझें घालूं नये व गोवर्धनाची प्रार्थना करावी हे गोवर्धना! तूं पृथ्वीला आधार असून गोकुळाचें

रक्षण करणारा आहेस ॥ ३० ॥ कृष्णानीं तुला हातांनीं उचलून धरिलें असा तूं आम्हांला कोटी गाई देणारा हो.
इंद्रादिलोकपालांची जी लक्ष्मी गाईच्या रूपानें राहून यज्ञाकरितां तूप देते, ती माझें पाप नाहींसें करो ॥ ३१ ॥
माझेपुढें व मागें गाई असोत, हृदयांत गाई वास करोत असा मी गाईमध्यें वास करीन. याप्रमाणें गोवर्धनाची पूजा करावी
॥ ३२ ॥ देवांना, सत्पुरुषांना व इतरांना भक्तीनें संतुष्ट करावें. इतरांना अन्नानें व पंडितांना उत्तम भाषणानें, घरां-

विष्णुबाहुकृतोच्छ्रायगवांकोटिप्रदोभव ॥ यालक्ष्मीर्लोकपालानांधेनुरूपेणसंस्थिता ॥ घृतंवह
तियज्ञार्थेममपापंव्यपोहतु ॥ ३१ ॥ अग्रतःसंतुमेगावोगावोमेसंतुपृष्ठतः ॥ गावोमेहृदयेसंतुगवां
मध्येवसाम्यहम् ॥ ३२ ॥ इतिगोवर्धनपूजा ॥ ॥ सद्भावेनैवसंतोष्यदेवान्सत्पुरुषान्नरान् ॥
इतरेषामन्नपानैर्वाक्यदानेनपंडितान् ॥ ३३ ॥ वस्त्रैस्तांबूलधूपैश्चपुष्पकर्पूरकुंकुमैः ॥ भक्ष्यैरुच्चा
वचैर्भोज्यैरंतःपुरःनिवासिनः ॥ ३४ ॥ ग्राम्यैर्वृषभदानैश्चसामंतान्नृपतिंधनैः ॥ ३५ ॥
पदातिजनसंघांश्चग्रैवेयैःकटकैःशुभैः ॥ स्वनामांकैश्चतान्राजातोषयेत्सज्जनान्पृथक् ॥ ३६ ॥
यथार्थंतोषयित्वातुततोबल्लानरांस्तथा ॥ वृषभान्महिषांश्चैवयुध्यमानान्परैःसह ॥ ३७ ॥

तील स्त्रियादिकांना वस्त्रें, विडे, फुलें, धूप, कापूर, केशर, उत्तम प्रकारचे भक्ष्यादि पदार्थ यांनीं संतुष्ट करावें॥३३॥३४॥
व शेतीवाल्यांना बैल वगैरे देऊन व राजाला व अधिकारी लोकांना धन द्यावें. राजानें कंठ्या कडीं वगैरे आपल्या
नांवाचे छाप मारलेलीं देऊन, पदाति जनांचा व सज्जनांचा संतोष करावा ॥ ३५ ॥ ३६ ॥ याप्रमाणें सर्वांस संतुष्ट

करून राजांनीं मंचकावर बसून मल्ल, बैल, रेडे, यांच्या झुंजी पहाव्या ॥३७॥ मांडलिकराजे, योद्धे, पायदळ, नट, नाच-
णारे व स्तुतिपाठक भाट यांच्या भेटी घ्याव्या॥३८॥बैल रेड्यांना सोडावे व गाईंना युद्धानंतर वासरें यांना मोकळें सोडून
द्यावें॥३९॥नंतर तिसरे प्रहरीं दर्भाची व मोळाची मार्गपाली(मांगोली)करून पूर्वेच्या वेशीला अगर झाडाला बांधावी व तिच्या

राजानश्चापियोधांश्चपदातीन्समलंकृतान् ॥ मंचारूढःस्वयंपश्येन्नटनर्तकचारणान् ॥ ३८ ॥
युद्धापयेद्वासयेच्चगोमहिष्यादिकंचयत् ॥ वत्सानाकर्षयेद्गोभिरुक्तिप्रत्युक्तिवादनात् ॥ ३९ ॥
ततोपराह्णसमयेपूर्वस्यांदिशिपावके ॥ मार्गपालींप्रबध्नातिदुर्गस्तंभेथपादपे ॥४०॥ कुशकाश
मयींदिव्यांलंबकैर्बहुभिःप्रिये ॥ वीक्षयित्वागजानश्वान्मार्गपाल्यास्तलेनयेत् ॥ ४१ ॥ गावो
वृषांश्चमहिषान्महिषीर्घंटकोत्कटान् ॥ कृतहोमैर्द्विजेंद्रैस्तुबध्नीयान्मार्गपालिकाम् ॥ ४२ ॥
नमस्कारंततःकुर्यान्मंत्रेणानेनसुव्रत ॥ मार्गपालिनमस्तुभ्यंसर्वलोकसुखप्रदे ॥ मार्गपालीतले
स्कंदयांतिगावोमहावृषाः ॥ ४३ ॥

खालून हत्ती, घोडे, गाई, बैल, म्हशी, रेडे वगैरे न्यावे. ब्राह्मणांनीं होम करून ती मार्गपाली बांधावी ॥४०॥४१॥४२ ॥
नंतर या मंत्रानें नमस्कार करावा. "हे मार्गपाली, तूं सर्व लोकांना सुख देणारी अशा तुला नमस्कार असो." हे स्कंदा!
मार्गपाली खालून गाई बैल यांना न्यावें। राजा, राजपुत्र, ब्राह्मण हे पाली उल्लंघून गेले असतां त्यांना रोग होणार

नाहीं व ते सुखी होतील ॥ ४३ ॥ ४४ ॥ दिवसा याप्रमाणें केल्यानंतर रात्रीं भूमीवर मंडळ काढून त्यावर दैत्य-पति जो बळी त्याची पूजा करावी ॥ ४५ ॥ पांच प्रकारचे रंग घेऊन त्यांनीं सर्व अलंकार व विंध्यावली स्त्रीयुक्त बळीचें चित्र काढावें. मधु नांवाचा दैत्य जवळ आहे असा बळी, हस्त, मुख, किरीट, कुंडलें घातलेला, दोन हातांचा

राजानोराजपुत्राश्चब्राह्मणाश्चविशेषतः ॥ मार्गपालींसमुल्लंघ्यनीरुजःसुखिनोहिते ॥ ४४ ॥
कृत्वैतत्सर्वमेवेहरात्रौदैत्यपतेर्बलेः ॥ पूजांकुर्यात्ततःसाक्षाद्भूमौमंडलकेकृते ॥ ४५ ॥
बलिमालिख्यदैत्येंद्रंवर्णकैःपंचरंगकैः ॥ सर्वाभरणसंपूर्णंविंध्यावलिसमन्वितम् ॥४६॥ कूष्मां
डमयजंभोरुमधुदानवसंवृतम् ॥ संपूर्णंहृष्टवदनंकिरीटोत्कटकुंडलं ॥ द्विभुजंदैत्यराजानंकारयि
त्वास्वकेपुनः ॥ ४७ ॥गृहस्यमध्येशालायांविशालायांततोर्चयेत् ॥ मातृभ्रातृजनैःसार्धंसंतुष्टो
बंधुभिःसह ॥ ४८ ॥ कमलैःकुमुदैः पुष्पैःकल्हारैरक्तकोत्पलैः ॥ गंधपुष्पान्ननैवेद्यैःसक्षीरैर्गुड
पायसैः ॥ ४९ ॥ मद्यमांससुरालेह्यचोष्यभक्ष्योपहारकैः ॥ मंत्रेणानेनराजेंद्रःसमंत्रीसपुरो
हितः ॥ ५० ॥

असा काढावा, तो आपल्या घरामध्यें मोठ्या दिवाणखान्यांत काढावा. आपली आई भाऊ व सर्व आप्तइष्ट यांसह-वर्तमान नानाप्रकारचीं कमळें, गंध, फुलें, दूध, गूळ, खीर, पक्कानें यांनीं समाधानानें पूजा करावी ॥ ४६ ॥ ४७ ॥ ॥ ४८ ॥ ४९ ॥ मद्यमांस, लेह्य (चाटण्याचे) चोष्य, (चोखण्याचे) पदार्थ, फराळाचे जिन्नस अर्पण करावे, राजानें

प्रधान उपाध्याय यांसह बसून पुढील मंत्रानें पूजा करावी ह्मणजे एक वर्ष सुखदायक जातें. हे विरोचनाच्या पुत्रा, पुढें इंद्र होणाऱ्या प्रभु बलिराजा, ही मी केलेली पूजा ग्रहण कर याप्रमाणें पूजाविधी व प्रार्थना करून रात्रीं जागरण करावें ॥५०॥५१॥५२॥ व त्या रात्रीं गाणें, नाच, कथा वगैरे करून करमणूक करावी. इतर लोकांनीं आपल्या

पूजांकरिष्यतेयोवैसौख्यंस्यात्तस्यवत्सरम् ॥ बलिराजनमस्तुभ्यंविरोचनसुतप्रभो ॥ ५१ ॥
भविष्येंद्रसुराराते पूजेयंप्रतिगृह्यताम् ॥ एवंपूजाविधानेनरात्रौजागरणंततः ॥ ५२ ॥ कारयेद्वै
क्षणंरात्रौनटनृत्यकथानकैः ॥ लोकैश्चापिगृहस्यांतेसपर्याशुक्लतंदुलैः ॥ ५३ ॥ संस्थाप्यबलिरा
जानंफलैःपुष्पैःप्रपूजयेत् ॥ बलिमुद्दिश्यवैतत्रकार्यंसर्वंचपावके ॥ ५४ ॥ यानियान्यक्षयान्याहु
र्मुनयस्तत्त्वदर्शिनः ॥ यदत्रदीयतेदानंस्वल्पंवायदिवाबहु ॥ तदक्षयंभवेत्सर्वंविष्णोःप्रीतिकरं
शुभम् ॥५५॥रात्रौयेनकरिष्यंतितवपूजांबलेनराः॥तेषांचश्रोत्रियोधर्मःसर्वस्त्वामुपतितुष्ठतु ॥५६॥

घरीं शुभ्र तांदुळांचा बळी काढून फुलें, फळें इत्यादिकांनीं पूजा करावी व बळीकरितां सर्व मंगलादि करावें ॥ ५३ ॥ ॥ ५४ ॥ सूज्ञऋषि जें जें अक्षय ह्मणून सांगतात, त्यामध्यें या कार्तिकांत बलिप्रतिपदेला जें थोडें फार दान द्यावें, तें अक्षय होऊन विष्णूला प्रीतिकर व शुभ होतें ॥ ५५ ॥ हे बले ! जे रात्रीं तुझी पूजा करणार नाहींत, त्यांचीं

सर्व धर्म, पुण्यें तुला मिळोत ॥ ५६ ॥ विष्णूनीं पुन्हां संतुष्ट होऊन बळीला उपकारकारक दैत्यांना हा आनंदोत्सव दिला तेव्हांपासून स्कंदा ! ही कौमुदी (दिवाळी) नांवाचा उत्सव सुरू झाला ॥ ५७ ॥ ५८ ॥ ही कौमुदी सर्व उपद्रव नाहींसे करणारी व सर्व विघ्नें घालविणारी आहे, तसेंच लोकांचा शोक घालविणारी व इच्छा पूर्ण करणारी, धन, पुष्टी, सुख देणारी, अशी आहे ॥ ५९ ॥ कु ह्मणजे पृथ्वी व मुद ह्मणजे हर्ष या युक्त शब्दाला व्याकरण व शास्त्र जाणणारांनीं कौमुदी

विष्णुनाचस्वयंवत्सतुष्टेनबलयेपुनः ॥ ५७ ॥ उपकारकरंदत्तमसुराणांमहोत्सवम् ॥ तदाप्रभृति सेनानीप्रवृत्ताकौमुदीसदा ॥५८॥ सर्वोपद्रवसंहर्त्रीसर्वविघ्नविनाशिनी ॥ लोकशोकहराकाम्याधनपुष्टिसुखावहा ॥ ५९ ॥ कुशब्देनमहीज्ञेयामुदहर्षंततोद्वयम् ॥ धातुज्ञैर्निगमज्ञैश्चतेनैशाकौमुदी स्मृता ॥ ६० ॥ कौमोदंतेजनायस्मान्नानाभावैःपरस्परम् ॥ हृष्टास्तुष्टाःसुखापन्नास्तेनैषाकौमुदीस्मृता ॥ ६१ ॥ कुमुदानिबलेर्यस्माद्दीयंतेतेनषण्मुख ॥ अर्थायपार्थिवैःपुत्रतेनैषाकौमुदी स्मृता ॥ ६२ ॥ एकमेवमहोरात्रंवर्षेवर्षेचकार्तिके ॥ दत्तंदानवराजस्यआदर्शमिवभूतले ॥ ६३ ॥

असें ह्मटलें आहे॥६०॥या दिवशीं पृथ्वीवर नानाप्रकारच्या गोष्टींनीं लोक एकमेकांत आनंद करितात,आनंदित होतात, संतुष्ट होतात, सुख पावतात, ह्मणून ही कौमुदी समजावी ॥६१॥ हे षण्मुखा ! राजे आपल्या कल्याणाकरितां बळीला कुमुद (कमळें) अर्पण करितात. ह्मणून हिला कौमुदी ह्मणतात ॥६२॥ ही एक बलिप्रतिपदेची रात्र व दिवस प्रत्येक वर्षीं

कार्तिकांत बलिराजाला या पृथ्वीवर आरशाप्रमाणें दिली आहे॥६३॥ जो राजा याप्रमाणें दिवाळी करितो त्याच्या राज्यांत व्याधीचें भय कोठून राहील ? त्याचे राज्यांत सुभिक्ष, क्षेम, आरोग्य, उत्तम संपत्ति हीं राहतात॥६४॥ सर्वजण निरोगी व उपद्रवरहित होतात अशा दिवाळीचा उत्सव केल्यानें त्या राज्यांत सुख होतें ॥६५॥ या कौमुदीला (बलिप्रतिपदेला) जो जशा भावानें राहील, तशा भावानें तो वर्षभर हर्षांत किंवा दुःखांत राहील ॥६६॥ त्यादिवशीं रडला,

यःकरोतिनृपोराज्येतस्यव्याधिभयंकुतः ॥ सुभिक्षंक्षेममारोग्यंतस्यसंपदनुत्तमा ॥६४॥ नीरुजश्चजनाःसर्वेसर्वोपद्रववर्जिताः ॥ कौमुदीक्रियतेयस्माद्भावंकर्तुंमहीतले ॥ ६५ ॥ योयादृशेनभावेनतिष्ठत्यस्यांचषण्मुख ॥ हर्षदुःखादिभावेनतस्यवर्षंप्रयातिहि ॥६६ ॥ रुदितेरोदितंवर्षंप्रहृष्टेतुप्रहर्षितम् ॥ भुक्तौभोग्यंभवेद्वर्षेस्वस्थेस्वस्थंभविष्यति ॥ ६७ ॥ तस्मात्प्रहृष्टैःकर्त्तव्या कौमुदीचशुभैर्नरैः ॥ वैष्णवीदानवीचेयंतिथिःप्रोक्ताचकार्तिके ॥ ६८ ॥ दीपोत्सवंजनितसर्वजनप्रमोदंकुर्वंतियेशुभतयाबलिराजपूजाम् ॥ दानोपभोगसुखबुद्धिमतांकुलानांहर्षंप्रयातिसकलंप्रमुदाचवर्षम् ॥ ६९ ॥

तर वर्षभर रडेल. आनंदांत राहिला तर वर्षभर आनंदी राहील, सुखाचा उपभोग घेतला तर वर्षभर सुखोपभोग मिळेल, स्वस्थ असला तर स्वस्थ राहील ॥ ६७ ॥ ह्मणून सर्वांनीं आनंदानें दिवाळी करावी, कार्तिकांतही दिवाळी पाडवा वैष्णवांची व दैत्यांची ही एक तिथी आहे ॥ ६८ ॥ जे लोक सर्व जनांना आनंद देणारा दीपोत्सव करून

मोठ्या आनंदानें बळीची पूजा करितात, त्यांच्या कुळाला तें वर्ष मोठ्या आनंदाचें व सुखोपभोगाचें जातें ॥ ६९ ॥ हे स्कंदा ! पर्जन्यकाळीं चार महिन्यांतील चार द्वितीयातिथी सुखकारक आहेत ॥ ७० ॥ पहिली श्रावण महिन्यां-तील द्वितीया, दुसरी भाद्रपद महिन्यांतील, तिसरी अश्विनांतील चौथी कार्तिकांतील ॥ ७१ ॥ श्रावणमासांतील द्वितीया कलुषा नांवाची, भाद्रपदांतील अमला नांवाची, अश्विनांतील प्रेतसंचारा नांवाची व कार्तिकांतील याम्यका

स्कंदैतास्तिथयोनूनंद्वितीयाद्याश्चविश्रुताः ॥ मासैश्चतुर्भिश्चततःप्रावृट्कालेसुखावहाः ॥ ७० ॥ प्रथमाश्रवणेमासितथाभाद्रपदेऽपरा ॥ तृतीयाऽश्वयुजेमासिचतुर्थींकार्तिकेभवेत् ॥ ७१ ॥ कलुषाश्रवणेमासितथाभाद्रपदेऽमला ॥ आश्विनेप्रेतसंचाराकार्तिकेयाम्यकामता ॥ ७२ ॥ ॥ गुहउवाच ॥ ॥ कस्माद्वैकलुषाप्रोक्ताकस्मात्सानिर्मलामता ॥ कस्मात्साप्रेतसंचाराकस्माद्याम्या प्रकीर्तिता ॥ ७३ ॥ ॥ सूतउवाच ॥ ॥ इतिस्कंदवचःश्रुत्वाभगवान्भूतभावनः ॥ उवाचवचनंश्लक्ष्णंप्रहसन्वृषभध्वजः ॥ ७४ ॥ ॥ महेशउवाच ॥ ॥ पुरावृत्रवधेवृत्तेप्राप्तराज्येपुरंदरे ॥ ब्रह्महत्यापनोदार्थमश्वमेधःप्रकीर्तितः ॥ ७५ ॥

नांवाची द्वितीया होय॥७२॥स्कंद ह्मणतातः—शंकरा! कलुषा, अमला, प्रेतसंचारा, याम्यका,अशी त्या द्वितीयांना नांवें कां प्राप्त झाली तें सांगा ॥ ७३ ॥ सूत ह्मणालेः—या प्रमाणें स्कंदाचें भाषण ऐकून भगवान् शंकर हंसून बोलले ॥ ७४ ॥ शंकर ह्मणालेः—पूर्वीं इंद्र वृत्रासुराचा वध करून राज्यावर बसला त्याला ब्रह्महत्त्या लागली, तिचे शमनार्थ

अश्वमेध केला ॥ ७५ ॥ तेव्हां इंद्रानें क्रोधानें त्या ब्रह्महत्येचे वज्रानें सहा भाग करून पृथ्वीवर टाकिले ॥ ७६ ॥ ते सहा विभाग वृक्षावर, जळावर, भूमीवर, भ्रूणघ्नावर, अग्निवर, पडले ॥ ७७ ॥ श्रावणांतील द्वितीयेला स्त्री, वृक्ष, नदी, भूमी, अग्नि, भ्रूणघ्न हीं अशुद्ध झालीं ह्मणून या द्वितीयेला कलुषा द्वितीया ह्मणतात ॥ ७८ ॥ पूर्वीं मधुकैटभ दैत्यांच्या रक्तानें पृथ्वी आठ अंगुळें भरल्यामुळें अपवित्र झाली, स्त्रियांचें रज हा मल आहे ॥ ७९ ॥ नद्या

क्रोधादिंद्रेणवज्रेणब्रह्महत्यानिषूदिता ॥ षड्विधासाक्षितौक्षिप्तावृक्षतोयमहीतले ॥७६॥ नार्यौ भ्रूणहरेवह्नौसंविभज्ययथाक्रमम् ॥ तत्पापश्रवणात्पूर्वंद्वितीयायादिनेनघ ॥७७॥ नारीवृक्षनदी भूमिवह्निभ्रूणहनस्तथा ॥ कलुषोभवनंजाताह्यतोऽर्थंकलुषास्मृता ॥ ७८ ॥ मधुकैटभयोरक्ते पुरामग्नातुमेदिनी ॥ अष्टांगुलाऽपवित्रासानारीणांतुरजोमलम् ॥७९॥ नद्यःप्रावृण्मलाःसर्वा वह्नेरूर्ध्वंमषीमलः ॥ निर्यासमनिलोवृक्षाःसंगाभ्रूणहनोमलाः ॥ ८० ॥ कलुषानिचरंत्यस्यांते नैषाकलुषामता ॥ देवर्षिपितृधर्माणांनिंदकानास्तिकाःशठाः ॥८१ ॥

पर्जन्यकाळीं मलिन होतात, अग्नीचा वरचा धूर मल आहे, वृक्षांचा डिंक मल आहे, भ्रूणहत्त्या करणारांची संगती हा मल आहे ॥ ८० ॥ या श्रावण द्वितीयेला ही मलिन झाली ह्मणून हिला कलुषा ह्मणतात ॥ देव, ऋषि, पितर, यांची व धर्मांची निंदा करणारे नास्तिक शठ यांच्या वाणीच्या मलापासून भाद्रपद द्वितीयेला ती निर्मल झाली ॥ ८१ ॥

व अनध्यायाचे दिवशीं जे पठण करितात व दुसऱ्याला पढवितात असें सांख्यशास्त्री, तर्कशास्त्री व वैदिक यांच्या शब्दापशब्दांच्या मलापासून ती भाद्रपद द्वितीयेला निर्मल झाली ॥ ८२ ॥ ८३ ॥ तसेंच भाद्रपदमासीं कृष्ण जन्म झाल्यामुळें सर्व त्रैलोक्य पवित्र झालें ह्मणून या भाद्रपदांतील द्वितीयेला निर्मला ह्मणतात ॥ ८४ ॥ अश्विनमासीं-

तेषांसावाङ्मलात्पूताद्वितीयातेननिर्मला ॥ अनध्यायेषुशास्त्राणिपाठयंतिपठंतिच ॥ ८२ ॥
सांख्यकास्तार्किकाःश्रौतास्तेषांशब्दापशब्दजात् ॥ मलात्पूताद्वितीयायांततोऽर्थेनिर्मलाचसा
॥ ८३ ॥ कृष्णस्यजन्मनावत्सत्रैलोक्यंपावितंभवेत् ॥ नभस्येतेननिर्दिष्टानिर्मलासातिथिर्बुधैः
॥ ८४ ॥ अग्निष्वात्ताबर्हिषदआज्यपाःसोमपास्तथा ॥ पितॄन्पितामहान्प्रेतसंचरात्प्रेतसंचरा
॥ ८५ ॥ प्रेतास्तुपितरःप्रोक्तास्तेषांतस्यांतुसंचरः ॥ पुत्रपौत्रैस्तुदौहित्रैःस्वधामंत्रैस्तुपूजिताः
॥ ८६ ॥ श्राद्धदानमखैस्तृप्तायांत्यतःप्रेतसंचरा ॥ महालयेतुप्रेतानांसंचारोभुविदृश्यते ॥ तेनै
षाप्रेतसंचाराकीर्तिताशिखिवाहन ॥ ८७ ॥

चे द्वितीयेला आग्निष्वात्त बर्हिषद, आज्यप, सोमप व पितर प्रेत रूपानें या द्वितीयेला संचार करितात ह्मणून इला प्रेत संच-रा ह्मणतात ॥ ८५ ॥ या तिथीला पुत्र, नातू ; कन्येचे पुत्र हे स्वधा मंत्रांनीं त्या पितरांची पूजा करितात ॥ ८६ ॥ व श्राद्ध, दान, यज्ञ करून तृप्त करितात ह्मणून ही प्रेतसंचरा होय। महालयामध्यें पृथ्वीवर प्रेतांचा (पितरांचा) संचार दिसतो

ह्मणून आश्विनांतील द्वितीयेला प्रेतसंचरा ह्मणतात ॥ ८७ ॥ कार्तिकांतील द्वितीयेचे दिवशीं यमाची पूजा करितात ह्मणून तिला याम्यका ह्मणतात असें मी खरें सांगतों ॥ ८८ ॥ कार्तिकशुद्ध द्वितीयेला दोनप्रहरच्या आंत यमाची पूजा करावी. त्या दिवशीं यमुनेमध्यें स्नान केलें असतां मनुष्य यमलोक पाहणार नाहीं ॥ ८९ ॥ पूर्वीं यमुनेनें कार्तिक शुद्ध द्वितीयेला यमाला आपले घरीं बोलावून त्याची पूजा करून भोजनास घातलें ॥ ९० ॥ व नरकांतील सर्व पापी

यमस्यक्रियतेपूजायतोऽस्यांपावकेनरैः ॥ तेनैषायाम्यकाप्रोक्तासत्यंसत्यंमयोदितम् ॥ ८८ ॥
कार्तिकेचद्वितीयायांपूर्वाह्णेयममर्चयेत् ॥ भानुजायांनरःस्नात्वायमलोकंनपश्यति ॥ ८९ ॥
कार्तिकेशुक्लपक्षेतुद्वितीयायांतुशौनक ॥ यमोयमुनयापूर्वंभोजितःस्वगृहेर्चितः ॥९०॥ द्विती
यायांमहोत्सर्गोनारकीयाश्चतर्पिताः ॥ ९१ ॥ पापेभ्योविप्रयुक्तास्तेमुक्ताःसर्वनिबंधनात् ॥
अत्राशिताश्चसंतुष्टाःस्थिताःसर्वेयदृच्छया ॥९२॥ तेषांमहोत्सवोवृत्तोयमराष्ट्रसुखावहः ॥ अतो
यमद्वितीयेयंत्रिषुलोकेषुविश्रुता ॥९३॥ तस्मान्निजगृहेविप्रनभोक्तव्यंततोबुधैः ॥ स्नेहेनभगि
नीहस्ताद्भोक्तव्यंपुष्टिवर्धनम् ॥ ९४ ॥

प्राणी मुक्त करून सर्वांना भोजन देऊन तृप्त केलें व ते पापापासून व सर्व बंधापासून मुक्त होऊन आपले मर्जीप्रमाणें जेवून संतुष्ट होऊन मोकळेपणें राहिले॥९१॥९२॥त्यांचा यमाच्या राज्यांत त्या दिवशीं सुखावह असा मोठा उत्सव झाला; ह्मणून ही यमद्वितीया नांवानें त्रैलोक्यांत प्रसिद्ध झाली॥९३॥ह्मणून या द्वितीयेला आपल्या घरांत जेवूं नये प्रेमानें बहिणी-

च्या हातचें जेवावें ह्मणजे तें पुष्टिवर्धक होतें ॥९४॥ त्या दिवशीं बहिणींनां अलंकार,वस्त्रें वगैरे देऊन त्यांची सत्कारपूर्वक पूजा करावी ॥ ९५ ॥ आपल्या सख्या बहिणीच्या हातचें भोजन करावें व इतर सर्व बहिणींचे हातचेंही जेवावें ह्मणजे त्यापासून बलवृद्धि होते॥९६॥कार्तिक शुद्ध द्वितीयेला, पूजित व तृप्त असून रेड्यावर बसलेला, दंड मुद्गल घेत-

दानानिचप्रदेयानिभगिनीभ्योविधानतः ॥ स्वर्णालंकारवस्त्राणिपूजासत्कारपूर्वकम् ॥ ९५ ॥
भोक्तव्यंसहजायाश्चभगिन्याहस्ततःस्वयम् ॥ सर्वस्वभगिनीहस्ताद्भोक्तव्यंबलवर्धनम् ॥९६॥
ऊर्ज्जेशुक्लद्वितीयायांपूजितस्तर्पितोयमः ॥ महिषासनमारूढोदंडमुद्गरभृत्प्रभुः ॥ वेष्टितःकिंकरैर्हृ
ष्टैस्तस्मैयाम्यात्मनेनमः ॥९७॥ यैर्भगिन्यःसुवासिन्योवस्त्रदानादितोषिताः ॥ नतेषांवत्सरंया
वत्कलहोनरिपोर्भयम् ॥ ९८ ॥ धन्यंयशस्यमायुष्यंधर्मकामार्थसाधनम् ॥ व्याख्यातंस
कलंपुत्रसरहस्यंमयानघ ॥ ९९ ॥

लेला, ज्याचे बरोबर आनंदित दूत आहेत अशाप्रकारच्या यमा तुला नमस्कार असो ॥९७॥ ज्यांनीं आपल्या सुवासिनी भगिनीला, वस्त्र अलंकार देऊन संतुष्ट केलें, त्यांना वर्षभर कलह व शत्रु यांचे पासून भय नाहीं ॥९८॥ ही यमद्वितीयेची श्रेष्ठ, यश व आयुष्य देणारी, धर्म, काम, अर्थ साधणारी अशी गुप्त सुंदर कथा, कार्तिकेया तुला मी सांगितली ॥९९॥

ज्या या द्वितीया तिथीला यमुनेनें यमराज देवाला प्रेमानें भोजन दिलें, त्या यमद्वितीयेला दरवर्षीं आपल्या बहिणीच्या घरीं जो भोजन करील, त्याला सर्व प्रकारचें शुभ, संपत्ति व द्रव्य होतात ॥ १०० ॥ इति श्रीपद्म-पुराणे कार्तिकमाहात्म्ये पंचत्रिंशोध्यायः ॥ ३५ ॥ कार्तिकेय, प्रश्न करितातः—हे भगवन् , व्रतामध्यें उत्तम व्रत जें का-

यस्यांतिथौयमुनयायमराजदेवःसंभोजितःप्रतितिथौस्वसृसौहृदेन ॥ तस्मात्स्वसुःकरतलादिहयो
भुनक्तिप्राप्नोतिवित्तशुभसंपदमुत्तमांसः ॥ १०० ॥ इतिश्रीपद्मपुरा० का० मा० कृष्णसत्यासं०
पंचत्रिंशोध्यायः ॥ ३५ ॥ ॥ कार्तिकेयउवाच ॥ ॥ भगवञ्छ्रोतुमिच्छामिव्रतानामुत्तमंव्र
तम् ॥ विधिंमासोपवासस्यफलंचास्ययथोचितम् ॥ १ ॥ यथाविधिनरैःकार्यांव्रतचर्यांयथाभ
वेत् ॥ आरभ्यतेयथापूर्वंसमाप्यंहियथाविधि ॥ २ ॥ यावत्संख्यंतुकर्त्तव्यंतत्प्रब्रूहिमहेश्वर ॥
व्रतमेतत्सुरश्रेष्ठविस्तरेणममानघ ॥ ३ ॥ ॥ श्रीरुद्रउवाच ॥ ॥ साधुपावकिसर्वंतेयत्पृष्टंप्रब्रुवेऽन
घ ॥ भक्त्यामतिमतांश्रेष्ठश्शृणुष्वगदतोमम ॥ ४ ॥

र्तिकांत मासोपवास करणें, याचा विधि व त्याचें यथोचित फल काय तें सांगा ॥ १ ॥ मनुष्यांनीं त्याचा विधि कसा करावा, आरंभ कसा करावा, समाप्ति कशी करावी ॥२॥ त्याची मुदत किती दिवस वगैरे सर्व व्रत विस्तारानें मला सांगा ॥३॥ शंकर ह्मणतातः—हे भक्तश्रेष्ठा स्कंदा, तूं फार चांगलें विचारलेंस, तूं भक्तिमान् आहेस, तुला सांगतों श्रवण कर ॥४॥

ज्या प्रमाणें सर्व देवांत विष्णु जसा श्रेष्ठ व ग्रहामध्यें रवि श्रेष्ठ, पर्वतांमध्यें जसा मेरु श्रेष्ठ, पक्ष्यांमध्यें जसा गरुड श्रेष्ठ ॥ ५ ॥ तीर्थांमध्यें जशी गंगा श्रेष्ठ, प्रजेमध्यें व्यापारी श्रेष्ठ, तसें सर्व व्रतांमध्यें मासोपवास व्रत श्रेष्ठ आहे. ॥ ६ ॥ सर्व व्रतें, सर्व तीर्थें केल्याचें व सर्व दान दिल्यापासून जें पुण्य मिळतें तें सर्व, मास उपोषण कर्त्याला प्राप्त होतें.

सुराणांचयथाविष्णुस्तपतांचयथारविः ॥ मेरुःशिखरिणांयद्वद्वैनतेयश्चपक्षिणाम् ॥ ५ ॥ तीर्थानांतुयथागंगाप्रजानांतुयथावणिक् ॥ श्रेष्ठंसर्वव्रतानांतुतद्वन्मासोपवासनम् ॥ ६ ॥ सर्वव्रतेषुयत्पुण्यंसर्वतीर्थेषुचैवहि ॥ सर्वदानोद्भवंचैवलभेन्मासोपवासकृत् ॥ ७ ॥ अग्निष्टोमादिभिर्यज्ञैर्विविधैर्भूरिदक्षिणैः ॥ नतत्पुण्यमवाप्नोतियन्मासपरिलंघनात् ॥ ८ ॥ तेनजप्तंहुतंदत्तंतपस्तप्तंकृता स्वधा ॥ यःकरोतिविधानेननरोमाससुपोषणम् ॥ ९ ॥ उद्दिश्यवैष्णवंयज्ञंसमभ्यर्च्यजनार्दनम् ॥ गुरोराज्ञांततोलब्ध्वाकुर्यान्मासोपवासनम् ॥ १० ॥ वैष्णवानियथोक्तानिकृत्वासर्वव्रतानितु ॥ द्वादश्यादीनिपुण्यानिततोमाससुपावसेत् ॥ ११ ॥

॥ ७ ॥ एक मासोपवासानें जें पुण्य मिळतें, तितकें पुष्कळ दक्षिणायुक्त अग्निष्टोमादि यज्ञापासूनही मिळत नाहीं. ॥८॥ ज्यानें मासउपोषण केलें, त्यानें सर्व जप, होम, दानें, तपें व श्राद्धें केल्याप्रमाणें आहे॥९॥प्रथम विष्णु प्राप्तीच्या उद्देशानें संकल्प करावा, विष्णूचें पूजन करावें व गुरूची आज्ञा घेऊन मासोपवासाला आरंभ करावा ॥१०॥द्वादशीआदिकरून जीं विष्णूचीं व्रतें आहेत, तीं अगोदर करावीं ॥ ११ ॥ तसेंच अतिकृच्छ्र, पाराक वगैरे प्रायश्चित्तें आपल्या शक्तीनुरूप प्रथम करावीं, नंतर मासोपवासव्रताला आरंभ करावा ॥१२॥ वानप्रस्थ, संन्यासी, विधवा स्त्री, यांनीं गुरु व ब्राह्मण यांची आज्ञा घेऊन मास उपोषण करावें ॥ १३ ॥ आश्विन शुद्ध एकादशीला उपोषण करून हें व्रत घ्यावें तें तीस दिवसपर्यंत करावें॥१४॥सर्व कार्तिक महिना विष्णूची पूजा करून उपोषण करावें, ह्मणजे तो मोक्ष फलभागी होतो ॥ १५॥ विष्णु

अतिकृच्छ्रंचपाराकंकृत्वाचांद्रायणंततः ॥ मासोपवासंकुर्वीतज्ञात्वादेहबलाबलम् ॥ १२ ॥ वानप्रस्थोयतिर्वापिनारीवाविधवामुने ॥ मासोपवासंकुर्वीतगुरोर्विप्राज्ञयाततः ॥ १३ ॥ आश्विनस्यामलेपक्षेएकादश्यामुपोषितः ॥ व्रतमेतत्तुगृह्णीयाद्यावत्त्रिंशद्दिनानितु ॥ १४ ॥ वासुदेवंसमभ्यर्च्यकार्तिकंसकलंनरः ॥ मासंचोपवसेद्यस्तुसमुक्तिफलभाग्भवेत् ॥ १५ ॥ अच्युतस्यालयेभक्त्यात्रिकालंकुसुमैःशुभैः ॥ मालतींदीवरैःपद्मैःकमलैस्तुसुगंधिभिः ॥१६॥ कुंकुमोशीरकर्पूरैर्विलिप्यवरचंदनैः ॥ नैवेद्यधूपदीपाद्यैरर्चयेच्चजनार्दनम् ॥१७॥ मनसाकर्मणावाचा पूजयेद्गरुडध्वजम् ॥ कुर्वन्नरःस्त्रीविधवाबृहद्भक्तिर्जितेंद्रियः ॥ १८ ॥

मंदिरांत जाऊन त्रिकाळ भक्तीनें, इंदीवर, पद्म,कमळ इत्यादि कमळें, मालती व सुगंधीं फुलांनीं,केशर,वाळा, कापूर, चंदनमिश्रित गंधानें व धूप, दीप, नैवेद्य यांनीं पूजा करावी॥१६॥१७॥ पुरुष, स्त्रिया व विधवा, यांनीं मनानें, वाचेनें, शरीरानें इंद्रियें जिंकून, भक्तिपूर्वक,गरुडध्वजाची पूजा करून त्याच्या नामांनीं कीर्तन, गायन करावें व खोटें न बोलतां,

विष्णूची रात्रंदिवस स्तुति करावी ॥ १८॥१९॥ सर्व प्राणिमात्रांवर दया करणारा, हिंसा न करणारा, शांतवृत्ति असा राहून निजतांना किंवा आसनावर बसूनही भगवंताचे गुणानुवाद वर्णन करीत असावें॥२०॥अन्नाचा स्वाद, अगर घास घेणें, स्मरण करणें, पहाणें, वर्णन करणें वगैरे सर्व वर्ज करावें ॥ २१ ॥ अंगाला, मस्तकाला तेल लावणें, विडा खाणें, गंधाची उटी लावणें, हें सर्व व इतर सर्व निषिद्ध, व्रत करणारानें वर्ज्य करावें ॥ २२ ॥ व्रतस्थानें कोणा विकर्म्याला

नाम्नामेवतथालापंविष्णोःकुर्यादहर्निशम् ॥ भक्त्याविष्णोःस्तुतिर्वाच्यामिथ्यालापविवर्जिता ॥ १९ ॥ सर्वसत्त्वदयायुक्तःशांतवृत्तिरहिंसकः ॥ सुप्तोवाप्यासनस्थोवावासुदेवंप्रकीर्त्तयेत् ॥ २० ॥ स्मृत्वालोकनगंधादिस्वादितंपरिकीर्तितम् ॥ अन्नस्यवर्जयेद्ग्रासंग्रासानांसंप्रमोक्षणम् ॥ २१ ॥ गात्राभ्यंगंशिरोभ्यंगंतांबूलंसविलेपनम् ॥ व्रतस्थोवर्जयेत्सर्वंयच्चान्यच्चनिराकृतम् ॥ २२ ॥ नव्रतस्थःस्पृशेत्किंचिद्विकर्मस्थंनचालयेत् ॥ देवतायतनेतिष्ठन्गृहस्थश्चाचरेद्व्रतम् ॥ २३ ॥ कृत्वा मासोपवासंतुयथोक्तविधिनानरः ॥ नारीवाविधवासाध्वीवासुदेवंसमर्चयेत् ॥ २४ ॥ अन्यूनाधिकमेवंतुव्रतंत्रिंशद्दिनैरिति ॥ कृत्वामासोपवासंतुसंयतात्माजितेंद्रियः ॥ २५ ॥

शिवूं नये. व्रत मोडेल ह्मणून कोणाबरोबर कोठें जाऊं नये, देवालयांत राहून गृहस्थानें व्रत आचरण करावें ॥ २३ ॥ यथाविधी पुरुष, सुवासिनी, विधवा, साध्वीस्त्रिया, यांनीं महिनाभर उपोषण करून भगवान् वासुदेवाची पूजा करावी ॥ २४ ॥ इंद्रियें जिंकून मन स्वाधीन ठेवून कमी अगर अधिक न करितां तीस दिवस उपोषण करावें ॥ २५ ॥

नंतर द्वादशीला विष्णूची पूजा करावी. गंध, माळा, धूप, दीप, विलेपन, वस्त्रें, अलंकार, वाद्यें, यांनीं देवाला संतुष्ट करावें व चंदनयुक्त पाण्यानें स्नान घालावें. चंदनानें आंगाला लेप करावा सुवासिक पुष्पें वाहावीं. ब्राह्मणांना वस्त्रें देऊन भोजन घालावें ॥ २६ ॥ २७ ॥ २८ ॥ त्यांना दक्षिणा देऊन नमस्कार करून त्यांची प्रार्थना करावी.

ततोर्चयेद्देवपुण्यंद्वादश्यांगरुडध्वजम् ॥ पूजयेत्पुष्पमालाभिर्गंधधूपविलेपनैः ॥ २६ ॥ वस्त्रालंकारवाद्यैश्चतोषयेदच्युतंनरः ॥ संस्नापयेद्धरिंभक्त्यातीर्थचंदनवारिभिः ॥ २७ ॥ चंदनेनानुलिप्तांगंधूपपुष्पैरलंकृतम् ॥ वस्त्रदानादिभिश्चैवभोजयित्वाद्विजोत्तमान् ॥ २८ ॥ दद्याच्चदक्षिणांतेभ्यःप्रणिपत्यक्षमापयेत् ॥ विप्रान्क्षमापयित्वातुविसृज्याभ्यर्च्यपूज्यच ॥ २९ ॥ एवंवित्तानुसारेणभक्तियुक्तेनशक्तितः ॥ एवंमासोपवासाह्निकृत्वाभ्यर्च्यजनार्दनम् ॥ ३० ॥ भोजयित्वाद्विजांश्चैव विष्णुलोकेमहीयते ॥ एवंमासोपवासांतेवृत्वाविप्रांस्त्रयोदश ॥ ३१ ॥

याप्रमाणें ब्राह्मणांची पूजा करून पाठवणी करावी ॥ २९ ॥ ज्या प्रमाणें द्रव्य असेल त्याप्रमाणें भक्तिपूर्वक उपोषण करून विष्णुपूजा करून ब्राह्मणभोजन घालावें, ह्मणजे विष्णुलोकीं आनंदांत राहतो. याप्रमाणें एक मास उपवास झाल्यानंतर उद्यापनाकरितां एकादशीला उपोषण करून तेरा ब्राह्मण ऋत्विज

करून त्यांच्यावर हवन यज्ञ सोपवावा ॥ ३० ॥ ३१ ॥ ३२ ॥ असा वैष्णव यज्ञ पूर्ण केल्यावर गुरूची आज्ञा घेऊन हरीची पूजा करावी व गुरूची पूजा करून नमस्कार करावा व शुद्ध कुळांतले चांगल्या आचरणाचे व भक्तीनें विष्णुपूजन करणारे असे ब्राह्मण बोलावून नमस्कार करून त्यांना भोजन घालावें ॥ ३३ ॥ ३४ ॥ असे

निर्यापयेत्ततस्तान्वैविधिनायेनतच्छ्रृणु ॥ कारयेद्वैष्णवंयज्ञमेकादश्यामुपोषितः ॥ ३२ ॥ पूज यित्वातुदेवेशमाचार्यानुज्ञयाहरिम् ॥ अर्चयित्वायथाशक्त्याद्यभिवाद्यगुरुंतथा ॥ ३३ ॥ ततोनु भोजयेद्विप्रान्नमस्कारपुरःसरम् ॥ विशुद्धकुलचारित्रान्विष्णुपूजनतत्परान् ॥ ३४ ॥ पूजयि त्वातथासर्वान्भोजयित्वात्रयोदश ॥ तांबूलवस्त्रयुग्मानिभोजनाच्छादनानिच ॥ ३५ ॥ योग पट्टानिसूत्राणिब्रह्मसूत्राणिचैवहि ॥ दत्त्वाचैवद्विजाग्र्येभ्यःपूजयित्वाप्रणम्यच ॥ ३६ ॥ ततोऽनु पूजयेद्भक्त्याशय्यास्तरणसंस्कृताम् ॥ साच्छादुनांशुभांश्रेष्ठांसोपधानामलंकृताम् ॥ ३७ ॥

तेरा ब्राह्मणांना व इतरांना भोजन घातल्यावर त्यांना विडे, दोन दोन वस्त्रें,यज्ञोपवितें, दक्षिणा, योगपट्ट सूत्रें देऊन त्या द्विजश्रेष्ठांना नमस्कार करावे ॥ ३५ ॥ ३६ ॥ नंतर एक शय्या तयार करावी तीवर अभ्रा, उशा, गिरद्या वगैरे घालून उत्तम सुशोभित करावी व शक्तीप्रमाणें सुवर्णाची आत्ममूर्ति करून त्या शय्येवर ठेवून माळादिक घालून पूजन

करावें ॥ ३७ ॥ ३८ ॥ आसन, पादुका, छत्र, दोन वस्त्रें, जोडा व उत्तम पुष्पें हें सर्व त्या शय्येवर ठेवावें ॥ ३९ ॥ याप्रमाणें शय्या तयार करून दान करावी, त्या मंडपांत असलेल्या सर्व ब्राह्मणांस नमस्कार करून प्रार्थना करावी; आपले कृपेनें विष्णूचें स्थान जो वैकुंठ तेथें मी गमन करीन, असें ह्मणावें, ह्मणजे तो वैकुंठाला जातो ॥ ४० ॥ ४१ ॥ मंत्र, कर्म,

कारयित्वात्मनोमूर्तिंकांचनींतुस्वशक्तितः ॥ न्यसेत्तस्यांतुशय्यायामर्चयित्वास्त्रगादिभिः ॥ ३८ ॥ आसनंपादुकाछत्रंवस्त्रयुग्ममुपानहौ ॥ पवित्राणिचपुष्पाणिशय्यायामुपकल्पयेत् ॥ ३९ ॥ एवंशय्यांतुसंकल्प्यप्रणिपत्यचतान्द्विजान् ॥ प्रार्थयेच्चानुमोदार्थंविष्णुलोकंव्रजाम्यहम् ॥ ४० ॥ ततोव्रजेन्नरःश्रेष्ठंविष्णोःस्थानमनामयम् ॥ मंडपस्थांस्तुतान्विप्रानितिवाच्यंमुहुर्मुहुः ॥ ४१ ॥ मंत्रहीनंक्रियाहीनंभक्तिहीनंद्विजोत्तमाः ॥ सर्वंसंपूर्णतांयातुभवद्वाक्यप्रसादतः ॥ विधिर्मासो पवासस्ययथावत्परिकीर्तितः ॥ ४२ ॥ इतिश्रीप०का०श्रीकृ०स०सं०मासोपवासकथनंनाम षट्त्रिंशोऽध्यायः ॥ ३६ ॥ ॥ ईश्वरउवाच ॥ ॥ प्रबोधिन्याश्चमाहात्म्यंपापघ्नंपुण्यवर्द्धनम् ॥ मुक्तिदंतत्त्वबुद्धीनांश्रृणुष्वसुरसत्तम ॥ १ ॥

भक्ति या वांचून जें जें कांहीं घडलें असेल तें सर्व हे द्विजोत्तमहो ! आपल्या वचनानें संपूर्ण व्हावें, अशी ब्राह्मणांची प्रार्थना करावी, हे स्कंदा ! याप्रमाणें कार्तिकमासउपोषणाचा विधि सांगितला आहे तो मी तुला सांगितला ॥४२॥इति श्रीकार्तिकमाहात्म्ये षट्त्रिंशोध्यायः ॥ ३६ ॥ शंकर ह्मणालेः—स्कंदा, प्रबोधिनीचें माहात्म्य पाप नाशकर व

पुण्य वाढविणारें व तत्वज्ञान्याला मुक्ती देणारें आहे, तें श्रवण कर ॥ १ ॥ कार्तिकांतील हरिबोधिनी जों पर्यंत आली नाहीं तों पर्यंतच भागिरथी पृथ्वीवर पवित्रतेची गर्जना करील ॥ २ ॥ व विष्णुप्रिया हरिबोधिनी एकादशी येईपर्यंतच समुद्रसहित सर्व तीर्थें पवित्रतेची गर्जना करितील ॥३॥ प्रबोधिनी एकादशीचें एक उपोषण केलें असतां हजार

तावद्गर्जतिसेनानीर्गंगाभागीरथीक्षितौ ॥ यावत्प्रयातिपापघ्नीकार्तिकेहरिबोधिनी ॥ २ ॥
तावद्गर्जंतितीर्थानिआसमुद्रसरांसिवै ॥ यावत्प्रबोधिनीविष्णोस्तिथिर्नायातिकार्तिके ॥ ३ ॥
अश्वमेधसहस्राणिराजसूयशतानिच ॥ एकेनैवोपवासेनप्रबोधिन्यायथाभवत् ॥ ४ ॥ दुर्लभंचै
वदुष्प्राप्यंत्रैलोक्येसचराचरे ॥ तदपिप्रार्थितंविप्रददातिप्रतिबोधिनी ॥ ५ ॥ ऐश्वर्यसंततिंज्ञानं
राज्यंचसुखसंपदः ॥ ददात्युपोषिताविप्रहेलयाविप्रबोधिनी ॥ ६ ॥ मेरुमंदरतुल्यानिपापान्यु
पार्जितानिच ॥ एकेनैवोपवासेनदहतेहरिबोधिनी ॥ ७ ॥

अश्वमेध केल्याचें व शंभर राजसूय यज्ञ केल्याचें पुण्य प्राप्त होतें ॥ ४ ॥ या चराचर त्रैलोक्यांत जें दुर्लभ व कठिण असेल, तें सर्व इच्छिलें असतां प्रबोधिनी व्रत प्राप्त करून देतें ॥ ५ ॥ प्रबोधिनीचा सहज उपास केला तरी ऐश्वर्य, संतति, ज्ञान, राज्य, सुखसंपत्ति हीं प्राप्त होतात ॥ ६ ॥ मेरुमंदर पर्वताएवढीं जरी पातकें घडलीं असलीं, तरी एक प्रबोधिनीच्या उपवासानें तीं सर्व नष्ट होतात ॥ ७ ॥ प्रबोधिनीचा उपवास समजून जो यथाविधि करील, त्याला यथोक्त संपूर्ण फल मिळतें ॥ ८ ॥ प्रबोधिनीला जागरण केलें असतां पूर्वींच्या हजार जन्मांत जें पातक घडलें असेल, तें सर्व कापसाच्या राशीप्रमाणें सहज जळून जातें ॥ ९ ॥ हे स्कंदा! तुला जागराचें लक्षण सांगतों ऐक.

उपवासंप्रबोधिन्यांयःकरोतिस्वभावतः ॥ विधिनानरशार्दूलयथोक्तंलभतेफलम् ॥ ८ ॥ पूर्वजन्म
सहस्रेषुपापंयत्समुपार्जितम् ॥ जागरेणप्रबोधिन्यांदह्यतेतूलराशिवद् ॥ ९ ॥ शृणुषण्मुखवक्ष्या
मिजागरस्यचलक्षणम् ॥ यस्यविज्ञानमात्रेणदुर्लभोनजनार्दनः ॥ १० ॥ गीतंवाद्यंचनृत्यंचपु
राणपठनंतथा ॥ धूपंदीपंचनैवेद्यंपुष्पंगंधानुलेपनम् ॥ ११ ॥ फलमर्घ्यंचश्रद्धाचदानमिंद्रि
यसंयमम् ॥ सत्यान्वितंविनिद्रंचमुदायुक्तंक्रियान्वितम् ॥ १२ ॥ साश्चर्यंचैवप्रोत्साहमालस्या
दिविवर्जितम् ॥ प्रदक्षिणादिसंयुक्तंनमस्कारपुरःसरम् ॥ १३ ॥

जें समजलें असतां विष्णूची प्राप्ति दुर्लभ नाहीं ॥ १० ॥ जागरांत गायन, वाद्यें, नाचणें, पुराण वाचणें, धूप,दीप,नैवेद्य,फुलें गंध, फल, अर्घ्य अर्पण करणें ॥ ११ ॥ श्रद्धापूर्वक दान, इंद्रियनिग्रह, सत्यभाषण, झोप न घेणें, आनंद युक्त असणें इत्यादि क्रियायुक्त असणें ॥ १२ ॥ आश्चर्य व उत्साहयुक्त मन असून आलस्यरहित राहून प्रदक्षिणा नमस्कार करणें

॥ १३ ॥ हरिला प्रहरा प्रहराला उत्साहित अंतःकरणानें ओंवाळून आरती करणें ॥ १४ ॥ अशा सर्व उपचारांनीं युक्त एकाग्रमनानें जागरण करावें, ह्मणजे त्याला पुन्हा पृथ्वीवर जन्म प्राप्त होणार नाहीं ॥१५॥ या प्रमाणें शक्तीप्रमाणें द्रव्य खर्च करून भक्तीनें हरिजागर करितो, तो परमात्म्याचे सायुज्य मुक्तीला जातो ॥ १६ ॥ जो कार्तिक महिन्यांत पुरुषसूक्तानें नित्य हरीची पूजा करितो, त्यानें हजार कोटिवर्षें विष्णूची पूजा केल्याप्रमाणें आहे॥१७॥नारद पंचरात्रांत

नीराजनसमायुक्तमनिर्विण्णेनचेतसा ॥ यामेयामेमहाभागकुर्वन्नीराजनंहरेः ॥ १४ ॥ एतैर्गुणैः समायुक्तंकुर्याज्जागरणंविभोः ॥ एकाग्रमनसायस्तुनपुनर्जायतेभुवि ॥ १५ ॥ यएवंकुरुतेभक्त्या वित्तशाठ्यविवर्जितः ॥ जागरंवासरेविष्णोर्लीयतेपरमात्मनि ॥ १६ ॥ पुरुषसूक्तेनयोनित्यंका र्तिकेह्यर्चयेद्धरिम् ॥ वर्षकोटिसहस्राणिपूजितस्तेनकेशवः ॥ १७ ॥ यथोक्तेनविधानेनपंचरात्रो दितेनवै ॥ कार्तिकेत्वर्च्चयेन्नित्यंसुक्तिभागीभवेन्नरः ॥ १८ ॥ नमोनारायणायेतिकार्तिकेयोर्च येद्धरिम् ॥ समुक्तोनारकैर्दुःखैःपदंगच्छत्यनामयम् ॥ १९ ॥ हरेर्नामसहस्रंचगजराजस्यमोक्ष णम् ॥ कार्तिकेपठतेयस्तुपुनर्जन्मनविंदति ॥ २० ॥

सांगितलेल्या विधानाप्रमाणें जो कार्तिकांत नित्य पूजा करील त्याला मुक्ति प्राप्त होते ॥ १८ ॥ कार्तिकांत नमोनारायण या अष्टाक्षर मंत्रानें जो नित्य पूजा करील तो नरकांचे दुःखापासून मुक्त होऊन नित्य अविनाशी आशा वैकुंठस्थानाला जातो ॥ १९ ॥ जो कार्तिकांत विष्णुसहस्रनाम व गजेंद्रमोक्ष नित्य पठण करील, त्याला पुनः जन्म प्राप्त होणार नाहीं ॥ २० ॥ कार्तिकांत द्वादशीला जागर करितो तो हजारकोटी युगें व शंभर मन्वंतरें होईपर्यंत स्वर्गांत वास करील ॥ २१ ॥ हरिजागर करणाऱ्याच्या शंभर कुळांमध्यें जे हजारों मनुष्य जन्मास येतील त्यांनांही वैकुंठप्राप्ति होईल, ह्मणून जागर अवश्य करावा ॥ २२ ॥ कार्तिकांत रात्रीं शेवटच्या प्रहरीं जे हरीचें स्तवन गायन करितील, ते आपल्या पितरांसह श्वेतद्वीपांत राहतील ॥ २३ ॥ पूर्वरात्रीं जे हरीला नैवेद्य

युगकोटिसहस्राणिमन्वंतरशतानिच ॥ द्वादश्यांकार्तिकेमासिजागरीवसतेदिवि ॥ २१ ॥ कुले तस्यचयेजाताःशतशोथसहस्रशः ॥ प्राप्नुवंतिपदंविष्णोस्तस्मात्कुर्वीतजागरम् ॥ २२ ॥ कार्ति केपश्चिमेयामेस्तवंगानंकरोतियः ॥ श्वेतद्वीपेतुवसतेपितृभिःसहभामिनि ॥ २३ ॥ नैवेद्यदानं हरयेकार्तिकेदिनसंक्षये ॥ युगानिवसतेस्वर्गेतावंतिमुनिसत्तमाः ॥ २४ ॥ अक्षयंमुनिशार्दूलमा लतीकमलार्चनम् ॥ अर्चयेद्देवदेवेशंसयातिपरमंपदम् ॥ २५ ॥ कार्तिकेशुक्लपक्षेतुकृत्वाह्येका दशींनरः ॥ प्रातर्दत्त्वाशुभान्कुंभान्सयातिममंमंदिरम् ॥ २६ ॥

अर्पण करितील, ते अनंतयुगें स्वर्गांत राहतील ॥ २४ ॥ हे ऋषिहो, जे मालती व कमळें यांनीं देवदेवेश विष्णूची नित्य पूजा करितात, त्यांना उत्तम पद प्राप्त होतें ॥ २५ ॥ कार्तिकशुक्लएकादशीला उपोषण करून द्वादशीला सकाळीं उत्तम प्रकारचे कुंभ उदक भरून दान द्यावे ह्मणजे त्याला माझ्या वैकुंठाची प्राप्ति होईल ॥ २६ ॥

कार्तिकेय ह्मणतातः—शंकरा, आपण सांगितलें कीं, कार्तिकामध्यें व्रतामध्यें उत्तम व्रत असें भीष्मपंचक व्रत करावें ॥२७॥ तर हे मुनिश्रेष्ठा शंकरा! त्याचें विधान काय व तें केल्याचें फळ काय तें कृपाकरून सांगावें ॥ २८ ॥ ईश्वर ह्मणालेः—महापुण्यकारक सर्व व्रतांत श्रेष्ठ असें पांच दिवसांचें हें भीष्मपंचक व्रत सांगतों ॥२९॥ हें व्रत भीष्माला वासुदेवा-

॥ कार्तिकेयउवाच ॥ ॥ यदेतद्वदितंपुण्यंव्रतानांपरमंव्रतम् ॥ कर्तव्यंकार्तिकेमासिभवताभीष्मपंचकम् ॥ २७ ॥ विधानंतस्यचफलंतथैवसुरसत्तम ॥ कथयस्वप्रसादान्मेमुनीनांचपितामह ॥ २८ ॥ ॥ ईश्वरउवाच ॥ प्रवक्ष्यामिमहापुण्यंव्रतंव्रतवतांवर ॥ भीष्मेणैतद्यतःप्राप्तंव्रतंपंचदिनात्मकम् ॥ २९ ॥ सकाशाद्वासुदेवस्यतेनोक्तंभीष्मपंचकम् ॥ व्रतस्यास्यगुणान्वक्तुंकःशक्तःकेशवादृते ॥ ३० ॥ कार्तिकेशुक्लपक्षेतुश्रृणुधर्मंपुरातनम् ॥ वसिष्ठभृगुगर्गाद्यैश्चीर्णंकृतयुगादिषु ॥ ३१ ॥ अंबरीषेणभोगाद्यैश्चीर्णंत्रेतायुगादिषु ॥ ब्राह्मणैर्ब्रह्मचर्येणजपहोमक्रियादिभिः ॥ ३२ ॥

पासून मिळालें, ह्मणून या व्रताला भीष्मपंचक ह्मणतात; याचा महिमा केशवाशिवाय वर्णन करण्याला कोण समर्थ आहे ॥३०॥ कार्तिक शुक्लपक्षांतील पुरातनधर्मरूप हें भीष्मपंचक व्रत कृतयुगांत वसिष्ठ, भृगु, गर्ग इत्यादि ऋषींनीं हें आचरिलें आहे ॥ ३१ ॥ त्रेतायुगांत अंबरीषादिकांनीं आचरिलेलें व ब्राह्मणांनीं ब्रह्मचर्याचा नेम करून व होम करून आचरिलेलें ॥३२॥

सत्य व शुद्ध आचरण करणारे क्षत्रिय, वैश्य यांनीं आचरिलेलें असें आहे ॥ हें व्रत सत्यहीन मूर्ख बुद्धीचे लोकांना घडणें कठीण आहे ॥ ३३ ॥ भीष्म ह्मणजे करण्याला कठीण असें हें व्रत प्राकृत जनांला घडणें कठीण आहे; याकरितां जो हें करील, त्यानें सर्व व्रतें केल्याप्रमाणें आहे ॥ ३४ ॥ हें भीष्मपंचक व्रत मोठें पुण्यकारक व सर्व पापें नाहींसें करणारें आहे, ह्मणून मनुष्यांनीं मोठ्या प्रयत्नानें करावें ॥ ३५ ॥ कार्तिकशुक्लपक्षामध्यें एकादशीला यथाविधि प्रातःस्नान

क्षत्रियैश्चतथावैश्यैःसत्यशौचपरायणैः ॥ दुष्करंसत्यहीनानामशक्यंबालचेतसाम् ॥ ३३ ॥
दुष्करंभीष्ममित्याहुर्नशक्यंप्राकृतैर्नरैः ॥ यस्मात्करोतिविप्रेंद्रतेनसर्वंकृतंभवेत् ॥ ३४ ॥
व्रतंचैतन्महापुण्यंमहापातकनाशनम् ॥ अतोनरैःप्रयत्नेनकर्तव्यंभीष्मपंचकम् ॥ ३५ ॥
कार्तिकस्यामलेपक्षेस्नात्वासम्यग्विधानतः ॥ एकादश्यांतुगृह्णीयाद्व्रतंपंचदिनात्मकम् ॥३६॥
प्रातःस्नात्वाविशेषेणमध्याह्नेचतथाव्रती ॥ नद्यांनिर्झरगर्तेवासमालभ्यचगोमयम् ॥३७॥ यवव्रीहितिलैःसम्यक्पितॄन्संतर्पयेत्क्रमात् ॥ स्नात्वामौनंनरःकृत्वाधौतवासादृढव्रतः ॥ ३८ ॥

करून पांच दिवसांचें भीष्मपंचकव्रत ग्रहण करावें ॥ ३६ ॥ व्रत घेणारानें प्रातःस्नान करून दोनप्रहरीं पुनः गाईचें शेण आंगाला लाऊन नदी, झरा अगर विहीर यांत स्नान करावें व उत्तम प्रकारें यवांनीं देवांचें, तांदुळांनीं ऋषींचें व तिळांनीं पितरांचें तर्पण करावें. स्नान केल्यावर बोलूं नये व धुतलेलीं स्वच्छ वस्त्रें नेसावीं व पांघरावीं

॥ ३७ ॥ ३८ ॥ भीष्माचें तर्पण करावें व अर्घ्य द्यावें व भीष्माची पूजा करून दानें द्यावीं ॥ ३९ ॥ विशेषेंकरून ब्राह्मणाला पंचरत्नें द्यावीं व लक्ष्मीसह वासुदेवाची पूजा करावी ॥ ४० ॥ अशी पांच दिवस पूजा केली असतां कोटी जन्म सुख मिळतें ॥४१॥ हें व्रत केल्यानें एक वर्षांतील सर्व व्रतांचें फल प्राप्त होतें ॥ भीष्माचें पुढील मंत्रानें तर्पण करावें

भीष्मायोदकदानंचअर्घ्यंचैवप्रयत्नतः ॥ पूजाभीष्मस्यकर्तव्यादानंदद्यात्प्रयत्नतः ॥ ३९ ॥ पंचरत्नंविशेषेणदत्त्वाविप्रायत्नतः ॥ वासुदेवोपिसंपूज्योलक्ष्मीयुक्तःसदाप्रभुः ॥ ४० ॥ पंचके पूजयित्वातुकोटिजन्मानितुष्यति ॥ यत्किंचित्कुरुतेमर्त्यःपंचधातुप्रकल्पयेत् ॥ ४१ ॥ संवत्सर व्रतानांचलभतेसकलंफलम् ॥ कृत्वातूदकदानंतुतथार्घ्यस्यचदापनम् ॥ ४२ ॥ मंत्रेणानेनयःकु र्यान्मुक्तिभागीभवेन्नरः ॥ वैयाघ्रपादगोत्रायसांकृत्यप्रवरायच ॥ ४३ ॥ अनपत्यायभीष्मायउ दकंभीष्मवर्मणे ॥ वसूनामवतारायशंतनोरात्मजायच ॥ अर्घ्यंददामिभीष्मायआजन्मब्रह्मचा रिणे ॥ ४४ ॥ इत्यर्घ्यमंत्रः ॥ अनेनविधिनायस्तुपंचकंतुसमापयेत् ॥ अश्वमेधसमंपुण्यंप्राप्नो त्यत्रनसंशयः ॥ ४५ ॥

व अर्घ्यदान करावें म्हणजे मुक्ति मिळते ॥ ४२ ॥ मंत्रः–" ज्याचें गोत्र वैयाघ्रपाद व प्रवर सांकृत्य व ज्याला आपत्य नाहीं, त्या भीष्माला उदक देतों " ॥ ४३ ॥ " वसूंचा अवतार, शंतनूचा पुत्र, आजन्म ब्रह्मचारी असणाऱ्या अशा भीष्माला मी अर्घ्य देतों " ॥ ४४ ॥ अशा विधीनें जो भीष्मपंचकव्रत समाप्त करील, त्याला अश्वमेध यज्ञाचें पुण्य

मिळतें ॥ ४५ ॥ याप्रमाणें यत्नानें पांच दिवस व्रत करावें. या महिन्यांत नियमावांचून राहूं नये ॥ ४६ ॥ उत्तरायण नसतांनाही हरीनीं भीष्माला हे पांच दिवस दिले. उत्तरायण नसतांनाही हे पांच दिवस शुभ आहेत. या पांच दिवसांत लग्नशुद्धि शुभवेळा पाहण्याचें कारण नाहीं ॥ ४७ ॥ प्रथम सर्व पापें नाहींशीं करून मोक्ष देणाऱ्या हरीची पूजा यत्नानें करावी नंतर भीष्मपंचकव्रतविधि करावा ॥ ४८ ॥ श्रीकृष्णाला उदकानें व दूध, दहीं, मध, तूप

पंचाहमपिकर्तव्यंनियमंचप्रयत्नतः ॥ नियमेनविनायत्रनभाव्यंवरवर्णिनि ॥ ४६ ॥ उत्तरायणही नायभीष्मायप्रददौहरिः ॥ उत्तरायणहीनापिशुद्धिंलग्नंविनाशुभाः ॥ ४७ ॥ ततःसंपूजयेद्देवंसर्व पापहरंहरिम् ॥ अनंतरंप्रयत्नेनकर्तव्यंभीष्मपंचकम् ॥ ४८ ॥ स्नापयेतजलैर्भक्त्यामधुक्षी रघृतेनच ॥ तथैवपंचगव्येनगंधचंदनवारिणा ॥ ४९ ॥ चंदनेनसुगंधेनकुंकुमेनाथकेशवम् ॥ कर्पूरोशीरमिश्रेणलेपयेद्गरुडध्वजम् ॥ ५० ॥ अर्चयेद्रुचिरैःपुष्पैर्गंधधूपसमन्वितैः ॥ गुग्गुलुंघृ- तसंयुक्तंददेत्कृष्णायभक्तिमान् ॥ ५१ ॥ दीपकंतुदिवारात्रौदद्यात्पञ्चदिनानितु ॥ नैवेद्यंदेवदेव स्यपरमान्नंनिवेदयेत् ॥ ५२ ॥

साखर या पंचामृतानें स्नान घालावें, नंतर सुवासिक गंधाच्या पाण्यानें स्नान घालावें ॥ ४९ ॥ नंतर चंदन, केशर, कापूर, वाळा यांचें गंध करून तें गरुडध्वजाचे अंगाला लावावें ॥ ५० ॥ नंतर भक्तीनें सुंदर सुवासिक पुष्पें वाहून गुग्गुळ तूप मिश्रित सुगंधी धूप दाखवावा ॥ ५१ ॥ व पांच दिवस सारखा नंदादीप ठेवावा. खीर व

पक्वान्नांचा नैवेद्य अर्पण करावा ॥ ५२ ॥ याप्रमाणें विष्णूचें पूजन करून नामस्मरण करीत नमस्कार घालावे. व ॐनमो भगवते वासुदेवाय असा एकशें आठ जप करावा ॥ ५३ ॥ घृत, तीळ, तांदूळ, यव, यांनीं सहा अक्षरांच्या कृष्णमंत्रानें होम करावा ॥ ५४ ॥ संध्याकाळची संध्या करून गरुडध्वज भगवंताला नमस्कार करावा व पुन्हा मंत्र जपून भूमीवर निजावें ॥ ५५ ॥ याप्रमाणें पांच दिवस करावें. या व्रतांत ज्या योगानें व्रत पूर्ण होतें असें विशेष

एवमभ्यर्च्चयेद्देवंसंस्मृत्वाचप्रणम्यच ॥ ॐनमोवासुदेवायेतिजपेदष्टोत्तरंशतम् ॥ ५३ ॥ जुहुयाच्चघृताभ्यक्तैस्तिलव्रीहियवादिभिः ॥ षडक्षरेणमंत्रेणस्वाहाकारान्वितेनच ॥ ५४ ॥ उपास्यपश्चिमांसंध्यांप्रणम्यगरुडध्वजम् ॥ जपित्वापूर्ववन्मंत्रंक्षितिशायीभवेत्सति ॥ ५५ ॥ सर्वमेतद्विधानंतुकार्यंपंचदिनानितु ॥ विशेषोत्रव्रतेह्यस्मिन्यदन्यूनंश्शृणुष्वतत् ॥ ५६ ॥ प्रथमेह्निहरेःपादौपूजयेत्कमलैर्व्रती ॥ द्वितीयेबिल्वपत्रेणजानुदेशंसमर्चयेत् ॥ ५७ ॥ ततोनुपूजयेच्छीर्षंमालत्याचक्रपाणिनः ॥ कार्तिक्यांदेवदेवस्यभक्त्यातद्गतमानसः ॥ ५८ ॥ अर्चित्वातंहृषीकेशमेकादश्यांसमासतः ॥ निःप्राश्यगोमयंसम्यगेकादश्यामुपावसेत् ॥ ५९ ॥

आहे तें ऐक ॥ ५६ ॥ व्रत करणाऱ्यानें पहिले दिवशीं कमळांनीं देवाचे पायांची पूजा करावी; दुसरे दिवशीं बेलाच्या पानांनीं गुडघ्यांची पूजा करावी ॥ ५७ ॥ नंतर पुढें मालतीनें देवाच्या मस्तकावर पूजा करावी ॥ याप्रमाणें कार्तिकांत मोठ्या भक्तीनें हरीकडे अंतःकरण ठेऊन त्याची पूजा करावी ॥ ५८ ॥ एकादशीला पूजा करून

गोमय (गाईचें शेण) प्राशन करून उपवास करावा ॥ ५९ ॥ द्वादशीला गोमूत्र मंत्रयुक्त प्राशन करावें, त्रयोदशीला दूध प्यावें व चतुर्दशीला दहीं प्यावें ॥ ६० ॥ देहशुद्धीकरितां याप्रमाणें प्राशन करून चार दिवस उपवास करावा; पांचवे दिवशीं स्नान करून यथाविधि देवांची पूजा करावी ॥ ६१ ॥ ब्राह्मणाला भोजन घालून दक्षिणा द्यावी, पापबुद्धि टाकून बुद्धिमंतांनीं ब्रह्मचर्यानें रहावें ॥ ६२ ॥ मद्य, मांस, पापकारी मैथुन वर्ज्य करावें, भाजीपाल्यांचा

गोमूत्रंमंत्रवद्भूमौद्वादश्यांप्राशयेद्व्रती ॥ क्षीरंचैवत्रयोदश्यांचतुर्दश्यांतथादधि ॥ ६० ॥ संप्राश्यकायशुद्ध्यर्थंलंघयित्वाचतुर्दिनम् ॥ पंचमेदिवसेस्नात्वाविधिवत्पूज्यकेशवम् ॥ ६१ ॥ भोजयेद्ब्राह्मणान्भक्त्यातेभ्योदद्याच्चदक्षिणाम् ॥ पापबुद्धिंपरित्यज्यब्रह्मचर्येणधीमता ॥ ६२ ॥ मद्यंमांसंपरित्यज्यमैथुनंपापकारिणम् ॥ शाकाहारेणउत्पन्नेकृष्णार्चनपरोनरः ॥ ६३ ॥ ततोनक्तंसमश्नीयात्पंचगव्यपुरःसरम् ॥ एवंसम्यक्समाप्यंस्याद्यथोक्तंफलमाप्नुयात् ॥६४॥ मद्यपोयत्पिबेन्मद्यंजन्मनोमरणांतिकम् ॥ एतद्भीष्मव्रतंकृत्वाप्राप्नोतिपरमंपदम् ॥ ६५ ॥ स्त्रीभिर्वाभर्तृवाक्येनकर्तव्यंधर्मवर्धनम् ॥ विधवाभिश्चकर्तव्यंमोक्षसौख्याप्तिवृद्धये ॥ ६६ ॥

आहार करून कृष्णपूजा तत्पर असावें ॥ ६३ ॥ पंचगव्य घेऊन संध्याकाळीं भोजन करावें. याप्रमाणें व्रतांची समाप्ति करणाराला संपूर्ण फळ मिळतें ॥ ६४ ॥ जन्मापासून मरेपर्यंत दारू पिणारा असला तरी हें भीष्मपंचक केलें असतां तो मोक्षास जातो ॥ ६५ ॥ बायकांनींही नवऱ्याचे आज्ञेनें हें धर्म वाढविणारें व्रत करावें ह्मणजे धर्मवृद्धि

होते. विधवांनीं केलें असतां मोक्ष व सुख प्राप्त होतें ॥६६ ॥ हे स्कंदा ! कार्तिकांत नित्यस्नान, दान, उपवास केल्यानें सर्व कर्मे समृद्धि, पुण्य व अर्थ प्राप्त होतात ॥ ६७ ॥ विष्णुभक्तांनीं वैश्वदेव करावा, ह्मणजे आरोग्य व पुत्रप्राप्ति होऊन महापातक नाहींसें होतें ॥६८॥ कार्तिकव्रताची समाप्ति प्रयत्नानें तीर्थाचे ठिकाणीं करावी व सर्व संवत्सरव्रतांची समाप्ति कार्तिकांत करावी ॥६९॥ एक सोन्याची पापाची प्रतिमा भयंकर मुखाची अशी करावी, जिच्या हातांत खड्ग, लोहाच्या दाढांनीं

सर्वकर्मसमृद्ध्यर्थंपुण्यार्थमपिपावके ॥ नित्यस्नानेतथादानेयेकार्तिकमुपासते ॥ ६७ ॥ वैश्वदेवश्चकर्तव्योविष्णुध्यानपरायणैः ॥ आरोग्यपुत्रदोवत्समहापातकनाशनः ॥ ६८ ॥ तीर्थेषुकार्तिकींकुर्यात्सर्वयत्नेनभामिनि ॥ संवत्सरव्रतानांतुसमाप्तिःकार्तिकेमता ॥ ६९ ॥ पापस्यप्रतिमाकार्यारौद्रवक्त्रातिभीषणा ॥ खड्गहस्ताविनिष्क्रांतालोहदंष्ट्राकरालिनी ॥ तिलप्रस्थोपरिस्थाप्यकृष्णवस्त्राभिवेष्टिता ॥ ७० ॥ रक्तपुष्पकृतापीडाज्वलत्कांचनकुंडला ॥ संपूज्यपरयाभक्त्याधर्मराजस्यनामभिः ॥ ७१ ॥ इममुच्चारयेन्मंत्रंगृहीतकुसुमांजलिः ॥ यदन्यजन्मनिकृतमिहजन्मनिवापुनः ॥ ७२ ॥

भयंकर, काळीं वस्त्रें गुंडाळलेली, अशी एक शेर तिळांच्या ढिगावर ठेवावीं ॥ ७० ॥ तांबड्या फुलांचा तुरा व सोन्याची झगझगीत कुंडलें घालून तिची भक्तीनें यमधर्मांच्या नांवांनी पूजा करावी ॥ ७१ ॥ ओंजळींत फुलें घेऊन पुढील मंत्रांनीं प्रार्थना करावी ॥ "मीं पूर्वजन्मीं व या जन्मीं जें पातक केलें असेल तें तुझ्या पायाच्या प्रसादानें नाहींसें होवो. " याप्रमाणें विधिपूर्वक पूजा करून ती सोन्याची प्रतिमा ॥ ७२ ॥ ७३ ॥ सर्व दुःखांचा परिहार करणारा भगवान् कृष्ण यांच्या संतोषाकरितां वैदिक ब्राह्मणाची पूजा करून॥७४॥मंत्र पूजा सांगणाऱ्या ब्राह्मणाला यथाशक्ति दक्षिणा देऊन धर्म प्रसन्न होवो असें ह्मणून दान करावी ॥७५॥ सोनें व गाय वाचक ब्राह्मणाला देऊन कृष्णाला अर्पण असो असें ह्मणावें याप्रमाणें

पापंप्रशममायातुतवपादप्रसादतः ॥ एवंसंपूज्यविधिवत्प्रतिमांतांचकांचनीम् ॥ ७३ ॥ कृत्वापूजांयथाशक्त्याविप्राणांवेदवादिनाम् ॥ प्रीतयेदेवदेवस्यकृष्णस्याक्लिष्टकर्मणः ॥ ७४ ॥ ब्राह्मणायप्रदातव्यंधर्मोमेप्रीयतामिति ॥ वाचकायप्रदातव्यायथाशक्त्याचदक्षिणा ॥ ७५ ॥ दद्याद्धिरण्यंगाश्चैवकृष्णोमेप्रीयतामिति ॥ कृतकृत्यःस्थितोभूत्वाविरक्तःसंयतोभवेत् ॥ ७६ ॥ अन्येषामपिदातव्यंस्वशक्त्यादानमुत्तमम् ॥ शांतचित्तोनरोऽव्याधिःपरंपदमवाप्नुयात् ॥ ७७ ॥ नीलोत्पलदलश्यामश्चतुर्दंष्ट्रश्चतुर्भुजः ॥ अष्टपादेकनयनःशंकुकर्णोमहास्वनः ॥ ७८ ॥

सर्व कृत्य झाल्यावर विरक्त जितेंद्रिय होऊन स्वस्थ असावें ॥ ७६ ॥ इतरांनाही शक्तीप्रमाणें दानें करावीं, त्या योगानें शांतचित्त व निरोगी होऊन मनुष्य उत्तमपदाला जातो॥ ७७ ॥ नीलकमलाप्रमाणें शामवर्ण ज्याला चार दाढा, चार भुज , आठ पाय, ज्यास एक डोळा, शंकुसारखे कान व मोठा आवाज, मस्तकाला जटा, दोन जिभा, लाल डोळे, सिंहा-

सारखें रूप धारण करणाऱ्या नरहरीचें चिंतन करावें ॥७८॥७९॥ शरपंजरीं असतांना भीष्मानें याप्रमाणें मला सांगितलें ते करण्यास कठीण असें भीष्मपंचक मी तुला सांगितलें ॥८०॥ धर्मराजा ! हें धन्य, पुण्यकारक, पाप घालविणारें, मोठें व्रत आहे; हें केलें असतां, ब्रह्महत्या व गोहत्या करणारे देखील पापापासून मुक्त होतात ॥ ८१ ॥ एकादशीपासून पौर्णिमेपर्यंत पांच दिवसांचें हें भीष्मपंचक व्रत पृथ्वीवर प्रसिद्ध असलेलें सांगितलें तें भोजन करणाराला याचा निषेध आहे व हें

जटीद्विजिह्वस्ताम्राक्षोमृगराजतनुच्छदः ॥ चिंतनीयोमहादेवोयस्यरूपंनविद्यते ॥ ७९ ॥
इदंभीष्मेणकथितंशरतल्पगतेनमे ॥ तदेतत्तेमयाख्यातंदुष्करंभीष्मपंचकम् ॥ ८० ॥ धन्यंपुण्यं
पापहरंयुधिष्ठिरमहाव्रतम् ॥ यत्कृत्वाब्रह्महागोघ्नःसर्वपापैःप्रमुच्यते ॥ ८१ ॥ यद्भीष्मपंचक
मितिप्रथितंपृथिव्यामेकादशीप्रभृतिपंचदशीनिरुद्धम् ॥ उक्तंनभोजनपरस्यतदानिषेधस्तस्मि
न्व्रतेशुभफलंप्रददातिविष्णुः ॥ ८२ ॥ ॥ सूतउवाच ॥ ॥ एतत्सर्वाधिकंपुण्यंदुर्लभंभवते
कलौ ॥ इदंगुह्यंमयाख्यातंशास्त्रसारसमुच्चयम् ॥ ८३ ॥ सुराणांगोपितंसर्वंपरंगुह्यंचमोक्षदम् ॥
श्रुत्वाचैकपदेदेविअगम्यागमनेरतः ॥ ८४ ॥

व्रत करणाराला विष्णु शुभ फळ देतात ॥ ८२ ॥ सूत ह्मणालेः—हें व्रत सर्वांपेक्षां अधिक पुण्य देणारें, कलीमध्यें दुर्लभ असें आहे, शास्त्रांतील सार व गुह्य हें व्रत मी तुह्माला सांगितलें ॥ ८३ ॥ देवांना देखील माहीत नाहीं, असें गुप्त गुह्य असून मोक्ष देणारें असें आहे; हें ऐकलें असतां अगम्य स्त्रियांशीं रत होणारे, कन्येचा व बहिणीचा विक्रय करणारे

हे सर्व दोष मुक्त होतात. मोक्ष देणारें हें शास्त्र इतर लोकांना उघड करून सांगूं नये ॥ ८४ ॥ ८५ ॥ हें एक समयीं ऐकिलें असतां मनुष्याला मोक्ष मिळतो. जे अधर्मी आहेत त्यांपासून हें गुप्त ठेवावें ॥ ८६ ॥ षण्मुखा, त्यांना हें पुण्यव्रत खचित सांगूं नये या प्रमाणें हें सर्व तुला कार्तिकाचें फल सांगितलें ॥८७॥ विष्णू ह्मणालेः—शंकरानीं कार्तिकेयाला सर्वांचे कल्याणाचे इच्छेनें ही कथा सांगितली, पित्यानें सांगितलेली कथा ऐकून षडाननाला फार आनंद झाला ॥८८॥सर्व-

कन्याविक्रीस्वसाविक्रीह्युभयंतुविमोचयेत् ॥ मोक्षदंचइदंशास्त्रंप्रकाश्यंनेतरेजने ॥ ८५ ॥ श्रुत्वाचै
कपदेयस्तुमोक्षंगच्छतिमानवः ॥ गोपनीयंप्रयत्नेनयेचापित्यागिनोनराः ॥ ८६ ॥ नतेषांकथ्य
तेपुण्यंसत्यंसत्यंचषण्मुख ॥ इत्येतत्सर्वमाख्यातंकार्तिकस्यतुयत्फलम् ॥ ८७ ॥ विष्णुरुवाच ॥
कथितंदेवदेवेनपुत्रायहितकाम्यया ॥ पितुस्तद्वाक्यमाकर्ण्यषण्मुखोहर्षनिर्भरः ॥ ८८ ॥ ऊचुः
प्रांजलयःसर्वेतंदेवंजगदायुषम् ॥ कृतकृत्यावयंजाताःश्रुत्वाकार्तिकजंफलम् ॥ ८९ ॥ अपरंना
स्तिश्रोतव्यंप्राप्तंमेजन्मनःफलम् ॥ माहात्म्यमेतदाकर्ण्यपूजयेद्यस्तुपाठकम् ॥ ९० ॥ गोभूहिर
ण्यवस्त्रैश्चविष्णुतुल्योयतोहिसः ॥ वाचकेपूजितेयस्माद्विष्णुर्भवतिपूजितः ॥ ९१ ॥

जण हात जोडून जगच्चालक शंकराला ह्मणाले, आह्मी कार्तिकाचें माहात्म्य ऐकून कृतकृत्य झालों ॥ ८९ ॥ आतां दुसरें कांहीं ऐकावयाचें राहिलें नाहीं. आमचें जन्म सफळ झालें. हें माहात्म्य ऐकून पुराण वाचणाराची पूजा करावी. ॥ ९० ॥ तो विष्णुतुल्य आहे असें समजून त्याला गाय, जमीन, सोनें, वस्त्रें द्यावीं,त्याची पूजा केली असतां, विष्णूची

पूजा केल्याचें फळ आहे ॥ ९१ ॥ ह्मणून ज्याला शुभदायक फलप्राप्ति व्हावी अशी इच्छा असेल त्यानें त्या वाचकाची नित्य पूजा करावी ॥ धर्मेच्छूंनीं पुराण सांगणारांना धर्मशास्त्र, पुराण, वेदविद्या इत्यादिक पुस्तकें दान करावीं, पुराणविद्या दान करणाराला अनंत फळ मिळतें ॥ ९२ ॥ ९३ ॥ हें माहात्म्य जे पठण करतील व भक्तीनें ऐकून ध्यानांत ठेवितील, ते सर्व पापांपासून मुक्त होऊन विष्णुलोकास जातील ॥ ९४ ॥ माहात्म्यश्रवणापासून धन, धान्य, यश,

तथातंपूजयेन्नित्यंयदीच्छेत्सफलंशुभम् ॥ धर्मशास्त्रंपुराणंचवेदविद्यादिकंचयत् ॥ ९२ ॥ पुस्तकं वाचकायैवदातव्यंधर्ममिच्छता ॥ पुराणविद्यादातारोह्यनंतफलभोजिनः ॥ ९३ ॥ इदंयःपठते भक्त्याश्रुत्वाचैवावधारयेत् ॥ मुच्यतेसर्वपापेभ्योविष्णुलोकंसगच्छति ॥ ९४ ॥ धनंधान्यं यशःपुत्रानायुरारोग्यमेवच ॥ माहात्म्यश्रवणादेवलभ्यतेचनसंशयः ॥ ९५ ॥ सूतउ० ॥ कृष्णसत्ययोःसंवादंनारदस्यपृथोस्तथा ॥ अन्यत्किंप्रष्टुकामाःस्थवदामिचसुविस्तरम् ॥ ९६ ॥ इतितद्वचनादेवऋषयःसस्मितास्तदा ॥ नोचुःपरस्परंकिंचित्तूष्णीमेवावतस्थिरे ॥ ९७ ॥

पुत्र, आरोग्य हीं निःसंशय प्राप्त होतात ॥ ९५ ॥ सूत ह्मणालेः—कृष्णाचा व सत्यभामेचा संवाद, तसाच नारदाचा व पृथुराजाचा संवाद तुह्माला सांगितला. आणखी कांहीं विचारण्याची इच्छा असल्यास प्रश्न करा, मी विस्तारानें कथन करितों ॥ ९६ ॥ हें सूताचें भाषण ऐकून सर्व ऋषि आनंद पावले व एकमेकांशीं कांहीं न बोलतां स्वस्थ राहिले॥९७॥

व सर्व शांत मनानें बदरीनारायणाचे दर्शनाकरितां निघून गेले ॥ ९८ ॥ इतिश्रीपद्मपुराणे उत्तरखण्डे कार्तिकमाहात्म्ये श्रीकृष्णसत्यभामा संवादे सप्तत्रिंशोध्यायः ॥ ३७ ॥ कार्तिकमाहात्म्य संपूर्णम् ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ शुभंभवतु ॥

जग्मुश्चबदरींद्रष्टुंसर्वेवैशांतमानसाः ॥ ९८ ॥ ॥ इतिश्रीपद्मपुराणेउत्तरखण्डेकार्तिकमासमाहात्म्येश्रीकृष्णसत्यभामासंवादेसप्तत्रिंशत्तमोऽध्यायः ॥ ३७ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥

इदं कार्तिकमासमाहात्म्यम् बाळाचार्यात्मज माधवाचार्यैर्महाराष्ट्रभाषांतरेण विरचितं तस्य द्वितीयावृत्तिः
पाठकोपाह्व विनायकात्मजविश्वनाथाभिधैः " बाळकृष्ण लक्ष्मण पाठक " इत्येषामर्थे
मुम्बापुर्यां गिरगांवविभागे गोवाटिकायां द्वितीयांकितगृहे स्वीये
" जगदीश्वराख्य " मुद्रणयंत्रालये मुद्रयित्वा प्राकाश्यं
नीता । शकाब्दाः १८३४.

अस्य पुनर्मुद्रणादिसर्वेऽधिकाराः प्रकाशकेन स्वायत्तीकृताः ।

पत्ता–बाळकृष्ण लक्ष्मण पाठक, बुकसेलर;
मोतीबाजार–मुंबई.

Printed & Published by V.V.Pathak, at Jagadishwar Press Girgaon Gaiwadi House No.2 Bombay.

M642

॥ इति सार्थ कार्तिकमाहात्म्यम ॥

M 642

[OrderDescription]
,CREATED=18.09.19 11:51
,TRANSFERRED=2019/09/18 at 12:17:30
,PAGES=126
,TYPE=STD
,NAME=S0001874
,Book Name=M-642-KARTIKMAS MAHATMAY
,ORDER_TEXT=
,[PAGELIST]
,FILE1=00000001.TIF
,FILE2=00000002.TIF
,FILE3=00000003.TIF
,FILE4=00000004.TIF
,FILE5=00000005.TIF
,FILE6=00000006.TIF
,FILE7=00000007.TIF
,FILE8=00000008.TIF
,FILE9=00000009.TIF
,FILE10=00000010.TIF
,FILE11=00000011.TIF
,FILE12=00000012.TIF
,FILE13=00000013.TIF
,FILE14=00000014.TIF
,FILE15=00000015.TIF
,FILE16=00000016.TIF
,FILE17=00000017.TIF
,FILE18=00000018.TIF
,FILE19=00000019.TIF
,FILE20=00000020.TIF
,FILE21=00000021.TIF
,FILE22=00000022.TIF
,FILE23=00000023.TIF
,FILE24=00000024.TIF
,FILE25=00000025.TIF
,FILE26=00000026.TIF
,FILE27=00000027.TIF
,FILE28=00000028.TIF
,FILE29=00000029.TIF
,FILE30=00000030.TIF
,FILE31=00000031.TIF

FILE32=00000032.TIF
,FILE33=00000033.TIF
,FILE34=00000034.TIF
,FILE35=00000035.TIF
,FILE36=00000036.TIF
,FILE37=00000037.TIF
,FILE38=00000038.TIF
,FILE39=00000039.TIF
,FILE40=00000040.TIF
,FILE41=00000041.TIF
,FILE42=00000042.TIF
,FILE43=00000043.TIF
,FILE44=00000044.TIF
,FILE45=00000045.TIF
,FILE46=00000046.TIF
,FILE47=00000047.TIF
,FILE48=00000048.TIF
,FILE49=00000049.TIF
,FILE50=00000050.TIF
,FILE51=00000051.TIF
,FILE52=00000052.TIF
,FILE53=00000053.TIF
,FILE54=00000054.TIF
,FILE55=00000055.TIF
,FILE56=00000056.TIF
,FILE57=00000057.TIF
,FILE58=00000058.TIF
,FILE59=00000059.TIF
,FILE60=00000060.TIF
,FILE61=00000061.TIF
,FILE62=00000062.TIF
,FILE63=00000063.TIF
,FILE64=00000064.TIF
,FILE65=00000065.TIF
,FILE66=00000066.TIF
,FILE67=00000067.TIF
,FILE68=00000068.TIF
,FILE69=00000069.TIF
,FILE70=00000070.TIF
,FILE71=00000071.TIF

FILE72=00000072.TIF
,FILE73=00000073.TIF
,FILE74=00000074.TIF
,FILE75=00000075.TIF
,FILE76=00000076.TIF
,FILE77=00000077.TIF
,FILE78=00000078.TIF
,FILE79=00000079.TIF
,FILE80=00000080.TIF
,FILE81=00000081.TIF
,FILE82=00000082.TIF
,FILE83=00000083.TIF
,FILE84=00000084.TIF
,FILE85=00000085.TIF
,FILE86=00000086.TIF
,FILE87=00000087.TIF
,FILE88=00000088.TIF
,FILE89=00000089.TIF
,FILE90=00000090.TIF
,FILE91=00000091.TIF
,FILE92=00000092.TIF
,FILE93=00000093.TIF
,FILE94=00000094.TIF
,FILE95=00000095.TIF
,FILE96=00000096.TIF
,FILE97=00000097.TIF
,FILE98=00000098.TIF
,FILE99=00000099.TIF
,FILE100=00000100.TIF
,FILE101=00000101.TIF
,FILE102=00000102.TIF
,FILE103=00000103.TIF
,FILE104=00000104.TIF
,FILE105=00000105.TIF
,FILE106=00000106.TIF
,FILE107=00000107.TIF
,FILE108=00000108.TIF
,FILE109=00000109.TIF
,FILE110=00000110.TIF
,FILE111=00000111.TIF

FILE112=00000112.TIF
,FILE113=00000113.TIF
,FILE114=00000114.TIF
,FILE115=00000115.TIF
,FILE116=00000116.TIF
,FILE117=00000117.TIF
,FILE118=00000118.TIF
,FILE119=00000119.TIF
,FILE120=00000120.TIF
,FILE121=00000121.TIF
,FILE122=00000122.TIF
,FILE123=00000123.TIF
,FILE124=00000124.TIF
,FILE125=00000125.TIF
,FILE126=00000126.TIF
,